# बारामती नगरपालिका
# शताब्दिपूर्ती समाचार ग्रंथ

31776

Due D... Slip
Tuljaram Chaturchand C...ege Library, Baramati
ACC. No 31776 Call No. W, 63.448 ... M65
SATI
This book should be ret... d on or befo... ...r the last-date stamped below 10 Paise will be charg... or each day if ... the book is kept beyond that date.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

# बारामती नगरपालिका
# शताब्दिपूर्ती समाचार ग्रंथ

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

31776



१. श्री काळेमंदिरांतील दुर्गामाता   २. लक्ष्मीनारायण मूर्ती   ३. शाकंबरी देवी
४. श्रीपूर्णानंद महाराज समाधि   ५. महानुभाव मठातील मूर्ती

बारामतीचें विहंगमदृश्य



# बाराम पालिका
# शताब्दिपू माचार ग्रंथ

W.63,443:56, N65-MG5
SAH
Acc. No. [illegible] Chaturchand College, Baramati

## ग्रंथासंबंधी स्थूल माहिती

लेखक-श्री. श्री. म. सहस्रबुद्धे
मदतनीस-श्री. नि. श्री. कानिटकर (चीफ ऑफिसर)
श्री. नि. वि. काकडे (सेवानिवृत्त हेडक्लार्क व सर्व ऑफिस स्टाफ).
प्रकाशक-श्री. ज. पां. सातव (अध्यक्ष, बारामती नगरपालिका १९६७).
छायाचित्रे-श्री. शिंदे फोटोग्राफर, बारामती.
श्री. काळे, माणिक फोटो स्टुडिओ, बारामती.
मुद्रण-चित्रशाळा प्रेस, ५६२ सदाशिव पेठ, पुणे २.
प्रकाशनकाल-मे १९६७

* * *

बारामती नगरपालिका
शताब्दिपूर्ती समाचार ग्रंथ

## अनुक्रमणिका

(१) बारामती नगरपालिकेच्या इतिहासाची प्रारंभीची काही पृष्ठे
(२) थोडे प्रास्ताविक निवेदन
(३) ऐतिहासिक व भौगोलिक परिचय
(४) बारामतीतील काही हिरेमाणके
(५) नगरपालिकेच्या प्रतिनिधी मंडळाचा विकास
(६) नगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने
(७) नागरिकांच्या सुखसोयी व खर्च
(८) शहरचे आरोग्य व स्वच्छता
(९) शहरातील दोन दवाखान्यांची वाटचाल
(१०) प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय
(११) बहिःशाल व्याख्यानमाला
(१२) शहरविकास व नियोजन
(१३) नगरपालिकेच्या कारभारातील विविध छटा
(१४) आजच्या बारामतीचे काही शिल्पकार
(१५) पू. साने गुरुजी कथामाला, बारामती
(१६) बारामती नगरपालिकेचे आजपर्यंतचे सभासद
(१७) वार्षिक पर्जन्यमान दर्शविणारा तक्ता
(१८) नागरी जीवन : व्यक्ती व संस्था
(१९) शेती, व्यापार व उद्योगधंदे
(२०) जमेची व खर्चाची सदरे

मंदिरातील गजाननाची मूर्ति



कविवर्य मोरेपंत पराडकरांचे स्फूर्तिस्थान गणपती मंदिर व त्यामागें पेशव्यांचे सावकार बाबूजी नाईक यांचे वाड्याचा तट.



विठ्ठल-रखुमाई मूर्ती

टांकसाळे विठ्ठल मंदिर



गोव्याचे लोकप्रिय मुख्य मंत्री
नामदार श्री. दयानंद बांदोडकर



नामदार श्री. पु. ग. खेर नगर-विकास मंत्री
समारंभाचे अध्यक्ष



सांगली जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध पुढारी
श्री. वसंतदादा पाटील




बारामतीच्या वाढीचा नकाशा-नगर पालिकेत पाहावयास मिळतो.

# -: स्वागत पद्य :-

या ! आमुच्या दरबारी
स्वागतास ही प्रमुदित झाली द्वादशनगरी ।
इक्षु-तुऱ्यांनी धरली चवरी ।
द्राक्ष फळांची अवीट माधुरी ।
जल-नहरांनी किमया केली ।
पावन अपुल्या पदचिन्हांनी सकल धरा सोनेरी ॥ १ ॥

परदास्यातुन तिमिरामधले ।
स्वतंत्र जीवन हासत आले ।
फुलवित नंदन इथे प्रगटले ।
एकरूपता शोधत मिसळे महाराष्ट्र जीवनी ॥ २ ॥

युगायुगांच्या संस्कारांचा ।
महावृक्ष हा अनेक शतांचा ।
नजराणा घ्यावा शुभेच्छांचा ।
दिली सावली लाख जिवांना कनकाच्या मंदिरी ॥ ३ ॥

उदात्त भारत स्वातंत्र्याचा ।
त्याग शांतिमय महाराष्ट्राचा ।
हिमालयापरि; बाणा त्याचा ।
उदात्ततेने त्या तर ठेवू झळकत हृदयांतरी ॥ ४ ॥

वाक् सुमने उधळू सारी ।
हृदयी वसे ती कवीच्या परी ।
सरस्वतीचा मोरोपंत मुकुटमणी ।
काव्यफुलोरा इंद्रधनूच्या रंगापरि ॥ ५ ॥

पाइक आपण नव्या जगाचे ।
नित्य उपासक मानवतेचे ।
बघतो मोहक स्वप्न उद्याचे ।
सत्य पूजनी सुंदर होवो कला फुलांची नगरी ॥ ६ ॥

—नीळकंठ श्रीधर कानिटकर
चीफ ऑफिसर, बारामती
म्यु. पल, कौन्सिल.

# बारामतीवर्णनं शुभेच्छा च ।

शतवर्षा चाद्य जाता इयं नगरपालिका ।
तस्मान्महोत्सवश्चात्र क्रियते नागरैर्जनैः ॥ १ ॥
नगररस्यास्य वैशिष्ट्यं कस्मिन्कस्मिंश्च वर्तते ।
करिष्ये विनयेनाद्य संक्षेपेण निवेदनम् ॥ २ ॥
महाराष्ट्रे पुण्यदेशे धन्या बारामती पुरी ।
यत्र सिद्धेश्वरो देवः करोति वसतिं सदा ॥ ३ ॥
गणेशो वरदो देवः सांनिध्यं लभते पितुः ।
समीपं वर्तते देवी चतुर्देवैः समावृता ॥ ४ ॥
पौरेभ्यो जीवनं दातुं मलपाप – विनाशिनी ।
मन्दं मन्दं च वहति शान्ता शीता कऱ्हा नदी ॥ ५ ॥
विश्वेश्वरो महादेवः परे पारे च दृश्यते ।
श्रीधरस्वामिना तत्र शिवलीलामृतं महत् ॥ ६ ॥
रचितं मोक्षदं काव्यं लोकोद्धारार्थमेव च ।
अष्टोत्तरशतं कृत्वः येन रामायणी कथा ॥ ७ ॥
लिखिताऽसौ मयूरोऽपि न्यवसत्स महाकविः ।
अस्मिन्नेव पुरे तेन आर्यावृत्ते च भारतम् ॥ ८ ॥
संशयानां रत्नमाला कृता केकावलिस्तथा ।
नाइकानां कुले तेन पुराणकथनेन च ॥ ९ ॥
स्वोदरं पूरयित्वा च जना उद्धारिताः सदा ।
तेन ख्यातिं गता लोके पुरीयं सर्वदिक्षु च ॥ १० ॥
त्रयो विद्यालयाः सन्ति आङ्ग्लविद्याप्रदायकाः ।
महाविद्यालयश्चाऽपि भूषणं नगरस्य च ॥ ११ ॥
उन्मार्गगामि बालान्वै सत्पथे स्थापनाय च ।
संचालितं च सुजनैः ' रिमाण्ड होम ' वर्तते ॥ १२ ॥
बालानां सुखबोधाय अस्ति ' बालकमन्दिरम् ' ।
एवमियं पुरी जाता आगारं शिक्षणस्य च ॥ १३ ॥
तारायंत्र समानीतं विद्युता दीपिता पुरी ।
अग्निरथः प्रवासाय विद्यते सौख्यदः खलु ॥ १४ ॥

नगरं परित सन्ति क्षेत्राणि विविधानि च ।
कृत्रिमेण प्रवाहेण सस्यपूर्णानि सन्ति च ॥ १५ ॥
पुरा प्रसिद्धा नगरी गुडस्योत्पादनाय च ।
द्राक्षाफलानि स्वादूनि निर्मीयन्ते सहस्रशः ॥ १६ ॥
विविधानि प्रकाराणि वर्णाश्च विविधास्तथा ।
अमृतं लघुतां नीतम् एतैर्द्राक्षाफलैः खलु ॥ १७ ॥
क्षेत्रे क्षेत्रे च दृश्यन्ते इक्षुदण्डाश्च प्रोन्नताः ।
यन्त्राणि चालयित्वा च शर्करोत्पादनं कृतम् ॥ १८ ॥
जनानां भाषणं तेन जायते मधुरं खलु ।
उदारा धनिनः सन्ति कुबेरो लज्जितो भवेत् ॥ १९ ॥
बन्धुभावेन वर्तन्ते लोकाः बारामतीपुरे ।
न धर्मविषये जातः कलहो यत्र कुत्रचित् ॥ २० ॥
परधर्मसहिष्णुर्वै समाजः खलु वर्तते ।
चित्तं च मोदते तेन दृष्ट्वा चैवंविधं पुरम् ॥ २१ ॥
जलं च विपुल भूयात् धनं धान्यं तथैव च ।
स्वच्छाश्च सर्वे मार्गाः स्युः प्रेक्षणीयं पुरं भवेत् ॥ २२ ॥
सद्भावो वर्धतां नित्यं स्वेच्छानि च मनांसि च ।
स्वधर्मनिरताः लोकाः प्राप्नुयुर्वाञ्छितं फलम् ॥ २३ ॥
निरामयाः सदा लोकाः सुखिनः सन्तु ते सदा ।
स्वोत्कर्ष प्राप्नुयुः सर्वे मा केचिदुःखमाप्नुयुः ॥ २४ ॥
यथा मुम्बापुरी लोके यथा पुण्यं च पत्तनम् ।
तथा बारामती चेयम् ख्यातिं लोकेषु गच्छतु ॥ २५ ॥

**पांडुरंग विनायक दामले**
**एम्. ए. एम्. एड्. पराडकर वाडा**
**बारामती**

# थोडे प्रास्ताविक निवेदन

बारामती नगरपालिका स्थापन झाल्याला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने तयार केलेली ही ' समाचार पुस्तिका ' सादर करताना मला खूप आनंद होत आहे.

वास्तविक नगरपालिका स्थापन झाल्याला १ जानेवारी १९६५ ला १०० वर्षे पूर्ण झाली. हा सुयोग योग्य प्रकारे साजरा करावा, अशी पूर्व सूचना नगरपालिकेच्या कार्यालयाने जवळ जवळ १॥ वर्षे अगोदर दिली होती.

वेळेवर आलेल्या ह्या सूचनेचा कालांतराने विचार होऊन १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक ग्रंथ तयार करण्याकरिता एक समिति नेमण्यात आली. बारामती कॉलेजचे त्या वेळचे प्राचार्य डॉ. ए. ए. पाटील हे त्या समितीचे अध्यक्ष होते व पुढील सदस्य होते :—

शताब्दि सत्र कमेटी सभासद :—

(१) मा. मा. तु. शाह
(२) मा. का. सि. सोनवले.
(३) मा. श्री. स. सोनवणे.
(४) मा. य. कों. सोनवणे.
(५) मा. रा. के. रासकर.
(६) मा. कृ. दां. सोनवले.
(७) मा. भा. आ. काटे.
(८) मा. बा. आ. कल्याणकर
(९) मा. सौ. वसंतमाला व्होरा
(१०) मा. स. बा. गालींदे ( उपाध्यक्ष )
(११) मा. वि. रा सोनवले ( अध्यक्ष )

नगरपालिकेच्या इच्छेप्रमाणे हे काम तेव्हा सुरू झाले, पण तडीस गेले नाही.

पुढे दीड दोन वर्षांत काय झाले व हे काम का झाले नाही, याबद्दल निरनिराळ्या गोष्टी सांगता येतील. ते नमूद केल्याने मुख्य कार्यभाग काहीच होणार नाही. एकाच बाबतीत मतैक्य होईल, आणि ती बाब म्हणजे कार्य तडीस गेले नाही, ही होय.

अध्यक्षपदाची सूत्रे माझ्याकडे आली, तेव्हा पुनः एकदा शताब्दिपूर्ती—समारंभ साजरा करण्याच्या प्रश्नाला चालना देण्याचा प्रयत्न झाला, आणि सर्व सहकार्यांनी मला या कामी पाठिंबा दिला, हे नमूद करण्यास मला मोठे समाधान वाटते.

आता जवळ जवळ दोन वर्षे जास्त झाली असता, हा समारंभ करण्याचे एक समर्थन असे होऊ शकेल की, वाढदिवस वाढत्या दिवसाने साजरा करावयाचा असतो.

नगरपालिका शंभर वर्षांची झाली, म्हणून जो समारंभ करावयाचा त्यात एक पुस्तक तयार करणे ही कल्पना होती. ती कशी साध्य करावी याचा विचार करताना, लेखनासाठी जाहिरात देऊन अर्ज मागवावेत हे योग्य दिसले. ह्या जाहीर आवेदनाला फक्त दोनच व्यक्तींनी साद दिली. त्या व्यक्ती म्हणजे बारामतीतले एक सन्माननीय समाजसेवक श्री. हरि पिराजी धायगुडे आणि मुंबईचे एक पत्रकार श्री. श्रीपाद महादेव सहस्रबुद्धे.

श्री. सहस्रबुद्धे यांना अशा कामाचा अनुभव आहे, ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात घेऊन त्यांच्याकडेच लेखनाची कामगिरी सोपविली. ती त्यांनी कशी पार पडली, हे वाचकांनी ठरवावयाचे आहे. माझ्यापुरते मला असे आग्रहाने सांगावेसे वाटते की, त्यांनी परिश्रमपूर्वक हे काम वेळात वेळ काढून केले आहे.

ही कामगिरी हाती घेताना श्री. सहस्रबुद्धे यांनी व्यवहाराच्या गोष्टीबरोबर एक विशेष उल्लेख केला होता. बारामती नगरपालिकेचे एक थोर माजी सेक्रेटरी व महाराष्ट्रातले थोर साहित्यिक श्री. महादेव नारायण सहस्रबुद्धे यांचे ते चिरंजीव आहेत. बारामतीशी जो प्रदीर्घ कालाचा संबंध आला, त्यासाठी हे काम केल्याने आपल्याला विशेष समाधान लाभेल असे ते म्हणाले. त्यांचे हे म्हणणे उचित असेच होते, ही गोष्ट आम्हा सर्वांना पटली.

श्री. सहस्रबुद्धे यांनी ही कामगिरी पत्करली, पण हे एकट्याचे काम नाही, असे त्यांनी प्रथमच सांगितले. नगरपालिकेचे सेवानिवृत्त हेडक्लार्क श्री. नी. वि. काकडे यांनी गेल्या १०० वर्षांतील



कागदपत्र व दप्तरे पाहून निरनिराळ्या विषयांची जंत्री तयार केली होती. ती श्री. सहस्रबुद्धे यांना फार उपयोगी पडली, हे त्यांनी अत्यंत सहृदयतेने मान्य केले आहे. चीफ ऑफिसर श्री. नी. श्री. कानिटकर व त्यांचे सर्व सहकारी यांनी त्यांना हरतऱ्हेने मदत केली. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कारकून श्री. बा. लिं. गोंजारे यांचीही उपयुक्त मदत त्यांना झाली आहे.

या ग्रंथाचे तयारीत अनेकांचे सहाय्य झाले. बारामतीतले नागरिक श्री. शां. धों. लल्गुणकर, पत्रकार श्री. अब्दुलगनी अत्तार, श्री. वाय्. एस. कानिटकर, श्री. रा. ग. घारपुरे, वकील इत्यादींनी विविध माहिती सांगितली. गावातल्या संस्थांनीहि सर्व प्रकारचे सहकार्य दिले. याखेरीज सरकारी गॅझेटियरचे संपादक श्री. पी. सेतु माधवराव पगडी, त्यांचे एक सहकारी, डॉ. बी. जी. कुंटे, प्राध्यापक श्री. न. र. फाटक, मुंबई विद्यापीठाचे रेक्टर श्री. जी. डी. पारीख, मुंबईचे श्री. दा. वि. जोशी इत्यादि व्यक्तींनी ऐतिहासिक भाग सजविण्याला निरलसपणे मदत केली आहे. या सर्वांबद्दल आम्ही कृतज्ञता नमूद करतो.

ह्या छोट्या पुस्तकाचे नांव काय ठेवावे, असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा ' बारामती नगरपालिका शताब्दिपूर्ती समाचार ' हे शीर्षक समर्पक होय असे वाटले. चालू शतकाच्या प्रारंभी बारामतीत एक साप्ताहिक निघत असे. ह्याचे नाव होते, ' बारामती समाचार. ' त्याचे शिरोभागी पुढील आर्या होती :—

" बारामतीत होई वणिजांचा उद्यमार्थ संचार
घेउनि वृत्त तयांचे आला बारामती समाचार "

ही गोष्ट लक्षात घेता, या पुस्तिकेला ' बारामती नगरपालिका शताब्दिपूर्ती समाचार ' असे म्हणणे उचित होय.

हा समाचार तयार करताना, इतर नगरपालिका भगिनींचे जे इतिहासग्रंथ तयार झाले आहेत, त्यापैकी काही अवलोकन करून ह्या कामाचा साचा ठरविला आहे. या बाबतीत निरनिराळ्या व्यक्तींची निरनिराळी मते असू शकतील. आतापर्यंतच्या कामाचे सर्वसाधारणपणे सामान्य स्वरूप दाखविण्याचा यात प्रयत्न केला आहे. हा ' समाचार ' म्हणजे ' रोजनिशी ' नव्हे हे मुद्दाम सांगणे अवश्य आहे. ठळक ठळक गोष्टी ग्रथित केल्या आहेत.

बारामती नगरपालिकेच्या गेल्या १०० वर्षांतील कामानंतर नागरिक समाधानात आहेत काय ? या प्रश्नाचे होकारात्मक उत्तर देणे अशक्य आहे. वाढत्या वयाबरोबर व्यक्ती थकते, अकार्यक्षम होते. सार्वजनिक संस्थेचे तसे नाही. विविध अनुभवांचे उन्हाळे-पावसाळे खाऊन संस्था अधिक सुदृढ होते, प्रौढ होते. बारामती नगरपालिका ह्या सर्वसामान्य समजुतीला अपवाद असण्याचे कारण नाही. असमाधानातूनच पुढच्या प्रगतीची पाउले जन्मास येतात हे खरे नाही काय ?

पुढची वाटचाल करताना ज्या अडचणी व उणीवा असतील त्या दूर करण्यासाठी शासनाने कायद्याची एक नवी संहिता तयार केली आहे. त्यातल्या सगळ्याच तरतुदी सगळ्यांना सारख्याच आवडतील असेहि नाही. पण आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेऊन तयार केलेले हे एक विधेयक आहे. त्यायोगे नगर संस्थांची चांगली वाढ होऊन नागरिकांचे हित साधेल, अशी अपेक्षा आहे.

या नवीन कायद्यान्वये पहिली सार्वत्रिक निवडणूक लवकरच होणार आहे. जुन्या कायद्याने अस्तित्वात आलेल्या ' बोर्डा ' ला ह्या नवीन कायद्याचे ' कौन्सिल ' म्हणून वारसदार व्हावे लागले आहे.

अशा ह्या संधिकाळात हा समारंभ होत आहे.

सर्वांचा प्रतिनिधी म्हणून अध्यक्षपदाची असलेली सूत्रे लवकरच मी खाली ठेवणार आहे. यावेळी एक वैयक्तिक समाधान प्रगटपणे व्यक्त करण्याची मी संधी घेतो. माझे वडील श्री. पांडुरंग केदारी सातव हे ह्या नगरपालिकेचे एक सभासद होते. जवळ जवळ १४-१५ वर्षे त्यांचा नगरपालिकेशी संबंध होता. मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन ते दोनदा होते. तसेच शिक्षण समिती व बांधकाम समिती यांचेहि ते अध्यक्ष होते. (इ. स. १९११ ते १९२५) माझे एक चुलत भाऊ श्री. धोंडिबा आबाजी सातव यांनी माझ्या अगोदर हे अध्यक्षपद १२ वर्षे विभूषित केले आहे. त्यांचे लोकप्रिय 'कारभारी' हे टोपण नाव त्यांनी सार्थ केले आहे. इतर कुटुंबीयहि नगरपालिकेचे सभासद या नात्याने सेवक आहेत. त्या परंपरेचा वारसा मी यथामती पुढे नेला आहे.

अशा रीतीने आतापर्यंत सर्वांच्या सहकार्याने व सदिच्छेने झालेले काम, मी जनताजनार्दनाच्या चरणी नम्रपणे व सेवाभावाने अर्पण करतो. ही कामगिरी गोड करून घ्या, असे मी माझ्या वतीने व माझ्या सहकाऱ्यांचे वतीने प्रार्थितो व हा समाचार सादर करितो.

आपला नम्र
**ज. पां. सातव**
अध्यक्ष बारामती
म्युनिसिपल कौन्सिल

---

## श्री. जयराम पांडुरंग सातव

### अध्यक्ष बारामती म्युनिसिपल कौन्सिल यांचे स्वागतपर भाषण

अध्यक्ष माननीय श्री. पु. ग. खेर नगर–विकास मंत्री, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील, सौ. शालिनीबाई वसंतराव पाटील सन्माननीय पाहुणे माननीय नामदार श्री. दयानंद बांदोडकर मुख्य मंत्री, गोवा, अधिकारी वर्ग व नागरिक बंधू–भागिनी, नगरपालिका सेवक वर्ग.

आमच्या विनंतीस मान देऊन आज बारामती नगरपालिकेच्या शताब्दिपूर्ती–समारंभास गोव्याचे मुख्य मंत्री माननीय श्री. दयानंद बांदोडकर ऊर्फ भाऊसाहेब, तसेच नगर–विकास मंत्री नामदार श्री. पु. ग. खेर व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील, सौ. शालिनीबाई वसंतराव पाटील, हे उपस्थित राहिले आहेत. आपणातर्फे प्रथम मी त्यांचे हार्दिक स्वागत करतो. बारामती-करांचा परिचय त्यांना करून देण्याची संधी मिळाली, ह्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

नगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत अनेक नामवंत पुढारी, देशभक्त, नामवंत राजकारणी समाज व साहित्यकारणी लोकांनी भेटी दिल्या व त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ बारामतीकरांस झालेला आहे. परंतु आजच्या समारंभाचे महत्व कांहीं आगळेच आहे. राजकीय रंग मंचकावरील हालचालींच्या पार्श्व- भूमीवर रंग निरपेक्ष सामाजिक समारंभाचे वैशिष्ट्य विशेषत्वानेच जाणवते. महारथी कर्णासारखे औदार्य असणारे व लाखो जिवांचे पोशिंदे सर्व प्रान्ताचा कायापालट करणारे गोव्याचे शिल्पकार श्री. भाऊसाहेब आजच्या समारंभास मुख्य पाहुणे म्हणून लाभले, हे आम्ही आपले परमभाग्य म्हणून समजतो. ह्या समारंभासाठी नामदार श्री. पु. ग. खेर, नगर विकास मंत्री यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची आम्ही विनंती करताच ती त्यांनीं मान्य करून आपणास उपकृत केले आहे. नगरपालिका हे त्यांच्याच खात्याचे एक अंग आहे. व त्यांना नगरपालिकेच्या शताब्दि समारंभाचे अध्यक्ष ह्या नात्याने जवळून नगरपालिकेच्या शंभर वर्षांच्या कार्याचे सिंहावलोकन करण्याची संधि मिळाली हेहीं एक नगराच्या पुढील प्रगतीच्या दृष्टीने सुचिन्ह म्हणावयास हरकत नाही. त्याचप्रमाणे नगरातील स्वातंत्र्यस्तंभाचे हुतात्म्यांच्या स्मारकाचे उद्घाटन स्वातंत्र्य सैनिक श्री. वसंतरावदादा पाटील अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी, ह्यांच्या हस्ते करून घेण्याचे सद्भाग्य लाभले. अशा रीतीने हा समारंभ–सोहळा त्रिवेणी संगमाने पावन होत आहे.

बारामती नगराचा परिचय गद्यरूपात सविस्तर व पद्यरूपात सारांशानें स्मारक ग्रंथात नमूद केलेला आहे.

कार्यांचा विस्तृत वृत्तान्त साकल्याने आपणापुढे जनतेच्या सिंहासनासमोर ठेवणे हे आम्ही आपले ह्या समारंभाचे निमित्ताने कर्तव्य समजतो. त्या कार्यांचे मोजमाप, मूल्य आपण परीक्षकांनी ठरवावयाचे आहे.

'शंभरावा वाढदिवस!' केवढी अभिमानाची व आनंदाची गोष्ट! वाढदिवसाची कल्पनाच किती किती मनोरम व मुलायम आहे. काळावर विजय मिळवीत घालविलेल्या व्यक्ती-जीवनातील छोटे परिमाण आपण एक वर्ष समजतो. कारण व्यक्ती-जीवनाला कमाल १०० वर्षांची मर्यादा असते. परंतु संस्थेचे जीवन अखंड व अमर्याद आहे. स्वैर क्रीडा करणाऱ्या काळाशी झुंज देत मानव काय किंवा संस्था काय, आपली कार्यक्रमणा करीत असतात. आयुष्यांतील एकेक वर्षाचा टप्पा याच कारणासाठी मोठ्या अभिमानाचा व उत्सवाचा मानला जातो. एका व्यक्तीचा वाढदिवस जर मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो तर अनेक व्यक्तींच्या परिश्रमावर व आस्थेवर जगणाऱ्या संस्थेच्या आयुष्यातील शताब्दिपूर्तीचा हा टप्पा विशेषच बहुमोलाचा का न मानावा? ह्या निमित्ताने गत जीवनाचे सिंहावलोकन करून आपली कुवत व ताकद लक्षात घेऊन पुढील जीवनातील ध्येय-धोरणे व लक्ष्य केंद्रित करणें सुलभ होणार नाही काय?

भारतीय परंपरेप्रमाणे व श्रद्धेप्रमाणें जीवनात शंभरी गाठणे, ही एक महत्त्वपूर्ण बाब समजलेली आहे. आपली नगरपालिका शतायू होऊन भविष्यात पदार्पण करीत आहे व तिच्या जीवनातील हा अत्यंत आनंदाचा व मंगल प्रसंग आहे. कर्मधर्मसंयोगाने हा समारंभ सभासद व पदाधिकारी ह्या नात्याने आम्ही आपणा सर्वांतर्फे साजरा करीत आहोत. ह्याचे उत्तरदायित्व व श्रेय केवळ आमच्याकडेच नाही तर ते मागील पिढ्यांचे व सर्व जनतेचे आहे. ह्याची आम्हास पूर्ण जाणीव आहे. इतके प्रास्ताविक निवेदन करून व पुन्हा एकदा सर्व पाहुण्यांचे व आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करून समारंभाचे पुढील कार्यक्रमास सुरवात करावी अशी मी माननीय अध्यक्ष महाशयांना विनंति करतो.

---

# बारामती

## ऐतिहासिक व भौगोलिक परिचय

बारामती हे गाव महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यात बारामती तालुक्याचे मुख्य केंद्र म्हणून सध्या प्रसिद्ध आहे. त्या तालुक्याला पूर्वी भिमथडी तालुका असे सरकार-दप्तरी नाव होते. हे नामाभिधान ता. २३-१-१८६७ च्या सरकारी ठरावाने ठरले. प्रथम बारामती इंदापूर विभागातच होते. भीमा व नीरा या नद्यांचे दरम्यानचा प्रदेश या अर्थाने भिमथडी हे नाव पडले. गंगथडी, भिमथडी असे म्हणण्याचा पूर्वीपासूनचा प्रघात आहे. भिमथडीची तट्टे अटकेपार नेली असा उल्लेख राघोबादादांचे संबंधी बोलताना अभिमानाने केला जातो.

बारामती गावाचे स्वाभाविक दोन भाग पडतात. कऱ्हा नदीने हे दोन भाग पाडले आहेत. ही नदी येथे उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते. हा गाव प्राचीन काळापासून कसबा म्हणजे आठवड्याच्या बाजाराचा गाव म्हणून प्रसिद्ध आहे.

उत्तर अक्षांश १८°-१०' व पूर्व रेखांश ७४°-३९'. अशा भौगोलिक स्थळात हे गाव वसलेले आहे. पुण्याहून सरळ आग्नेय दिशेस ५० मैलांवर बारामती आहे. पुणे जिल्ह्याचा आकार देशी लाकडी नांगरासारखा दिसतो. ह्या दृष्टीने बारामती तालुका हा फाळ बसविण्याचे लाकडी टोक असे म्हणता येते. बारामती तालुका हा सह्याद्रीच्या पूर्व-पश्चिम रांगा संपून त्यांना दक्षिणोत्तर बांध घालणारा जो पूर्वेकडे उतरत जाणारा सपाटीचा प्रदेश लागतो, त्याच्या सुरुवातीच्या भागात आहे. मूळ सह्याद्रि रांगेपासून हा प्रदेश ६० मैल अंतरावर आहे. यामुळे पूर्वकाळापासून कऱ्हेपठार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात बारामतीचा समावेश आहे.

या पठाराची स्वाभाविक रचना बहुधा सर्वत्र सारखी आहे. पृष्ठभाग ६ इंचापासून १ ते १॥ फुटापर्यंत हुरमूस मिश्रित काळ्या मातीचा आणि त्याखाली खोल असा मुरमाचा थर, व त्याहि खाली पक्का काळा दगड अशी रचना आहे. कऱ्हेच्या दोन्ही काठांवर कोस दोन कोस रुंदीच्या पट्ट्यांत सोरा हा क्षार असल्यामुळे ही जमीन विशेष बागाइतीला प्रतिकूल आहे. पण सभोवती चर खणून फाजील पाण्याचा निचरा केल्यास खोल काळ्या जमिनीपेक्षा ही जमीन बागायतीला अनुकूल आहे. आधुनिक मशागत पद्धतीने आता सर्व प्रकारची बागायत या भागात होते; आणि सर्व महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व भारतात एक अग्रगण्य बागायत भाग म्हणून बारामती गाव ख्यातनाम झालेला आहे.

बारामतीच्या सभोंवार उत्तम शेत-जमीन, विशेषेकरून पश्चिम भागात आहे. पूर्वकाळी पाण्याच्या अभावी बागायत हे खर्चाचे काम असल्यामुळे साधारण शेतकऱ्याच्या ती आटोक्याबाहेरच होती. नीरा कॅनॉल इ. स. १८८६ मध्ये झाल्यावर ही परिस्थिति बदलली. कोरडवाहू जमीन असे स्वरूप होते. सर्व प्रदेश वैराण होता. इंग्रज सेनापती कॅप्टन मूर याने इ. स. १७९२ मध्ये स्वतः पाहून गावापासून १ मैलावर उत्तम बाग असल्याचे नमूद केले आहे. हा बाग नाईकांचा मोतीबाग म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि या भागात झाडी कमीच होती, असे साधारण म्हणता येते. बारामती नगरपालिका इ. स. १८६५ मध्ये स्थापन झाल्यावर एक असा ठराव झाला की,

तांदुळवाडी वेशीबाहेर कमेटीने सर्वे नंबर १ लिलावात खरेदी घेतला आहे. त्यात २५ नवीन झाडे माती घालून लावावीत. कारण या गावास झाडे कमी व कोणी साहेब लोक उतरणेस आले म्हणजे नीट नाही, तरी ही उतरणेस उपयोगी पडावी, अशा बेताने झाडे लिंब किंवा नांदुर्की अगर पिंपरी वगैरे छायेची लावणेस व त्यास रु. १०० पर्यंत कसोशीने खड्डु वगैरे खणून पाणी

घालणेची तजवीज मॅनेजिंग कमेटीने करावी. (२३।३।१८७४ चा ठराव).

या पुढेहि वेळोवेळी झाडे लावून बाग करण्याचे आदेश दिले गेले. रोपट्यांना कुंपण करताना जिवंत वनस्पति वापरू नयेत अशा सूचनाहि दिल्या गेल्या.

नीरा नदीच्या पश्चिम बाजूने काढलेला कालवा या भागात आला, तेव्हापासून परिस्थिती पुष्कळ बदलली आहे. भिमथडीच्या दक्षिण भागाच्या मध्यातून पूर्व-पश्चिम असा हा कालवा खणला गेला. बारामतीच्या नैर्ऋत्य, उत्तर आणि वायव्य दिशांनी हा कालवा वाहतो. शेतजमिनीला फायदा या कालव्याने झालाच. पण कऱ्हेच्या पश्चिम तीरावर वसलेल्या विभागाच्या माथ्यावरून कालवा गेल्यामुळे, त्या भागातील विहिरींना पाण्याचा भरपूर पुरवठा होऊ लागला. सुदैवाची गोष्ट अशी की, कालवा उंचीवरून जात असूनही जमिनीच्या टणकपणामुळे गावाच्या नुकसानीला तो कारणीभूत झालेला नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे हा गांव देश भागात वसला असल्याकारणाने पाऊस कमी व उन्हाळा जास्त या स्वरूपाच्या हवामानाला भिमथडीपासून आरंभ होतो. येथून अगदी जवळचा डोंगर म्हणजे दक्षिणेस २० मैलांवर असलेला शंभु महादेवाचा डोंगर होय. पाऊस ओढून घेण्याला तो पुरेसा नाही. अशा स्थितीत हवामान उष्ण नाही व फार थंडहि नाही असे राहते. वैशाखाचे अखेरीस उष्णतामान जास्तीत जास्त ११२ डिग्री होते व पौषात थंडी कमीत कमी ४२ डिग्रीपर्यंत असते. पावसाचे मानही याबरहुकूमच आहे. गेल्या ५०-६० वर्षांत पर्जन्यमानात विशेष फरक झालेला नाही. सरासरी पर्जन्यवृष्टि २०.०२ इंचांपर्यंत आहे. डिसेंबर ते मेपर्यंत २.३५ इंच, जून ते सप्टेंबर १३.३० इंच आणि ऑक्टोबर नोव्हेंबर ह्या महिन्यात ४.३७ इंच असा सर्वसाधारणपणे पाऊस पडतो. पावसाचे असे ३२।३३ दिवस सबंध वर्षात असतात.

बारामती गावाबद्दल मुसलमानी अमलाच्या पूर्वीचा उल्लेख प्रस्तुत लेखकाला अजून मिळालेला नाही. तथापि या गावात कऱ्हेच्या पश्चिम तीरावर श्रीकाशीराजाचे शिवालय आहे. त्याच्या रचनेवरून हे मंदीर इ. स. ७०० पासून ९०० पर्यंतच्या काळात बांधले गेले असावे, असा कयास आहे. देवालयाच्या समोर सुमारे १½ फूट चौरस अशा शिळेवर कोरलेले राशिचक्र आहे. त्याचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे. त्यावरून देवालयाचा काल ठरविता येतो, असे पुराणतत्त्व इतिहासज्ञांचे मत आहे. देवगिरीच्या यादवांच्या राज्यात हा भाग होता. बारामती पासून ४ मैलांवर मालेगाव येथे यादव घराण्यातील एक शाखा मुसलमान पूर्व काळापासून अम्मल चालवीत होती. त्याबाबत सविस्तर उल्लेख पुढे येणार आहे.

यादवांच्या सत्तेचा लोप झाल्यानंतर महाराष्ट्रात जी निरनिराळी मुसलमानी राज्ये स्थापन झाली, त्यापैकी कुलबुर्गाच्या बहामनी राज्यात प्रथम बारामती सामील झाली. त्या राज्याचा प्रधान मलिक उल् तुजार महंमद गवान याने दिलेल्या एका कौलनाम्यावरून हे सिद्ध होते. सदरहू कौलात जुन्नर, चाकण, पुणे, सुपे, शिरवळ, बारामती व इंदापूर या परगण्यांत पूर्व रिवाजाप्रमाणे बिनहरकत वहिवाट करण्याचा परवाना कुमाजी केवराजी देशमुख यास मिळाला आहे. यानंतर प्रथम आदिलशाहीत बारामतीचा संबंध पोचतो. पुढे इ. स. १६०३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आजे मालोजीराजे भोसले यांना अहमदनगरच्या निजामशहाने 'राजे' हा किताब, पंचहजारी मनसब व फौजेच्या खर्चास चाकण, पुणे, सुपे हे परगणे आणि इंदापूरची देशमुखी वगैरे सरंजाम दिला. याप्रमाणे भोसले वंशाच्या ताब्यात बारामती आली आणि या प्रथमच्या जहागिरीचे पुढे छत्रपतींच्या कर्तृत्वाने स्वराज्य झाले.

मालोजी राजांच्या नंतर शहाजी राजे यांच्या कारकीर्दीत या प्रदेशाची तसनस आदिलशाहीचा सरदार रायाराव याने केली होती. ती त्याची बंडाळी मोडून पूर्ववत् स्थिती घडविण्याचे कार्य शहाजी राजे यांनी केले. या सुमारास सुपे परगण्याचे म्हणजे ज्यात बारामतीचा समावेश होत होता, त्या भागाचा देशमुख सामराज काटे हा होता, व तर्फ बारामतीचा ठाणेदार



हणमंतराव हा होता. शहाजी राजांचा अम्मल येथे स्थिर झाल्यावर बारामती स्वतंत्र परगणा बनविला गेला आणि त्याचे व्यवस्थेसाठी सुप्याचे काटे देशमुख व देशपांडे घराण्यातील एक शाखा बारामतीस स्थापन केली गेली.

शके १५६१ मध्ये शहाजी राजांनी काटे देशमुखापैकी धर्माजीराव काटे यांना चार चावर जमीन इनाम दिल्याचा उल्लेख सापडतो. अहमदनगरच्या निजामशाहीला सावरण्याचा शेवटचा प्रयत्न शहाजी राजांनी केला, तेव्हा मोगलांच्या फौजेशी मुकाबला करताना शहाजी राजांना बारामतीवरून जावे लागले होते (इ. स. १६३६). शहाजहानाचा एक सरदार खान जहान याच्याशी लढाई देताना शहाजी राजास बारामतीकडे यावे लागले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कारकीर्दीत बारामतीचा कारभार दादोजी कोंडदेव यांचे देखरेखीखाली चालू राहिला. छत्रपती संभाजी महाराजांच्या निधनानंतर भोसलेशाहीच वतीने माळेगांवकर जाधवरावांचे पूर्वज व मराठेशाहीचे सेनापती धनाजी जाधवराव यांनी पुढारीपण घेऊन औरंगजेबाशी टक्कर दिली. त्या कालात ही व्यवस्था काही काळ बदलली होती. दिल्लीच्या मोगलांचा अंमल येथे सुरू झाला होता. त्याचे प्रत्यंतर औरंगजेबाने बारामती येथील पीर चांदशावलीच्या दर्ग्याला दिलेल्या इनामतीच्या सनदेत दिसून येते. सदर कावरची सनद मिळविण्याचा प्रयत्न केला, पण त्यास यश आले नाही.

औरंगजेबाचे मृत्यूनंतर बारामती पुन्हा स्वराज्यात आली आणि दुसऱ्याच एका संदर्भात, त्या वेळच्या राजकीय घडामोडीशी बारामतीचा निकटचा संबंध आला. शाहू महाराजांनी मुक्तता झाल्यावर अहमदनगर येथे राहून स्वराज्याची जुळवाजुळव केली, तेव्हा काशीचे सावकार सदाशिवराव जोशी यांना आपल्याबरोबर आणले होते. सदाशिवराव जोशी हे त्या काळी काशीला नामांकित सराफ व सावकार होते. त्यांचा श्री शाहू महाराजांना फार उपयोग झाला होता. ताराबाई पक्षाशी काही काळ कटकटी झाल्यानंतर शाहू महाराजांची सत्ता स्थिर झाली, तेव्हा त्यांनी सदाशिवराव जोशी यांचे बंधु कृष्णराव यांस आपल्या राज्याचे खजीनदार नेमले. कृष्णरावांनी बारामतीला वस्ती करण्यास सुरुवात केली. कृष्णरावांचे पश्चात सदाशिवरावांचा पुत्र बाबुजी याला खजीनदारी मिळाली होती.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत बारामती अशा प्रकारे महत्त्व पावली. हे तिचे वैभव सुमारे ६० वर्षे टिकले. स्वराज्य अस्तास गेल्यावर इ. स. १८३९ पासून इथे इंग्रजी अंमल सुरू झाला. कालव्याचे पाणी येऊन बागायत वाढली. या मधल्या काळात बारामतीचे विशेष असे काही महत्त्व नव्हते. बारामतीची वाढ म्हणजे बारामतीला स्थानिक स्वराज्य संस्था इ. स. जानेवारी १८६५ मध्ये स्थापन झाल्यापासूनचा काळ होय असे स्थूल मानाने म्हणता येईल. या अगोदरच्या वैभवशाली कालखंडावर जरा विस्ताराने उल्लेख पुढच्या प्रकरणात करण्याचे योजिले आहे.

# बारामतीतील काही हिरेमाणके

बारामती नगरपालिकेच्या शताब्दिपूर्तीचा धावता आढावा घेताना ह्या गोष्टीची आवश्यकता काय आहे असे म्हटले जाणे साहजिक आहे. उज्ज्वल भूतकाळ हा भावी पराक्रमाची कूस असतो, या न्यायाने ह्या गतगोष्टींची आठवण असणे अवश्य आहे. त्या निवेदनाला मर्यादा ही असणारच. ही काही त्या घटनांची सविस्तर नोंद नाही. नगरपालिकेच्या कारभारांतील एका कामावरून ही कल्पना स्पष्ट करता येईल. नगरपालिका रस्त्यावर दिवे लावते, ते प्रकाश पाडण्यासाठी की दिशा दाखविण्याकरिता ? नगरपालिकेचे दिवे हे रस्त्याची दिशा दाखविण्यापुरतेच आहेत, असा एक पक्ष आहे. त्याचप्रमाणे हे निवेदन त्या महान् कालखंडाकडे अंगुलिनिर्देश करीत आहे, इतकेच समजावे. थोर साहित्यादिकांनी जो ज्ञानसंचय ग्रंथरूपाने केला त्यातून काही कावडी येथे आणल्या आहेत. त्याचा उद्देश इतकाच की, मूळ जलाशयाकडे जाऊन प्राशन करण्याची पिपासानिर्माण व्हावी.

हे निवेदन करताना कालखंडाचे दृष्टीने बरेच मागे गेले पाहिजे. शहाजी राजांनी पुणे प्रांती पराक्रम केले, त्यामुळे बारामती उजेडात आली. पण भक्तिमार्गातील देदीप्यमान तारा यापूर्वीच येथे महान तेजाने चमकला. बारामतीचे नाव चिरस्मरणीय करण्याइतकी कामगिरी त्याने येथे केली. ‘ शिवलीलामृत ’ या नावाने सर्व महाराष्ट्रांत आबालवृद्धांना आदरणीय झालेला ग्रंथ बारामतीला लिहिला गेला आहे. श्रीधर कवीने तो कऱ्हेच्या काठी बसून लिहिला, हे आज फारच थोड्यांना माहीत आहे. ही गोष्ट श्रीधराने केलेल्या उल्लेखावरून स्पष्ट होते.

शिवलीलामृताच्या चौदाव्या अध्यायाचे शेवटी १२ व १३ ओव्या अशा आहेतः—

शके सोळाशे चाळीस ।
विलंबी नाम संवत्सरास ॥
शुक्ल पौर्णिमा फाल्गुन मास ।
रविवारी ग्रंथ संपविला ॥ १२ ॥

ब्रह्मकमंडलूच्या तीरी ।
द्वादशमती नाम नगरी ॥
आद्यंत ग्रंथ निर्धारी ।
तेथेंच झाला जाणिजे ॥ १३ ॥

यावरून श्रीधराने हा ग्रंथ बारामतीला लिहिला व सर्वच लेखन इथे झाले हे स्पष्ट होते. ही सर्व रचना श्रीधराने कसब्यातील श्रीकाशीविश्वेश्वराच्या मंदिरांत बसून केली अशी आख्यायिक आहे. चित्ररूप विभागांत सदर देवालयाचा फोटो आहे. श्रीधराचा जन्मकाल शके १५८० च्या आसपास असावा, असे आता जाणकारांनी ठरविले आहे. त्याचा जन्म नाझरेकर घराण्यातला. मोगलाईत चौसाले महालात खडकी येथे ते घराणे रहात असे; म्हणून त्यांना खडकेही म्हणतात. नाझर महालाचे देश कुलकर्ण मिळून हे घराणे नाझरेकर झाले. श्रीधरानीच म्हटले आहे की,

“आम्ही ‘खडके,’अमुची कीर्तनगंगा असे पुरातन हो ।
भावे श्रवण करी जो वास कदा त्यास यमपुरात न हो ॥”

श्रीधराच्या वडलांचे नांव ब्रह्मानंद व आईचे नाव सावित्री असे होते. वडिलांचे कडून गुरुमंत्र घेण्याची या कुटुंबात प्रथा होती. त्याप्रमाणे ब्रह्मानंद हे आपले गुरु असा उल्लेख श्रीधराने केला आहे. ब्रह्मानंद नाझरहून पंढरपुराला गेले व तेथेच समाधिस्थ झाले.

श्रीधराने लिहून ठेविले आहे की,

श्रीधर म्हणे पंढरीये भीमातटीं ।
स्वामी माझा वाळवंटी ॥
समाधिस्थ जगज्जेठी ।
ब्रह्मानंद यतिराज ॥

हरिविजय, रामविजय, वेदान्तसूर्य, पांडवप्रताप, शिवलीलामृत हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. श्रीपंढरीमाहात्म्य व मल्हारी विजय, हीही त्यांची काव्ये आहेत. जैमिनी अश्वमेध, ध्रुव–चरित्र अशी ही रचना त्याने केली. राधाविलास व तत्त्वगीता ही



त्यांची संस्कृत रचना अप्रसिद्ध आहे. श्रीधराच्या बायकोचे नाव पार्वती. एका मुलाचे नांव दत्तात्रय, त्याची काही रचना आहे. प्रसिद्ध रंगनाथ स्वामी निगडीकर हे याच कुटुंबातले. ते व आत्मास्वामी हे श्रीधराचे चुलत चुलते. श्रीधरांच्या दोन मुलांना शाहूमहाराजांनी इनाम दिले होते. पंढरपूर येथे काटे यांचा वाडा श्रीधराने विकत घेतला होता. यावरून त्यांचे चांगले चालले होते असे म्हणता येते.

श्रीधराने वयाच्या १४ व्या वर्षी संन्यास घेतला हा भ्रम आहे. त्याच्या दोन मुलांनी फारकत पत्र केले ( शके १६५९ ). ते उपलब्ध आहे. त्याच्या समाधिकालाचा उल्लेख आढळतो तो असाः—

भूप्राणांगमही मिते शुभ शके ।
सौम्याब्द सौम्यायने ।
माघे मासि असिते द्विजे गुणतिथौ ।
ब्राह्मे मुहूर्ते यमे । भीमातीरगते सुपंढरपुरे ।
श्रीविठ्ठलाधिष्ठिते ।
श्रीमत् श्रीधर सद्गुरु सुखघनः ।
सच्चित् समाधौ स्थितः ॥ १ ॥

याप्रमाणे भू = १, प्राण = ५, अंग = ६ व मही = १ या नियमाने व ‘ अंकानाम् वामगतिः ’ या सूत्रान्वये श्रीधराचा मृत्यू शके १६५१ हा ठरतो. कै. चिं. नो. जोशी यांनी ‘ श्रीधर–चरित्र आणि काव्यविवेचन ’ हा ग्रंथ लिहिला आहे. ‘ महाराष्ट्र सारस्वत ’ कारांनी श्रीधरशिवलीलामृतविषयी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, “ भाविक लोक श्रीधराचे ग्रंथ फार मनोभावे करून वाचतात. यांच्या काव्यांत प्रायः सर्व रसांचा भरणा आहे. परंतु कठीण किंवा जाडे शब्द यात फारच थोडे आढळतात. भाषा शुद्ध, सरणी सुबोध व विषयाची मांडणी गोड, यामुळे हे ग्रंथ वाचण्यासाठी सोपे आहेत. ० ० ० नामदेव – तुकारामाचे अभंग फार पसरलेले खरे, पण ते फक्त पुरुषांच्याच सहवासाचे. भजनाचा छंद बायकांना, पतितांना आणि विधवांना किंवा लहान मुलांना आढळत नाही. या सर्वांना सारखे अन्नछत्र श्रीधराचेच आढळते. त्यांना श्रीधराच्या ग्रंथांचा आधार आहे. ”

शिवलीलामृताची जन्मभूमी म्हणून ही ‘ द्वादशमती ’ आठविली जाते, त्याचप्रमाणे मयूर पंडित कवी मोरोपंत यांची कर्मभूमी म्हणून बारामती अजरामर झाली आहे. बारामतीकर बाबूजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून मोरोपंत बारामतीला स्थायिक झाले. त्यांच्या यजमानांच्या पराक्रमापेक्ष मोरोपंतांच्या काव्यसंपदेमुळेच बारामतीचे नाव इतिहासात उज्ज्वल झाले आहे, असे म्हणण्यात अतिशयोक्ति बिलकुल नाही.

मोरोपंतांचे पराडकर घराणे मूळ कोकणातले, राजापूर परगण्यात सौंदळ गावचे. त्यांचे वडील रामाजीपंत पन्हाळगडावर आले. तेथे सौम्यनाम संवत्सरी शके १६५१ मध्ये मोरोपंतांचा जन्म झाला. आईचे नाव लक्ष्मीबाई. पन्हाळगडावर त्यांच्या शेजारीच केशव पाध्ये व गणेश पाध्ये नावाचे विद्वान पंडित होते, त्यांच्याकडूनच पंतांना संथा मिळाली. दूरदूरचे विद्यार्थी त्या विद्वानांचेकडे येत असत.

मोरोपंत लहान असतानाच त्यांचे वडील बारामतीकर बाबूजी नाईक यांच्या पदरी नोकरीला गेले. पन्हाळगडावर राहून त्या काळच्या रिवाजाप्रमाणे विद्यासाधना केल्यावर मोरोपंत वडिलांना भेटण्यासाठी आले असता बाबूजी नाईकांनी पंतांना आपल्याकडे पुराणिक म्हणून ठेवून घेतले (शके १६६२). बाबूजी नाईकांना मोरोपंतांची विद्वत्ता व काव्यशक्ती कशी कळली याबद्दल निरनिराळ्या आख्यायिका आहेत. त्या येथे देत बसणे योग्य होणार नाही.

मोरोपंत हे साधे पुराणिक होते व कीर्तनकारांना उपयोगी असेच काव्य त्यांनी रचिले. म्हणून ते विशेष प्रशंसनीय नाहीत, असा आक्षेप इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर काही काळ घेतला गेला. पण आता त्या सर्व गोष्टींचे निराकरण झाले असून ते विद्वान पंडित होते, ‘ केवळ यमके नव्हते, ’ ही कल्पना सर्वमान्य झाली आहे. ‘ मोरोपंत हे विशाल बुद्धीचे, दांडग्या व्यवसायाचे सकलशास्त्रपारंगत असे चतुर व चौरस राष्ट्रीय पुराणिक होते, ’ असा अभिप्राय ‘महाराष्ट्र सारस्वत’ कारांनी दिला आहे [पृष्ठ६४०.]

पंतांचे एक आप्त व हितचिंतक बाबा पाध्ये हे

पंढरपूरला रहात असत. त्यांच्याशी पंतांचा पत्ररूप विचारविनिमय चालू असे. आपली रचना त्यांच्याकडे पाठवावी, त्यांच्याकडून काही दुर्मिळ ग्रंथ नकलणेस आणावे असा परिपाठ असे. ते मूळ शंकर भक्त, यामुळे बारामतीला नदीपलीकडील श्रीकाशीविश्वेश्वराचे दर्शनाला नित्य जात असत. 'ब्रह्मोत्तर खंड' हा त्यांचा पहिला ग्रंथ होय. त्यांच्या उपसंहारात त्यांनी 'कवि नवीन' असे नमूद केले आहे.

मोरोपंतांच्या सर्व काव्याचा उल्लेख करणे शक्य नाही. कुशलव आख्यान, सीतागीत, रुक्मिणीगीत, भस्मासुराख्यान, हरिश्चंद्राख्यान, देवीमाहात्म्य, प्रल्हादविजय, अंबरीष चरित्र, मदालसा आख्यान, मंत्रभागवत, हरिवंश, १०८ रामायणे अशी त्यांची रचना विविध व विपुल आहे. त्यांच्या अगोदरचे साधुसंत व राष्ट्रपुरुष यांच्या बाबत त्यांनी असे उल्लेख केले आहेत :—

श्रीनामदेवतुकया तदभंग प्रभुसि गोड घास तसे ।
गहिवरतसे परिसता नाचतसे पांडुरंग हासतसे ॥

× × ×

शिवराजास ज्ञानद जो । जैसा याज्ञवल्क्य जनकास ।
तरले भवार्णवी बहु दृढतर ज्याची धरूनि जन कास ।

शके १७१० मध्ये मोरोपंत मालेगावचे जहागीरदार अमरसिंह जाधव यांचे बरोबर काशीयात्रेला गेले होते. त्या वेळी काशीयात्रा ही गोष्ट काही सोपी नव्हती. अमरसिंहांनी या वेळी आपल्याबरोबर संरक्षणासाठी ५०० स्वार घेतले होते. यात्रेचा खर्च ३ लाख रुपये झाला. सर्व यात्रेकरूंना संरक्षण व योग्य ती मदत देण्याचे आदेश पेशव्यांनी ठिकठिकाणी सरदारांना दिले होते.

या काशी यात्रेच्या वेळची गंगा प्रार्थना, गंगा वकिली, विष्णुपदवकिली, विश्वेशस्तुती, काशीस्तुती ही पंतांची काव्ये प्रसिद्ध आहेत. विष्णुपदवकिलीत पंतांनी आपल्या सर्व आप्तेष्टांची आठवण करून त्यांच्या वतीने, ज्ञानदेवाच्या पसायदानाप्रमाणे, प्रार्थना केली आहे. आपले गुरु, मित्र, बंधू सुना, लेकी, जावई, व्याही, सासू, सासरा, मामेभाऊ, वगैरे आप्तेष्टांची वकिली पंतांनी केली आहेच; पण याशिवाय बारामतीपुरीवाले, 'मजवरी सुस्नेह करणारे,' शिंपी, पाटील, कुलकर्णी, चौधरी, देशमुख, देशपांडे, न्हावी, परीट, तेली, महार, मांग,' वगैरे सर्व जातींच्या, दर्जाच्या लोकांबद्दल पंतांनी सप्रेम व सोल्हास वकिली केली. बापूभट्ट, जामदार, भिवजी खोत, बाळ हैदर, मैराळ शिंपी, बहिरोबा रामदासी, मुगदल भट, रहाळकर, एकबोटे, गाडगीळ, आठवले, दाते, राघोपंत कोतवाल, आवजी आचार्य वगैरेंची नावे घेऊन कोणाच्या दारिद्र्याची, कोणाच्या निपुत्रिकपणाची, कोणाच्या व्याधींची, कोणाच्या मानसिक व्यथांची गाऱ्हाणी गंगा व विष्णुपद या देवतांजवळ त्यांनी सांगितली. त्याचा एकच मासला असाः—

तारावे विष्णुपदा, मजवरि सुस्नेह करिति जे शिंपी ।
\+ \+ \+ \+
गंगे, त्वा तारावे कुंभार, सुतार, परिट, लोहार ॥

पंतांनी बारामतीला 'क्षेत्रे सिद्धेश्वरस्य प्रथितप्रभुगुणे मूर्तकैलासरूप' अशा शब्दांत गौरविले आहे. रघुनाथ व रामकृष्ण हे पंतांचे दोन मुलगे. त्यांच्या पत्नीचे नाव रमा. हिने पंतांना काशीयात्रेस जाण्याची प्रेरणा दिली. विष्णुपदवकिलीत ही गोष्ट त्यांनी कृतज्ञतेने सांगितली आहेः—

मी जरि अशक्त निर्धन कोपी
तरि बहु भली रमा भार्या
ईते सद्गति दे तूं हेचि करी,
प्रथम बोध या कार्या (६९)

मोरोपंतांना नाईकांनी गणपति-मंदिराजवळचा वाडा दान दिला होता. त्याची 'दक्षिणोत्तर लांबी हात ७३१' असे वर्णन आढळते. श्री अहिल्याबाई होळकर व दुसरे पेशवे बाजीराव यांनी पंतांना आपल्या पदरी बोलावले होते. पण त्यांनी अखेरपर्यंत बारामतीकरांना सोडले नाही. शके १७१६ मध्ये चैत्र शुद्ध पौर्णिमेस हनुमानजयंतीचे दिवशी पंतांचे देहावसान झाले.

मोरोपंताच्या काव्यरचनेचा परिणाम त्या वेळच्या व नंतरच्या कविजनावर झाला आहे. सोलापूरकर रामजोशी हे त्यांचे पट्टशिष्य झाले. मोरोपंतांच्या



सूचनेवरूनच रामजोशांनी तमाशा फडातील डफ खाली ठेवून वीणा हाती घेतला. इंग्रजी अमदानीतल्या कवींनीही मोरोपंताचे ऋण मान्य केले आहे. झाशी प्रांतातले गुलसराई येथील गंगाधर नारायण खानवलकर यांनी आर्यावृत्तातील अध्यायांच्या रामदासचरित्रात म्हटले आहे की,

बारामती निवासी मोरोपंत प्रसिद्ध आर्याला ।
निर्मुनि यश मेळविले नमितो भावे तयाहि आर्याला ॥

श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकरांनी गणेश पुराण रचताना स्तवन केले की,

केवि नवा कवि आर्यापद्धति पंता न ये मयूराला
दाविल गायक जैसा ठायी नच तान जे मयूराला ?
पंतोच्छिष्टचि सारे, उपमा, यमके सुवेष सुर सत्व ।
लिहिले ग्रंथी परि म्या स्तविला श्रीमत् गणेश सुरसत्व ॥

मोरोपंताच्या काव्याचा अभ्यास व समीक्षण विद्वानांनी केले आहे. रा. ब. दादोबा पांडुरंग यांनी पंतांच्या केकावलीवर 'यशोदापांडुरंगी' ही टीका लिहिली. नवनीतकार श्री. परशुरामपंत गोडबोले यांनी 'केकादर्श' प्रसिद्ध केला. त्यांनी म्हटले आहे की, "प्राकृत कवितेत मोरोपंतांच्या कवितेसारखी कविता नाही." श्रीसिद्धनाथ रामदासी हे मोरोपंताचे समकालीन बारामतीचे ग्रामस्थ होते. त्यांचा शिष्य, राजाराम प्रासादी, यांनी 'भक्तमंजरी' हा ग्रंथ लिहिला. त्यात पंतचारित्रावर ६ ओव्या आहेत. त्यांनी म्हटले आहे.—

श्रीगुरु मोरो पंडित ।
गणपतीचा अवतार सत्य ॥

मोरोपंतांच्या कवितेचा अभ्यास आजही नव्या जोमाने सुरू आहे. मोरोपंतांच्या वंशजांनी त्यांचे काव्य छापून प्रसिद्ध केले व आता मुंबई विद्यापीठाने हे कार्य पुढे चालविले आहे. सर्व हस्तलिखिते मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहेत. अगोदर छापून प्रसिद्ध झालेली पण आता दुर्मिळ झालेल्या काव्याचे ग्रंथरूपाने प्रकाशन मुंबई विद्यापीठाने हाती घेतले आहे. आतापर्यंत पाच खंड पुढीलप्रमाणे प्रसिद्ध झाले आहेतः—

आर्याभारत– १ आदिपर्व, २ सभापर्व, ३ वनपर्व, ४ विराटपर्व, ५ उद्योगपर्व, ६ भीष्मपर्व, ७ द्रोणपर्व, ८ कर्णपर्व, ९ शल्यपर्व, १० गदापर्व, ११ सौप्तिकपर्व, १२ ऐशिकपर्व, १३ स्त्रीपर्व.

मुंबईचे एक पंतभक्त श्री. दामोदर विनायक जोशी यांनी पंत-वाङ्मय प्रसिद्ध करण्यासाठी मुंबई विद्यापीठाला रुपये २५००० ची देणगी दिली, म्हणूनच मुंबई विद्यापीठाला ही कामगिरी करणे शक्य झाले आहे. श्री. जोशी यांनी आमच्या इच्छेला मान देऊन आपल्या भावना पुढील शब्दांत व्यक्त केल्या आहेत:–

"पंतांच्या हस्त-लिखिताप्रमाणे त्यांच्या महत्तम काव्याचे नऊ खंड त्यांच्या वंशजांनी, इ. स. १९१२ ते १९१६, अशा चार वर्षांत प्रसिद्ध केले, आणि स्फुट काव्याचे तीन खंड मुंबईच्या मराठी संशोधन-मंडळाने इ. स. १९६१ ते १९६४ या चार वर्षांत प्रकाशित केले. सुमारे ५०।५५ वर्षांपूर्वी छापलेले नऊ खंड हल्ली बाजारात मिळत नाहीत, ही गोष्ट माझ्या मनाला खटकली व म्हणून त्यांचे पुनर्मुद्रण व्हावे याच हेतूने मी मुंबई विद्यापीठाला बरीच मोठी रक्कम देणगीदाखल दिली. तीतून आता पहिले सहा भाग (पूर्वींचे संपूर्ण 'आर्याभारताचे' तीन खंड) नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. नंतरचे सहा खंड क्रमाक्रमाने निघतीलच. या देणगीशिवाय पंतांच्या नावाने एस्. एस्. सी. बोर्डातर्फे दोन पारितोषिकें व मुंबईच्या ब्राह्मण-सभेतर्फे एक शिष्यवृत्ती मी चालू केली. पंत-चरणी ही सेवा रुजू केल्याबद्दल मला अत्यंत आनंद वाटत आहे.

"पंतांचीं सर्व हस्तलिखितें मुंबई विश्व-विद्यालयाच्या वाचनालयात सुरक्षित ठेवलीं आहेत. रसिकांस ती तेथे पाहता येतील.

"मोरोपंत, हे मराठी भाषेतील एक अमोलिक रत्न आहे. त्याचे संपूर्ण संशोधन व्हावयास पाहिजे म्हणजे त्यांचे विविध पैलू जनतेस कळून येतील.

मोरोपंतांचे यजमान बाबूजी नाईक यांचे ऋण बारामतीकर केव्हाहि विसरू शकत नाहीत. मोरोपंतांना आश्रय देऊन त्यांनी मराठी काव्यसंपदेला उधाण आणले. सध्या बारामती गावाची

जी वस्ती आहे, ती बाबूजींनी वसविलेल्या गांवाची वारस आहे, हेही विसरता येत नाही. बाबूजींचे पूर्वज मूळ कोकणातले, रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यांतील केळशींचे. केसोबा नाईक जोशी यांचा मुलगा सदाशिव याने काशीला जाऊन सराफीचा धंदा मोठ्या लौकिकाने केला. काशीला दुर्गा घाटावर त्यांचा वाडा होता व तेथेच नाईकजीचा महल्ला म्हणून पेठ आहे.

श्री छत्रपती शाहू महाराजांनी मोंगलांच्या अटकेतून मुक्तता झाल्यावर दक्षिणेत येताना सदाशिव नाईक यास बरोबर आणले व मराठी राज्याची पोतदारी त्यास दिली ( इ. स. १७०७ ). सदाशिवरावचे दोन मुलगे बाबुजी व आबाजी. पेशवा बाळाजी विश्वनाथ याने आपली मुलगी भिऊबाई ही आबाजीस दिली होती. भिऊबाईने पुण्याला अमृतेश्वराचे देऊळ बांधले. शनिवार पेठ नाईकांनीच वसविली. पहिल्या बाजीरावाने भिऊबाईच्या लुगडेचोळीसाठी त्या पेठेचे उत्पन्न लावून दिले होते.

पहिले बाजीराव इ. स. १७४० मध्ये निधन पावल्यावर रघुजी भोसले यांनी छत्रपती शाहूमहाराज यांचेकडे बाबुजी नाईक यांस पेशवाईची वस्त्रे देण्यासाठी खटपट केली होती. पण या प्रयत्नात त्यास यश आले नाही. कर्नाटकची जहागिरी मिळावी असेहि बाबूजींनी प्रयत्न केले; पण ते सफल झाले नाहीत. शाहूमहाराजांनी इ. स. १७४३ मध्ये बाबूजीस बारामती महालाची जहागिरी दिली, ती अशी—

" फत्तेसिंह भोसले व शंभुसिंग जाधव यांचे ताब्यात असलेल्या सांगवी, गुनवडी, माळेगांव, कटफळ, गोजाबावी व कन्हेरी या सहा गांवांशिवाय सर्व बारामती महाल म्हणजे या महालाच्या पेठा दुतर्फा बाबती, चौथ, सहोत्रा, जकात, कुलबाब, व कुलकानु बाबुराव सदाशिव यास देण्यात आला आहे. या महालाला त्यांनी पूर्ण अंमल चालवावा, कसबा बारामती येथे त्याने आपला वाडा बांधावा व महाल ताब्यात घेऊन त्याप्रमाणे सरकारांत कळवावे."

बारामतीस येण्यापूर्वी बाबूजी सातान्यास राहात असत. ते पराक्रमी होते व गुणग्राहक होते. त्या वेळच्या स्वराज्याचे दृष्टीने पोषक अशी कामगिरी त्यांनी फारच थोडी केली आहे, हे उमजून घेणे अवश्य आहे. शनिवारवाड्याच्या धर्तीवर त्यांनी बारामतीला कऱ्हा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर आपला वाडा बांधला. (त्या वाड्याचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे. ) व भोवती पेठ बसविली. तीच आजचे बारामती नगर होय.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्याशी बाबूजींचे कधीच पटले नाही. असा उल्लेख सापडतो की, " इ. स. १७४५ च्या सुमारास बाबूजींनी पेचात सापडून अविचारे सोमल खाऊन विषप्रलय केला. महाराजास प्रातःकाली समजले. आपला हात लावून दूध पाठविले, दूध पाजले. त्याने सोमल उतरला. नंतर महाराज जाऊन बहुत विवेक सांगितला आणि गवगवा जाहला त्याचा बंदोबस्त करविला. "

पुढे दि. २७–११–१७४६ च्या पत्रात पेशव्याने रामचंद्र बाबास लिहिले की " दर्शनास बाबूजी नाईक आले, भेटी जाहली. संभाजी महाराजांचे सोंधे बिदनूर इ. तालुक्यांत उपद्रव न द्यावा. येविशी नाईकांनी संभाजी महाराजांचे गळ्यावर हात ठेविला. संभाजी महाराज पाच, सहा महिने अडले होते. स्वामींनी आम्हास जामीन व्हावयास आज्ञा केली. आम्ही जाहलो. नाईकांनीं येथील ताळतंत्र आठ रोज पाहिले. उपरांतिक स्वामीच्या दारी बैसोन उपोषणे करितात. धाकटी बाई रदबदल करितात. उपास केल्यामुळे राजश्री स्वामी सक्रोध जाहले. मशारनिल्हेची अब्रू राहिली नाही. त्यांचे मध्यस्थास वारंवार शिरकाव होत गेला. अद्यापि होतात. राजश्रीची मर्जी फारच क्रूर आहे. नाईक प्राक्तनवान साहसी आहेत. ईश्वरे काय परिणाम नेमिला असेल न कळे. "

त्या वेळच्या राजकीय घालमेली समजून येण्यासाठीच हा उतारा दिला आहे. राघोबाची मुलगी दुर्गाबाइ ही बाबूजींचा मुलगा पांडुरंग याला दिली होती. बारभाईच्या कारस्थानाचे वेळी नारायणरावाची पत्नी गंगाबाई हिच्या प्रसूतिसमयी ही दुर्गाबाई पुरंधरवर साक्षीदार म्हणून बोलावून ठेविली होती. तेव्हा ती ९ वर्षांची होती. तोतया प्रकरणी बाबुजी नाईक हे रामशास्त्री इत्यादि २१ पंचांपैकी एक पंच होते.



भिकूबाईचा भाऊ बाजीराव ( दुसरा ) एकदा भाऊबिजेसाठी बारामतीला आला होता. दोन घराण्यांची सोयरीक होती; पण रहस्य असे कधीच जमले नाही. पहिल्या बाजीरावाला फार कर्ज झाले होते. साडे चवदा लाखांच्या कर्जात बाबूजीने दिलेले कर्ज सुमारे ३६ हजारांचे होते,असा उल्लेख आहे. व्याजाचा दर दरमहा दर शेकडा एक रुपया असा होता. बाबूजी नाईक ता. ६–१०–१७७७ ला निवर्तले.

बारामतीच्या वैभवाला कारणीभूत झालेल्या नाईक घराण्याचा उद्विग्न मनाने निरोप घेताना एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्य आहे. श्री छत्रपति शाहू महाराजांच्या जनानखान्यात वसंतराव कासुरडे नावाच्या व्यक्तीचा पहारा असे. महाराजांनी त्यास खूप द्रव्य दिले. ते तो सरकारात देऊ लागला. शाहूमहाराजांनी त्यास दानधर्म करण्यास सांगितले. तेव्हां श्री शंभु महादेवाचे देवालय हेमाडपंती सिंधण राजाच्या वेळचे होते, ते उकलून बारामतीहून दगड आणवून देवालय नवीन बांधविले. पायरीचे कासवालगत चरणी तत्पर वसंतराव निरंतर अशी अक्षरे कोरलेली आहेत. [ मराठी रियासत मध्यविभाग, खंड ३, प्रकरण ११, पृष्ठ १९२ ]

बारामतीहून सातारला मंदिरासाठी दगड नेले ही गोष्ट विशेषच होय. बाबूजींनी आपल्या वाड्याचे दक्षिणेस श्रीसिद्धेश्वराचे देवालय बांधले. त्यासाठी जे दगड आणविले गेले त्यांतूनच बहुधा सातारला दगड रवाना झाले असावेत, असा प्रस्तुत लेखकाचा कयास आहे. श्रीसिद्धेश्वराच्या मंदिरातील नंदीची मूर्ती बैठी व भव्य आहे. ( फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात आहे. ) तीबाबत प्रस्तुत लेखकाने बालपणी एक आख्यायिका ऐकिली आहे. ती अशी की, प्रथम ही नंदीची मूर्ती उभी होती, पण एका बाईची दृष्ट लागून ती दुभंगली. एका शिळेचा हा बैठा नंदी केला व दुसरी शिळा दुसऱ्या देवळात नेली. यावरून आख्यायिका व वास्तवता यांचे साधर्म्य काय तेही सहज लक्षात येईल.



श्री छत्रपती शाहू महाराजांनी सातान्याला राहून सुरू केलेल्या राजकारणात सहाय्यभूत होणारे बारामतीचे दुसरे एक घराणे म्हणजे काळे घराणे हे होय. नाईकांच्या वाड्याचे पूर्वेस त्यांचा वाडा होता व ती वास्तु आजही उभी आहे. कृष्णराव काळे हे हैद्राबाद निजामच्या दरबारी पेशव्याचे वकील होते. राघोबा दादा व थोरले माधवराव यांचा बेबनाव झाला तेव्हा कृष्णराव काळे यांनी आनंदवल्लीस जाऊन सलोखा करण्याचा प्रयत्न केला होता. इ. स. १७७३।७४ च्या सुमारास राघोबा दादाने निजामवर स्वारी केली. तेव्हा बेदरला उभयतांमध्ये समेट झाला. निजाम स्वतः दादांच्या भेटीस आला. " दादांनीं वाड्याचे बाहेर जाऊन हाती धरून डेऱ्यांत आणिले. मसलत जाली. उपरात उभयतांचे भोजन एकत्र झाले. दोघे खासे व रुक्नुद्दौला व कृष्णराव काळे चौघे खलबतात होते. " बारभाईचे कारस्थान तडीस नेण्याला कृष्णरावाची फार मदत झाली असे म्हणता येते.

कृष्णराव काळे यांचा मुलगा गोविंदराव हाही निजामचे दरबारी पेशव्यांचा वकील होता. नाना फडणवीस व त्यांची मैत्री होती. किंबहुना मुत्सद्देगिरीत गोविंदराव काळे हे प्रती नाना फडणवीस असा दबदबा त्या वेळी झाला होता. अशा कर्तबगार व्यक्तीला स्वराज्य अस्तास गेल्याचे पाहून किती मनस्ताप झाला असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. ते इ. स. १८२३ मध्ये स्वर्गवासी झाले. त्यांचा मुलग कृष्णराव हा बारामती नगरपालिका स्थापन झाली तेव्हां सरकारने नेमलेल्या मूळच्या 'कमिशनरा'पैकी म्हणजे सभासदांपैकी एक होता. ह्या कृष्णरावांचे चिरंजीव गोविंदराव हेही नावलौकिकास चढले. ते पाहिल्या वर्गाचे सरदार होते. श्री. कृष्णाजी गणेश जोशी यांचेकडून ते दत्तक गेले. डिस्ट्रिक्ट जज्जच्या हुद्द्यावरून ते निवृत्त झाले. त्यांचे दोन चिरंजीव; श्री. धुंडिराजपंत काळे, हे सध्या महाराष्ट्र राज्य सरकारचे 'लेबर कमिशनर' ह्या हुद्द्यावर असून श्री. हरिहरराव हे पुण्याला वकिली करतात.

बारामतीच्या कीर्तीत भर घालणारी एक व्यक्ती

म्हणून बाबुजी नाईकांचे समकालीन असे रघुनाथपंत कोशे यांचा उल्लेख करावयाला हवा. ते मूळ बारामतीचे राहणारे. नानासाहेब पेशव्यांच्या सेवेत ते असत. मोरोपंत व त्यांचे काव्य या दोन्हींवर त्यांचे विशेष प्रेम होते. 'नामरसायन' मध्ये मोरोपंतांनी नमूद केले आहे की,

रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला।
प्रेमे सिंचित होते मत्कवना ते सखे असे वेला॥

त्यांचे सबंध नाव रघुनाथ गणेश कोशे. तेही काव्य रचना करीत. 'पंतप्रधान काव्य' हे त्यांचे एक काव्य. त्यांच्या काव्याचा नमुना असा:—

बाळाजी तरि विश्वनाथ म्हणती बाजींद्र बाजी प्रती।
श्री नामासुत त्यास ज्यास ह्रदयी दिल्लीस ही कापती
नाना न वदे म्हणोनि जनता 'नाना' जयातें वदे।
विप्राला धन दे, खळा निधन दे सर्वास सर्वस्व दे।
शत्रूला भय दे, निजा अभय दे विश्वास विश्वास दे।
दे दे देउनि देचि! दे तरि सख्या शैवास संवास दे॥

पेशव्याचे सैन्य पाहून रघुनाथपंत कोशे म्हणतात की,

शें शें बाण भरूनि उष्ट्रशतकें सेना मुखीं चालती।
शे शे आश्रयजालनाल झडता भूभृच्छिरे हालती।
नाना दिग्विजयास या जंव निघे तैं देव उल्लासती।
सेनाव्यूह तसे उडुव्रज असे चंद्रासवे भासती॥

महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांचा या काव्यरचनेबद्दलचा अभिप्राय असा की "काव्य चकटदार आहे. शब्द चमत्कारावर जास्त भर आहे. थोडक्यांत गोडी आहे."

श्री छत्रपती शाहूच्या वेळी बारामतीला दामाजीपंत कुलकर्णी होते. त्यांचा मुलगा बाबाजी हा संसाराविषयी विरक्त होता. त्याने सप्तशृंगीला तपाचरण करून नगरजवळ वास्तव्य केले होते.

बारामतीबाबत इतिहासात आणखी उल्लेख आला की, इ. स. १८०२ मध्ये यशवंतराव हौळकर यांचा सरदार फत्तेसिंग माने याने दुसऱ्या बाजीरावाचा बारामतीला तळ पडला असताना त्यावर हल्ला करून त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला. इ. स. १८०३ मध्ये जनरल वेलस्ली हा श्रीरंगपट्टणहून परत येताना बारामतीला आला होता. पुण्याच्या बचावाकरिता तो १॥ दिवसात येथून पुण्याला जाऊन पोचला. इ. स. १८०८ मध्ये बाबूजी नाईकांचे पुत्र पांडुरंग बाबासाहेब यांचा मृत्यू झाला व नाईकांची जहागीर पेशव्यांनी जप्त केली. माणकेश्वर यास येथे जप्तीदार नेमले होते. हे गृहस्थ पूर्वी नाईकांचे आश्रित होते. दुसऱ्या बाजीरावाची मर्जी संपादन करून ते दिवाणपदी चढले. पेशवाई अखेरपर्यंत व नंतर सुमारे २० वर्षे ते बारामतीत अंमल करीत होते. इ. स. १८३९ पासून इंग्रजी सरकारचा अंमल सुरू झाला.

बारामतीच्या पश्चिमेस ४ मैलांवर मालेगांव येथील जहागिरदार जाधव हे घराणेही बारामतीशी निगडित आहे. श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आजोळच्या घराण्यापैकीच हे जाधव होत. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल सैन्याशी मोठ्या हिमतीने मुकाबला करणारे सेनानी धनाजी जाधव यांचे तीन मुलगे होते. पहिल्या पत्नीचा संताजी आणि दुसरीचे चंद्रसेन व शंभुसिंग यांनी पन्हाळ्याच्या स्वारीत चांगली कामगिरी केली, म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी शंभुसिंगास माळेगावची जहागिरी दिली (ता. १[illegible] नोव्हेंबर १७३२)

शंभुसिंग इ. स. १७६० मध्ये वारले. त्यांचा मुलगा अमरसिंह ऊर्फ बाबासाहेब ह्यांनी कवि मोरोपं[illegible] यांना काशीयात्रेस आपल्या बरोबर नेले असा उल्ले[illegible]वर आलाच आहे. अमरसिंह यांचे नंतर रत्नसिं[illegible] [मत्यू १८७६] व अमरसिंह (मृत्यू १७७[illegible] असे वारस झाले. ह्या दुसऱ्या अमरसिंहाचे चिरंजी[illegible] शंभुसिंह हे बारामतीच्या जुन्या पिढीतील व्यक्तींन[illegible] आजही आठवत असले पाहिजेत. बारामतीच्या स[illegible] सार्वजनिक कार्याला त्यांचा पाठिंबा असे. बागाईत[illegible]दारांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्यासाठी एक खाजगी 'कमिशन' नेमले गेले, त्याचे ते अध्यक्ष होते (इ. स. १९२०). त्याच वेळी त्यांचे श्रीसिद्धेश्वराच्या देवळात गणपतीपुढे गीतेवर व्याख्या[illegible] झाले होते.

निरा कॅनॉल सोसायट्यांचा खरेदी बिक्री सं[illegible] काढण्याचे कामी राजे शंभूसिंग यांनी पुढाकार घेतला होता. त्यांचे चार मुलगे; सर्वांत धाकटे कॅप्टन धनसिंग यांनी दुसऱ्या महायुद्धात आसाम आघाडीवर काम केले. ते आता शेती कामात कै. चंद्रसेन शंभूलिंग यांचे एक चिरंजीव श्रीवीरसिंह हे मालेगावच्या साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. कै. राजे शंभूसिंग याची कन्या म्हणजेच फलटणच्या राणीसाहेब सौ. लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर आहेत. फलटण व बारामती यांचे संबंधही सलोख्याचे व मित्रत्वाचे आहेत.

बारामतीची परंपरा अशी उज्ज्वल व स्फूर्तिदायक आहे. राजकारण व साहित्यकारण ह्या दोन्ही क्षेत्रात तिचे ठसे उमटलेले आहेत. इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर ३०–४० वर्षे येथे ग्लानता आली असेच समजले पाहिजे. १ जानेवारी १८६५ ला 'म्युनिसीपालिटी' म्हणजे नगरसंस्था, नगरपालिका स्थापन झाल्यावर प्रगतीची व विकासाची नवीन क्षितिजे दिसू लागली. 'राजा कालस्य कारणम्' या न्यायाने नवीन राजवटीने नवीन पावले टाकली, नव्या वाटा निघाल्या व आज शंभर वर्षांनंतर बारामतीची जनता संक्रमणाच्या प्रवेशद्वाराशी उभी आहे. त्या घटनेचा मागोवा यापुढे आपल्याला घ्यावयाचा आहे.

---

# नगरपालिकेच्या प्रतिनिधी मंडळाचा विकास

इंग्रजांनी महाराष्ट्र काबीज केल्यावर जमीनमहसुलाचे काम हाती घेतले. ' पेशवाई ' चे अखेरीस जमीनमहसुलाच्या बाबतीत बरेच गोंधळ झालेले होते. ' काळी पांढरीच्या वहिवाटीची चौकशी ' असे महसूल खात्यांतील माहीतगार या प्रकरणाला म्हणतात. या चौकशीत असे निष्पन्न झाले की, निवळ जमीनसाऱ्याशिवाय अनेक पट्ट्या व कर यांचा समावेश सरकारी जमेत होत असे. तो म्हणजे गावच्या व्यवस्थेची तरतूद यासाठी होय. ही व्यवस्था गाव कामगाराचे मार्फत परस्पर केली जात होती. त्यांना लागणारा पैसा हाती ठेवून, नंतर सरकारजमा देण्यात येई.

सर्वे सेटलमेंटच्या पूर्वेतिहासात असे स्पष्ट उल्लेख आहेत. पेशवाईच्या अखेरीस पाहणीवरून ठरलेला मामूल जमाबंदीचा आकडा आणि मक्त्याने मामलती घेणाराना ठरवून दिलेला कमाल यात फार अंतर होते. पण त्याच्या कारणाचा उलगडा न आल्याने अनिष्ट प्रकार घडले व प्रजा त्रस्त झाली. या कमाल मामुलाच्या जंजाळाशी गावखर्चाच्या पट्ट्या निगडित झाल्यामुळे ब्रिटिश अमदानीत पहिल्या ३० वर्षांत गावाची व्यवस्था पार बिघडून गेली. ग्रामसंस्था म्हणून जे एक शस्त्र रयतेच्या हाती स्वतःच्या सुखसोयीसाठी होते, ते आता दुःखाला कारणीभूत झाले असे म्हणता येते.

गावखर्चाचा ऐवज सरकारचे देण्यात गडप झाला; आणि ती व्यवस्था अजिबात बंद झाली. या प्रकाराचा उलगडा इ. स. १८३९ च्या सुमारास राज्यकर्त्यांना होऊ लागला. सरकार घेणे म्हणून जमीनसारा प्रमुख होता व त्याला सरकारचे हिशेबात मान्यता होती. विलायतेतील राज्यनियंत्रकांना असे आढळून आले की, सरकारकडे जमा होणाऱ्या रकमेत जमीनसाऱ्याव्यतिरिक्त अशा काही रकमा आहेत. याची चौकशी झाली व या रकमा कोण, कोठे, कशा रीतीने खर्च करीत असे, तेही कळून आले.

पण त्या रकमांचा समावेश सरकार महसुलात जो एकदा झाला तो कायमचा. जमीन साऱ्याशी, कायमची अशी, त्या रकमांची फारकत झाली नाही. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात ही स्थिति अशी होती. त्याचबरोबर गावची अशी काही व्यवस्था हवी अशी राज्यकर्त्यांना जाणीव झाली. त्यासाठी रयतेच्या सहकारित्वाने कांही योजना ठरविल्या गेल्या. तोच म्युनिसिपालिट्यांचा हिंदुस्थानांतील उगम होय.

या बाबतचे कायदे प्रथम मध्यवर्ती सरकारने केले. पुढे हे अधिकार प्रांतिक सरकारकडे सुपूर्त झाले, आता तीच विचारसरणी सुरू आहे. जवळजवळ शंभर वर्षांनी, मुंबई राज्यांत म्हणजे सध्याच्या महाराष्ट्र राज्यात नगरपालिकेचा एक संकीर्ण कायदा तयार होऊन त्याची अंमलबजावणी १६ जून इ. स. १९६६ पासून सुरू झाली आहे. अशा वेळी ही गंगोत्री कशी जन्मास आली व तिचे स्थित्यंतर कसकसे झाले हे पाहणे योग्य होय.

सन १८५० चे २६ व्या कायद्याने मुंबई, मद्रास व कलकत्ता याखेरीज गावात राहणाऱ्या लोकांची " प्रकृति व हित " या संबंधाने अधिकार उत्पन्न करण्यात आले. या कायद्याचे कलम २ मध्ये असा उल्लेख होता.

ईस्ट इंडिया कंपनी सरकारचे देशातील कोणत्याहि इलाख्याचे किंवा जागेचे गव्हर्नर अथवा गव्हर्नर इन कौन्सिल अथवा लेफ्टनंट गव्हर्नर यास असे दिसेल की, कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई ही शहरे खेरीज करून आमचे ताब्यातील कोणत्याही गावातील अथवा गावालगतचे पेठेतील राहणाऱ्या लोकास कोणत्याही गल्ल्या, रस्ते, नळ अथवा तलाव ही बांधणे अथवा त्याची डागडुजी करणे अथवा स्वच्छ राखणे अथवा त्यांचा चिराग लावणे अथवा हे दर किंवा अडचण न पडू देणे अथवा सदरहू गाव अथवा गावालगतची पेठ



दुसऱ्या कोणत्याही प्रकारे सुधारण्याकरिता अधिक चांगले ठराव करणे, याविषयीची इच्छा आहे तर सदरहू गव्हर्नर, गव्हर्नर इन कौन्सिल अथवा लेफ्टनंट गव्हर्नर यास अशा गावात अथवा गावालगतच्या पेठेत हा कायदा अमलात आणविण्याचा अधिकार आहे. "

या कायद्यांप्रमाणे लोकांच्या मागणीवरून म्युनिसीपालिट्या स्थापन होत असत. या संस्थांचा कारभार सरकारनियुक्त ' कमिशनरा'च्या कडून म्हणजे सभासदांचे कडून होईल. त्यांना नियम करून स्थावर घरावर अथवा मालावर कर बसविण्याचा व त्या उत्पन्नाचा निनियोग करण्याचा अधिकार दिला होता. पूर्वीची ग्रामव्यवस्था जाऊन ही नवीन यंत्रणा आली, तेव्हा तीमध्ये नवीन कर बसविण्याची तरतूद असल्याकारणाने रयतेने तिचे विशेष आस्थेने स्वागत केले नाही. असा त्यावेळचा अनुभव आहे. याच्या उलट पूर्वीच्या वतनदारीचा उपयोग घेतलेल्यांना ह्या नव्या अधिकाराचे आमिष वाटले यात नवल नाही.

अशा परिस्थितीत हिंदुस्थान सरकारच्या १८५० च्या ह्या कायद्याप्रमाणें मुंबई सरकारने इ. स. १९६२ मध्ये ' मुंबई प्रेसिडेन्सी' मुंबई इलाख्याकरिता कायदा केला. या कायद्यान्वये अनेक नगरपालिका स्थापन झाल्या. पण बऱ्याच अल्पजीवी ठरल्या. त्यांच्या करवसुलीच्या रकमा अगदीं तुटपुंजा होत्या; आणि तेवढ्यात कामहि जेमतेमच झाले. या कायद्याखालीं बारामती म्युनिसिपालटीची स्थापना १ जानेवारी १८६५ ला झाली. ह्या १ ल्या दिवसाच्या रोजकीर्दीच्या पानाचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे.

सरकारने नेमलेल्या पहिल्या कमिशनरात (सभासद) पुढील गृहस्थ होते.

श्री. कृष्णराव गोविंदराव काळे
,, कृष्णराव आनंदराव सुमंत
,, रावजी कृष्णराव महालकरी
,, नारो महादेव देशपांडे
,, छबन वलद राजेरतन शेटये
,, जयराम बिन धारोजी ढवाण
,, पांडु सोमजी कुलकर्णी
,, देवराव काटे देशमुख
,, मोरू बिन काका चिवटे
,, रघुनाथ रामलाल मारवाडी
,, रामचंद देवचंद गुजर
,, मुसाभाई तय्यब अल्ली बोहोरी
,, ताराचंद माधवजी गुजर

यांतले पहिले येथील अगोदर उल्लेख केलेल्या काळे घराण्यांतले; दुसरे सुमंत घराण्यातले; तिसरे सुप्याचे महालकरी; चवथे वतनदार देशपांडे घराण्यातले; पाचवे पेठेतील शेटये; सहावे व सातवे अनुक्रमे वतनदार व कामगार पाटील व कुलकर्णी; आठवे देशमुख घराण्यांतले; नववे मोरशेट चिवटे हे प्रमुख लिंगायत सावकार; दहावे प्रमुख मारवाडी व्यापारी; अकरावे प्रमुख जैन गुजर व्यापारी; बारावे बोहोरी व्यापारी; आणि **तेरावे गृहस्थ हे नंतर बारामती म्युनिसीपालटीचे प्रदीर्घ काळ अध्यक्ष म्हणून ख्यातनाम झालेले श्रीमान रामचंद्र मलुकचंद यांचे आजे होत.**

सुदैवाची गोष्ट अशी अगदी साधारण परिस्थितीत स्थापन झालेली. बारामती नगरपालिका ही सतत १०० वर्षे चालून, महाराष्ट्र सरकारने तयार केलेल्या नवीन नगरपालिका कायद्याची ती वारसदार झाली आहे. गाव व गावालगतची जी पेठ सुधारण्याचा हेतु नगरपालिका स्थापण्याचे वेळी सांगितला गेला, तो कसकसा सफल झाला हेच पुढे पायरीपायरीने पहावयाचे आहे.

बारामती नगरपालिकेच्या दप्तरात पहिल्या वर्षांचे काही कागदपत्र आहेत. ' प्रोसिडिंग ' च्या (सभाचे इतिवृत्त) वहीवर ' म्युनिसीपालिटी बारामती, असा शिक्का आहे. तर कीर्दीवर ' पोलीस अंमलदार, इंमापूर ' असा शिक्का दिसतो. प्रारंभी महसूल, नगरपालिका व पोलिसी कामे महालकऱ्याकडे असत. त्यांची कचेरी कोष्टी आळी आता जेथे सद्गुरु महाराजांचा मठ आहे तेथच्या इमारतीच्या सदरहू इमारतीचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे. नंतर महालकरी कचेरी नाईकांच्या वाड्याचे जागेत गेली. प्रारंभी पोलिसांचा कारभार म्युनिसी-

# नगरपालिकेच्या प्रतिनिधी मंडळाचा विकास

इंग्रजांनी महाराष्ट्र काबीज केल्यावर जमीनमहसुलाचे काम हाती घेतले. 'पेशवाई' चे अखेरीस जमीनमहसुलाच्या बाबतीत बरेच गोंधळ झालेले होते. 'काळी पांढरीच्या वहिवाटीची चौकशी' असे महसूल खात्यांतील माहीतगार या प्रकरणाला म्हणतात. या चौकशीत असे निष्पन्न झाले की, निवळ जमीनसाऱ्याशिवाय अनेक पट्ट्या व कर यांचा समावेश सरकारी जमेत होत असे. तो म्हणजे गावच्या व्यवस्थेची तरतूद यासाठी होय. ही व्यवस्था गाव कामगाराचे मार्फत परस्पर केली जात होती. त्यांना लागणारा पैसा हाती ठेवून, नंतर सरकारजमा देण्यात येई.

सर्वे सेटलमेंटच्या पूर्वेतिहासात असे स्पष्ट उल्लेख आहेत. पेशवाईच्या अखेरीस पाहणीवरून ठरलेला मामूल जमाबंदीचा आकडा आणि मक्त्याने मामलती घेणाराना ठरवून दिलेला कमाल यात फार अंतर होते. पण त्याच्या कारणाचा उलगडा न आल्याने अनिष्ट प्रकार घडले व प्रजा त्रस्त झाली. या कमाल मामुलाच्या जंजाळाशी गावखर्चाच्या पट्ट्या निगडित झाल्यामुळे ब्रिटिश अमदानीत पहिल्या ३० वर्षांत गावाची व्यवस्था पार बिघडून गेली. ग्रामसंस्था म्हणून जे एक शस्त्र रयतेच्या हाती स्वतःच्या सुखसोयीसाठी होते, ते आता दुःखाला कारणीभूत झाले असे म्हणता येते.

गावखर्चाचा ऐवज सरकारचे देण्यात गडप झाला; आणि ती व्यवस्था अजिबात बंद झाली. या प्रकाराचा उलगडा इ. स. १८३९ च्या सुमारास राज्यकर्त्यांना होऊ लागला. सरकार घेणे म्हणून जमीनसारा प्रमुख होता व त्याला सरकारचे हिशेबात मान्यता होती. विलायतेतील राज्यनियंत्रकांना असे आढळून आले की, सरकारकडे जमा होणाऱ्या रकमेत जमीनसाऱ्याव्यतिरिक्त अशा काही रकमा आहेत. याची चौकशी झाली व या रकमा कोण, कोठे, कशा रीतीने खर्च करीत असे, तेही कळून आले.

पण त्या रकमांचा समावेश सरकार महसुलात जो एकदा झाला तो कायमचा. जमीन साऱ्याशी, कायमची अशी, त्या रकमांची फारकत झाली नाही. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात ही स्थिति अशी होती. त्याचबरोबर गावची अशी काही व्यवस्था हवी अशी राज्यकर्त्यांना जाणीव झाली. त्यासाठी रयतेच्या सहकारित्वाने कांही योजना ठरविल्या गेल्या. तोच म्युनिसिपालिट्यांचा हिंदुस्थानांतील उगम होय.

या बाबतचे कायदे प्रथम मध्यवर्ती सरकारने केले. पुढे हे अधिकार प्रांतिक सरकारकडे सुपूर्त झाले, आता तीच विचारसरणी सुरू आहे. जवळजवळ शंभर वर्षांनी, मुंबई राज्यांत म्हणजे सध्याच्या महाराष्ट्र राज्यात नगरपालिकेचा एक संकीर्ण कायदा तयार होऊन त्याची अंमलबजावणी १६ जून इ. स. १९६६ पासून सुरू झाली आहे. अशा वेळी ही गंगोत्री कशी जन्मास आली व तिचे स्थित्यंतर कसकसे झाले हे पाहणे योग्य होय.

सन १८५० चे २६ व्या कायद्याने मुंबई, मद्रा व कलकत्ता याखेरीज गावात राहणाऱ्या लोकांची "प्रकृति व हित" या संबंधाने अधिकार उत्पन्न करण्यात आले. या कायद्याचे कलम २ मध्ये असा उल्लेख होता.

ईस्ट इंडिया कंपनी सरकारचे देशातील कोणत्याहि इलाख्याचे किंवा जागेचे गव्हर्न अथवा गव्हर्नर इन कौन्सिल अथवा लेफ्टनं गव्हर्नर यास असे दिसेल की, कलकत्ता, मद्रा किंवा मुंबई ही शहरे खेरीज करून आमच्या ताब्यातील कोणत्याही गावातील अथवा गावालगतच्या पेठेतील राहणाऱ्या लोकास कोणत्याही गल्ल्या, रस्ते नळ अथवा तलाव ही बांधणे अथवा त्याची डाग डुजी करणे अथवा स्वच्छ राखणे अथवा त्यांना चिराग लावणे अथवा हे दर किंवा अडचण न प देणे अथवा सदरहू गाव अथवा गावालगतची व



दुसऱ्या कोणत्याही प्रकारे सुधारण्याकरिता अधिक चांगले ठराव करणे, याविषयीची इच्छा आहे तर सदरहू गव्हर्नर, गव्हर्नर इन कौन्सिल अथवा लेफ्टनंट गव्हर्नर यास अशा गावात अथवा गावालगतच्या पेठेत हा कायदा अमलात आणविण्याचा अधिकार आहे."

या कायद्यांप्रमाणे लोकांच्या मागणीवरून म्युनिसीपालिट्या स्थापन होत असत. या संस्थांचा कारभार सरकारनियुक्त 'कमिशनरा'च्या कडून म्हणजे सभासदांचे कडून होईल. त्यांना नियम करून स्थावर घरावर अथवा मालावर कर बसविण्याचा व त्या उत्पन्नाचा निनियोग करण्याचा अधिकार दिला होता. पूर्वीची ग्रामव्यवस्था जाऊन ही नवीन यंत्रणा आली, तेव्हा तीमध्ये नवीन कर बसविण्याची तरतूद असल्याकारणाने रयतेने तिचे विशेष आस्थेने स्वागत केले नाही. असा त्यावेळचा अनुभव आहे. याच्या उलट पूर्वीच्या वतनदारीचा उपयोग घेतलेल्यांना ह्या नव्या अधिकाराचे आमिष वाटले यात नवल नाही.

अशा परिस्थितीत हिंदुस्थान सरकारच्या १८५० च्या ह्या कायद्याप्रमाणें मुंबई सरकारने इ. स. १९६२ मध्ये 'मुंबई प्रेसिडेन्सी' मुंबई इलाख्याकरिता कायदा केला. या कायद्यान्वये अनेक नगरपालिका स्थापन झाल्या. पण बऱ्याच अल्पजीवी ठरल्या. त्यांच्या करवसुलीच्या रकमा अगदीं तुटपुंजा होत्या; आणि तेवढ्यात कामहि जेमतेमच झाले. या कायद्याखालीं बारामती म्युनिसिपालटीची स्थापना १ जानेवारी १८६५ ला झाली. ह्या १ ल्या दिवसाच्या रोजकीर्दीच्या पानाचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे.

सरकारने नेमलेल्या पहिल्या कमिशनरात (सभासद) पुढील गृहस्थ होते.

श्री. कृष्णराव गोविंदराव काळे
,, कृष्णराव आनंदराव सुमंत
,, रावजी कृष्णराव महालकरी
,, नारो महादेव देशपांडे
,, छबन वलद राजेरतन शेटये
,, जयराम बिन धारोजी ढवाण
,, पांडु सोमजी कुलकर्णी
,, देवराव काटे देशमुख
,, मोरू बिन काका चिवटे
,, रघुनाथ रामलाल मारवाडी
,, रामचंद देवचंद गुजर
,, मुसाभाई तय्यब अल्ली बोहोरी
,, ताराचंद माधवजी गुजर

यांतले पहिले येथील अगोदर उल्लेख केलेल्या काळे घराण्यांतले; दुसरे सुमंत घराण्यातले; तिसरे सुप्याचे महालकरी; चवथे वतनदार देशपांडे घराण्यातले; पाचवे पेठेतील शेटये; सहावे व सातवे अनुक्रमे वतनदार व कामगार पाटील व कुलकर्णी; आठवे देशमुख घराण्यांतले; नववे मोरशेट चिवटे हे प्रमुख लिंगायत सावकार; दहावे प्रमुख मारवाडी व्यापारी; अकरावे प्रमुख जैन गुजर व्यापारी; बारावे बोहोरी व्यापारी; आणि **तेरावे गृहस्थ हे नंतर बारामती म्युनिसीपालटीचे प्रदीर्घ काळ अध्यक्ष म्हणून ख्यातनाम झालेले श्रीमान रामचंद्र मलुकचंद यांचे आजे होत.**

सुदैवाची गोष्ट अशी अगदी साधारण परिस्थितीत स्थापन झालेली. बारामती नगरपालिका ही सतत १०० वर्षे चालून, महाराष्ट्र सरकारने तयार केलेल्या नवीन नगरपालिका कायद्याची ती वारसदार झाली आहे. गाव व गावालगतची जी पेठ सुधारण्याचा हेतु नगरपालिका स्थापण्याचे वेळी सांगितला गेला, तो कसकसा सफल झाला हेच पुढे पायरीपायरीने पहावयाचे आहे.

बारामती नगरपालिकेच्या दप्तरात पहिल्या वर्षांचे काही कागदपत्र आहेत. 'प्रोसिडिंग' च्या (सभाचे इतिवृत्त) वहीवर 'म्युनिसीपालिटी बारामती, असा शिक्का आहे. तर कीर्दीवर 'पोलीस अंमलदार, इंमापूर' असा शिक्का दिसतो. प्रारंभी महसूल, नगरपालिका व पोलिसी कामे महालकऱ्याकडे असत. त्यांची कचेरी कोष्टी आळी आता जेथे सद्गुरु महाराजांचा मठ आहे तेथच्या इमारतीच्या सदरहू इमारतीचा फोटो चित्रमय बारामती ह्या विभागात दिला आहे. नंतर महालकरी कचेरी नाईकांच्या वाड्याचे जागेत गेली. प्रारंभी पोलिसांचा कारभार म्युनिसी-

पालिटीकडे ठेवलो होता. ती फारकत होताना काही गमतीचे प्रकार झाले ते पुढे नमूद करावयाचे आहेत.

प्रारंभी असिस्टंट कलेक्टर (मॅजिस्ट्रेट) हे अध्यक्ष व मामलेदार उपाध्यक्ष असत. याप्रमाणे स्थापन झालेल्या म्युनिसीपालिटीच्या पहिल्या महिन्यातील सभेला फर्स्ट असिस्टंट मॅजिस्ट्रेट चार्लस रॉबर्टसन व मामलेदार विनायक काशिनाथ हे उपस्थित होते. या सभेत संमत झालेल्या ठरावांचा आशय :–

* खालीलप्रमाणे नोकरांची नेमणूक झाली. (अ) सिताराम आबाजी कुळकर्णी यास १–२–१८६५ पासून दरमहा पगार रु. १३ वर व यशवंत आबाजी यास दरमहा पगार रु. १२ वर आणि (ब) शिपाई (१) कुशा चोगुले व (२) विनायक बाजी देशपांडे–प्रत्येकी पगार दरमहा रु. ५।–

* सादिलवारसाठी रु. २ आहेत; परंतु म्यु. कडील चेअरमन, पंच, कामदार वगैरे बसणेस, जागाभाडे वगैरे खर्च कामास त्यासुद्धा रु. ५ मंजूर.

* काम चालविण्यासाठी शिक्का व ऑफिससाठी जाजम, तक्क्या, पैसे ठेवण्यास पेटी वगैरेकरिता खर्च रु. ५० पर्यंत करावा.

* अधिकारी लोकांस उतरण्याकरिता एक धर्मशाळा. पाणवठा वेशीचे आत लक्ष्मीनारायणाचे देवळाजवळ वेशीचे उत्तरेस व दक्षिणेस आणि लक्ष्मीनारायणाचे दक्षिण जागेत पूर्व-पश्चिम अशी रु. १०००।– पर्यंत बांधावी, परंतु आधी माणसे व जनावरांस पाण्याची अडचण आहे. सबब नदीत हेळ तीन करण्याची मॅनेजिंग कमिटीने तजवीज करावी. वेशीच्या दक्षिणेकडील धर्मशाळेचा काही भाग इ. सन १९५३ मध्ये विभागीय कमिशनर पुणे, यांचे हुकुमानुसार पाटील व तलाठी यांच्या कचेरीसाठी दिला त्याबद्दल नगरपालिकेस रु. ४९२९।– मिळाले.

ह्या मॅनेजिंग कमिटीत प्रथम गोपाळ रघुनाथ दाते (अध्यक्ष), सय्यद इमामुद्दीन वल्लद सय्यद सगेशा काझी, नारो माधवराव देशपांडे, मुसाभाई तय्यब अल्ली, बोहोरी, व रामचंद देवचंद गुजर हे सभासद होते. नंतर मार्चमध्ये असे ठरविले की, गोपाळ रामचंद्र मयत झाले, त्यांचे चिरंजीव सावळाराम गोपाळ ऊर्फ त्र्यंबक गोपाळ यांस नेमावे, सभासद पाच आसामीत देवराव बाजीराव देशमुख यास नेमावे व मुसाभाई तय्यब अल्ली बोहरी यांना अध्यक्ष नेमावे.

पुढे ता. २२–७–१८६५ ला सर्वसाधारण सभा झाली, ती कृष्णराव गोविंदराव काळे यांच्या वाड्यात काळे यांच्या वाड्यात सभा भरविण्याची प्रथा पुढे बरीच वर्षे चालू होती. 'अकात बारामती' अशा अक्षराचे खुणेबद्दल 'सिक्का' करण्यास मंजुरी, वर उल्लेख केलेल्या सभेत देण्यात आली. वर्ष अखेरीच्या एका सभेत हद्दीबाबत ठराव झाला की, मेहेरबान मॅजिस्ट्रेट साहेब बहादूर जिल्हा पुणे यांचेकडील पत्र नं. १०५ ता. २४ ऑगस्ट १८६५ चे म्युनीसिपल हद्द कोठपर्यंत धरण्याची व बखळ जागा बिनहरकत कोणते ठिकाणी किती वगैरेबद्दल आल्यावरून ठराव करण्यात आला की, म्युनीसीपालिटीची हद्द प्रतबंदी नकाशाप्रमाणे गावचे शिवेपर्यंत धरण्याची व वसूल बिनहरकत जागा मोजून यादी तयार करण्याविषयी मॅनेजिंग कमेटीने तजवीज करून प्रतबंदीकडील नकाशासह प्रकरण सरकारकडे पाठवावे.

नगरपालिका स्थापन झाल्यानंतर दुसऱ्या वर्षी २६–५–१८६६ च्या सभेत ठरविले की, सय्यद इमामुद्दीनबद्दल सगेशा काझी हे मॅनेजिंग कमेटीत होते. ते मयत झाल्याने त्यांचे जागेवर जनरल कमेटीत मोरो पांडुरंग शेंबेकर हे मेंबर नेमावे व ताराचंद माधवजी गुजर हे मॅनेजिंग कमिटीत नेमावे.

इंदापूरच्या सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटनी विचारणा केल्यावरून 'शिर ओझ्या' ची व्याख्या केली की,

(१) चार पायरी कैली मापावर ओझे असेल तर ते शिर ओझे समजून जकात घेणेची.
(२) कडबा पाच पाचुंदे व सरपण मोळी असेल तर शिरी ओझे समजून जकात घेणे
(३) तूप, तेल, गूळ एक पासरीचे (दीड शेर पक्का) आत असेल तर शिर ओझे नाही. त्याचेवर असेल तर शिर ओझे समजावे.



ता. १७–११–१८६६ च्या सभेत असा निर्णय घेण्यात आला की, "म्यु. चा पैसा कोठे ठेवण्याचा याबद्दल विचार करता, रु. ५०० हून जास्ती व्याजी पैसा सावकाराकडे ठेवावा. त्याची जोखीम चेअरमन व सर्व कमेटीवर राहील."

पहिल्या एकदोन वर्षांत कोणत्या प्रकारची कामे झाली, याची कल्पना येण्यासाठी ह्या गोष्टींचा उल्लेख केला. इतक्या विस्ताराने सर्व गोष्टीचा विचार करण्याला अवसर नाही. इ. स. १८६२ ला पहिल्या 'म्युनिसिपल' कायद्यानंतर गेल्या १०० वर्षांत चार कायदे झाले आणि ते बरेवाईट रीत्या राबवून झाल्यावर, नवीन कायद्याचा सूर्य नुकताच जून १९६६ मध्ये उगवला आहे. नगरपालिकेचा ७१ वा वाढदिवस साजरा करताना (इ. स. १९३५) ज्या संयुक्त कायद्याच्या प्रसूतिवेदना होत होत्या, तोच हा कायदा होय.

जुन्या कायद्यात 'बरो म्युनिसिपालिटी,' 'डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटी,' 'सिटी म्युनिसिपालिटी,' 'टाऊन म्युनिसिपालिटी' असे चार प्रकार होते. नवीन कायद्याने एका दावणीत सर्व प्रकार लोकसंख्येवर आधारित असे 'अ, ब, क' समाविष्ट केल्यासारखे झाले आहेत. इतकी वर्षे बारामती म्युनिसिपालिटी ही डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटी ॲक्ट अन्वये चालत असे. नवीन कायद्यावरील तत्त्वाप्रमाणे १९०१ बारामती नगरपालिका ही 'ब' वर्गात आहे.

पहिल्या कायद्याने स्थापिलेल्या म्युनिसिपालिटीत सरकारने नेमलेले १५ सभासद होते. इ. स. १८७३ मध्ये मुंबई सरकारने नवा कायदा केला. पण निवडणुकीचे तत्त्व 'शहर म्युनिसिपालट्या' पुरते मर्यादित केल्या कारणाने, बारामतीचा काही लाभ झाला नाही. तथापि म्युनिसिपालिटीची मालमत्ता व पैसा, रस्त्याची आखणी, आणि अडथळे अगर पीडा यांचा बंदोबस्त या प्रकाराची या कायद्यान्वये व्यवस्था ठरली. ती बारामतीला लागू झाली.

कारभारासाठी उत्पन्न म्हणून कर बसविण्याचे अधिकार विस्तृत झाले आणि आरोग्याविषयीच्या कायद्याचे उल्लंघन करणारास दंड करविण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीला मिळाला. सरकारनियुक्त अधिकाऱ्याचे हाती या अधिकाराची अंमलबजावणी असल्याकारणाने याबद्दल जनतेला समाधान असे कधीच वाटले नाही. या वेळच्या कारभाराचा एक नमुना असा की,

स्कूलमास्तर बारामती यांचे पत्र नं. १४० ता. २८–३–१८७४ प्रमाणे मार्च ते जून १८७४ अखेर. उष्णकाळात ४ महिन्यांत शाळेकडील मुलांना पाणी पिण्यास दरमहा रु. २ प्रमाणे खर्च होणार आहे व शिवाय तपेला, घागर, तपेली, २ पंचपात्री असे सामान मिळावे म्हणून आहे. त्यावर विचार होऊन चार महिने पाण्यासाठी रु. ५।– खर्च करण्यास मंजुरी आहे. भांडी मागाहून आणावीत.

पेठेत जनावरे मोकाट दिवसा व रात्री नेहमी हिंडतात. त्या कारणाने जाणारे–येणारास त्रास होतो. यासाठी कोंडवाडा पेठेत असावा म्हणून महालकरी यांस यादी लिहून अखेर त्यांचे पत्र आलेवरून कोंडवाड्यास व त्याचे रखवालदारासह जागा कोंडवाडा बांधण्यास खर्च व त्याचे रक्षणार्थ निवाऱ्यासाठी जागा अशी कमिटीकडून मिळेल.

इ. स. १८७३ च्या कायदा राबविला जाताना बारामतींत विशेष काही खटकल्याचें आढळत नाही. या कालावधीनंतर लॉर्ड रिपन यांच्या सत्ताविकेंद्रीकरणाच्या फर्मानाचे युग अवतरले. गेल्या १०।१५ वर्षांत सत्तेचे विकेंद्रीकरण (डीसेन्ट्रलायझेशन ऑफ पॉवर) हा शब्द फार वापरात आहे. पण तो त्याच्याहि अगोदर प्रदीर्घ कालापासून राज्यशासनाच्या कारभारांत घुटमळत आहे. त्यात इतकी वाटचाल केल्यावर खरोखर त्याचे बी रुजले की नाही हे भावी इतिहासच ठरविणार आहे.

भारताचे त्यावेळचे गव्हर्नर–जनरल लॉर्ड रिपन यांनी आपल्या ठरावात असे म्हटले की, "सरकारी अधिकाऱ्यामार्फत कामे चालत असल्याने जी व्यवस्था रहाते. त्यापेक्षा चांगली व्यवस्था लोकाकडून आजच राहू लागेल असे हिंदुस्थान सरकारचे म्हणणे आहे असे समजू नये. जी व्यवस्था योजिली आहे ती कारभारांत सुधारणा व्हावी हा

पूरक हेतू धरून योजलेली नाही. लोकांना राज्य प्रकरणी सुलभ रीतीने शिक्षण मिळण्यास ती मुख्यत्वेकरून उपयोगी आहे. ठिकठिकाणच्या लोकांच्या हातूनच त्यांचा कारभार घालविण्याविषयी प्रयत्न झाले खरे, पण सरकारी कामगारांनी या लोकांच्या उद्योगात विनाकारण हात घातला. यामुळे सर्व प्रयत्न निष्फळ झाले असा सरकारचा अभिप्राय आहे.

बारामतीचे बाबतीत असा अनुभव आला नाही, असे अभिमानपूर्वक म्हणता येते. आरंभीचे मॅनेजिंग कमिटीचे चेअरमन मुसाभाई तय्यबजी यांनी केलेल्या कामावर खुष होऊन श्रीराम–मंदिराचे सभामंडपासाठी लोकांनी व अधिकाऱ्यांनी मिळून जमा केलेली वर्गणी मुसाभाईचे हातून कारणी लागावी असा लोकांनी अर्ज केला व त्याबरहुकूम ते काम झाले, असा दप्तरी उल्लेख आहे.

लॉर्ड रिपन यांनी प्रसृत केलेल्या, उपरिनिर्दिष्ट ठरावात मुख्य उद्दिष्ट असे होते की, राजकीय कारणाकरिता सरकारी कामगाराचे ताब्यात ही कामे असलीच पाहिजेत. अशी कामे खेरीजकरून इतर सर्व कामे अंगावर घेऊन करण्याची लोकांची योग्यता वाढवावी व ती नसल्यास उत्पन्न करावी. याहून दुसरा कोणताहि चांगला उपाय दिसत नाही. या हेतूची पूर्तता करताना सरकारने जी कारणे सांगितली त्यांमध्ये सभासदांची निवडणूक व सरकारचा बाहेरून दाब ही होती. तपशील म्हणून म्युनिसीपालिटयांचे अधिकारक्षेत्र वाढविणे, शिक्षणसंस्था त्यांचे ताब्यांत देणे, अध्यक्ष–उपाध्यक्षाचे जागी बिन सरकारी सभासदांची नेमणूक करणे वगैरे योजना होत्या.

दिल्लीतील हे 'विकेंद्रीकरणा' चे वारे मुंबईतल्या लाटांना तितकेसे आवडत नव्हते. त्या वेळच्या एका सरकारी अहवालात असे स्पष्ट म्हटले आहे की, "The Smaller Municipalities are certainly not schools of Self—Government." (म्हणजे निदान लहान नगरपालिका स्वायत्ततेचे शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत असे म्हणता येत नाही.) पुष्कळ पत्रव्यवहार होऊन मुंबई सरकारने दिल्लीचे म्हणणे मान्य केले व नगरपालिकांच्या इ. स. १८८४ च्या कायद्याचा जन्म झाला.

या कायद्यान्वये सभासदांपैकी अर्धा अधिक भाग निवडलेला असावा असे ठरले. सिटी व टाऊन असे म्युनिसीपालिट्यांचे भेद नाहीसे झाले. सरकारच्या नजरेनुरूप बिन सरकारी सभासदातून अध्यक्ष नेमणे शक्य झाले; सरकारचा दाब आतून होता तो गेला; पण नियंत्रण शिल्लक राहिले. शिक्षणविषयक बाब नगरपालिकेकडे आली; आणि पोलिसांचा खर्च देण्यातून नगरपालिका मुक्त झाली.

नव्या कायद्यान्वये, बारामती म्युनिसीपालिटीचे अध्यक्षाखेरीज एकंदर १२ सभासद असावेत असे ठरले; त्यांत ६ लोकनियुक्त; ३ पेक्षां जास्त नाहीत इतके सरकारनियुक्त सरकारी अधिकारी; आणि बाकीचे सरकारनियुक्त बिन सरकारी गृहस्थ. सरकारी ठराव नं. २९४० ता. ४ ऑगस्ट १८८५ चा याअन्वये या घटनेला मंजुरी मिळाली. निवडणुकीसाठी गावाचे ६ विभाग पाडले. (१) कसबा, (२) मारवाड पेठ, (३) कोष्टी आळी, (४) भवानी पेठ, (५) कासार आळी व (६) गुरुवार पेठ. दरवर्षी २ रु. प्रत्यक्ष म्युनिसिपल कर भरणारे लोक, १० रुपयांचे पेन्शर, ग्रॅज्युएट (पदवीधर) वकील, ३० रु. व वरचे पगाराचे सरकारी नोकर, हिंदुस्थान सरकारचा लायसेन्स कर म्हणजे सध्याचा इन्कमटॅक्स (प्राप्तीवरील कर) वर्षास १० रुपये व त्यापेक्षां जास्त शेतसारा व खंड भरणारे लोक सरदार, ऑनररी मॅजिस्ट्रेट, सरकारांतून पदव्या मिळालेले गृहस्थ, अशा वर्णनाच्या लोकांना मतदानाचा हक्क होता. मतदारांची संख्या ३५४ होती व ता. १ सप्टेंबर १८८५ रोजी पहिली निवडणूक झाली.

या निवडणुकीसाठी सहा वॉर्ड मिळून एकंदर २४ उमेदवार होते. २८८ मतदारांनी नावे नोंदली. पुढील सहा उमेदवार सभासद म्हणून निवडले गेले:–

## माननीय अध्यक्ष



श्री. जयराम पांडुरंग सातव, बारामती म्यु. पल कौन्सिल.

## माननीय उपाध्यक्ष



श्री. मा. तु. शाह

# नगरपालिकेचे लोकनियुक्त अध्यक्ष



कै. श्री. रामचंद मलूकचंद गुजर
एप्रिल १९०९ ते ३०-६-१९२१ व
१९-७-१९२४ ते १७-११-१९२९.



कै. श्री. सदाशिव वासुदेव करंदीकर
बी. ए. एल्.एल् बी.
१-७-१९२१ ते १८-७-१९२४



कै. श्री. सोपानराव तुकाराम जाचक
१-११-१९३० ते ३०-१०-१९३३



कै. श्री. नारायण मनोहर दाते
बी. ए. एल्एल्. बी.
११-११-१९३३ ते १०-११-१९३६



कै. श्री. रंगो नारायण गुजर
११-११-१९३६ ते १०-१०-१९३९



श्री. रा. सा. नारायण रामचंद्र ढो
११-११-१९३९ ते २३-१२-१९



श्री. मा. तु. शाह
२४-१२-१९४८ ते ६-११-१९५२



श्री. धों. आ. सातव
६-११-१९५२ ते ३०-१-१९६४



श्री. वि. रा. सोनवले
३०-१-१९६४ ते ३०-६-१९६





श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर ता. १-६-१९४७ पासून.



कै. श्री. म. ना. सहस्रबुद्धे
गरपालिकेचे माजी सेक्रेटरी व शाहिरी
वाङ्मयाचे उपासक



श्री. शि. गो. जोशी
डी. सी. ई.
सेक्रेटरी १९४६–४७



श्री. श्री म. सहस्रबुद्धे
शताब्दि समाचार ग्रंथाचे लेखक

# महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांची भेट



बारामती नगरपालिका अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य यांचेसह.



खुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) हेडक्लार्क शां. भि. पोटे, (२) श्री. का. सि. सोनवले, (३) श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर.
मागे उभे :- (४) उ. रा. शिंदे नाईक.



ुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) श्री शां भि. पोटे, (२) श्री. य. कों. सोनवणे, (३) श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई.
मागे उभे :- श्री. उ. रा. शिंदे.

# ऑफिस-स्टाफ-बारामती म्यु. पल कौन्सिल, बारामती.



खुर्चीवर बसलेले पहिली रांग :- (१) द. नि. आगवणे, (२) अ. ल. जाधव, (३) शां. भि. पोटे, (४) प्र. कृ. दे
(५) नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर, (६) मा. शं. कऱ्हे, (७) ए. आर्. शेख, (८) मु. शं.
(९) एच्. के. मदने, (१०) रत्नमाला सी. गायकवाड.

खुर्चीवर बसलेले डावीकडून दुसरी रांग :- (११) गं. दि. लालबिगे, (१२) गं. धों. चौधरी, (१३) चं. वा.
(१४) म. कृ. गालिंदे, (१५) व. कृ. सावंत, (१६) नं. आं. पालीवाल, (१७) गं. श्री. बेलपत्रे, (१८) वि. शि बा
(१९) मो. भा. नाचणे, (२०) र. वैद्य, (२१) बा. ग. गिजरे, (२२) वि. अ. परांजपे, (२३) उ. शि. बा
(२४) उ. रा. शिंदे (नाईक), (२५) गु. मु. जाधव.

तिसरी रांग उभे राहिलेले डावीकडून :- (२६) सो. शं. जगताप, (२७) ए. कें. हवालदार, (२८) के एल्.
(२९) शि. वा. देशमुख, (३०) दा. आ. कोकटे, (३१) म. ह. शु. बागवान, (३२) शां. द. खडके, (३३) बा. ल.
(३४) शि. दे. जगताप, (३५) ह. नि. थोरात, (३६) कृ. शं. लोहकरे, (३७) व. व. तावरे, (३८) भ. बु. सा

# जकात खाते बारामती म्यु. पल कौन्सिल, बारामती.



खुर्चीवर बसलेले पहिली रांग डावीकडून :- (१) आ. वा. भोसले, (२) गो. न. बहुलकर, (३) म. दि सोनवणे, (४) वा. ना. सोनवणे, (५) सय्यद कें. एल्.,
(६) व. कृ. सावंत, (७) मे. चीफ ऑफिसर नि. श्री. कानिटकर, (८) मा. प्रेसि. सों. ज. पां. सातव, (९) नं. आं. पालीवाल, (१०) मो. भा. नाचणे,
(११) मा. द. भिले, (१२) मा. मो. फाळके, (१३) शा. अी. काझी.



खुर्चीवर बसलेले डावीकडून :– (१) शांताबाई डी. वावळे, (२) शालिनीबाई चंद्रसेन जाधव, (३) डॉ. सौ. मनोजा रमेश जोशी, (४) डॉ. एच्. के. बलानी, (५) डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी, (६) डॉ. के. एस्. गायकवाड, (७) ब. मा. देशपांडे, (८) इंदिराबाई एल्. शेपाळ, (९) सौ. पी. पी. देशमुख.

दुसरी रांग उभी :– (१०) भि. पा. एकाड, (११) चं. कि. गडियाल, (१२) भा. ना. लोखंडे, (१३) मा. ज. कळसकर, (१४) आ. रा. पांडकर, (१५) हि. रा. कागडा, (१६) व्यं. पा. दाउतखाने.

तिसरी रांग उभी डावीकडून :– (१७) कि. मो. गडियाल, (१८) सो. अ. सोनवणे, (१९) बा. शं. शितोळे, (२०) मा. ल. चव्हाण, (२१) सु. वि. जाधव, (२२) आ. रा. घोडकर, (२३) बा. पां. कांबळे.



**उत्कृष्ट कंपोस्ट खत निर्मितीबद्दल फिरती ढाल महाराष्ट्र सरकार तर्फे**
श्री. मा. शं. कटे ( फूड इन्स्पेक्टर. )




खुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) श्री. डॉ व. मा. कोठारी चेअरमन,
(२) श्री. डॉ. महाजन व्हेटरनरी सर्जन,
दुसरी रांग उभी :– (३) जा. गो. लोणकर कंपौंडर,
(४) श्री. र. म. सोनवले कारकून,
तिसरी रांग उभी :– (५) श्री. ना. ग. शिरसट वॉर्डबॉय,
(६) श्री. म. तु. राऊत ड्रेसर.

# नगरपालिका वाचनालय



डावीकडून :– (१) श्री. उ. शि. बारटक्के ग्रंथपाल, (२) श्री. शेख हा. मं. बागवान, चेअरमन शिक्षण-स
(३) श्री. नि. श्री. कानिटकर, डी. सी. ई. चीफ ऑफिसर.



वाचनालयांतील वाचक वर्ग.



खुर्चीवर बसलेली दुसरी ओळ :– (१) वं. गु. परदेशी, (२) ह. नि. थोरात, (३) मा. शं. कट्टे, (४) डॉ. व. मा. कोठारी, (५) आ. ल. जाधव, (६) बा. लि. गोंजारे, (७) ना. मो. परदेशी.

माता बाल संगोपन केंद्र स्टाफ व चअरमन सॅ. मे. व म. हे. कमेटी.



खुर्चीवर बसलेले डावीकडून :– (१) मा. मा. दंडवते, (२) श्री. मा. वर्धमान माणिकचंद कोठारी
(३) डॉ. सौ. म. र. दोशी, (४) सौ. ए. ए. महाजन, (५) ए. के. हवालदार (शिपाई).

श्रीसत्यनारायण पूजा १९ ऑगस्ट १९६६



माननीय अध्यक्ष श्री. जयराम पांडुरंग सातव व सौ. सुभद्राबाई जयराम सातव व हरी शंकर कानिटकर



पाणीपुरवठा योजना पाइप लाइन टाकणेंसाठीं मा. मा. तु. शाह उपाध्यक्ष हे लाइनसाठीं पहिला टिकाव घालीत आहेत.

ता. १०-४-१९६७ रोजीं वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर श्री. ज. पां. सातव अध्यक्ष यांचें हस्तें भूमिपूजन सि. ज्यु. हॉस्पिटलमधील नव्या इमारतीसाठीं होत आहे.





श्री. ज. पां. सातव अध्यक्ष यांचे हस्तें पायाखोदाई समारंभ ता. १०-४-१९६७ रोजीं झाला.





नगरपालिका स्थापनेच्या १ जानेवारी १८६५ च्या पहिल्या दिवसाचें रोजकीर्दीचें पान



तारीख २७-१-६५ रोजीं पाण्याच्या टाकीचा भूमिपूजन समारंभ
श्री. वि. रा. सोनवले यांच्या शुभहस्तें झाला.



पाणीपुरवठा योजनेचा पाइप लाइन टाकणेचे वेळीं भूमिपूजन समारंभ नगरपालिकेचे उपाध्यक्ष श्री..मा. तु. शाह यांचे शुभहस्तें ता. १३-३-१९६७ रोजीं डेप्युटी इंजिनिअर श्री. खाडिलकर ( काळा चष्मा ) यांचे उपस्थितींत साजरा झाला.

## नगरपालिकेचे विद्यमान सभासद



खुर्चीवर बसलेले डावीकडून :-( १ ) श्री. ल. ना. इंगुले, ( २ ) श्री. कृष्णा शंकर सोनवले, ( ३ ) श्री. स. बा. गालिंदे, ( ४ ) श्री. ज. पा. सातव अध्यक्ष, ( ५ ) श्री. मा. तु. शाह उपाध्यक्ष, ( ६ ) श्री. आ. रा. गाडे ( ७ ) श्री. य. को. सोनवणे, ( ८ ) श्री. डॉ. व. मा. कोठारी, ( ९ ) श्री. सौ. वसंतमाला शिल्होरा

मागील रांग खुर्चीवर बसलेले डावीकडून :- ( १ ) श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर, ( २ ) श्री. शेख मो. हु. बागवान, ( ३ ) श्री. रा. के. रासकर, ( ४ ) श्री. शेख हा. मं. बागवान, ( ५ ) श्री. भा. अ. काटे.

स्टँडिंग कमेटी



खुर्चीवर बसलेले डावीकडून :-(१) श्री. शेख हा. मं. बागवान, (२) श्री. कृ. शं. सोनवले, (३) श्री. का. सि.
(४) श्री. ज. पां. सातव चेअरमन, (५) श्री. डॉ. व. मा. कोठारी, (६) श्री. आ. रा. गाडे, (७) श्री. य. कों.
मागें मध्यभागीं उभे :-श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर.

प्लॅनिंग व डेव्हलपमेंट कमेटी



खुर्चीवर बसलेले डावीकडून :-श्री. देशमुख स्टोअरकीपर, (२) श्री. र. ना. वैद्य मिस्त्री, (३) श्री. देशमुख
(४) श्री. स. बा. गालिंदे, (५) श्री. का. सि. सोनवले चेअरमन, (६) श्री. रा. के. रासकर, (७) श्री.
बागवान, (८) श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर.

वॉटर सप्लाय व ड्रेनेज कमेटीचे चेअरमन व अन्य सभासद



खुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) श्री. आ. रा. गाडे, (२) श्री. कृ. शं. सोनवले, (३) श्री. य. कों. सोनवले चेअरमन, (४) श्री. नि. श्री. कानिटकर डी. सी. ई. चीफ ऑफिसर.

एज्युकेशन कमेटी



खुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) श्री. आ. रा. गाडे, (२) श्री. शेख हा. मं. बागवान चेअरमन, (३) श्री. ज. पां. सातव अध्यक्ष, (४) श्री. भा. आ. खरात.

# सॅनिटरी मेडिकल व पब्लिक हेल्थ कमेटी



खुर्चीवर बसलेले डावीकडून :- (१) सौ. लक्ष्मीबाई धों. सातव, (२) श्री. धों. आ. सातव, (३) श्री. डॉ. व. मा. को[...]
चेअरमन, (४) श्री. भा. आ. खरात, (५) श्री. नि. श्री. कानिटकर डो. सी. ई. चीफ ऑफिसर.
मागे उभे डावीकडून :- (१) श्री. अ. ल. जाधव असिस्टंट सॅ. इन्स्पेक्टर, (२) श्री. एम्. एस्. कन्हे चीफ सॅ. इन्स्[...]
व फूड इन्स्पेक्टर

# वॉटर सप्लाय ड्रेनेज कमेटी व पब्लिक वर्क्स स्टाफ



खुर्चीवर बसलेले डावीवडून :- (१) श्री. देशमुख स्टोअरकीपर, (२) श्री. नि. श्री कानिटकर डी. सी. ई.
ऑफिसर, (३) श्री. कृ. शं. सोनवले, (४) श्री. य. को. सोनवले चेअरमन, (५) श्री. देशमुख ओव्हर[...]
(६) श्री. र. ना. वैद्य मिस्त्री.
मागील उभी रांग डावीकडून :- (१) श्री. ल. शिंदे आ. ए. ड्रायव्हर, (२) श्रीं. काळू ह. घोरपडे आ. ए. ड्रा[...]
(३) श्री. उ. ल. शिंदे नाईक, (४) श्री. बा. शं. भोकरे आ. ए. ड्रायव्हर, (५) श्री, मोरे आ. ए. ड्रायव्हर.



| वॉर्ड नं. | यशस्वी उमेदवाराचे नाव | एकंदर नोंदलेली मते | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १ | विठ्ठल रघुनाथ देशपांडे | ४८ | ३८ |
| २ | भवानीराव साहेबराव | ४१ | ३३ |
| ३ | मारुती विठोबा वाळवे | ४२ | २९ |
| ४ | मलुकचंद ताराचंद | ६३ | ३८ |
| ५ | रामचंद देवचंद | ५३ | ४१ |
| ६ | मनोहर बल्लाळ दाते | ४२ | ३७ |

ह्या सहा लोकनियुक्त सभासदांचे जोडीला पुढील सहा सरकारनियुक्त सभासद होते:-

( १ ) रामराव कृष्ण–महालकरी, ( २ ) येसुजी महादूजी–चीफ कॉन्स्टेबल, ( ३ ) केशव विश्वनाथ भागवत शाळा शिक्षक, ( ४ ) सिताराम नारायण देशपांडे, ( ५ ) सिताराम आबाजी लोणकर व ( ६ ) अहमद अल्ली मुसाभाई बोहरी.

ता. १५ ऑक्टोबर १८८५ पासून यांच्या कारभाराला प्रारंभ झाला.

यानंतरची निवडणूक १ मार्च १८८९ ला झाली. पुढील उमेदवार निवडून आले—(१) श्री. नारायण लक्ष्मण कुलकर्णी, ( २ ) भवानीराम साहेबराम, ( ३ ) श्री. मारुती विठोबा वाळवे, ( ४ ) श्री. मलुकचंद ताराचंद गुजर, ( ५ ) श्री. रामचंद देवचंद गुजर व ( ६ ) श्री. मनोहर बल्लाळ दाते.

सरकारने नेमलेले सभासद—(१)श्री. गोपाळ बाबाजी खाडे महालकरी, ( २ ) श्री. भिकाजी आनंदराव देशपांडे, ( ३ ) श्री. गंगा बीन डॉक्टर, ( ४ ) श्री. अहमदअल्ली मुसाभाई, ( ५ ) बाळाजी मार्तंड करंजकर व ( ६ ) श्री. रामलाल साहेबराम

तिसरी निवडणूक ता. ३ मार्च १८९२ ला झाली. मतदारांची संख्या २२५ होती. पैकी १३२ जणांनी मतदान केले. पुढील सहा उमेदवार निवडून आले.

( १ ) श्री. मलुकचंद ताराचंद गुजर, ( २ ) श्री. नारायण लक्ष्मण दंडवते, ( ३ ) श्री. रामचंद देवचंद गुजर, ( ४ ) श्री. मारुती विठोबा वाळवे, ( ५ ) श्री. रामलाल साहेबराव मारवाडी, व ( ६ ) श्री. सिताराम भावजी लोणकर.



या वेळी नऊ उमेदवार होते. सरकारने नेमलेले सभासद असे—( १ ) श्री. नारायण विश्वनाथ नेने महालकरी, ( २ ) श्री. गणपतराव अर्जुनराम डॉक्टर, ( ३ ) श्री. भिकाजी आनंदराव देशपांडे, ( ४ ) श्री. अहंमदभाई मुसाभाई बोहरी, ( ५ ) श्री. गोविंदराव कृष्णराव काळे इनामदार व ( ६ ) श्री. महारुद्र विश्वनाथ आय्या.

यानंतर ता. १६।१।१८९५ ला निवडणूक होऊन १५८ पैकी ९० मतदारांनी मतदान केले. लोकनियुक्त सभासद असे—( १ ) श्री. नारायण लक्ष्मण, ( २ ) श्री. मलुकचंद ताराचंद, ( ३ ) श्री. रामलाल साहेबराम, ( ४ ) श्री. सिताराम आबाजी, ( ५ ) श्री. रामचंद देवचंद व ( ६ ) श्री. भवानीराम साहेबराम.

सरकारने नेमलेले सभासद ( १ ) श्री. भिकाजी आनंदराव देशपांडे, ( २ ) श्री. गोविंदराव कृष्णराव काळे, ( ३ ) श्री. पिराजी कामाजी डॉक्टर, ( ४ ) श्री. विठ्ठल बळवंत फाटक, ( ५ ) श्री. महारुद्र विश्वनाथ आय्या, ( ६ ) श्री. अब्दुल हुसेन बोहरी, ( ७ ) मामलेदार बारामती.

एक सभासद श्री. रामचंद देवचंद हे निधन पावल्यामुळें रिकाम्या झालेल्या जागेसाठी पोट-निवडणूक झाली. श्री. शंकर रामशेट भेडदे हे निवडून आले. ( १६–१–१८९६ )

निवडणुकीविरुद्ध श्री. गोविंद रघुनाथ देशपांडे

यांचा तक्रारी अर्ज आला. त्याचा विचार करून या बाबतीत गैर कायदा काही झाल्याचे दिसत नाही व म्युनिसिपालिटीस जास्त तजवीज करण्याचे कारणही दिसत नाही. म्हणून तसा अर्जदारास जबाब देण्याचे ठरले.

एकोणिसाव्या शतकातील अखेरची निवडणूक २५ फेब्रुवारी १८९८ ला झाली. मतदारसंख्या १८८ होती. १२३ मतदारांनी मतदान केले. निवडून आलेले सभासद :-(१) श्री. नारायण लक्ष्मण, (२) श्री. मलुकचंद ताराचंद, (३) श्री. भवानीराम साहेबराव, (४) श्री. शंकर रामशेट मेडदे, (५) श्री. गोविंदराव रघुनाथ देशपांडे व (६) श्री. रामलाल साहेबराम.

सरकारने नेमलेले सभासद :-(१) श्री. राव साहेब व्यंकटेश दामोदर पुणतांबेकर, (२) श्री. विठ्ठल बलवंत फाटक-त्याऐवजी नंतर श्री. बी. एम्. कॅंजळे, (३) श्री. गोविंदराव कृष्णराव काळे, (४) श्री. दामोदर रघुनाथ दाते, (५) श्री. भिमाजी आनंदराव व (६) श्री. ताजुद्दीन कासीम पीरजादे.

निवडलेले सभासद निम्मे असावेत हे प्रमाण इ. स. १८८५-८६ मध्ये ठरले ते इ. स. १९२०-२१ पर्यंत चालू होते. इ. स. १९०१ ला नवीन कायदा झाला; त्यात ही संख्या वाढविण्याला मुभा होती; पण शासनाने त्याचा अमल फार मंदगतीने केला. इ. स. १९२०-२१ ला हे प्रमाण चार पंचमांश-पर्यंत आले. एकोणिसाव्या शतकातील निवडणुकीचे निर्णय विस्ताराने दिले. त्यांतील बरीच नावे आजच्या पिढीलाही परिचित आहेत, असे म्हणता येईल. नंतरच्या निवडणुकीचा इतक्या विस्ताराने मागोवा घेण्याची आवश्यकता नाही.

इ. स. १९२० मध्ये एकूण सभासदांची संख्या १५ पैकी फक्त ३ सरकार नियुक्त अशी ठरते. उमेदवाराच्या नावाच्या पेट्या ओळखू याव्यात म्हणून पेट्यांना निरनिराळे रंग देत. मतदाराने मतपत्रिका आपल्याला पाहिजे त्या उमेदवाराच्या रंगाच्या पेटीत टाकण्याची प्रथा याच वेळी सुरू झाली. पुढे सहा वर्षांनी नगरपालिकेच्या निवडणुकीला उभे राहणाऱ्या उमेदवाराकडून रु. ५० अनामत रक्कम घेऊन जी मतनोंदणी होईल, तिच्या अष्टमांश मते ज्या मिळणार नाहीत, त्याची अनामत रक्कम जप्त हो सुरू झाले. वाटेल त्याने उमेदवार उभे राहू नये, ह यामागची कल्पना होती.

मुंबई सरकारने इ. स. १९२२ मध्ये मुसलमानां साठी स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्याचा ठराव केला त्याची अम्मलबजावणी बारामतीला इ. स १९२४ च्या सार्वजनिक निवडणुकीचे वेळ झाली. श्री. अंबीर मस्तुम बागवान हे त्या वे निवडून आले तेव्हा मतदारविभाग चार हो सरकारनियुक्त सभासद ३ : श्री. एच. आर. कार्व्हे श्री. मानोजीराव लिंबाजी म्हसे व श्री. नारा मनोहर दाते. एकूण सभासदसंख्या १५ होती.

ही रचना इ. स. १९३८ पर्यंत सुरू होती. वेळी सरकारनियुक्त सभासदांची प्रथा पूर्ण बंद झा व एकूण सभासदांची संख्या १८ ठरविली गे तीत स्त्रियांसाठी राखीव ११, हरिजनांसाठी. रा १ व मुसलमानासाठीं राखीव २ अशी व्यव झाली. याप्रमाणे निवडणूक होऊन नगरपालिके पहिल्या स्त्री सभासद होण्याचा मान सौ. कमला केशव गोखले यांस मिळाला. श्री. सावळा पिरा हे निवडून आलेले पहिले हरिजन सभासद होत. अगोदर त्यांची सरकारने एकदा नियुक्ति केली हो एकूण मतदार-विभाग ८ होते.

विभक्त मतदार-संघाची व्यवस्था होती तो बिगर मुसलमान मतदार संघ व मुसलमान मत संघ असे म्हणण्याची प्रथा होती. या पद्धतीने न पालिकेची शेवटची निवडणूक इ. स. १९४८ झाली, तेव्हां हरिजनांसाठी ३, मुसलमानांसाठी व स्त्रियांसाठी १ अशा राखीव जागा होत्या. प्र वरील कर भरलेल्यांना मतदानाचा अधिकार अस मुळे, निवडणुकीचे (म्हणजे मतदानाचे) अ या व्यक्तींची नावे सरकारकडून मिळवून ती दारांच्या यादीत प्रविष्ट केली जात असत.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाहीने ज महत्त्वाचे बदल केले ते म्हणजे, (१) वयात आ



प्रत्येक स्त्रीपुरुषास मतदानाचा अधिकार यामुळे मतदारांचे निरनिराळे वर्ग असत ते सर्व संपुष्टांत आले. विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी मतदारांच्या ज्या याद्या असतात, त्याच नगरपालिकेच्या निवडणुकी (शहरविभागापुरत्या) वापरणे सुरू झाले. (२) स्त्रिया हरिजन (शिड्यूल कास्ट) व गिरिजन (शिड्यूल ट्राईब्ज) याव्यातिरिक्त इतर कोणत्याहि जमातीला राखीव जागा देण्याचे तत्त्व नाहीसे करण्यात आले. इ. स. १९५० मध्ये मुंबई सरकारने केलेल्या १७ नंबरच्या कायद्यान्वये हे बदल घडून आले.

ह्या नवीन पद्धतीने बारामती नगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक इ. स. १९५२ मध्ये झाली. याबाबतचा सरकारी ठराव ता. २४ ऑक्टोबर १९५१ चा आहे. तेव्हा एकूण जागा १८ पैकी हरिजनांसाठी ३ व स्त्रियांसाठी २ राखीव जागा होत्या. एकूण मतदार ११३०२ होते.

या पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी म्हणजे इ. स. १९५७ मध्ये एकूण सभासदसंख्या २१ ठरली. पैकी ३ हरिजनांसाठी व २ स्त्रियांसाठी राखीव जागा होत्या. याबाबतचा सरकारी ठराव २ मार्च १९५६ चा आहे. एकूण मतदार १०,८८१ होते.

प्रथम सार्वत्रिक निवडणुकी त्रैवार्षिक होत्या, पण इ. स. १९५४ मध्ये त्या चार वर्षांनी घेण्याचे ठरले. ही मुदत जास्तीत जास्त ५ वर्षे करता येत असे.

त्याप्रमाणे वरच्या निवडणुकीनंतर इ. स. १९६१ मध्ये सार्वत्रिक निवडणूक व्हावयाची. निवडणुकीचा जाहीरनामा काढला गेला व पुढची तयारी झाली. पण मतदारांच्या याद्या नव्या शिरगणतेप्रमाणे असाव्यात या मुद्द्यावर प्रकरण हायकोर्टात गेल्या कारणाने ती ऐनवेळी तहकूब केली. मग ती निवडणूक ता. ११ डिसेंबर १९६३ ला झाली. या वेळी एकूण सभासदसंख्या २१. हरिजनांसाठी २ व स्त्रियांसाठी २ राखीव जागा, अशी योजना होती.

यानंतर सध्या अस्तित्वात आलेल्या कायद्यान्वये सार्वत्रिक निवडणुकी करण्याची तयारी सुरू आहे. सार्वत्रिक निवडणुकी पाच वर्षांनी कराव्यात असे कायद्याने ठरविले आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची मुदतहि प्रतिनिधी मंडळाइतकीच राहणार आहे. या कायद्यामधील एक महत्त्वाचा बदल असा की, एकेरी मतदार संघ (सिंगल मेंबर कॉन्स्टिट्युअन्सी स्थापण्यात येत आहे. यापूर्वी एकच मतदारसंघातून एक अथवा जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी निवडता येत असे. आता त्या पद्धतीला तिलांजली देऊन जितके सभासद तितके शहरातले मतदार संघ हे तत्त्व मान्य करण्यात आले आहे याबाबत बारामती नगरपालिकेसाठी सरकारी ठराव ता. ३० सप्टेंबर १९६५ चा आहे.

या ठरावान्वये नगरपालिकेचे प्रतिनिधी मंडळ (जनरल बोर्ड) २० सभासदांचे व्हावे असे आहे. त्यात स्त्रियांसाठी २ जागा व हरिजनांसाठी १ जागा राखीव आहे. गावात एकूण २० मतदार-संघ होणार आहेत.

त्यात वरील राखीव जागांची अनुक्रमे १० व १९ स्त्रियांसाठी आणि १५ नंबरच्या मतदार-संघात शिड्यूल कांस्टसाठी केलेली आहे. मतदार-संघांना नावे देतांना निरनिराळ्या विभागांवरील प्रसिद्ध संस्था, मंदिरें इ० यांची नावे दिली आहेत. येती निवडणूक ता. ३ जून १९६७ रोजी असून मतदारसंख्या अंदाजी.

आता पुढील मतदार-संघ मुक्रर करण्यात आले आहेतः-१ कसबा, २ काशीविश्वेश्वर, ३ चांदशावली, ४ सिद्धेश्वर, ५ श्रीराम मंदिर ६ रामेश्वर मंदिर, ७ विठ्ठल रखुमाई, ८ ज्योतीबा, ९ उघडा मारुती, १० दुर्गा देवी (स्त्रियांसाठी राखीव), ११ बालाजी, १२ दत्तगुरू, १३ जुम्मामशीद, १४ भाजीपाला मार्केट १५ दाणे बाजार (हरिजनांसाठी राखीव), १६ सिनेमा, १७ मार्केट यार्ड, १८ आंबराई, १९ भीमनगर (स्त्रियांसाठीं राखीव) व २० अशोक नगर.

या नवीन कायद्यान्वये पुढील समित्यांची निवड करावी लागतेः--(१) स्थायी समिति, (२) बांधकाम समिती, (३) शिक्षण समिती, (४) सफाई, वैद्यक व आरोग्य समिती, (५) पाणीपुरवठा

व जलनिःसारण ड्रेनेज समिती), (६) नियोजन व विकास समिती.

याखेरीज इतर सल्लागार समित्या नेमता येतील. पण त्यांचे अधिकार व कार्यक्षेत्र मर्यादित विशिष्ट कारणापुरते राहील. ह्या समित्यांची निवड प्रतिनिधी मंडळाने ' सिंगल ट्रॅन्स्फरेबल प्रेफरेन्शिअल ' मतदान पद्धतीने करावयाची, हा मूलभूत फरक नव्यानेच केला आहे. अल्पसंख्याक गटाच्या सभासदांना निवडून येण्याला वाव मिळावा हा व्यवस्थेचा उद्देश आहे. ह्यापूर्वी अल्पमतात असलेल्या सभासदांना प्रातिनिधित्व स्थायी समितीची रचना ही विशेष आहे. अध्यक्ष हे स्वार्थी समितीचे अध्यक्ष आहेत. पाच विषयनियामक समित्यांचे ( कायद्याने ठरवून दिलेल्या म्हणजे स्टॅटयुटरी ) अध्यक्ष हे स्थायी समितीचे पदसिद्ध सभासद होतात. त्याशिवाय तीन सभासद प्रतिनिधी मंडळाने निवडावयाचे असतात. थोडक्यात स्थायी समितीचे स्वरूप " Co-ordinating" कमिटीसारखे आहे. म्युनिसिपल कौन्सिलच्या निर-निराळ्या समित्यांत काय काय कामकाज चालले आहे ह्याची सविस्तर माहिती ह्या समितीतील सभासदांस वरील रचनेन्वये उपलब्ध होण्याचे साधन झाले आहे.

पाच विषयनियामक समित्यांचे सभासद किती असावेत हे प्रतिनिधी मंडळाने ( कौन्सिलने ) ठरवावयाचे आहे. त्याचबरोबर उपाध्यक्ष हा कोणत्या विषयनियामक समितीचा अध्यक्ष असावा, हे कौन्सिलने ठरवावयाचे आहे. कायद्यात अशी स्प तरतूद आहे की, एका सभासदाला एका वेळ जास्तीत जास्त दोन विषयनियामक समित्यांच सभासद होता येईल. अध्यक्ष हा स्थायी समितीच पदसिद्ध अध्यक्ष राहील. इतर विषयनियाम समित्यांचे अध्यक्षपद त्याला स्वीकारता येणार नाह मात्र कोणत्याही विषयनियामक समितीत जाउ त्यास भाषण करता येईल. त्या समितीच्या का काजात ( डेलिबेरेशन ) ( Deliberation ) त्यां भाग घ्यावयाचा नाही.

या नवीन कायद्यातील इतर महत्त्वाच्या तरतु बाबत अन्यत्र उल्लेख करावयाचा असल्याकाणाने, विवेचन येथेच संपवून नगरपालिकेच्या कारभारा वळू या.

# नगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने

संसार करावयाचा किंवा चूल पेटवावयाची म्हटले की, तांदूळ मिळण्याची व्यवस्था प्रथम करावी लागते, अशा अर्थाची एक संस्कृत म्हण आहे. त्या न्यायाला अनुसरून नगरपालिकेला आपला खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचा विचार कर्तव्यप्राप्त झाला. जकात हे एक उत्पन्नाचे साधन प्रथमपासून आजतागायत चालू आहे. अप्रत्यक्ष कराचा हा प्रकार आहे. म्हणजेच एका अर्थाने हा व्यापारावरील कर आहे. ग्राहकावरच तो बसतो. ही करपद्धती फार जुनी आहे. आर्य चाणक्याच्या 'अर्थशास्त्र' या विषयावरील ग्रंथात त्याचा सूक्ष्म विचार केलेला आहे. गावात येणाऱ्या मालावर जकात घेतात; काही वेळेला गावातून जाणाऱ्या मालावरही जकात घेतली जात असे.

नगरपालिकेच्या पहिल्या सहामाहीचे अखेरीस नियामक मंडळाने ' जकात बारामती, ' असा शिक्का करून घेण्याला मंजुरी दिली. इ. स. १८६५–६६ मध्ये जकातीचे उत्पन्न रु. २००८–१५–९ इतके झाले होते. एकोणीसाव्या शतकाचे अखेरीस ते रु. ५७९१–१५–६ इतके झाले, कारण वेळोवेळी दर वाढविले आणि नव्या नव्या वस्तूंवर जकात घेण्याचे सुरू केले.

गावात येणाऱ्या काही वस्तूंवर जकात घ्यावयाची, पण अगदी थोड्या प्रमाणात, बरोबरचे सामान म्हणून ती वस्तू आली तर जकात घ्यावयाची नाही, असे धोरण असते. म्हणून ' शिर ओझ्याची , व्याख्या ठरवावी लागली. २६ मे १८६५ च्या सभेत ती व्याख्या अशी ठरली :–

( १ ) चार पायली कैली मापावर ओझे असेल तर ते शिर ओझे समजून जकात घेण्याची.

( २ ) कडबा पाच पाचुंदे व सरपण मोळी असेल तर ते शिर ओझे समजून जकात घेण्याची.

( ३ ) तूप, तेल, गूळ, एक पासरीचे ( दीड शेर पक्का ) आत असेल तर शिर ओझे नाही. त्याचे वर असेल तर शिर ओझे समजावे.

नगरपालिकेने जकातवसुलीचा कच्चा अंमल म्हणजे आपल्या नोकराकरवी वसुली करण्याचे धोरण पाहिले वर्षी स्वीकारले. नंतर कित्येक वर्षे जकातीचा मक्ता दिला जात असे. हे मक्तेदार ठराविक दराने जकात घेत, पण नगरपालिकेकडे हप्ते वेळेवर भरीत नसत, आणि मग त्याजकडून व्याज घेतले जाई. बारा वर्षे ही प्रथा चालल्यावर ती बंद केली. पाच सहा वर्षांनी असा खुलासा करण्यात आला की, ( १ ) रयतेचे शेतात उत्पन्न झालेले पदार्थ खरोखर खाजगी खाण्याकरिता आणतील तर जकात घेणे नाही. ( २ ) प्रत्यक्ष जनावर विकतील त्यावर कर घेणे; एरवी कर घेणे नाही. ( १६–३–१८७१ )

गावात येणाऱ्या व गावातून जाणाऱ्या मालावर जकात घेण्याची प्रथा प्रथम होती असे वर म्हटले आहे. ब्रिटिश अमदानीपूर्वीपासून ही करपद्धती हो ती. तिला थळमोड व थडभरित अशी नावे होती. शेतसाऱ्याबरोबर ती वसूल केली. या कराचे उत्पन्न गावकामगारांच्या हाती जात असे.

गावखर्चासाठी येई व खर्चिले जाई. ब्रिटिश अमदानीत ते कर शेतसाऱ्यात समाविष्ट झाले आणि ही जकात ( ऑक्ट्राय सुरू झाली. ता. १९-११-१८७० ला असा ठराव करावा लागला की,

" हल्ली स्थळभाडे एकेरी असल्याकारणाने उत्पन्न कमी होत असून शिवाय सरकारचे ठरावावरून ( ता. ६–११–१८६८ चा नं. ४४४० व ४४४१ ) जलमार्गाने सुटे होऊन येणाऱ्या मीठ, अफू, कैफी पदार्थ यांजवर जकात घेऊ नये. म्हणून रूढ झाल्या-

Acc. No. 3
Anek
Tuljaram
Libr
Title



वरून उत्पन्न एकंदर कमी पडल्यास खर्च भागला पाहिजे. शहर सुधारण्यास रुपये पाहिजेत. त्या कामास पूर्वी राशीची पहिले वर्गात सर्व प्रकारची धान्ये जी आहेत, त्याचा दुप्पट कर घ्यावा. वर्ग दोन गळीत-मधील कर्डी, तीळ, कान्हाळे वगैरे पदार्थ यास दुप्पट दर पूर्वीपेक्षा घ्यावेत."

जकातदर वाढविला, त्याचबरोबर नियामक मंडळाला, ता. ४–७–१८७० ला असा इशारा देण्यात आला की, "कच्ची जकात घेण्याबद्दल सुरू असून त्या कामाकडे पाच नाक्यावर शिपाई व शिवाय रात्री दिव्यास तेल लागते. इतके लोकांस पगार व तेलास खर्च करणे भाग आहे. तरी मॅनेजिंग कमेटीने कसोशीने खर्च करावा."

जकात करवसुली काटेकोरपणे होण्यावर कारभार अवलंबून असल्यामुळे या कार्यपद्धतीवर वेळोवेळी सूचना दिल्या गेल्या. शिर ओझ्यावर जकात घेण्याची पद्धत ता. १० मे १८७१ ला कायम केली. गावात आलेला माल परत न्यावयाचा असेल तर, असे ठरविले की, जर काही माल येथे विकण्यास आणील, आणि तो लागलीच न विकता काही दिवस ठेवण्याचा आहे, असे मालकाने सांगितले, तर हल्लीची जी २४ कलाकांची प्रथा आहे, ती बदलून १५ दिवस मुदतीची करावी. इ. स. १८८२ च्या प्रारंभी ही मुदत तीन महिने केली. आणखी असे ठरविले की, बांगडी शिर ओझ्यावर जकात हल्ली घेण्याची वहिवाट आहे; परंतु ती कमी करून, घोडे, बैलगाडी वगैरे जनावरां-वर माल विकण्यास वगैरे आणला तर त्यावर जकात घ्यावी.

आणखी असे निक्षून ठरविले की, जर कोणी मनुष्य छपवून अगर लपवून माल आणून जकात नाकारील, तर त्यावर दुप्पट जकात घ्यावी. मक्ते-दार जर जुलूमजबरदस्तीने जास्ती दराने जकात घेईल व ते मॅनेजिंग कमेटीचे नजरेस येईल तर त्या-प्रमाणे त्यास शिक्षा देण्याची तजवीज व्हावी.

ता. ३–४–१८७४ ला जकात–वसुलीचा मक्ता रु. २५२५ यास तीनवार पुकारून श्री. राघो भिमराव देशपांडे यांचे नावे दिला. बाजाराचे दिवशी जकात–वसुलीत लबाडी होऊ नये, म्हणून प्रत्येकी २ आणे रोज देऊन चार माणसे हंगामी नेमण्याला मंजुरी देण्यात आली. (ता. १५-४-१८७८) गवत व सरपणाच्या शिर–ओझ्यावरील जकात, ता. २५–१–१८७९ ला रद्द केली.

माल खपला तरच जकात घेतली जावी, हा उद्देश तडीस जावा म्हणून सरकारने प्रारंभी फार किचकट हिशेब सुरू केले. दर माणशी प्रत्येक प्रकारचा माल प्रत्यक्ष किती खपणे शक्य आहे याचा हिशेब करून, त्यापेक्षा जास्त खप असे तर आसपासच्या लोकांनी खपविलेल्या मालावर जकात बसली हे स्पष्ट होई; आणि ते होते की नाही हे कळावे म्हणून ठरवून दिलेल्या प्रमाणाचे बाहेर का प्रमाण पडले, याबद्दल म्युनिसिपालिट्यांना खुलासा द्यावा लागे.

हे प्रमाण ठरवून देताना एक चूक अशी झाली की उत्तर हिंदुस्थानातील खपाचे आधारे येथले प्रमाण ठरले. बाजाराचे गावी या बाबतीत बिलकूल मेळ बसेना. या धोरणाप्रमाणे असे ठरले होतेः–

(१) धान्यः–९ मण, (२) शुद्ध साखरः– ... शेर, (३) अशुद्ध साखरः–१५ शेर, (४) तूपः– ... शेर, (५) तेल व तेलबीजः–४ मण, (६) सरपण ... -॥- शेर; (७) तमाखूः–४ शेर; (८) कापड ... १८ रु. (९) किरकोळः–रु. १।- (१०) ... भांडी वगैरेः–१–८–०

ही पद्धती आखून दिली खरी, पण तिचा व्य-हारात काही उपयोग होईना; नंतर राज्यशासना-करवी या बाबतीत कडक दृष्टी ठेवणे सुटले.

वरकड मालाच्या जकातीच्या परतीवर येथील व्यापाऱ्यांचे विशेष लक्ष नसे. गुळावरील जकातीच्या बाबतीत मात्र ते डोळ्यांत तेल घालून असत, कारण गुळाचा व्यापार खूप वाढीस लागला होता. गुळावरील जकात बंद करून गाडीपट्टीची (व्हील टॅक्स) आकारणी दुप्पट करावी अशी सूचना इ. स. १९... मध्ये आली होती. भोवतालच्या सात हजार एकर ऊस जमिनीतील गूळ यावयाचा, म्हणून जकात अजीबात रद्द करणे गैर हिताचे होते. या...



गुळावर अन्य रीतीने म्हणजे पुण्याच्या ट्रेड रजिस्ट्रेशन फीच्या रूपाने कर बसविला. ही एक ठराविक रकमेची जकात होय. पूर्वी प्रत्येक गाडीस दर आठ आणे होता, तो चार करण्यात आला, त्याला परती नव्हती.

प्रारंभी रेल्वे स्टेशन नगरपालिकेच्या हद्दीबाहेर होते. जकातवसुली तर ठीक व्हावी, म्हणून रेल्वेच्या स्टेशन मास्तरनी नगरपालिकेचा शिक्का पाहिल्या-शिवाय माल देऊ नये अशी विनंती करण्यात आली (१५।५।२१). जकातीचे दर या वर्षी वाढविले ते असेः—

| पदार्थ | पूर्वीचा जकात दर १५ मणाचे गाडीस | नवीन दर |
|---|---|---|
| | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| पेंड | ०–१–० | ०–२–०० |
| किरकोळ धान्य | ०–३–० | ०–४–०० |
| तांदूळ | ०–८–० | ०–१२–० |
| साखर | ०–९–० | १–०– |
| कापड | १–०–० | ४–०– |
| किरकोळ ज्या जिनसावर जकात नाही ते पदार्थ | ०–०–० | ०–४– ० |

बारामतीच्या भोवती कापसाची लागवड होऊ लागली. जिन सुरू झाले. याचा नगरपालिकेला शक्य तितका फायदा मिळावा, म्हणून शहराची हद्द वाढ-विण्याची कल्पना सरकारकडे गेली. (१७–१०–१९२६). तसेच जकातीचे कामासाठी रेल्वे स्टेशन-वर एक कारकून नेमला.

जकातीचे दर वेळोवेळी वाढविले, बदलले आहेत. तसेच काही वस्तूंवर जकात बसविली, तर काही वगळ-ण्यात आल्या. वस्तूंचे साधारणपणे दहा वर्ग आहेत. त्यात वर्गीकृत अशा जवळजवळ २०५ वस्तू आहेत.

इ. स. १९३५–३६ चे अखेरीस जकातीचे उत्पन्न रु. १९१७५–१३–६ होते, ते पुढच्या दहा वर्षांत रु. २९२००–६–६ झाले आणि त्या-नंतरच्या दोन दशकाचे अखेरीस ते असे होते.

इ. स. १९५५–५६ जकात उत्पन्न = रु. १४४४२८-१५-६

,, १९६४–६५ जकात उत्पन्न = रु. २६६९३८--८६ पैसे

जकातीच्या उत्पन्नात वाढ होण्याचे अलीकडचे इ. स. १९४९चे एक कारण असे की, पूर्वी वजनावर जकात असे ती आता मालाच्या किंमतीवर आकारली जाते हे होय. पोस्टाने, पार्सलाने येणाऱ्या मालावर जकात घेण्याला दि. १६–९–१९५३ पासून सुरवात झाली. जकातीचा विचार करताना गुळावरील एक-रकमी जकात जी एकदा ठरली, तीत आजपर्यंत काही बदल झालेला नाही. नीरा कॅनॉल झाल्यावर गुळाचे उत्पादन वाढले. नीरा व्हॅली साखर कारखाना इ. स. १९२०–२१ मध्ये सुरू झाला तेव्हा ते कमी झाले, पण तो साखरेचा कारखाना बंद पडल्यावर गुळाची आवक वाढली. गेल्या ८–१० वर्षांत बारामतीच्या आसपास साखरेचे कारखाने सुरू झाल्यावर गुळाचे उत्पादन घटले पण आता पुनः ते वाढत आहे. या सर्व स्थित्यंतरात गुळावरील जकात एकरकमी ठरलेली अद्याप बदललेली नाही.

सध्या गावात एकूण आठ जकात नाकी आहेत. प्रत्येक नाक्यावर वेळेला एक जकात कारकून व एक मदतनीस अशी जोडी असते. आठ तासांची एक पाळी या पद्धतीने हे काम चालते. बरीच वर्षे एकच नाके कारकून सर्व दिवस असे. नंतर त्याला जोडीदार दिला गेला आणि आता ८ तासांचे पाळी-पाळीने काम चालते म्हणजे प्रत्येक नाक्यावर तीन नाकेदार व तीन नाका प्यून्स असा सेवकवर्ग आहे. शिवाय रजेच्या मुदतीत बदली कामासाठी एकूण नाका स्टाफच्या ⅙ स्टाफ राखीव म्हणून ठेवला आहे.

## गाडीपट्टी व चाकपट्टी

टोल (गाडीपट्टी) व व्हीलटॅक्स (चाकपट्टी) हे दोन्ही कर नगरपालिकेच्या उत्पन्नात भर घालीत असतात. शहरातील रस्त्यांचा वापर करण्यासाठी ते घेतले जातात. नगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या वाह-

नावर प्रत्येक खेपेपुरता हा कर घेतात. तो टोल आणि गावात असणाऱ्या वाहनावर वार्षिक अगर सहामाही अथवा तिमाही अशा मुदतीसाठी एकदाच घ्यावयाची ती चाकपट्टी ( व्हीलटॅक्स ) होय.

बारामती नगरपालिकेने टोल प्रथम बसविला. इ. स. १९०० मध्ये, हा कर बसविण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारने मुंबई सरकारला इ.स. १८८६ मध्ये दिला होता. नगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनावर टोल बसवावा, पण ती वाहने ओझ्याने अथवा माणसांनी लादलेली असावीत आणि टोलचे जेवढे उत्पन्न येईल त्यातून वसुलीचा खर्च वजा जाता, बाकी उरेल तो सर्व पैसा रस्त्यांच्या कामावर खर्च केला पाहिजे अशी अट घालण्यात आली होती.

बारामतीत गाडीपट्टी ( व्हील टॅक्स) बसविण्यापूर्वी गावातल्या वाहनावर मुदतीचा कर इ. स. १८८८-८९ पासून बसविला होता. त्याचा दर बेताबाताचाच आणि गावात वाहनांची संख्या कमी यामुळे त्यापासून उत्पन्न दरसाल सुमारे शंभर रुपयांपेक्षा जास्त होत नव्हते. रस्त्यासाठी खर्च मात्र त्याचे दुप्पट तिप्पट करावा लागत असे. यासाठी गाडीपट्टी ( व्हील टॅक्स ) बसविण्याची गरज भासली आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न तीन हजारांपासून पुढे येऊ लागले.

नीरा नदीचा कॅनॉल आला व गावाच्या भरभराटीला सुरुवात झाली. त्यातून एक प्रश्न उत्पन्न झाला की, रुई वगैरे गावचे लोकांचा असा अर्ज की, गाडीवरलि टोलाची माफी असावी. त्याचा विचार करता ठरविले गेले की, अलीकडे उसाची लागण जास्त होऊ लागल्याने खताच्या गाड्या फार येतात त्यामुळे रस्ता खराब होतो. खताला भावही चांगला मिळतो. तरी अशा स्थितीत सदर गाड्यांना टोल माफ करू नये ( १८-४-१९०० ).

हा काल उसाच्या लागवडीच्या सुरुवातीचा होता. उसाला जरूर ते खत, पेंड ( खत ) यांची आवक आणि ऊस गाळल्यावर गुळाची आवक या रहदारीमुळे गाडीपट्टीचे उत्पन्न चांगले येऊन वाढत्या प्रमाणात स्थिर झाले. शिवाय आठवडा बाजारा[त] येणाऱ्या धान्य आदि करून मालाची आवक असेच म्हणजे प्रारंभी वर्षाला २५००० ते ३०००[०] गाड्यांची आवक येऊ लागली. या गाडीपट्टीमुळे रस्त्याचे बाबतीत नगरपालिकेच्या निधीस बरा[च] मोठा व स्थिर आधार मिळाला. इ. स. १९२[.] नंतर मोटारीची वाहतूक सुरू झाली, पण दुसऱ्या महायुद्धाचे प्रारंभापर्यंत तरी गाड्यांची वाहतूक कमी झाली नाही. बारामती रेल्वेमुळे गाड्यांच्या वहातुकी[.] वर परिणाम झाला. बारामतीला मालाची ये-ज[ा] रेल्वेच्या डिकसळ स्टेशनवरूनच होत असे. इ. स. १९१३ मध्ये ही रेल्वे सुरू झाली. बारामतीहू[न] डिकसळ स्टेशनला व तिकडून परत बारामती[.] होणारी मालाची वाहतूक कमी झाली व गाडी[.] पट्टीचे उत्पन्न चार हजार रुपयांवरून तीन हजा[र] रुपयांवर आले. जी. आय. पी. रेल्वेने डिकस[ळ] स्टेशनचे दर उतरवून आपल्या मालवाहतुकी[.] झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न केला. सा[.] जिकच बारामती नगरपालिकेचे गाडीपट्टीचे उत्[.] पुनः वाढले.

भिमथडी, इंदापूर व फलटण ह्या भागांत इ. [.] १९२५-२७ पासून कापसाची लागवड सुरू झा[.] कापसातली सरकी काढणे ( जिनिंग ) व त्याचे [.] बांधण्याचे केंद म्हणून बारामतीला महत्त्व आ[.] तेव्हा कपाशीच्या आवकीमुळे गाडीपट्टीचे उत्[.] सुमारे हजारभर वाढले.

याच सुमारास भिमथडीत गूळ होणारा निरेला जा[.] रेल्वेमार्गे इतरत्र पाठविण्याकडे कल वाढला. मो[.] व्हिइकल आक्ट १९३५ प्रमाणे इ. स. १९३६-[.] च्या सुमारास मोटारवरील 'होल' बंद करून पेट्रोल[.] खपावर व रजिस्ट्रेशनवर जास्त.कर बसवून त्याचे उत्प[.] तून नगरपालिकांना त्याचे होणारे नुकसान नक्त रुप[.] सरासरीच्या प्रमाणात सरकारकडून भरून देण्या[.] प्रारंभ झाला. पण यायोगे नगरपालिकेच्या ना[.] भाडे कराच्या उत्पन्नात विशेष फरक झाला ना[.]

गाडीपट्टी व चाकपट्टी याबाबत कायदेशीर, का[.] कोर अर्थ लावण्याचा प्रयत्नहि त्याच वेळी झा[.]



त्या वेळेच्या कायद्यातील शब्दाबरहुकूम अर्थ घ्यावयाचा तर नगरपालिकेच्या हद्दीतच वापरण्याचे हेतूने ठेवलेल्या गाड्यावर चाकपट्टी ( व्हील टॅक्स ) आकारता येतो. तसे तंतोतंत नसल्यास व्हील टॅक्स न आकारता टोल घेतला जावा, असा अर्थ सरकारने कळविला. शब्दाचा अक्षरशः अर्थ करावयाचा तर गावातल्या बहुतेक सर्व गाड्यांवर व्हील टॅक्स घेणे भाग पडले, कारण बहुतेक गाड्या नगरपालिकेच्या हद्दीतच वापरल्या जात असत असे नाही.

मोटार-वाहनावरील गाडीपट्टी व चाकपट्टी याबाबत एक-दोन विशेष उल्लेखनीय गोष्टी आहेत. मोटार व्हईकल्स ॲक्ट अन्वये इ. स. १९३५ पासून मोटार-वाहनावरील गाडीपट्टी रद्द झाली व सरकार काही प्रमाणात अनुदान ( ग्रँट ) देऊ लागले, असा उल्लेख वर केला आहे. ही अनुदानाची रक्कम राज्यसरकारने तेव्हा रु. ७४९ ठरविली. तीत आतापर्यंत एका नव्या पैशाचीहि वाढ झालेली नाही. गेल्या ३०-३२ वर्षांत मोटार-वाहनांची वरदळ किती तरी पटीने झाली आहे. राज्यसरकार पेट्रोल खपावर कर व मोटार-वाहनावर कर बसवून उत्पन्न मिळविते व नगरपालिकेला त्यातला योग्य वाटा मिळावयाचा तो मिळत नाहीं.

गावात चाकपट्टी निरनिराळ्या वहानांवर निरनिराळ्या रीतीने घेतली जाते. चारचाकी दोन जनावरांची, चारचाकी एक जनावराची, दोनचाकी दोन जनावरांची, दोनचाकी एक जनावराची ( बैल व घोडा ) स्वारीचा घोडा, हातगाडी, बाबागाडी, बायसिकल इत्यादि प्रकारच्या वाहनांवर चाकपट्टी आकारली जाते.

नगरपालिकांचा नवा कायदा गेल्या जूनपासून अमलात आला. त्यातील एका तरतुदीमुळे ( कलम १०८ ) गावातल्या मोटार-वाहनावर चाकपट्टी व्हील टॅक्स घेणे बंद करावे लागत आहे. याबाबतचे नगरपालिकेचे उत्पन्न सुमारे चार हजार रुपयांचे होते, ते आता बंद झाले आहे. ह्या नुकसानीदाखल नुकसानभरपाई राज्यसरकारकडून केव्हा होईल ते होवो.

गाडीपट्टी व चाकपट्टी यांचे उत्पन्न रस्ते करणे व रस्ते दुरुस्ती या कामावर खर्च करावे अशी कायद्यातील तरतूद आहे. वर सांगितल्याप्रमाणे नगरपालिकेचे या साधनांचे द्वारा होणारे उत्पन्न घटले आहे. पण रस्त्यावरील खर्च करावाच लागतो. त्याचे हिशेब ठेवावे लागतात. त्यावरून असे आढळून येते की, गाडीपट्टी व चाकपट्टी या कराच्या उत्पन्नाचा नगरपालिकेने वापर तर केलाच, पण त्यापेक्षाही आतापर्यंत ७ लक्ष ८० हजार ४४० रु. जास्त खर्च रस्त्यावर केला आहे व ह्या नोंदवहीत वरील रकमेची उणे शिल्लक दाखविली आहे.

## घरपट्टी व भंगीपट्टी

घरपट्टी, सफाईपट्टी व भंगीपट्टी हे तीन कर प्रत्यक्ष नगरपालिका स्थापन केली, तेव्हा घरपट्टी आकारण्याला मुभा होती. ब्रिटिश अमदानीच्या अगोदर जी ग्रामव्यवस्था होती, तीत घरपट्टीसारखा कर नव्हता. साहजिकच नगरपालिका स्थापन झाली. इ. स. १८६५ मध्ये घरपट्टी बसविण्याचा विचार झाला, तो इ. स. १८८४ मध्ये.

घरपट्टीची आकारणी करताना भाड्याचा मगदूर ( रेंटल व्हॅल्यु ) वा दुसरा कोणताहि मगदूर असे प्रारंभी कायद्यात शब्द होते. याचा खुलासेवार विचार कायद्यांत नसल्याकारणाने नगरपालिकेच्या सभासदांच्या ( कमिशनरांच्या ) सारासार विचारावरच ते अवलंबून राहिले. बारामती नगरपालिकेत अर्धे सभासद निवडून आल्यावर घरपट्टी आकारण्याचा प्रथम विचार झाला.

घराचे किंमतीचे मानाने इमारतीचे वर्ग पाडले व प्रत्येक निराळ्या वर्गाला निराळी पट्टी ठरविली. बारामतीची आकारणी अशी होती—

| घरांची किंमत रुपये | दर रु. आ. पैसे |
|---|---|
| किंमत ५० ते १०० | ० – ८ – ० |
| १०१ ते २०० | ० – १२– ० |
| २०१ ते ३०० | १ – ० – ० |
| ३०१ ते ४०० | २ – ० – ० |
| ४०१ ते ६०० | ३ – ० – ० |
| ६०१ ते ८०० | ४ – ० – ० |
| ८०१ ते १००० | ५ – ० – ० |

किंवा त्यापेक्षा अधिक.

घरांच्या किंमती ठरविताना असे तत्त्व अंगीकारले की, दर सागवानी खणाची किंमत रु. २०|– दर रायवळी खणाची किंमत रु. १०|– ही आकारणी थोड्याफार फरकाने इ. स. १९०२ पर्यंत कायम राहिली. तेव्हा घरपट्टीचे उत्पन्न सातशे ते आठशे रुपये इतके होते.

या किंमतीवर घरपट्टीची आकारणी करण्याला प्रांतिक सरकारने अमान्यता दर्शविली व भाड्याचा मगदूर ( रेन्टल व्हॅल्यू ) लक्षात घेऊन घरपट्टी आकारणीसाठी एक नमुनेदार कोष्टक तयार करून दिले ते असे :–

| रुपये | आकारणी |
| --- | --- |
| १० ते १५ | ०–८–० |
| १६ ते २५ | १–०–० |
| २६ ते ३५ | १–८–० |

याप्रमाणे चढत चढत रु. १०० ला रु. ४ असे प्रमाण बसविले, आणि पुढे रु. ३००|– ला रु. १०|– व त्यानंतर प्रत्येक शेकड्याला अगर त्याचे भागाला दर शेकडा रु. ३ असे ठरवून दिले होते.

हे कोष्टक स्वीकारणे किंवा नवीन तयार करणे हे नगरपालिकांचेवर सोपविले होते.

भाड्याचे उत्पन्नावर घरपट्टी बसाविण्याचे प्रकरणी नगरपालिकेने ता. ३१–१०–१८९२ ला असे मत प्रदर्शित केले होते की, भाड्याचे उत्पन्नावर घरपट्टीची आकारणी करण्यास हरकत नाही. यावर विचार करता, फक्त बाजारचे रस्त्यावर जी घरे आहेत–त्यावरच भाडे येत आहे. शिवाय बिलकूल आड रस्त्याचे घरास भाडे येत नसून काही घरास येते–ते फारच कमी आहे, आणि कसब्यात तर मुळीच भाड्याचे उत्पन्न येत नाही. सबब भाड्यावर आकारणी झाली असता घरपट्टीचे फारच नुकसान होणार आहे. साठी, आहे ती आकारणी कायम राहणे-विषयी कळवावे.

इ. स. १९१२ मध्ये घरपट्टीची आकारणी करताना घराच्या किंमती पुढीलप्रमाणे ठरविल्या—

( १ ) प्रत्येक सागवानी खणास रु. ३०|–

( २ ) प्रत्येक रायवळी ,, रु. २०|–

( ३ ) ,, दुकानचे खणास रु. ३०|–

अशा प्रकारे आकारणी केल्यावर घरपट्टीचे उत्प इ. स. १९१६–१७ मध्ये रु. २९७३–०–० झाले आणि इ. स. १९३५–३६ मध्ये ते रु. ६१५४-३- होते. यावरून मधल्या अवधीत विशेष काही फर पडला नाही, हे उघड आहे. ही वाढ होण्याचे मुख् कारण म्हणजे वार्षिक भाड्याच्या ॲन्युअल लेटि व्हॅल्यु मगदुरावर घरपट्टी आकारणीचे तत्त्व अंगीकार गेले. इ. स. १९१७ मध्ये सरकारने सरसकट साल दर शेकडा रु. ४ आणे ११ असा घरपट्टी दर ठेवण्याला मंजुरी दिली. या पद्धतीत हिशेबा सुलभता आली.

घरपट्टीची अशी सुलभ आकारणी मंजूर करता दर चार वर्षांनी घरपट्टीची फेर–तपासणी करण्या तरतूद होती. ती आजही सुरू आहे.

यात बदल झाला तो इ. स. १९४६ मध्ये वर्षाच्या १ एप्रिलपासून दरसाल दर शेकडा ४–११–० घरपट्टीच्या जोडीला सफाईपट्टी (जन सॅनिटरी सेस ) रु. १–९–० घेण्याला मंजुरी दे आली. हा बदल एक वर्षभरच टिकला आणि एप्रिल १९४७ पासून " संकलित घरपट्टी कन्सॉलिडेटेड प्रॉपर्टी टॅक्सची अंमलबजावणी झाली. दरसाल भाड्याच्या प्रमाणाशी ही संक घरपट्टी निगडित केली. तीमध्ये जुन्या काळची घर दिवाबत्ती खर्च व सफाई कर हे तीन कर सम झाले. ही नवी योजना सुरू झाली. तेव्हा ती रु. ७–१३–० इतकी होती. १ एप्रिल १९ पासून हे प्रमाण १० टक्के करण्यात आले. नंतर एप्रिल १९५५ पासून १२॥ टक्के झाला. जुलै १९ पासून आजपर्यंत तो १५ टक्के आहे.

घरपट्टीची संपूर्ण फेर पाहणी करण्याचे काम नगरपालिकेचे प्रतिनिधी मंडळच करीत असे. स्थायी समितीमार्फत हे काम प्रारंभी करून जनरल बोर्डाची संमती घेत इ. स. १९४८ प्रकारच्या फेर तपासणीबाबत सभासदांचे झाले नाही व हे काम पुढच्या वर्षापर्यंत



साहजिकच राज्यशासनाने जरा वक्रदृष्टी केली, पण उभयपक्षी सौजन्य प्रकटून प्रकरण मिटले.

सन १९४८ च्या सरकारी ठरावान्वये सध्या फेर-तपासणीचे काम सरकारी अधिकाऱ्यामार्फत होते. या व्यवस्थेत एक निश्चितता आली. पण दुसऱ्या अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. सरकारी अधिकाऱ्यांचा जो निर्णय असतो, त्यावर घरमालक दाद मागतात, आणि प्रतिमंडळ निधी, म्हणजे एखादी समिती त्या निर्णयाची फेर तपासणी करू शकत नाही. अपिले ऐकून निकाल देण्यासाठी दुसरा सरकारी अधिकारी नेमावा लागतो व तो निर्णय देऊन मोकळा होतो. कोर्टात अपीले दाखल झाल्यास त्याची उत्सवारी नगरपालिकेस करावी लागते. ह्याच सरकारी ठरावात घरपट्टी दर शेकडा २० टक्के असावा असे नमूद केले आहे. या प्रकारची ३००–३५० अपीले येतात. यावरून सरकारी अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय कसे सदोष असतात हे दिसून येईल. अनुभवी व जुन्या नागरिकांना हे माहीत आहे की, गावात घरांची संख्या फार वाढलेली नाही, किंवा घरभाडे एकदम जास्त होईल, अशा दुरुस्त्याही घरमालकांनी केल्या असे आढळत नाही. भाडे–नियंत्रणाचा कायदा असल्याकारणाने घरमालकांनी घरभाडी भरमसाठ वाढविण्याला एक प्रकारचा आळा घातला आहे. असे असूनही सरासरी अधिकाऱ्यांनी घेतलेले निर्णय तिप्पट चौप्पट वाढीचे झालेले आहेत व दर चार वर्षांनी हे कराचे ओझे विशेष वाढ न होताही वाढतच राहिले आहे.

संकलित घरपट्टी कर आकारण्यासाठी इमारतीचे वार्षिक भाडे ( ॲन्युअल लेटिंग व्हॅल्यू ) पहावे लागते. त्याचप्रमाणे शिक्षणासाठी नगरपालिकेने जिल्हा शिक्षण मंडळाने जे अनुदान द्यावयाचे ते ह्या वार्षिक भाड्याशी एक निगडित आहे. सर्व गावातील इमारतीचे वार्षिक भाडे सुमारे १० लक्ष ११ हजार २५२ रुपये होते.

या कराचे उत्पन्न रु. १९४७–४८ मध्ये रु. १९००० होते, ते आता रुपये १५१७८१ झाले आहे म्हणजे ते जवळ जवळ सहापट झाले आहे. तितक्या प्रमाणात गावातील इमारतींची संख्या व खरी किंमत वाढली की काय हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

आता जो संकलित घरपट्टी ( कन्सॉलिडेटेड प्रॉपर्टी टॅक्स ) आहे, तीत पूर्वीची सफाई पट्टी ( जनरल सॅनिटरी सेस ) समाविष्ट आहे. याचे प्रारंभीचे स्वरूप माहितीसाठी नमूद करावयाला हरकत नाही. इ. स. १९०१ पासून ही सफाईपट्टी प्रथम आली. त्या अगोदर भंगीपट्टी होती. सफाईपट्टी हा कर घराबाबत प्रत्यक्ष विशिष्ट कामासाठी केलेल्या कामाचा मेहनताना नाही. गावातील स्वच्छता राखण्यासाठी कचरा काढून नेणे इत्यादि ज्या गोष्टी करावयाच्या त्यासाठी हा कर होता. इ. स. १९१४ मध्ये ज्या घरांना शौचकूप नाही अशा घरांना प्रत्येकी रु. २ अशी ही सफाई पट्टी बसविली होती. इ. स. १९३० पासून सर्वच घरांवर सफाई पट्टी बसविली होती व तीपासून सुमारे २ ते ३ हजार रुपयांचे उत्पन्न मिळत असे.

भंगीपट्टी हा कर नगरपालिकेच्या उत्पन्नाचे एक साधन ही गोष्ट खरी. तथापि त्या कामाचा खर्च भागेल इतक्याच प्रमाणात तो घेण्याची प्रथमपासून प्रथा आहे. म्हणजे नगरपालिकेच्या इतर कामासाठी या कराचे उत्पन्न मिळू शकत नाही. याचाच अर्थ असा की, हा कर म्हणण्याऐवजी नगरपालिका जे संडास सफाईचे काम करते त्यासाठी घेतलेला मेहनताना इतकेच त्याचे स्वरूप होय.

भंगीपट्टी प्रथम इ. स. १८९३ च्या कायद्याच्या ५७ कलमान्वये अस्तित्वात आली. पुढे १९०१ च्या कायद्यात त्याला 'स्पेशल सॅनिटरी सेस' असे नाव दिले गेले. शौचकूप सफाई हा हेतु व त्यावर होणारा सर्व खर्च या कराच्या उत्पन्नातून अविच्छिन्न वसूल व्हावा असा निर्बंध या कराचे मागे आहे. या वेळी कायद्याच्या शब्दयोजनेत जी गफलत झाली ती पुढे दूर करण्यात आली. वर सफाईपट्टीचा उल्लेख केला आहे त्यावरून हे लक्षात येईल.

बारामतीस हा कर प्रथम इ. स. १९०९ मध्ये बसविला गेला. त्या वेळी बैठकीमागे रु. १ असा दर होता. खाजगी संडास साफ करण्याचे या वेळी ठरविले.

इ. स. १९१३ मध्ये हा दर रु. ४ केला व नंतर इ. स १९२२ मध्ये रु. ६ केला. इ. स. १९२५-२६ मध्ये ह्या कराचे उत्पन्न रु. ११५५-०० होते. इ. स. १९४६-४७ पर्यंत हा दर कायम होता. पुढे त्यात वाढ झाली ती अशी :—

इ. स. १९४७-४८ पासून बैठकीला ९ रु.
इ. स. १९५०-५१ पासून बैठकीला १५ रु.
इ. स. १९५५-५६ पासून आजतागायत २० रु.

भंगीपट्टी याविषयी एक दोन गोष्टी लक्षात घेणे अवश्य आहे. या खात्यावर जो खर्च होतो त्याला पुरेसा कर बसविता येतो. बर्वे समितीने भंगीकामाबाबत ज्या शिफारशी केल्या, त्यात एका भंग्याला किती बैठकीचा मैला काढण्यास सांगावे, तसेच मैला डोक्यावरून न्यावयाचा नाही, असे नियम केले आहेत. त्यामुळे खर्च वाढला आहे. तसेच या कामाच्या यांत्रिकीकरणानेही खर्च जास्त करावा लागतो. हल्ली डोक्यावरून मैला वाहण्याची पद्धत बंद केली असून प्रत्येक सफाईकामगारास हातगाडी दिली आहे व रबरी बूट व हातमोजे लवकर देण्यात येत आहेत.

त्याचबरोबर भंगीपट्टी देणाऱ्या घरमालकाकडूनच फक्त भंगीकामाचा सर्व खर्च वसूल होतो हे लक्षात ठेवले म्हणजे गावात ज्यांच्याकडून भंगीपट्टी मिळते, अशा ४५० बैठकी आहेत व सार्वजनिक बैठकी १४९ आहेत. कोण कोणाचा खर्च करतो, हे यावरून सहज लक्षात येईल. अर्थात् लोकप्रतिनिधींचे निर्णय सरकारी नियम अनुसरताना जनमानस लक्षात घेऊन ठरविलेले असतात, हे समजून घेणे अवश्य आहे.

## बाजाराचे उत्पन्न

बारामती नगरपालिकेच्या उत्पन्नात बाजाराचे उत्पन्न हा एक बराच महत्त्वाचा भाग आहे. आठवड्याचा बाजार येथे फार पुरातन काळापासून आहे. मालावरील जकाती (ऑक्ट्राय) खेरीज शेट्याची बाब म्हणजे मापे पुरविण्याची बाब, रामोशांची संरक्षणासाठी बाब अशा बाबी सोडल्या तर बाजारातल्या जागेचे भाडे घेण्याची बाब जुन्या काळात नव्हती.

नगरपालिका स्थापन झाली तेव्हा बाजार श्री
सिद्धेश्वराचे देवालयाचे सभोवार बसत असे. आठव
बाजार दर गुरुवारी पूर्वीपासून भरत असे. अली
कडे गेल्या १५ वर्षांत आठवड्यातून आण
एकवार सोमवारी बाजार भरविण्याची नियमा
तरतूद झाली. पण अलीकडे सर्वच गावात आठव
बाजार भरू लागल्याने सोमवारचे बाजारास अपेक्षि
यश मिळाले नाही. आणि जनावरांचा बाजा
गावाचे दक्षिणेस गावकुसाचे बाहेर निरा, इंदा
रस्त्यालगत भरत असे. पहिली १५ वर्षे बाजारापास
भाड्याच्या रूपाने उत्पन्न काढण्याची कल्पना नव्हत
पुढे जनावरांच्या विक्रीवर नगरपालिका कर
लागली, पण सहा-सात वर्षांतच तो कर ऑ
कल्चरल प्रोड्यूस मार्केट कमेटीच्या स्थापनेने घेण्या
बंद करावे लागले. जकातीच्या पद्धतीने जनावरां
कर घेता येत होता व अशा प्रकारचा कर आ
तागायत घेतला जात नाही.

मध्यवर्ती चौकात जोते होते, तेथे लाकडी इमा
करून दुकानदारांना देण्याचे ठरले. त्यासाठी प्र
४००|- रु. खर्च केला. (इ. स. १८८३). त्
भागात भाजी, फळफळावळे बसत, नंतर ते
करण्यात आले.

बारामती नगरपालिकेने बाजारात बसणाऱ्या
दुकानांपासून भाड्याच्या रूपाने वसुली करणे
केले. त्याचे उत्पन्न सुमारे हजार-बाराशे रुपये
इ. स. १८९७ मध्ये प्लेगचा प्रादुर्भाव झाला,
मध्यवस्तीत इतकी गर्दी होण्याचे टाळावे
हल्लीच्या जागेत म्हणजे गावकुसाबाहेर पूर्व व द
अंगास पड जमीन होती. त्या जागेत बाजार
विण्याची व्यवस्था सुरू झाली.

बाजाराचे बाबतीत खर्चाची बाब प्रामु
लक्षात घेऊन विचार केला जाई. इ. स. १
मध्ये कसाई, खाटीक व भाजीपाला बाजार बांध
सूचना सरकारकडून आली. त्यावर ठरविले
नगरपालिकेच्या हद्दीत मासमासळीचा मोठा
नाही, म्हणून बाजार बांधण्यास सध्या सवड ना
भुसाराची आवक व घडामोड बारामतीत



असते. त्याकरिता एक सर्वे नंबर ५ चा विकत घेऊन सभोवार भिंत घातली आणि दोन दरवाजे ठेवून मधल्या आवारात धान्यबाजार बसण्याची व्यवस्था झाली. इ. स. १९०४ मध्ये यासाठी प्रथम ४ हजार रुपये मंजूर करण्यात आले. त्याच वेळी गुळाचे व पेंडीचे मार्केट स्थापण्याचा विचार करण्यासाठी त्या वेळचे मामलेदार व नगरपालिकेचे उपाध्यक्ष रावसाहेब बी. बी. सहस्रबुद्धे यांचे अध्यक्षतेखाली एक पोट समिती नेमली होती. श्री. बी. ए. देशपांडे, श्री. भवानीराम साहेबराम, श्री. रामचंद मलुकचंद हे या समितीचे सभासद होते.

धान्यबाजार बसण्याची सोय झाल्यावर धान्य साठविण्यासाठी कोठे बांधले गेले. मैदानाच्या पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा तीन बाजूंस ४० कोठड्यांच्या चाळी बांधल्या. रु. १५००० त्यासाठी खर्च केले. कापड, पान, तमाखू, मणेरी सामान, भोयांचा माल इत्यादींसाठी अलग अलग बाजू आखून ओटे बांधले. पानबाजारातील विहीर स्वच्छ करून पाण्याची व्यवस्था केली. त्या रस्त्याला चिंचेची झाडे लावून सावली केली. जनावरांच्या व शेळ्यामेंढ्यांच्या बाजारासाठी निराळे दगडी भिंतीचे आवार बांधले. अशा रीतीने बाजाराची सोय झाली व नगरपालिकेला उत्पन्नहि चांगले मिळू लागले.

पहिल्या दहा वर्षांत बाजारच्या भाड्याचे उत्पन्न सालिना ५ हजार रु. वर झाले आणि पुढे ते वाढत जाऊन इ. स. १९३५-३६ मध्ये वीस हजारांपर्यंत चढले. या भागात काही कायम दुकाने नगरपालिकेने बांधून ती किरकोळीच्या दुकानदारांना भाड्याने दिली आहेत. आता याच भागात भाजी बाजार बसण्याची इमारत झाली असून, मोकळ्या आवारात फरसबंदी ओटेही आहेत.

बाजारातील दुकाने, जागा व गावातील इमारती यांपासून नगरपालिकेला वर्षाला चांगलेच उत्पन्न मिळते. सध्या हे उत्पन्न सुमारे वर्षाला २९|३० हजारांच्या घरात आहे. बाजारातील जागा कोणाची हा प्रश्न राज्यसरकारने इ. स. १९२० मध्ये उपस्थित केला होता. बरीच चर्चा होऊन नगरपालिकेचे स्वामित्व आता मान्य झाले आहे. शहर-विकास-योजनेच्या आराखड्यात भाजीबाजार दुसरीकडे म्हणजे स. नं. ६ मध्ये नेण्याची सूचना आहे. ह्या मोकळ्या होणाऱ्या जागेत खुल्या नाट्यगृहाची कल्पना दाखविली आहे.

## उत्पन्नाची इतर काही साधने

नगरपालिकेला उत्पन्नाची आणखी कांही साधने अलीकडे उपलब्ध झाली आहेत. हॉटेल टॅक्स हे एक साधन नुकतेच मिळाले होते. पण आता नव्या १९६५ च्या कायद्याने ते बंद झाले आहे. इ. स. १९५०-५१ पासून हॉटेल टॅक्स बसविला. हॉटेलसाठी वापरल्या जाणाऱ्या जागेचा वार्षिक भाड्यावर (ॲन्युअल लेटिंग व्हॅल्यू) तो बसविला होता.

त्याचे प्रमाण असे :—
रु. ५० पर्यंत = ६-०-० रु.
रु. ५१ ते ७५ = ८-०-० रु.
रु. ७६ ते १०० = १०-०-० रु.
रु. १०१ ते १५० = १४-०-० रु.
रु. १५१ ते २०० = १८-०-० रु.
आणि पुढे प्रत्येक रु. ५० वर रुपये ३.

नवीन कायद्यात (कलम २७७) भेसळ प्रतिबंधक कायद्यान्वये ज्या दुकानाला लायसेन्स घ्यावे लागते, त्या दुकानाला हॉटेल टॅक्स लागू नाही. अशी तरतूद आहे. म्हणजे या तरतुदीमुळे, हॉटेल टॅक्स बंद झाला आहे.

धोक्याच्या व दुर्गंधीयुक्त धंद्यावर कर बसविण्याचा प्रारंभ १ एप्रिल १९५२ पासून झाला व इ. स. १९६४-६५ मध्ये त्याचे उत्पन्न रु. २९६७-९५ पैसे होते.

इतर उत्पन्नाच्या बाबी नाममात्र असल्याने त्याचा उल्लेख अनावश्यक आहे.

# नागरिकांच्या सुखसोयी व खर्च

बारामती नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनाचा अशा रीतीने विचार केल्यानंतर त्या उत्पन्नाचा विनियोग कसा होतो, हे पहाणे ही गोष्ट क्रमप्राप्तच आहे नागरिकांच्या सुखासाठी झटणे हे नगरपालिका स्थापण्यातले मुख्य उद्दिष्ट, ते पुरे करण्यासाठीच ह्या उत्पन्नाचा विनियोग केला जातो.

स्वच्छता राखणे, आरोग्य रक्षिणे व आरोग्याचे संवर्धन करणे, इतर सुखसोयी, शिक्षणप्रसार इत्यादि क्षेत्रात हे सर्व काम वाटले जाते. गेल्या १५-१६ वर्षांतील खर्चाचा विचार केला तर असे आढळून येते की, १९५०-५१ मध्ये नोकरवर्गावर एकूण खर्च रु. १,१२,४८९ झाला; तो चालू वर्षी रु. ३,११,७६६ होत आहे. म्हणजे खर्चात तिप्पट वाढ झाली आहे.

खर्चाचा विचार करताना भांडवली स्वरूपाचा खर्च व दैनंदिन कारभारासाठी खर्च अशी दोन स्पष्ट चित्रे डोळ्यांपुढे उभी राहतात. कार्यालयासाठी वा शाळेसाठी इमारत बांधणे, पाणी योजनेसाठी इंजिन घेणे, पाईप खरेदी करणे व टाकणे, इत्यादि स्वरूपाचा खर्च हा भांडवली खर्च होय. नेहमीचा कारभारी खर्च महसूल उत्पन्नाच्या शे. ३३·३ पेक्षा जास्त होऊ नये, याबद्दल दक्षता बाळगावी लागते. राज्यशासनाचे यावर विशेष लक्ष असते; आणि सरकारी तपासणी अंमलदार याच दृष्टीने हिशेब पाहतात. नगरपालिकेच्या भांडवली खर्चासाठी कर्ज देण्याचे प्रश्नाचा विचार करताना राज्यशासनाकडून दैनंदिन कारभारी खर्चाची विशेष छाननी होत असते.

नेहमीच्या कारभारी खर्चाचे प्रमाण अवास्तव असू नये, ही गोष्ट सर्वसामान्य होईल. त्याचबरोबर जरूर तो खर्च सढळपणे केल्याशिवाय नागरिकांच्या सुखसोयी उपलब्ध होणार नाहीत, हेही त्रिवार सत्य आहे. नगरपालिकांनी सरकारकडून कर्ज घेतले नाही, म्हणजे चांगले असे समजण्याचा एक जमाना होता. आता कर्ज काढून लोकांच्या सोयी वाढवा, पाणीपुरवठा करा, रस्ते चांगले करा, गटारयोजना घ्या, असे म्हणण्यात येते. तीच गोष्ट दैनंदिन कारभारी खर्चाची आहे.

बदललेल्या परिस्थितीसाठी नगरपालिकांचा एक संकीर्ण कायदा आता करण्यात आला आहे. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर लोकशाहीप्रधान शासनव्यवस्थेत लोकांच्या आशाआकांक्षा पुऱ्या करण्याला योग्य असा हा कायदा केल्याचा दावा केला जातो. नगरपालिकांनी पाणीपुरवठा करण्याच्या योजना अंगीकाराव्यात अशी कायद्यातच तरतूद केली, हे याचेच एक गमक होय. याचाच अर्थ असा की, खर्च वाढतो म्हणून खंत बाळगण्याचे कारण नाही. नागरिकांच्या सुखस्वास्थ्यासाठी झटणे ही महत्त्वाची बाब होय.

आणखी एक विचार लक्षात घ्यावयाला हवा. नागरिकांच्या हितासाठी सारी प्राथमिक कार्ये करावयाची म्हटले तरी खर्चाचे प्रमाण [illegible] आहे कारणांस्तव वाढत आहे, वाढत जाणार हे निर्विवाद होय. जकात वसुलीचाच प्रश्न घ्या २५/३० वर्षांपूर्वी एकच नाके कारकून २० तास काम पहात असे. आता एका कारकुनाची आठ तासांची व त्याला एक मदतनीस अशी कल्पना रूढ आहे. साहजिकच खर्चाचे प्रमाण वाढते. कामाविषयी आता आधुनिक कल्पना आल्या आहेत. एका सफाई कामगाराने २५ किंवा ३० बैठकी साफ करावयाच्या असे दंडक बर्वे समितीच्या शिफारशीनुसार घातले गेले आहेत. कामगारांची संख्या, काम पूर्वीपेक्षा वाढले नसले तरी वाढते, म्हणजेच खर्च वाढतो. नगरपालिकेच्या नोकरवर्गाच्या वेतनश्रेणीचे बाबतीत आता प्रगतिक विचार केला जातो. मिनिमम वेजीस लागू नगरपालिकेच्या नोकरवर्गाला आला आहे. औद्योगिक न्यायालयाकडे प्रकरणे जातात; आणि नगरपालिकेचा व अन्य क्षेत्रातील कामगार यांचे वेतन, भत्ते, रजा इत्यादि बाबतीत जी तफावत पूर्वीपासून आढळते, ती कमी कमी केली जात आहे. इतकेच नव्हे तर कनिष्ठ व वरिष्ठ सेवक असा नियमात भेदभाव राहिलेला नाही. ही गोष्ट अर्थातच खर्च वाढण्यास कारणीभूत होते. नोकरवर्ग वाढतो, म्हणूनच केवळ खर्च वाढतो असे नाही. नगरपालिकेच्या कामाचे स्वरूप बदलले की खर्च वाढतो. याचे एक उदाहरण म्हणून दिवे लावण्याच्या कामाचे देता येईल. आता विजेचे दिवे व तेही जास्त लावले जावेत अशी अपेक्षा आहे.

आधुनिक काळाला अनुसरून नगरपालिकेवर नवीन जबाबदाऱ्या टाकल्या जात आहेत त्यामुळेहि खर्च वाढतो. संस्कार–केंद्र चालविण्याची कल्पना पन्नास वर्षांपूर्वी कोणाच्या स्वप्नातही नव्हती. शिशुसंगोपन, उद्याने, क्रीडांगणे इत्यादि कामेहि याच कक्षेतली होत. ह्या नवीन जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या तर खर्च वाढणार हे अनिवार्य होय.

दैनंदिन कारभारी खर्चाचे प्रमाण ही गोष्ट उत्पन्नाशी निगडित आहे, हे खरे. अगोदरच्या प्रकरणात उत्पन्नाच्या साधनांचा विचार केला आहे. उत्पन्नाची नवीन साधने नगरपालिकेला अजून उपलब्ध झालेली नाहीत. उत्पन्न वाढविण्याचे बाबतीत कशी हलाखीची परिस्थिती होते, ते पूर्वी सूचित केले आहे. करवाढ करून घेण्याला जनता नाखूष असते. आणि राज्यसरकारकडून विविध करांच्या उत्पन्नाच्या वाटा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे किंवा आजिबात बंद होत आहे. राज्यसरकारकडून अनुदाने मिळण्याचे बाबतीत दिवसेदिवस काटकसरच केली जात आहे. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास महागाई भत्त्यावर ५० टक्के ग्रँट मध्यवर्ती सरकारने दिली. पुढे ती बंद केली. १ मे १९६० पासून दिल्या जाणाऱ्या महागाई भत्त्यावर दरवर्षी १० टक्के कपात करून आज तारखेस खर्चाच्या फक्त ५० टक्के ग्रँट मिळते. सुरुवातीस ही ग्रँट १०० टक्के होती म्हणजेच उत्पन्न विशेष वाढले वा वाढणार आहे असे म्हणता येणार नाही. असे असले तरी खर्च काही टळत नाही. म्हणून कारभारी खर्चाचे सरासरी प्रमाण ठरविण्याची दृष्टि आता चालणार नाहीं, हे आता स्पष्ट होत आहे. खर्च वाढला म्हणून उगीच टीकास्त्र उगारणे योग्य होणार नाही.

कारभाराविषयक खर्चाचे सरासरी प्रमाण ३३·३ टक्के असे फार पुरातन काळी सरकारने ठरवून दिले आहे. वाढत्या महागाईने वाढता महागाई भत्ता सेवकास देणे सयुक्तिक ठरते. याचबरोबर सरकारी निर्बंध पाळणे दुर्घट होते.

या सर्व चर्चेचा सारांश असा की, खर्च कमी ठेवला ही मोठी फुशारकीची गोष्ट ठरत नाही. त्याचबरोबर खर्च वाढला म्हणजे जनतेची तितक्या प्रमाणात सेवा अधिक केली, असेही म्हणता येणार नाही. नागरिकांना सुखसोयी उपलब्ध झाल्या की नाहीत व त्यांपासून नागरिकांस खरोखरी फायदा होतो किंवा नाही, हीच सेवेची कसोटी होय. इतके मात्र निश्चित की, खर्चाचे योग्य सरासरी प्रमाण आता पुन्हा ठरविले जाणे जरूर आहे.

नागरिकांना जरूर त्या सुखसोयी मिळाल्या की नाही, याचा विचार करताना, इच्छित काम का होऊ शकले नाही तेही पहावे लागेल. शंभर वर्षांचे आयुष्य प्राप्त झालेल्या ह्या नगरसंस्थेच्या कामाचा विचार करताना संकुचित व क्षुद्र दृष्टीने पहाणे योग्य नव्हे. मात्र चूक ती चूकच असे समजून घेणे अवश्य आहे. नगरपालिकेने ह्या प्रदीर्घ काळात जनतेला काही समाधान दिले असो अथवा नसो; जनता ही आपली नगरपालिका म्हणून ते सर्व अपयश, असमाधान, नजरेआड करील यात शंका नाही.

असे असले तरी, ह्या अपयशात राज्यशासनाच्या धरसोडीच्या धोरणामुळे भर पडते हे अमान्य करता येणार नाही. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच नवीन संकीर्ण कायदा करण्यात आला आहे. जुन्या पद्धतीतील दोष काढून टाकून नगरपालिकेला काही बाबतीत जादा स्वायत्तता देण्याचा ह्या कायद्यात प्रयत्न असल्याचे म्हटले जाते. ही गोष्ट कितपत सत्य होय, हे कालांतरानेच ठरणार आहे. आज प्रत्यक्ष अनुभव आहे तो असा की, नगरपालिकेच्या बांधकाम खात्याच्या

विविध योजनांना राज्य सरकारच्या तंत्रज्ञाची अगोदर संमति घ्यावी लागत आहे. ह्या ' व्हीटो ' मुळे नगरपालिकेतील 'लोकशाही स्वातंत्र्य' मर्यादित होत आहे.

असाही अनुभव आहे की, राज्यशासनाने उमद्या प्रकारचे सहकार्य दिले म्हणजे बारामतीतील सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल सारखी उत्तम सोयीची वास्तू निर्माण होऊ शकते. आता ३० वर्षांनी ती सोय सुधारून वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, ही गोष्ट वेगळी. याच्या उलट नगरपिते व पदाधिकारी हे ठाम मताचे आणि दूरदृष्टीचे असले म्हणजे बारामतीतील उघड्या गटाराची योजना सरकारकडून उपस्थित केलेल्या अडथळ्यांना न जुमानता तडीस जाऊन नागरिकांचे आरोग्य बरेच टिकविले गेले असाही अनुभव येतो. राज्यशासनाच्या वांझोट्या सहकार्याचे उदाहरण म्हणून पाणीपुरवठा योजनेकडे बोट दाखविता येईल.

याच्या उलट नागरिकांच्या प्रतिनिधींनी वेळीच जागरूकता ठेवली नाही, म्हणून काही इष्ट गोष्टी दुरावल्या याची उदाहरणेही नजरेसमोर उभी रहातात. या गोष्टींचे स्मरणही पक्के करून शताब्दीच्या समारंभाकडे जावयाचे आहे.

नगरपालिकेचा कारभार लोकशाहीप्रधान असतो. म्हणून तो लोकप्रतिनिधीकरवी निर्णय घेऊन कार्यान्वित केला जातो. शासनयंत्रणेत निरनिराळी खाती असतात. त्याचप्रमाणे निरनिराळ्या कामांसाठी लोकप्रतिनिधींच्या समित्या नेमल्या जातात. जनरल बोर्ड वा कौन्सिल ( म्हणजे प्रतिनिधी मंडळ ) निरनिराळ्या बाबतीत धोरण ठरवून देते व त्याची कार्यवाही समित्यांच्याकडे सोपविली जाते.

नगरपालिकेच्या स्थायी समितीकरवी पैशाच्या सर्व व्यवहारावर देखरेख ठेवली जाते. नगराध्यक्ष हेच ह्या स्थायी समितीचे अध्यक्ष होत अशी नवीन कायद्यात तरतूद आहे. उपाध्यक्षाकडे एका समितीचे अध्यक्षपद सोपविले आहे. बारामती नगरपालिकेत सध्या उपाध्यक्ष श्री. मा. तु. शाह हे पब्लिक वर्क्स समितीचे म्हणजे बांधकाम समितीचे अध्यक्ष आहेत.

याखेरीज इतर पाच समित्या आहेत; व त्यांचे अध्यक्ष निवडले जातात. ह्या पाच समित्यांचे अध्य व जनरल कौन्सिलमधील तीस सभासद हे सर्व स्था समितीचे सभासद असल्याने ह्या समितीद्वारे स कामाचा समन्वय साधला जातो. ह्या समित्या अशा ( १ ) बांधकाम समिती ( २ ) शिक्षण समिती ( ३ ) सफाई वैद्यक व आरोग्य समिती, ( ४ पाणीपुरवठा व गटार ( जलनिःसारण ) योज समिती, आणि ( ५ ) नियोजन व विकास समिती

कायद्याने ठरवून दिलेल्या ह्या समित्या आहेत. य खेरीज इतर सल्लागार समित्या नेमण्याचा अधि प्रतिनिधी मंडळाला ( जनरल बोर्डाला ) आहे. ए समित्यांचे अधिकारक्षेत्र मर्यादित असते. एख विशिष्ट प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक सम ठेवता येते. तिची मुदत तेवढ्याचपुरती अ सल्लागार समित्यांची मुदत इतर समित्यांचे बरो चालते. सध्या बारामती नगरपालिकेत अशा सम नाहीत. प्रासंगिक समित्यास हंगामी अस्तित्व व ठर दिलेलेच कार्यक्षेत्र असते.

ह्या विषयनियामक समित्यांच्या अनुषंगाने आ आपण नगरपालिकेच्या विविध क्षेत्रांतील का काजाचा व खर्चाचा अगदी स्थूल असा आढ घेण्याचे योजिले आहे. हा विचार करताना असे ल ठेवले पाहिजे की, समित्या निरनिराळ्या असल्या त्या समित्यांकडे सोपविलेली कामे नगरपालिके एकाच खात्याकडून केली जातात. उदाहरणार्थ, न पालिकेचे ' बांधकाम खाते ' घ्या. या खात्याक पाणीपुरवठा व गटार योजनांची कामे होत अस बारामती नगरपालिकेच्या कारभाराला तर हे वि लागू आहे. जेथे खाती स्वतंत्र केली असतील ते गोष्ट वेगळी. दुसरे असे की, स्वतंत्र व नि नावाने समिती असली तरी तिचे काम मर्यादित शकते. सध्याच्या शिक्षण समितीबाबत असा आहे. बारामतीस प्राथमिक शिक्षणाच्या शा ताबा नगरपालिकेने ठराव करून सन १९६० साली मागितला आहे. ती गोष्ट शासनाने अद्या मान्य केली नाही. अर्थातच तोपर्यंत शिक्षण–समि



W. 63.443156 d N65 MGE
SAH
31776

काम मर्यादितच रहाणार. त्याच बरोबर शाळांचा ताबा नगरपालिकेकडे आला म्हणजे सदर ' शिक्षण-समिती ' ही प्राथमिक शिक्षण कायद्यातील तरतूदीप्रमाणे काम करू लागेल. सारांश, पुढे ठराविक क्रमानेच विचार केला आहे, असे समजू नये.

## रस्ते जुने व नवे

गावात दळणवळणासाठी व वहातुकीसाठी रस्ते ही आवश्यक गोष्ट आहे, असे म्हटल्याने काही विशेष सांगितल्यासारखे होत नाही. नागरी वस्तीचे ते अविभाज्य अंग आहे. नगरपालिका स्थापन झाली तेव्हा गावात रस्ते अगदी 'आटोपशीर' होते. ' चौक ' हा त्याचा मध्य बिंदु, चार बाजूला चार वेशी, पूर्वेला जळोची वेस, पश्चिमेला पानवथा वेस, उत्तरेला तांदुळवाडी वेस व दक्षिणेला गुनवडी वेस, या चार वेसींना जोडणारे दोन मोठाले रस्ते सोंगट्याच्या पटाप्रमाणे होते व आजहि आहेत. तटाच्या आत जवळ जवळ समांतर असा एक अरुंद रस्ता, सर्व गावाला वेष्टिणारा; त्याची निरनिराळ्या विभागात नावे निरनिराळी; इतकेच. मधून मधून काही बोळ व गल्ल्या आहेत. गुनवडी वेशीच्या बाहेर पूर्वेला इंदापूरकडे जाणारा रस्ता आणि पश्चिमेकडे कसब्यातून दक्षिणेस फलटणकडे, तसेच पाश्चिमेकडे माळेगाववरून निराकडे जाणारा रस्ता अशी रचना मूळपासूनची होती. जळोची वेशीतून पूर्वेला भिगवणकडे रस्ता जातो. तिकडेच साधारण अर्धा मैल अंतरावर रेल्वे स्टेशन आहे.

नगरपालिकेचे कार्यालय. जळोची वेशीबाहेर आणले ( इ. स. १९११ ). गुनवडी वेशीच्या पूर्वेला व दक्षिणेला दाणेबाजार, जनावरांचा बाजार, भाजीपाल्याचा बाजार इत्यादि सोयी केल्या तेव्हा इतर रस्त्यांची आखणी आवश्यक झाली. नगरपालिकेच्या कार्यालयाजवळून दाणेबाजाराकडे जाणारा रस्ता, सध्या 'सिनेमा रोड' म्हणून ओळखला जातो. याच्या उलट दिशेला जो रस्ता जातो तो हॉस्पिटल रोड होय. कारण नगरपालिकेचे ' सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल ' गावापासून एका बाजूला असावे म्हणून



या बाजूला बांधले ( इ. स. १९३५ ). आता त्याचे पलीकडच्या भागात वस्ती वाढून ह्या रस्त्याला महत्त्व येत आहे.

मोटार वाहतूक नव्हती तोंपर्यंत गावातील रस्त्याचा प्रश्न विशेष त्रासदायक नव्हता. गावाची वस्ती कडक मुरुमावर वसलेली आहे. खड्डे पडले तरच वाहनांना त्रास होतो. धुळीचा त्रास अंगवळणी पडलेला होता आणि आज आहे. या कल्पनेला अनुसरून रस्त्याची आखणी पूर्वीपासून झाल्याचे आढळून येते.

रस्त्याबाबत आरंभीचे काही उल्लेख असे जळोची वेशीचे बाहेरील जागेत गाड्या वगैरे येण्यास फार अडचण होते. त्या ठिकाणी मोठाले खड्डे पडले आहेत. ती जागा मुरूम टाकून साफ करून घ्यावी. सदरचे कामास रु. ०–१२–६ पै. खर्च झाला. त्यास मंजुरी आहे. ( ता. २२–७–१८६५ )

गुनवडी वेशीपासून नदीकडे जो रस्ता जातो तेथे नदीचे काठी खडक असल्यामुळे गाड्या, घोडी वगैरे माळेगाव व फलटण रस्त्यास जाण्याकरिता फार अडचण होते. सबब तो रस्ता व नदीकाठची खडकाची जागा अखत्यारीचे आत कसोशीने खर्च करून एक रस्ता येण्याजाण्यासाठी दुरुस्त करावा. ( ता. २७–७–१८६६ )

गावातील नवीन व दुरुस्त रस्ते झालेले आहेत त्याबाबत रस्त्याची जागा वगैरे खुलासा समजण्यास ज्याप्रमाणे पुणे शहरात जागोजाग पाट्या लावून तजवीज केली आहे त्याप्रमाणे तजवीज करावी. इंग्रजी व मराठी अक्षरे लिहावीत. (१०-१२-१८६६)

हल्ली चारी बाजूस रस्ते झाले आहेत. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी व पाणी येण्या जाण्याचे ठिकाणी मोऱ्या बांधाव्यात म्हणजे सडकेवरून पाणी न जाता सडका खराब होणार नाहीत. सदरहू कामास रु. २०० मंजूर आहेत.

तांदुळवाडी वेशीबाहेर रस्ता केला. त्याचे पश्चिम बाजूचे गटाराची खोली ४ फुटापर्यंत आहे. तरी सफाई मनुष्यास अगर जनावरास धोका आहे. तरी

Acc. No. 31776
Cell No.
Tuljaram Chaturchand College, Library

त्या बाजूस बाभळीचे खांब लावून गज लावावेत. ज्याप्रमाणे रामाचे बोळात लाकडी खांब व गज लावले आहेत त्याप्रमाणे काम करावे. (ता. १९।१।१८८५)

या उदाहरणावरून रस्त्याचे काम कसे झाले याची कल्पना येईल. प्रथम प्रथम रु. ५००, रु. ८०० अशा रकमा खर्च झाल्याचे आढळते. तेव्हा फक्त मुरुमाचे रस्ते करीत गुळाची उतार पेठ वाढली व बैलगाड्यांची वर्दळ वाढली. तेव्हा मुख्य रस्ते प्रथम कठीण मुरुमाचे व नंतर खडीचे केले. गाडीपट्टी (व्हील) बसविण्याची परवानगी देताना त्याचे उत्पन्न रस्त्यावरच खर्च झाले पाहिजे अशी अट होती व ती पाळली गेली.

राम मंदिरापासून नदीकडे एक नाला वाहत होता. तो बांधून काढला. त्याचा उल्लेख वर आला आहेच. नागरिकांना त्रास होऊ नये हे एक उद्दिष्ट. त्याचप्रमाणे रस्ते बिघडू नयेत हेही त्याचे एक उद्दिष्ट होते. नंतर रस्ते करताना दोन्ही बाजूला गटारासाठी जागा ठेवून रस्ते केले गेले.

माखल आळीचा रस्ता रुंद करण्याचे काम इ. स. १९०६ मध्ये सुरू झाले. तेव्हा असे ठरविले होते की, सदरहू रस्ता मोठा करण्याची आवश्यकता असून त्याप्रमाणे नोटिसांची मुदत संपून गेली आहे. सबब नोटीस झालेले सर्व ओटे व बारगज्या ताबडतोब काढण्यात येऊन रस्ता सार्वजनिक करावा. (१) जेथे ओटा असेल त्या मालकास दर चौरस फुटास २ आणे व जेथे ओटा असून बारगजी असेल तेथे दर चौरस फुटास ३ आणेप्रमाणे भरपाई द्यावी.

पुढे मार्च इ. स. १९२८ मध्ये तांदुळवाडी, गुनवडी व जळोची वेशीचे भाग पाडून त्या ठिकाणी रस्ते रुंद करावेत असे पत्र भिमथडी (म्हणजेच बारामती) मामलेदार यांचेकडून आल्यावरून तसे करण्यास मंजुरी देण्यात आली. वेशीचे व बुरुजाचे भाग पाडण्यासाठी खर्चाचा अंदाज रु. ६३४-९-६ मंजूर करण्यात आला.

नगरपालिकेची असली कामे नेहमीच सुरळीत होतात असे नाही. सार्वजनिक हितासाठी घेतलेले निर्णय अमलात आणताना शासनाच्या अधिका मन खंबीर ठेवावे लागते. याचे एक उदाहरण इ. स. १९२१-२२ मधील घटनेचा उल्लेख येईल. त्या वर्षाच्या अहवालात अध्यक्ष श्री. स. करंदीकर यांनी नमूद केले की नदीकडे इंदापूर रस्ता रुंद करण्याचे काम सुरू झाले नाही. दुकानदारांनी ओटे व दुकाने फेब्रुवारीपर्यंत हटविली नाहीत. वास्तविक भाडेपट्ट्याची (लीज) पाच वर्षांची मुदत १९२१ मध्येच संपली होती. रस्ता-रुंदीच्या गुंतलेल्या नगरपालिकेच्या दोन कर्मचाऱ्यांना करणे व जखमी करणे याबद्दल दोन इसमांचे कायदेशीर इलाज करावा लागला. कदाचित होईल म्हणून पोलीस बंदोबस्त अगोदरच होता. त्याप्रमाणे आलेल्या पोलिसांनी झाल्या. गुन्हेगारावर खटले भरण्यात मामलेदार व उपाध्यक्ष श्री. एस्. आर. यांनी या कामी हार्दिक सहकार्य दिले. फार उपयोग झाला. त्यांचा मी फार आभारी मॅनेजिंग कमिटीचे अध्यक्ष श्री. रंगो नारा यांचे कामही उल्लेखनीय झाले. श्री. काही जणाना त्रास झाला. त्यांनी कारभार केली व सभेच्या वेळी उपयुक्त उपस्थिती म्हणून त्यांचेही मी आभार मानतो. या खात्याच्या लोकांनी, त्यातले कांही नवशिके चांगले काम केले हे समाधानपूर्वक नमूद केले

रस्त्याचे रक्षण करावयाचे तर गटारे आहेत. हे वर आलेच आहे. आरोग्यरक्षणा एक भाग आहे. या बाबतीत बारामती नगर केलेल्या गटार योजनेचा येथे उल्लेख करणे त्याचा परामर्श अन्यत्र स्वतंत्रपणे घेतला गटार योजनेचा खर्च मंजूर करताना राज्य अधिकाऱ्यांनी त्या गटार योजनेच्या मूळ तिसरा हिस्सा रस्त्याचे कामी झाला अशी केले. यावरून रस्त्यासाठी गटारांची किती हे समजून येईल.

मोटार वहातुक सुरू झाल्यानंतर मुरु



ही गोष्ट अयोग्य ठरली. नंतर अस्फॉल्ट करणे किंवा सिमेंट कॉंक्रीट करणे, त्याच पद्धती प्रचारात आल्या. हा विचार निर्माण झाला तेव्हा दुसऱ्या महायुद्धाच्या ज्वाला पेटलेल्या होत्या. आणि त्यानंतर टंचाई म्हणून सिमेंटचा वापर करणे शक्यतेच्या कोटीतले नाही. ॲस्फॉल्ट करणे हीच रस्त्याची चालू पद्धती आहे. सध्या शहर हद्दीत एकूण रस्ते ८·७ मैलांचे आहेत. त्यापैकी २·७ मैल रस्ते ॲस्फॉल्टचे, ३·३ मैल रस्ते खडीचे, १·५ मैल रस्ते दगडाचे आणि बाकीचा १ मैल रस्ता मुरुमाचा आहे. अळोची वेशीपासून भिगवणकडे जाणारा रस्ता जिल्हा परिषदेचा आहे. कॅनाल पुलापासून रेल्वे स्टेशनचा भाग सिमेंट कॉंक्रीटचा झालेला आहे. हा रस्ता जिल्हा परिषदेचा असल्यामुळे त्याचा समावेश वरील गणनेत नाही.

रस्त्याचे नूतनीकरण म्हणजे ॲस्फॉल्टचे रस्ते तयार करण्याचे काम नगरपालिकेच्या इतिहासात अगदी प्रथम श्री. मा. तु. शाह हे अध्यक्ष असतांना इ. स. १९४८ ते ५२ चे दरम्यान झाले. व त्यानंतर १९५२ ते १९६३ पर्यंत नंतरचे अध्यक्ष श्री. धों. आ. सातव यांचे कारकीर्दीतही आणखी ॲस्फॉलटचे रस्ते केले गेल्याने गावातील जास्त वहातुकीच्या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाल्याने गावच्या एकंदर चेहरेपट्टीत ( Get up ) विशेषत्वाने फरक पडला.

## पक्की उघडी गटारे

रस्ते चांगले रहावेत आणि सांडपाण्याचा नीट निचरा व्हावा यासाठी गटारांची आवश्यकता असते. आता भुयारी गटारांची कल्पना सर्वत्र रूढ झाली आहे. ती गोष्ट खर्चाची आहे. आणि ते काम होण्याला दीर्घ कालही लागतो. त्याच्या अगोदरची पायरी म्हणजे उघडी गटारे. अगदी जुन्या संस्कृतीत सांडपाण्याला वाट करून देणे म्हणजे गटार अशी कल्पना होती. त्यायोगे पाण्याचा नीट निचरा होत नाही व ओल वाढून लोकवस्तीचे आरोग्य धोक्यात येते. सर्वसाधारणपणे सपाट भूप्रदेशावर वसलेल्या गावात तर गटारांची फार आवश्यकता असते.

बारामतीपुरते बोलावयाचे तर नगरपालिका स्थापन झाल्यापासून या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले होते असे म्हणता येत नाही. घराजवळ खड्डे खणीत व ते पाणी वाहून नेण्याची प्रथा होती. कॅनॉलचे पाणी गावाच्या खांद्यावरून गेल्याने ओल वाढली व आरोग्य आणखीच धोक्यात आले. यावर उपाय म्हणून तीन बाजूने बांधलेली पक्की उघडी गटारे बांधण्याचा कार्यक्रम आपल्या नगरपालिकेने हाती घेतला.

या योजनेला सरकारी यंत्रणेकडून विशेष पाठिंबा मिळाला नाही. असे असूनही नगरपालिकेच्या चालू उत्पन्नातून त्यासाठी मोठा खर्च केला. आणि कमीत कमी खर्चात ती कार्यान्वित केली. याबद्दल जनतेने त्या वेळचे अध्यक्ष श्री. स. वा. करंदीकर आणि त्यांचे सहकारी सभासद यांना सदैव धन्यवाद दिले आहेत.

पक्क्या उघड्या गटाराचे एक वैशिष्ट्य म्हणजे ती धुण्यासाठी गावातील विहिरीचे पाणी वापरून अनेक मैलांवरून पाईपने पाणी आणण्याचा मोठा खर्च टाळला हे होय. गटारे धुण्यासाठी पाणी आणावयाचे तर मोठा खर्च हातो. म्हणून त्या वेळचे नगरपिते स्वस्थ बसले नाहीत हे विशेष स्पृहणीय होय. इतर गावांत विटांची वा दगडांची गटारे केली जातात. पण ती धुण्याची सोय नसल्याकारणाने फक्त पावसाळ्याचे पाणी जाण्यापुरताच त्या गटारांचा उपयोग होतो. हा अर्धवटपणा बारामतीच्या गटार योजनेत राहिला नाही. म्हणूनच बारामतीचे आरोग्य अलीकडे बरेच सुधारले आहे असे म्हणता येते. गटारे धुण्यासाठी विहिरीच्या पाण्याचा उपयोग केला. त्यातूनच पुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागला आहे.

उघडी पक्की गटारे बांधण्याच्या कामाला इ. स. १९२२-२३ पासून प्रारंभ झाला व ते काम इ. स. १९२७-२८ मध्ये पुरे झाले. त्यासाठी तेव्हा एकूण खर्च रु. ९४,२२६ झाला. त्यापैकी फक्त रु. २५,००० सरकारकडून कर्जरूपाने मिळाले. गटारे धुण्यासाठी जी व्यवस्था केली तिचा खर्च रु. १०,०१० झाला. तेल्याचे विहिरीवर नवे इंजिन बसविले, सर्व विहिरीचे

पाणी उपसून त्यातला गाळ काढला. ह्या विहिरीला सर्व उन्हाळाभर पाणी रहाते व ते पिण्यालायक आहे असा अभिप्राय आरोग्य तपासनीसांनी दिल्यावरून ते पाणी पिण्यासाठी देण्याची व्यवस्था नंतर अंगीकारण्यात आली.

विहिरीजवळ एक टाकी बांधली. त्यातील पाण्याचा उपयोग आग विझविण्यासाठी होतो.

उघडी पक्की गटारे बांधण्याचा उपक्रम नंतरही चालू झाला. नंतर आणखी पक्की गटारे बांधली. सीमेंट काँक्रीटच्या प्रीकास्ट व्ही शेपच्या गटारी सन १९५२-५६ ओतण्यांत आल्या व त्याचा उपयोग गटारी बांधण्याकडे करण्यात येऊ लागला. नगरपालिकेच्या हद्दीतील गटारीची लांबी ३९,४७२ फूट आहे.

ह्या गटाराचे पाणी कऱ्हा नदीत सोडले जाते. त्यायोगे नदीचे पाणी विशेष खराब होऊ नये, म्हणून गटारातले पाणी प्रथम एका हौदात सोडतात (सेटलिंग टँक) व मग गाळ बसल्यावर पाणी नदीच्या पाण्यात मिसळते. हा हौद सध्या निरुपयोगी झाला आहे, असे चौकशीकरता आढळून आले.

गटार योजना म्हणजेच जलनिःसारण योजना. तीमधून निर्माण झालेला प्रश्न म्हणजे पिण्याच्या पाण्याचा त्याचा आता विचार करू.

## पिण्याच्या पाण्याची योजना

शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा असे नागरी संस्कृतीचे एक मुख्य लक्षण मानले जाते. नगरपालिकेची स्थापना झाल्या वेळेपासून ह्या गोष्टीकडे लक्ष दिले गेले असे म्हणता येते. आज शंभर वर्षे याचा विचार झाला. ही गोष्ट समाधानाची असली तरी ते प्रत्यक्ष तोंडात पडलेले नाही. तोंपर्यंत नागरिकांचे तोंड अक्षरशः कोरडेच राहणार, अशी जाणीव ठेवून हे लेखन केले आहे. या दिरंगाईबद्दल जबाबदारी कोणाची असे पहावयाचे तर प्रारंभी तो दोष नगरपालिकेकडे येतो. आता, कारणे काहीही असोत. राज्यशासनाच्या यंत्रणेवर या अपयशाची जबाबदारी पडते असे नमूद

केल्यास धिटाईचे असे कोणी म्हणू शकणार नाही
किंबहुना, प्रारंभीची ही नजरचूक मान्य केल्यानंत
नगरपालिकेची शताब्दि साजरी करताना पाणीपुर
करण्याच्या विचाराचा रजत-महोत्सव साजरा हो
आहे असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागते.

बारामती गावाला पहिल्यापासून पाण्याचे दुर्
क्ष्यच होते. नदीचे पाणी खारट आणि तेही व
काठी चार पाच महिनेच असे. विहिरींना पा
मिळेल असा कोणताच जलप्रवाह वा जलसं
आजूबाजूला नव्हता. नदीचे पाणी सोन्याच्या मिश्र
मुळे खारट वाळूतून गाळून निघालेले पाणी. त्यातल
त्यात जरा गोड म्हणून कऱ्हा नदीच्या पात्रात मो
विहिरीसारखे झरे करण्याची पद्धती बाबूजी ना
कांच्या वेळेपासून होती. खुद्द बाबूजी नाईक
प्रथम असा एक मोठा झरा बांधला होता. त्य
नातू पांडुरंगराव बाबासाहेब यांनी आणखी एक
बांधला. यांना 'हेळ' असे म्हणतात. हे दोन्ही हेळ प
साच्या पाण्याने बुजून जात, अगर आत गाळ साच
मुळे त्यांत पाणी साचण्याचे बंद होई. नगरपालि
हे दोन्ही हेळ वारंवार उकरून काढून पाणीपुर
चालू राखण्याची आपल्याकडून प्रारंभी शि
केली.

नदीत हेळ पाणी पिण्यास तीन व देव बागेती
विहीर आहे, ती खराब आहे. थोड्या खर्चाने दु
करून पाणी पिण्याला लायक होण्याची तजवीज मॅ
कमेटीने करावी असा आदेश ता. ६-११-१८६
दिला होता. अशीही सूचना पुढे दिली की,
वठ्याच्या व धुण्याच्या जागा असतील तेथे
कपडे धुवून व स्नाने करून पाण्याची खराबी क
म्हणून बंदोबस्तासाठी पाणी खराब होऊ नये. या
दोन तीन चपराशी ठेवावेत ( ता. २९-७-१८६
नदीचे पाणी पूर आला म्हणजे कसब्यात शिरते
सुमारे रु. १५०० खर्चून तट बांधला. त्यावेळी
पेक्षा जास्त रक्कम लागणार आहे. काम
ठेवल्यास खर्च वाया जाईल, म्हणून आणखी रु.
मंजूर केले ( ता. २६.७.१८६९ ) तांदुळवाडी
कडील विहीर बांधण्याला प्रथम रु. ५१६ मंजूर



नंतर आणखी रु.६००मंजूर केले. (ता.४-७-१८७०).

इ. स. १८७६ मध्ये अवर्षण होते. तेव्हां हेळ खडक फोडून पाणी भरपूर राहील असे करण्याकरिता रु. १०० मंजूर केले व तेथे एक पहारेकरी बसविला. नोव्हेंबर १८७६ पासून मार्च १८७७ पर्यंत त्याला दरमहा रु. ५ वेतन दिले.

ता. २१-४-१८९० चा ठराव असा की, पत्कीचे विहिरीचे पाणी खराब झाले आहे. ते उपसून स्वच्छ करावे. पायऱ्यांवर दगड-मातीची भिंत रचून वाट बंद करावी. पाणी काढण्याकरितां हल्ली एक रहाट आहे त्यालगत वरचे बाजूस एक कणा लावून पाणी काढण्याची तजवीज करावी.

वरील ठरावावरून लक्षात येईल की, विहिरीचे पाणी पुरविण्याकडे नगरपालिकेने या काळात विशेष लक्ष दिले. इ. स. १८९० मध्ये कोठून तरी पाणी बांधून आणावे अशी कल्पना निघाली होती. पण ती बारगळली. निरा कॅनॉलचे पाणी वाहू लागल्या वेळेपासून गावातील विहिरींना पाणी राहू लागले आणि पाण्यासाठी पहाण्याची दिशा थोडी बदलली असे म्हणायला हरकत नाही.

निरा कॅनाल गावाच्या माथ्यावरून जात आहे. त्याचे पाणी निचरून भोवतालच्या विहिरींना व नदीलाही पाणी थोडे थोडे जास्त राहू लागले. अगदी अल्प वेगाने हे स्थित्यंतर होत होते. अलीकडे ह्या पाण्याचे प्रमाण वाढले आहे. पाणी मिळू लागले, तरी पाणी बांधून आणण्याची कल्पना सुटली नव्हती. यासंबंधी दप्तरी असे उल्लेख आढळतात कीं,

पाणी शहरात घेण्याचे व रक्कम रुपये १६,००० चे अंदाजी खर्चाप्रमाणे काम करण्याचे व पाण्याचे दराबद्दल सरकारात दरसाल अदमासे रु. १५० देण्याचे ठरले.

शहरात पाणी देण्याचे संबंधाने प्रकरण चालू आहे. त्यात हजार गॅलन पुढचे पाण्यास दर रु. १ आहे तो देण्याचे कबूल केले. आहे. कर्ज फिटेपर्यंत रु. ८८ द्यावे व हल्ली जो दर सरकार कायम करील तोच दर पुन्हा कदाचित् जास्त पाणी लागल्यास हल्लीचे दराप्रमाणे मिळावे म्हणून तजवीज करावी.

नंतर ठराव केला कीं, अंदाजी खर्चाचे रु. २०४६१ कबूल करून, त्यापैकी कमेटीचे शिलकेतून रु. ७४६१ खर्च करून रु. १३००० सरकारचे कर्ज काढावे. त्याचा हप्ता दरसाल रु. १००० देण्यात येईल.

पाणी पुरवठा योजनेचा विचार अशा रीतीने सुरू झाल्यावर ता. ३।७।१८९३ च्या सभेत अशा आशयाचा निर्णय घेण्यात आला की, यासंबंधी रयतेचा अर्ज आहे. कॅनॉलचे पाणी शहरात आरोग्यास धोका होईल. ( निचऱ्याची सोय नाही म्हणून ) शिवाय कर्ज काढल्यास त्याचा बोजा कराचे रूपाने रयतेवर पडेल. तो घेण्यास ताकद नाही. सबब सर्व बाजूने विचार करता व पाण्याचे प्रकरणाचा विचार करता हल्लीचे परिस्थितीवरून पाणी शहरात घेण्याचे कारण दिसत नाही, असे बहुमताने ठरले.

प्रारंभीची चूक असे अगोदर म्हटले ती ही होय. कराचा बोजा बसेल म्हणून आवश्यक ते करण्याचे टाळल्यानंतर परिस्थिती थोडी सुधारली, आणि परिस्थितीनें ही आपली आच दाखविली. तेव्हा इ. स. १९११ मध्ये ह्या प्रश्नाचा पुनः विचार सुरू झाला. या वेळचा विशेष असा की, पाणी पुरवठा व त्याचे जोडीला गटार योजना असा दुहेरी कार्यक्रम हा होता.

या वेळी गुळाचे उत्पादन वाढून नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती थोडीशी सुधारली होती. पालिकेजवळ सुमारे ८ ते १० हजार रुपयांचा संचय होता. कॅनालचे पाणी जाऊ लागल्या वेळेपासून गांवातल्या घरांना लोणा येत असे व ओलही असे. घराचे सांडपाणी कुंड्यात गोळा करावे व नगरपालिकेने ते वाहून न्यावे, असा प्रकार सुरू होता. पण ओल हटत नव्हती. त्याच बरोबर गावातील विहिरींना पूर्वीपेक्षा जास्त पाणी राहू लागले होते. प्रथम लोकांना जास्त पाणी आणण्याची भीति होती. आता तज्ञानीहि जास्त पाणी आणण्याविरुद्ध अभिप्राय दिला. पैशाचा बोजा जास्त बसतो ही बाब होतीच, अखेर ही योजना पुनः एक वेळ बारगळली.

मध्यंतरीच्या काळांत नीरा कॅनालची रुंदी वाढ-

विली गेली. म्हणजेच जास्त मोठा जलप्रवाह जाऊ लागला. सहाजिकच गावातील विहिरींना पाणी अधिक मिळू लागले. ते पाणी चवीला एकदम वाईट नाही, पण रोगराईचे दृष्टीने त्या पाण्यावर विसंबून राहणे योग्य नाही. शिवाय कॅनालचे पाणी महिन्यातून आठ दहा दिवस बंद होते. म्हणून त्या पाण्यावर भरवसा ठेवणे योग्य नाही. अशी एकंदर विचारसरणी दिसून आली.

इतकी वर्षे कॅनालचे पाणी गावाला पिण्यासारखे करून देण्याचा विचार होता. तो आता बदलून गावातील विहिरीचे पाणी पिण्याला योग्य करून ते पुरविण्याच्या दिशेने विचार सुरू झाला. गावात लहान मोठ्या ४०० ते४५० विहिरी आहेत. त्यातल्या पाच सहा विहिरी चांगल्याच मोठ्या आहेत. त्यांचे पाणी पुरविण्याचा विचार सुरू झाला. मध्यंतरीच्या काळात ह्या मोठ्या विहिरीचे पाणी गावातील खुली गटारे धुण्याला वापरण्याची योजना सुरू होऊन, ती यशस्वी ठरली होती. अनुभव असा येत गेला की, जों जों विहिरीचे पाणी पंपाने खेचावे तों तों पाणी पुरवठा वाढून कालांतराने ते अधिक अधिक गोड होते.

इ. स. १९३५-३६ च्या सुमारास याच विचाराची पक्कड विशेष बसलेली होती. लांबून पाणी बांधून आणण्याचा भरमसाट खर्च यामुळे वाचणार ही मोठी विलोभनीय गोष्ट होती. पान बाजारातील विहिरीवर पंप बसवून ते पाणी पाईपाने नेऊन, कसब्याला पुरवावे अशी योजना त्यावेळी होती. ती आता यशस्वी रीत्या सुरू आहे. सरकारी इंजिनियर्सनी कसबा पाणी योजनेची कल्पना त्यावेळी पसंत होती व पहाणी करून खर्चाचा असा अंदाज दिला होता की प्रथम रु. १५००० खर्च येईल व वर्षाचा खर्च रु. ४००. पण हे सर्व काम त्यावेळी अतिशय खर्चाचे आहे. म्हणून नगरपालिकेने स्थगित ठेवले. येथे उल्लेख करण्याची गोष्ट अशी की, कसब्यात पाणी नेणारा पाईप, नवीन झालेल्या पुलाच्या बाजूने नेण्याला सरकारी इंजिनियर्सनी तेव्हा परवानगी नाकारली होती. आता तीच कल्पना सरकारी मंजुरीने इ. स. १९४८-५२ पासून मूर्त स्वरूपात अवतीर्ण झाली आहे.

ह्याच कालावधीत काट्यांच्या विहिरीवर ऑईल इंजिन बसवून पाणीपुरवठा वाढविण्यात आला. सन १९५२-५६ सालात आंबराई भागांत पाण्याचे ज्या ठिकाणी अत्यंत दुर्भिक्ष्य त्या ठिकाणी स. नं. २ मध्ये ५० फूट व्यासाची व ६ पुरुष खोल अशी विहीर खणण्यात येऊन त्यावर ३८ हॉर्स पॉवरचे रस्टनचे एंजिन बसवून पुरवठा आणखी वाढविण्यात आला. आज तारखेस १५०ते२०० पब्लिक वॉटर स्टँड असून त्यातून विनामूल्य नागरिकांस पाणीपुरवठा केला जातो व सालीना ह्या खात्यावर रु. २०,००० खर्च होतो.

गटारी धुण्यासाठी तेल्याचे विहिरीवर ऑईल एंजिन बसवून गावातील गटारी पाइप टाकून धुतल्या जात असत असा उल्लेख वर केलेला आहे. विहिरीत उतरून लोक पाणी घेत किंवा ह्या गटारात सोडलेले पाणीही लोक वापरीत असत. मग ह्याच पाइपना उभ्या तोट्या बसवून पब्लिक वॉटर स्टँडमधून पिण्यासाठी पाणी देण्याची कल्पना त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. मा. तु. शाह यांचे १९४८ ते ५२ ह्या काळात उदयास येऊन कार्यान्वित झाली व त्याचीच वाढ आजपर्यंत होत राहिली असून मोठी योजना मूर्त स्वरूप धारण करीपर्यंत चालू राहणार आहे.

इ. स. १९३५ ची आणखी एक कल्पना होती ती म्हणजे नीरा कॅनॉल व कऱ्हा नदी यांची जेथे भेट होते, तेथे नदीच्या पात्रात विहीर खणून (इन्फिल्ट्रेशन गॅलरी) ते पाणी बांधून आणावयाचे त्या योजनेचा खर्च तेव्हा २ लक्ष अंदाजिला होता, हा प्रयत्न अयशस्वी झाला.

आणखी दहा वर्षांनी म्हणजे १९४७ पासून कॅनालचे पाणी घेण्याचे प्रयत्न जोराने सुरू झाले. नीरा कॅनालचे पाणी घेऊन ते पुरवावे आणि योजनेचा अंदाजित खर्च रु. ११,३७,५०० होता. परंतु एक तांत्रिक कारण देऊन ती योजना फेटाळण्याचे श्रेय एका अंडर सेक्रेटरीने घेतले. ते कारण असे की कॅनालचे पाणी बागायतीसाठी आहे, पिण्यासाठी नाही. ही माहिती सदर अधिकाऱ्यास कोठून मिळाली



ते त्यांनी आपल्या पत्रात नमूद केलेले नाही. आणि संबंधित मंत्र्यांनी त्यावेळी ते उत्तर म्हणजे सरकारी ठराव असे समजून काही चौकशी केली नाही. या योजनेचे गोड फळ पदरात पडणार अशी गोड स्वप्ने बारामतीकरांना पडत होती, तोच हा वज्राघात झाला.

त्यानंतर आणखी दहाबारा वर्षांनी जी योजना मंजूर होऊन 'एका टॉवर' च्या रूपाने गावात वारंवार आठवण देत आहे, ती नीरा कॅनालचे पाणी घेऊनच कार्यान्वित व्हावयाची आहे हे विशेष नव्हे काय? पुलाखालून पाणी सतत वहाते. सचिवालयांतील खोल्यात नेहमी बदल होतात, त्याचाच हा परिणाम असे समाधान मानावयाला पाहिजे. तथापि भावी पिढीच्या माहितीसाठी असे नमूद करावयाला हरकत नाही की, नीरा कॅनाल बांधला तेव्हा त्याचे पाणी बागायतीसाठी व पिण्यासाठी असे दुहेरी उद्दिष्ट अगदी प्रारंभापासून होते. असे राज्य सरकारच्या गॅझेटियरमध्ये म्हटलेले आहे.

सारांश, नीरा कॅनालच्या पाण्याची योजना अशा रीतीने धुडकावली गेल्यावर नीरा नदीचे पाणी निरावागज यासारख्या ठिकाणी बांधून आणावी. हा विचार सरकारच्या पब्लिक हेल्थ इंजिनीयर्सनी पुरस्कृत केला. या योजनेचा भांडवली खर्च प्रथम सुमारे रु. १७०२५ लक्ष अंदाजिला होता व ती चालविण्याचा वार्षिक खर्च रु. ९०,६२८ च्या आसपास येईल, असा स्थूल हिशेब केला होता.

एक योजना जाऊन दुसरी योजना रुजू लागली म्हणजे सर्व बारीकसारीक कारवाई पुनः सुरू होते. मोठ्या योजना नगरपालिकेच्या आवाक्याबाहेरच्या ठरतात. आणि लहान योजना पुरत नाहीत. अशा परिस्थितीत सरकारी तंत्रज्ञही मोठ्या कल्पकतेने लिखापडी करतात. एक असिस्टंट पब्लिक हेल्थ इंजिनियरने सुचविलेल्या योजनेचे समर्थन करताना नागरिकांना कमी स्वच्छतेत रहाण्याची सवय आहे. (People are used to Low Sanitard Standard) असे कारण सांगितले होते. सरकारी यंत्रणेकडून विलंब होऊं लागला म्हणजे नगरपालिकेच्या प्रतिनिधींना राज्य सरकारच्या मंत्र्यांची भेट घेण्याची इच्छा होती. इच्छा अशी की खुद्द मंत्रिमहाशयांना भेटून प्रगतीच्या मार्गातील अडसर दूर करता आला तर पहावा. जरूर ते पैसे खर्च करण्याची ऐपत नगरपालिकेला नसली तर प्रश्न शिल्लकच रहात नाही. पण पैसे आहेत व काम लवकर व्हावे म्हणून प्रयत्न करावेसे वाटतात. तेव्हा सरकारी अधिकारी असे स्वच्छ सांगतात की, नगरपालिकेच्या सभासदांनी संबंधित मंत्र्यांची भेट घेऊन प्रश्न कार्यवाहीत उतरेल असे मला वाटत नाही. अशी भेट व्हावयाची तर ती सरकारच ठरवू शकते. अशी बैठक घडवून आणणे मला शक्य नाही. या दिशेने पावले पडावीत अशी आपली इच्छा असेल तर आपण बांधकाम खात्याच्या सचीवाकडे पत्रव्यवहार करावा असे मी सुचवितो. (पब्लिक हेल्थ इंजिनियरचे पत्र ता. १५ सप्टेंबर १९५३) अशाच प्रकारचा आणखी एक उल्लेख नमूद करून हे प्रकरण आटोपते घेतो. सध्या शताब्दिच्या वर्षी जी योजना कार्यान्वित होण्याची चिन्हे दिसत आहेत. तीबाबत नगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीसंबंधी सरकारला अहवाल सादर करताना सरकारी ऑडिटरनी आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे, असा अभिप्राय व्यक्त केला व लगेच म्हटले आहे की, वैद्यकीय मदतीवरील खर्च ४ टक्क्यापेक्षा जास्त आहे असे दिसते. या विधानातील मर्म काय ते विस्ताराने सांगण्याची जरूरी नाही.

नीरा नदीचे पाणी आणण्याची योजना फार खर्चाची दिसली, तेव्हा नगरपालिकेने पुनः एकदा नीरा कॅनालचे पाणी घेण्याला सरकारकडे मंजुरी मागितली. समाधानाची गोष्ट अशी ता. २४-१२-१९५३ ला नीरा कॅनालचे पाणी घेण्याला राज्य सरकारने मंजुरी दिली. आणि त्या कल्पनेवर आधारलेली पाणीपुरवठा योजना बरीच कार्यान्वित झाली आहे. नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे असा अभिप्राय एक्झॅमिनर ऑफ लोकलफंड अकाऊन्टस्, पुणे जिल्हाधिकारी व पुणे विभागीय कमिशनर यांनी पूर्वी वेळोवेळी केलेले होते. बोर्ड ऑफ पब्लिक हेल्थने ता. १६-७-१९५८ च्या ठरावान्वये ह्या योजनेला मंजुरी दिली.

'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने' या न्यायाने

इतके सारे जमले, पण प्रथम आर्थिक टंचाई व नंतर आणीबाणीची परिस्थिती यामुळे राज्य सरकारला या कामी विशेष काही करता आले नाही. सर्व काम स्वतःच्या पैशाने करण्याची नगरपालिकेने तयारी दाखविली; आणि सरकारी मंजुरीने खुल्या बाजारात जरूर ते कर्ज उभारण्याचा प्रयत्न केला. त्यात यश आले नाही. या घडामोडीत तीन चार वर्षे गेली. इ. स. १९६० मध्ये हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न सुरू झाला. लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडून या योजनेसाठी, दुरुस्त केलेल्या खर्चाचे अंदाजाप्रमाणे जरूर ते रु. ६,२३,५५० चे कर्ज इ. स. डिसेंबर १९६३ मध्ये ५½ टक्के व्याजाचे दरांत मिळाले. ती रक्कम व स्वतःचा खर्चाचा हिस्सा अशा दोन्ही रकमा एक्झिक्युटिव्ह इंजिनियरकडे भरल्या गेल्या. इतके झाल्यावर कामाची चाके जरा वेगाने फिरू लागली आहेत. ह्या कर्जाची फेड २० वर्षांत करावयाची आहे.

आता कार्यान्वित होत असलेल्या योजनेचे स्वरूप स्थूल मानाने असे आहे. नीरा कॅनालचे पाणी घ्यावयाचे ही मुख्य कल्पना आहे. तांदूळवाडी रस्त्यावरील कॅनालच्या तीन कमानी पुलानजीक हे पाणी घेतले जाईल. तेथे पाणी साठविणे, फिल्टर करणे इत्यादि तरतूद असेल. त्या कामावरील नोकरवर्गाच्या रहाण्याच्या जागाही तेथेच योजिलेल्या आहेत. उन्हाळ्यात कॅनालचे पाणी महिन्यातून १० दिवस बंद असते; त्या मुदतीत उपयोगी पडेल. इतके पाणी घेऊन ठेवण्याची व्यवस्था ह्या मुख्य जलसंचयात (रिझरवायर) होणार आहे. तेथेच पाणी शुद्ध करण्याची सोय आहे. कॅनालचे पाणी चालू असेल, तेव्हा कॅनॉलचे पाणी थेट ह्या फिल्टर टाकीत येईल, पाणी बंद असेल तेव्हा ते पाण्याच्या खजिन्यातून येईल. पाणी आत येत असताना तुरटीची पूड सोडली जाईल. तुरटी पूर्ण विरघळावी म्हणून पाणी विजेवर चालणाऱ्या रवीने घुसळले जाईल. ह्या घरातून पाणी दुसऱ्या टाकीत जावयाचे, म्हणजे पाण्यातील गदळ द्रव्ये तळाशी बसून पाणी शुद्ध होईल. या घरातून पाणी तिसऱ्या कप्प्यात गेले की, तेथे क्लोरीन मिश्रण करण्याची सोय असेल.

अशा रीतीने शुद्ध व जंतुविरहित झालेले पाणी पाईपाने उंच जागी बांधलेल्या टाकीत खेचले जाईल. ही टाकी सध्या स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर, उजवे बाजूस, रिमांड होमची जागा व कॅनाल यांच्या मधल्या नगरपालिकेच्या जागेत बांधून तयार आहे. जमिनीपासून ही टाकी ७५ फूट उंच आहे. या टाकीत १॥ लक्ष गॅलन पाणी साचू शकते.

या उंच टाकीतून पाणी सर्व गावभर खेळविले जाईल. नदीच्या दोन्ही भागात, दोन मजल्यापर्यंत हे पाणी आपोआप जावे अशा पद्धतीने ही उंच टाकी बांधलेली आहे. दर दिवशी बारा तास योजने माणसी ३० गॅलन पाणी पुरविण्याचा या योजनेचा संकल्प आहे.

या योजनेतील उंच टाकी बांधण्याचे काम पुरे झाले आहे. या टाकीचे जागी ता. २७ जानेवारी १९६५ ला त्यावेळचे नगरपालिकेचे अध्यक्ष माननीय श्री. विठ्ठल रामचंद्र सोनवले यांचे शुभ हस्ते भूमिपूजन झाले. इतर सर्व काम व्हावयाचे आहे. ती सामुग्री जमा करण्याचे काम सुरू आहे.

या योजनेचा खर्च प्रथम रु. १२,४७,१०० होता. आताचा दुरुस्त अंदाज रु. २१,६४,२०० आहे. या अंदाजावर आधारून सर्व पैशाचे व्यवहार आहेत.

रस्त्याखालून पाइप टाकण्याचे कामाचा शुभारंभ ता. १३-३-६७ रोजी नगरपालिकेचे उपा... माननीय श्री. मा. तु. शाह यांचे हस्ते झाला.

पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणे पुरवणी खर्चाची तरतूद करण्यासाठी लाइफ इन्शुअरन्स कार्पोरेशनकडून मार्च १९६७ मध्ये नगरपालिकेला वरील नमूद केलेल्या कर्जाव्यतिरिक्त ६½ टक्के व्याजाच्या दराने आणखी रु. ४,५५,९५० चे कर्ज मिळाले आहे. वाढीव खर्चाच्या प्रमाणात नगरपालिकेने ... १० टक्क्याप्रमाणे खर्चाची पूरक रक्कम रु. ९९... नोव्हेंबर १९६६ मध्ये सरकारात रोख ... होती. ह्या दुसऱ्या कर्जाची फेड २५ वर्षांत ... याची आहे. सन १९५६-६३ ... श्री. धों. आ. सातव अध्यक्ष यांच्या कारकीर्दीत ...



भांडवली खर्चावर काटकसर करून सन १९६३ अखेर सुमारे ६ ते ७ लाख रुपयांचा राखीव निधी निर्माण केल्यानेच पाणी पुरवठ्याची योजना हाती घेणे शक्य झाले.

सन १९६३ साली व १९६७ साली आलेल्या कर्जात बराच फरक आहे. पहिल्या कर्जाबद्दल सरकारने कर्जफेडीची विमा कार्पोरेशनला फक्त हमी दिली होती. पण दुसऱ्या कर्जाच्या वेळी ह्या हमीबद्दल सरकारला सालीना शेकडा २० पैसे ह्याप्रमाणे कर्जाच्या रकमेवर २५ वर्षांपर्यंत फी भरावी लागणार आहे. यासाठी नगरपालिकेला वर्षाला सुमारे रु. ८०० द्यावे लागणार आहेत. सरकारने हा हमीच्या फीचा बोजा नगरपालिकेवर निष्कारण टाकला आहे असे नगरपालिकेचे प्रामाणिक मत आहे. कारण नगरपालिकेवर सरकारचे नियंत्रण आहे. कर्जाची फेड लोकनियुक्त नगरपालिकेकडून मुदतीत व वेळेवर न झाल्यास सरकारला कर्जफेडीची रक्कम देण्याचा आदेश नगरपालिकेच्या अधिकाऱ्यास देता येतो व अंमलबजावणी करता येते. मग ही आडत कशाकरता सरकारने घ्यावी, हा प्रश्न आहे. नगरपालिका लोकनियुक्त व सरकारही लोकनियुक्त; म्हणून ह्या आडतीचे प्रयोजन नगरपालिकेला समर्थनीय वाटत नाही.

पाणी पुरवठ्याची मोठी योजना अमलात येण्याच्या अगोदर कसबा भागाला पाणी पुरविण्याची योजना पुरी केली. तिचा थोडासा उल्लेख करणे उचित होईल. या योजनेचे स्वरूप असेः—

गुरांच्या दवाखान्याजवळ विहीर आहे तिला पान बाजार विहीर म्हणतात. तेथे ऑईल इंजिन बसवून पाणी खेचले जाते व ते पाणी पाईपाने कसब्यात नेले आहे. कसब्याच्या मध्यवर्ती भागात उंच जागी टाकी बांधली आहे. त्या टाकीत हे पाणी सोडतात. ह्या टाकीत ६००० गॅलन पाणी रहाते. खाली वर्तुळाकाररीत्या बारा तोट्या बसवून पाणी सोडतात. दर माणशी रोज १० गॅलन पाणी पुरवावे या कल्पनेनुसार १६००० गॅलन पाणी पान बाजार विहिरीतून खेचले जाते.

ह्या योजनेचा पुरस्कार इ. स. १९५० मध्ये त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. मा. तु. शाह यांचे कारकीर्दीत केला गेला. मे १९५३ मध्ये काम पुरे झाले व ह्या योजनेचे उद्घाटन बारामतीला भूषणभूत झालेले श्री. दादासाहेब शेंबकर यांचे हस्ते ता. ४ जुलै १९५३ ला झाले. तेव्हा कसब्यातलेच एक जुने रहिवासी श्री. धोंडिबा आबाजी सातव हे नगरपालिकेच्या अध्यक्षपदी होते. कसब्यातल्या लोकांची एक गैरसोय दूर झाली, याबद्दल सर्वांना आनंद वाटला यात शंका नाही. या योजनेसाठी एकूण खर्च रु. ३४,१५८ झाला. ह्या योजनेच्या खर्चावर रु. १५,२०० सरकारी मदत म्हणून मिळाली.

बरील सर्व विवेचनावरून बारामतीचे नागरिकांस स्वच्छ पाणीपुरवठा करण्याकडे नगरपित्यानी प्रथमपासून व विशेषतः सन १९४५ पासून सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसून येईल व १०० वर्षे वाटचाल करीत असलेले पाणी नागरिकांस लवकरच मिळेल अशी आशा आहे. भगीरथाने गंगा भूलोकावर आणण्यासारखाच हा प्रकार आहे.

—

# शहरचे आरोग्य व स्वच्छता

नगरपालिकेच्या कायद्यान्वये नेमली पाहिजे अशी आणखी एक समिती म्हणजे ‘सफाई, वैद्यक व आरोग्य समिती’ ही होय. हे काम अनेकविध प्रकारचे आहे. या कामावर देखरेख करून मार्गदर्शन करण्यासाठी नगरपालिकेत ‘आरोग्य अधिकारी’ नेमतात. त्यांच्या हाताखाली सॅनिटरी इन्स्पेक्टर, फूड इन्स्पेक्टर, मार्केट इन्स्पेक्टर इत्यादि विभाग-प्रमुख अधिकारी असतात. जेथे असा अधिकारी नेमलेला नाही तेथे मुख्य कार्यकारी अधिकारी (चीफ ऑफिसर) यांच्या देखरेखीखाली हे काम चालते. बारामती नगरपालिकेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखरेखीखालीच हे काम चालू आहे. येथे स्वतंत्र आरोग्य अधिकारी नाही.

नगरपालिकेच्या कार्यक्षमतेची कसोटी पहावयाची तर ती ह्या खात्याच्या कामावरून पहाता येते. सर्व-साधारण अनुभव असा आहे की, या खात्याच्या कामाबद्दल नागरिकांकडून क्वचितच समाधान व्यक्त केले जाते. बारामती नगरपालिका या अनुभवाला अपवाद आहे, असे नाही. कॉलरा, देवीसारख्या साथीचा रोग येऊन राज्यशासनाच्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली प्रतिबंधक उपाययोजना सुरू झाली आणि प्राणावरच बेतले होते, ते शेपटीवर वाचले, असा अनुभव आला म्हणजे लोकाकडून नगरपालिकेला थोडेसे धन्यवाद मिळतात. ती आणीबाणीची परिस्थिती गेली की, पुन्हा पूर्वीची टीका ऐकू येते.

सर्वसाधारणपणे ‘आरोग्य खाते’ असे या खात्याला म्हणतात. त्याचें काम वास्तविक दोन तीन प्रकारचे आहे. देवीची लस टोचण्याचा कार्यक्रम बारामाही सुरू असतो. तो प्रतिबंधक उपाय होय. म्हणजे रोग होऊ नये यासाठी जो उपाय योजतात तो. मुलांना पौष्टिक आहार, (नैसर्गिक-दूध, फळे वगैरे) उपलब्ध करून देणे व त्यांना खेळ व्यायामासाठी सोयी करून देणे, ही कामेही वास्तविक याच कक्षेत येतात. माता-बालसंगोपन केंद्राचे द्वारा सन १९४५ सालापासून हे काम सुरू झाले आहे. नंतर रोग झाला [illegible] उपचार करावयाचा तो कार्यक्रम-कॉलरा, [illegible] यासारखे साथीचे रोग उद्भवले की, उप[illegible] व्यवस्था केली जाते. त्याच बरोबर चांगल्या [illegible] हे रोग होऊ नयेत, म्हणून प्रतिबंधक उपाय [illegible] जातात. सर्वसाधारण आजारावर औ[illegible] करण्याकरिता दवाखाने चालविणे हे का[illegible] खात्याकरवी होते. फळफळावळ, भाजीपा[illegible] मासळी इत्यादि बाजारावर या दृष्टिकोनातू[illegible] केले जात असते.

प्लेग व कॉलरा ह्या दोन साथीचा [illegible] बारामतीला महाराष्ट्रातील इतर विभा[illegible] झाला. अलीकडे १५–२० वर्षांत प्लेगचा [illegible] ह्या पांढरीला लागलेला नाही. तथापि दोन [illegible] कालऱ्याने बराच त्रास दिला. प्रतिबंध[illegible] योजनेतील सुधारणा व आरोग्यरक्षणार्थ [illegible] पावले, यामुळे ह्या साथीचा त्रास झाला तरी [illegible] उपद्रव कमी झाला आहे, असे समाधान [illegible]

कॉलऱ्याचे साथीचा उल्लेख प्रथम इ. [illegible] मध्ये आढळला. तेव्हा ठरविले होते [illegible] कॉलऱ्याचे आजारामुळे हवा स्वच्छ क[illegible] रस्त्यावर कोळशाचे ढीग पेटवून त्यावर [illegible] गंधक घालून जाळण्याचे काम सुरू आ[illegible] मंजुरी आहे. रु. ५० पर्यंत मंजुरी.

त्याचवेळी समस्त रयतेकडून अर्ज आ[illegible] की, कॉलऱ्यामुळे गावात काही ठिका[illegible] आजारी आहेत. मुसलमान लोकांची [illegible] त्यामुळे ते ताशा वाजवून गावांत फिरता[illegible] आजाऱ्यास त्रास होतो तरी कॉलऱ्याचा[illegible] आहे तोंपर्यंत ताशा न वाजविण्याबद्द[illegible] समज द्यावी.

कॉलऱ्याने कोणी आजारी असेल तर [illegible] ताबडतोब कळावे, यासाठी असे ठरविले [illegible] कॉलऱ्याबद्दल आजारी झाल्यापासून चार त[illegible] व आपोआप देवी येऊ लागल्यापासून [illegible]



आत म्युनिसिपालिटीच्या ऑफिसात अगर नाक्यावर अगर नोकरास खबर द्यावी. याप्रमाणे खबर न दिल्यास तो एक रुपयापर्यंत दर एक कामाबद्दल दंडास पात्र होईल. याप्रमाणे नियम (बाय लॉ) करावा.

ता. ३ सप्टेंबर १८८९ ला डेप्युटी सॅनिटरी कमिशनरनी पत्र लिहून कॉलरा सुरू झाल्याची चौकशी करून स्वच्छतेबद्दल सूचना दिल्या. नीरा कॅनालचे पाणी लोकांना पिण्यासाठी घ्यावे अशी एक सूचना त्याने केली. ‘कॅरबॉलिक डिसइन्फेक्टिंग पॉवडर’ तेव्हा वापरत.

याच संदर्भात असा उल्लेख करावयाला हरकत नाही की ‘सॅनिटरी’ कमिशनरनी आपल्या ऑगस्ट १९–१–१८८९ च्या अहवालात म्हटले आहे की, कॉलरा झाला म्हणजे उघडया जागेत डांबर व गंधक जाळणे हे अगदी निरुपयोगी आहे. या त्यांच्या अभिप्रायाकडे सर्व नगरपालिकांचे लक्ष वेधण्यात आले होते. इ. स. १८९६–९७ मध्ये कॉलऱ्याने ३ मृत्यु झाले. त्याच वेळेला प्लेगने ३ इसम मरण पावले.

कॉलऱ्याच्या साथीचा उपद्रव चालू शतकाच्या पहिल्या ३०।३५ वर्षांत विशेष नव्हता. जेव्हा जेव्हा कॉलऱ्याची साथ सुरू होते, तेव्हा गावातील खाजगी डॉक्टरांच्या सहकार्याने प्रतिबंधक उपाय योजले जातात. ‘आयसोलेशन वॉर्ड’ उघडतात. व तेथेही खाजगी डॉक्टर कामाला येतात. असे जन-सेवेचे काम करणाऱ्या डॉक्टरांचा नगरपालिका वेळोवेळी गौरव करते. डॉ. के. के. कोल्हटकर, डॉ. के. आर्. कुंचूर, डॉ. के. आर्. पोळ यांची विशेष प्रशंसा नगरपालिकेने केली आहे.

नगरपालिकेच्या कार्यालयासमोरील जळोची धर्म-शाळेत ‘आयसोलेशन वॉर्ड’ उघडला जात असे. अलीकडे सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलच्या आवाराच्या उत्तरेकडे लागून असलेली ऑस्ट्रेलियन मिशनची जागा नगरपालिकेला विनामूल्य देण्यात आली. (इ. स. १९५०) ऑस्ट्रेलियन मिशनतर्फे मिस् ओझर ह्या वेळी जातीने हजर होत्या. तेथे एक पडवी बांधलेली आहे व तिचा या कामासाठी आता उपयोग केला जातो.

कॉलऱ्याने आतापर्यंत किती आजारी पडले व मृत्युमुखी पडले, याची सालवार यादी देण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. साथ आली म्हणजे ती जोराची येते व शेकडो स्त्री-पुरुष या रोगाला बळी पडतात, असा अनुभव आहे. कॉलऱ्याचा प्रथम उल्लेख केला. याचे एक कारण असे की, दुसरी उपद्रव देणारी जी साथ, प्लेगची ती आता इतिहासजमा झाली आहे. इ. स. १९५० नंतर तिने मान वर केलेली नाही. पण कॉलरा अजून येतो. एक वर्षाआड तो येतो, असे म्हणणेही अतिशयोक्तीचे होणार नाही.

कॉलरा सुरू झाला म्हणजे तो आटोक्यात आणण्याचे प्रयत्न शिकस्तीचे होतात हे खरे; पण कॉलरा का होतो याचा एरवी शांततेच्या काळात, विचार झाल्याचे नगरपालिकेच्या दप्तरात आढळले नाही. कॉलऱ्याची बाहेर गावाहून लागण आली, तर कोणाला दोष द्यावयाचा बरे? पण बाहेर गावाहून साथीचे बीज आल्यावर ते स्थानिक परिसरात रुजण्याइतपत ‘जमीन तयार असते’ ही गोष्ट लक्षात घेऊन, जरूर ती पावले टाकलेली आढळत नाही.

प्लेगची साथ म्हणजे काय हे गेल्या २० वर्षांतील पिढीला जवळ जवळ माहीत नाही. इतिहासजमा झालेल्या ह्या संकटाचे स्वरूप काय होते, हे समजण्यापुरताच येथे उल्लेख करावयाचा आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इ. स. १८९७ मध्ये जी प्लेगची साथ आली तिला देशाच्या कारभारात राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. बारामतीला प्लेगचा प्रसार होऊ नये म्हणून ठरविले होते की,—

बाहेर गावाहून येणारांना गावात आपल्या घरच्या मंडळीत मिसळू दिले जात नसे. यालाच ‘क्वॉरंटाईन’, करणे म्हणजे अलग ठेवणे म्हणतात.

(१) मुंबईहून आलेल्यांना गावाबाहेर ७ दिवस राहावे लागे, पुण्याहून आलेल्यांना ३ दिवस, फलटणहून आलेल्यांना २ दिवस आणि सुप्याचे लोकांना एक दिवस.

(२) मुंबईहून अगर इतर ठिकाणाहून जळोची वेशीकडून जे लोक येतील, त्यांना माळावरील देवीचे

देवळात रहाण्यास जागा द्यावी. (त्या काळात रेल्वेने बारामतीला येणारे लोक डिकसळला उतरून टांगे वा बैलगाड्यांनी बारामतीला येत.)

(३) तांदुळवाडी वेशीकडून येणाऱ्या लोकास मुरलीधराचे देवळात रहाण्यास जागा द्यावी.

(४) फलटण व नीरा स्टेशनकडून वरील ठिकाणचे लोक आल्यास त्यांना कसब्याचे पश्चिमेस ढवाणांचे मळ्यात गोठा आहे तो रहाण्यास द्यावा.

ज्या इसमाचे घरी सदरहू प्रकारचा (प्लेग) रोग झाला असेल, त्या घरातील कोणी इसम आल्यास त्यास सात दिवसांचे क्वॉरंटाईनमध्ये ठेवावे.

गाडीतळ जळोची वेशीबाहेर आहे. तो कॅनॉल पुलाकडे ठेवावा व तेथे माणसांची तपासणी करावी. डॉक्टरचे सल्ल्याने मॅनेजिंग कमिटीने तजवीज करावी.

याचवेळी आणखी असे ठरविले होते की, घाण पाणी काढण्याचे काम एका इसमाकडून होत नाही. सबब एक बैल छकडा भाड्याने पाहून त्यात एक लोखंडी टीप घालून पाणी भरून नेण्याची तजवीज करावी.

आणखी सहासात वर्षांनी प्लेगची साथ आटोक्यात येईना तेव्हा (ता. १९-७-१९०४) असे ठरविले की, (१) म्युनिसिपालिटीचे ताब्यातील सर्व शाळा बंद ठेवाव्यात व रेकॉर्डचे सर्व काम मास्तरांच्याकडून करून घ्यावे. त्या कामी मि. बेरी शाळामास्तर नं. १ यांनी या कामावर देखरेख करावी.

(२) मि. पुणतांबेकर मास्तर यांनी प्लेगचे रजिस्टर लिहिण्याचे काम दवाखान्यात करावे.

(३) मि. देशपांडे यांनी म्युनिसिपालिटीचे शेतकी, ज्वारी पेरणे, मिरच्याची व्यवस्था ठेवणे व आंब्याचे झाडांची देखरेख ही कामे पहावीत.

(४) मि. अब्दुल कादर मास्तर यांनी सर्व म्युनिसिपल इमारती व रस्त्यांची झाडे आणि बागा यावर देखरेख ठेवावी.

(५) मुली बोलावणाऱ्या बाईने नवीन धर्मशाळा झाड-सारवण करावे.

इ. स. १९१९ मध्ये सर्व्हे नंबर २२५ पैकी एक एकर जागा रु. ६९ भरपाई देऊन 'क्वॉरंटाईन'-साठी ताब्यात घेतली. गावात प्लेग झाला की, तो गावाबाहेर निरनिराळ्या वस्तीवर रहावयाला जा[...] नगरपालिकेचे त्या वेळचे एक सभासद श्री. एक[...] गंगाराम पोटे यांनी रेल्वे स्टेशनजवळील आप[...] जागेत झोपड्या बांधण्यासाठी आपली जागा [...] होती.

आरोग्यविषयक व्यवस्थेत जन्म-मृत्यूची [...] व देवी काढणे ही दोन कामे फार महत्त्वाची अ[...] पहिले काम सर्वस्वी नगरपालिकेच्या कक्षेतले [...] आणि दुसरे राज्य सरकारमार्फत प्रथम जिल्हा लो[...] बोर्डाच्या द्वारा आणि आता जिल्हा परिषदेच्या [...] होत आहे. सन १९६४ चा देवीबाबतचा का[...] नुकताच १५ एप्रिल १९६७ पासून अ[...] आलेला आहे.

बारामती नगरपालिकेने जन्म-मृत्यूची नोंद ठे[...] बाबत नियम इ. स. १८८५ मध्ये करून [...] केला. त्याच्या अगोदर काही व्यवस्था नव्हती[...] माहिती नोंदविली जाणे हे फार महत्त्वाचे, आ[...] व जरूरीचे आहे. तसेच त्यास राष्ट्रीय महत्त्वहि[...] न्यायदानाच्या कामी त्या माहितीचा उपयोग [...] तसेच आरोग्याचे मापन करण्याचे ते एक [...] आहे. या प्रश्नाकडे जावे तसे लक्ष अजून गेलेले [...] नाही. नगरपालिकेत एका कारकुनाकरवी ही [...] अद्ययावत् करण्याचा प्रयत्न केला जातो. [...] दवाखान्यातून व खाजगी दवाखाने अथवा [...] गृहातून जन्म-मृत्यूची माहिती सदर का[...] त्याने सचोटीने प्रयत्न केले तर खात्रीलायक [...] शकते. त्याबाहेरच्या क्षेत्रातून माहिती [...] गोष्ट नागरिकांच्या सर्वस्वी सदिच्छेवर [...] आहे. अर्थात् नागरिकांना केव्हा ना केव्हा [...] मृत्यूचे प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) सादर क[...] प्रसंग येत असल्याकारणाने त्यांच्याकडूनही [...] मिळण्याची शक्यता जास्त आहे असे म्हण[...] त्याचबरोबर ताबडतोब नोंद होण्यातील जो [...] पणा असतो तो साध्य होऊ शकत नाही.

ह्या लेखनाचे वेळी चौकशी करता असे [...] की, गावात निरनिराळ्या जमातीच्या निर[...] स्मशानभूमी आहेत. तेथे दिवसाला सविस्त[...]



होऊन ती नगरपालिकेकडे येण्याची तरतूद सध्या झालेली नाही. स्मशानभूमीवर कसलेच नियंत्रण वा नियमन नाही. पोलिसांच्या कक्षेतील काही प्रकार एकाद्या स्मशानभूमीत झाला, तर ती प्रथम कळणार पोलिसांना. मग त्याप्रमाणे नगरपालिकेच्या दप्तरात नोंद झाली तर झाली. ते सर्व सेवकांच्या व परिस्थितीच्या यदृच्छेवर सोपविलेले आहे. म्यु. च्या नवीन कायद्याप्रमाणे ठराविक मुदतीत जन्म-मृत्यूची नोंद न करणारांस शिक्षा ठेवलेली आहे.

हजारी मृत्यूचे प्रमाण पाहून आरोग्याबद्दल निर्वाळा द्यावयाचा असतो. शहरासारख्या ठिकाणी मृत्यूची अनेक कारणे आहेत. प्लेग, इन्फ्ल्यूएन्झा, कॉलरा, देवी यासारखे सांथीचे रोग आहेत. वहानांचे व यंत्राचे जास्त वापरामुळे अपघात होऊन मरण ओढवते, आणि इतर नैसर्गिक कारणे आहेत. आरोग्यमापन नीट व्हावयास पाहिजे तर जन्म व मृत्यू यांची नोंद बिनचूक होणे जरूर आहे.

गेल्या काही वर्षांतील सरासरी लोकसंख्येशी दर हजारी प्रमाण दाखविणारे आकडे खाली दिले आहेतः—

| वर्ष | सरासरी वार्षिक नोंद | | लोकसंख्येशी दरहजारी प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | जन्म | मृत्यु | जन्म | मृत्यु |
| १८८५ ते १८९१ | १९९ | १७६ | ३७-५ | ३३-३ |
| १८९२ ते १९०१ | २४० | २३१ | ४४-४ | ४२-७ |
| १९०२ ते १९११ | ३०५ | ३३४ | ३२-५ | ३५-५ |
| १९१२ ते १९२१ | २६८ | ३४० | ३४-३ | ४३-४ |
| १९२२ ते १९३१ | ३३१ | २८४ | ३७-९ | ३२-५ |
| १९३२ ते १९३५ | ३६९ | ३५० | ३५-४ | ३३-५ |
| १९३६ ते १९४१ | २३५० | १८७२ | २२-४९ | १६-९६ |
| १९४२ ते १९५१ | २४१३ | २१४६ | ३५-०६ | २३-२९ |
| १९५२ ते १९६१ | ७२९२ | १८६९ | ४२-६८ | १०-९० |
| १९६२ ते १९६६ | ५०१५ | ८९८ | २३-६० | ४२-२७ |

बारामती शहराच्या विकासासाठी आराखडा तयार करताना तज्ज्ञानी गावच्या लोकसंख्येबद्दल काही शास्त्रीय विचार मांडले आहेत. नीरा-कॅनाल आल्यापासून शहराची लोकसंख्या वाढली. ती १९०१ मध्ये ९४०७ झाली. परंतु पुढे २० वर्षे लोकसंख्या घटली. प्लेगसारख्या साथीमुळे हे प्रमाण घटले असे तज्ज्ञांचे मत आहे. पुनः लोकसंख्या वाढू लागली. इ. स. १९५१ मध्ये ती १७०६४ झाली. पिण्याच्या पाण्याची सोय चांगली नसल्यामुळे शहरची लोकवस्ती विशेष वाढली नाही. इ. स. १९६१ मध्ये लोकसंख्या २१११८ झाली. आता नियोजकांनी इ. स. १९७१ मध्ये बारामतीची लोकसंख्या २५,००० होईल आणि पुढे इ. स.१९९१ च्या सुमारास ती ४०,००० होईल असा अंदाज धरला आहे.

जन्ममृत्यूची नोंद महत्त्वाची आहे. हे प्रारंभी लक्षात आले, तेव्हा इ. स. १८८१ मध्ये, ज्या घरात जन्म अगर ज्याचे ' घरात मृत्यु: झाला असेल, त्या घरातील इसमाने त्याची खबर नगरपालिकेचे जकातीचे नाक्यावर व कसब्यातील लोकांनी पाटील, कुलकर्णी यांचेकडे ७२ कलाकात द्यावी. याप्रमाणे न झाल्यास

त्या गुन्ह्याबद्दल त्यास रु. २ दंड व्हावा. अशा-प्रमाणे नियमास मंजुरी मागण्याचे ठरले होते.

जन्म-मृत्यूच्या कामाकडे स्वतंत्र नेमणूक करावी; श्री. पंढरीनाथ तुकाराम जाधव यास दरमहा रु. ४ वर नेमावे असा ठराव ता. २४-७-१८९६ ला झाला. ही व्यवस्था आजतागायत चालू आहे.

देवी काढण्याचे ( स्मॉल पॉक्स व्हॅक्सिनेशनचे ) काम नगरपालिकेने, आपल्या जन्मापासून सुरू केले. देवी काढण्यासाठी एक इसम डॉक्टरकडून कामाची माहिती घेऊन दरमहा रु. १२ वर ठेवावा. त्यास जरूर ते सामान द्यावे. असा ठराव ता. १७-११-१८६६ ला झाला.

नंतर असे आढळून आले की, देवी काढण्यास व्हॅक्सिनेटर नेमला आहे. त्यास गावातील देवीचे काम अपुरे आहे. सबब चार कोसपर्यंत जी खेडी असतील, त्या गावी जाऊन देवी काढण्याचे काम त्याने करावे म्हणजे बारमाही काम चालून सरकारा-सही फायदा आहे. याजबद्दल देवीचे सुपरिंटेंडेंट यांज-कडे लिहून जाऊन, त्यांचेकडून जसे लिहून येईल, त्याप्रमाणे तजवीज करावी. अशा आशयाचा ठराव ता. २२-७-१८६७ ला केला.

याच प्रकरणी, नंतरचा एक निर्णय असा की, काढाविलेली देवीची नोंद हल्ली गाव कामगाराकडे आहे ती नगरपालिकेने ठेवावी म्हणून आलेल्या प्रक-रणाचा विचार करता, तूर्त आहे तीच तजवीज चालू ठेवावी. ( ता. ६-४-१८८८ )

इ. स. १८७४ पर्यंत नगरपालिकेने देवी काढण्याचा सर्व खर्च स्वतः केला. पुढे इ. स. १८९० पर्यंत काहीच खर्च करावा लागला नाही. त्यानंतर कामाचे प्रमाणांत खर्च द्यावा लागतो. नंतर लोकसंख्येच्या प्रमाणावर खर्च ठरविला गेला, तसेच लशीची किंमतही ठरविली गेली. देवी काढण्याचे काम आता जिल्हा-परिषदेच्या आरोग्य खात्यामार्फत केले जाते, साधारण-पणे वर्षाला रु. ४७५ पर्यंत या कामी खर्च होतो.

## भेसळप्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी

शहराचे आरोग्य सुधारण्याचे दृष्टीने आणखी [illegible] पाऊल म्हणजे भेसळप्रतिबंधक कायद्याची अंम[illegible] बजावणी होय. बारामती शहरास हा काय[illegible] ता. १एप्रिल १९६५ पासून लागू करण्यात आला.

नगरपालिकेचे सॅनिटरी इन्स्पेक्टर श्री. एम. [illegible] कऱ्हे यांनाच या कायद्यान्वये 'फूड इन्स्पेक्टर' व [illegible] सेनसिंग ॲथॉरिटी ' नेमण्यात आले आहे. गावा[illegible] दुकानातून जे खाद्य पदार्थ विकले जातात ते तपास[illegible] जरूर ती कारवाई करण्याची यांच्याकडे आहे. [illegible] पदार्थ विक्रीस ठेवण्याचा परवाना देताना काही [illegible] अशा अटी घातल्या जातात. अशा दुहेरी मार्गा[illegible] या कायद्याचे उद्दिष्ट तडीस नेण्याचा प्रयत्न होतो.

इ. स. १९६५-६६ या अवधीत खाद्य पदा[illegible] ८७ नमुने घेऊन ते तपासणीसाठी राज्य सरकार[illegible] केमिकल ॲनलायझरकडे पाठविले.

पैकी ३९ नमुने दूषित असल्याचा अहवाल आ[illegible] इ. स. १९६६-६७ ह्या चालू वर्षी डिसेंबर[illegible] ८३ नमुने घेऊन ते तपासणीसाठी पाठविले. [illegible] २९ नमुने दूषित असल्याचा अहवाल आला आहे.

पाठविलेला नमुना दूषित आहे असा अभि[illegible] आला म्हणून ज्या दुकानातून तो नमुना घेतला [illegible] त्या दुकानदारावर खटला भरावयाचा असतो. न[illegible] कायद्यातील तरतुदीप्रमाणे, असे खटले भरण्या[illegible] माननीय जनरल बोर्डाची मंजुरी अगोदर घ्या[illegible] लागते. या कार्यपद्धतीप्रमाणे संबंधित सर्व प्रक[illegible] मंजुरीसाठी जनरल बोर्डाकडे गेलेली आहेत.

ह्या कायद्याची अंमलबजावणी करण्याला गा[illegible] पुष्कळ वाव आहे. त्याचबरोबर नवीन कायद्या[illegible] तरतुदीमुळे विलंब लागतो, असा आतापर्यं[illegible] अनुभव आहे.

## साफसफाईचे प्रश्न

शहरातील रस्ते झाडून, त्यातील कचरा [illegible] नेणे, बखळी आणि इतर मोकळ्या जागा [illegible]



ठेवणे, सार्वजनिक शौचकूप बांधणे व ते स्वच्छ राखणे आणि रस्त्यावर पाणी शिंपडणे या कामाचा समावेश सर्वसाधारणपणे शहरची सफाई ह्या सदरात होतो. किंबहुना नगरपालिकांची स्थापनाच या कामा-साठी होती, असे म्हणणे वावगे होणार नाही. आजही या कामावरून नगरपालिकेच्या कार्यक्षमतेची कसोटी लावण्याचा प्रयत्न होतो. यावरून त्या कामाचे अनन्य-साधारण स्वरूप लक्षात येईल.

सहाजिकच बारामती नगरपालिकेची स्थापना झाल्यावेळेपासून यातली कामे हाती घेण्यात आली. पहिल्या वर्षी काही कामे अशी केली:—

जळोची वेशीचे बाहेरील जागेत गाड्या वगैरे येण्यास फार अडचण होते. त्या ठिकाणी मोठाले खळगे पडले आहेत. ती जागा मुरूम टाकून साफ करून घ्यावी. सदरचे काम रु. ०-१२-६ खर्च झाला आहे. त्यास मंजुरी आहे. ( ता. २२-७-१८६५ )

शहरात चारी रस्त्यांनी सडका, गटार न होता साध्या मुरुमाची व मातीची भर घालून तयार झाल्या आहेत. त्याचे दोन्ही बाजूस पाणी जाण्यास गटारे नाहीत. सबब तोडी व पाटथर घालून गटारे बांध-ण्याची तजवीज करावी. गटारे करण्यास रु. २००।-स मंजुरी दिली आहे. मॅनेजिंग कमिटीने काम करवून घ्यावे.

प्रथम केवळ केरकचऱ्याच्या सफाईवर लक्ष असे. मैल्याची व्यवस्था पुढे लवकरच सुरू झाली.

आरंभी गावचे रस्ते झाडण्याचे काम सुद्धा महार लोक करीत नसत. त्यासाठी हलालखोर म्हणून एक जात मुसलमानी अमलात निर्माण झाली होती. त्या जातीच्या लोकांची या कामावर योजना होती. कालांतराने महार रस्त्याच्या सफाईचे काम करू लागले आणि सांडपाण्याचे व मैल्याचे काम अनुक्रमे हलालखोर, तसेच भंगी यांच्याकडून करून घेण्यात आले.

मैल्याचे काम करणारे भंगी येथे राहाणारे नव्हते, ते बाहेरून आणले याबाबत ता. १४-७-१८७९ चा ठराव असा की, राम दयाल सोना भंगी यास कमेटीने मैला कामाकरिता पुण्याहून आणला असून त्याला येथे भाड्याने वगैरे घर कोणी देत नाही. तो हल्ली मुडदा फाडण्याचे खोलीत रहात आहे. सबब त्यास कमेटीकडील नं. १४५ यात गवती छप्पर बांधून देऊन तेथे त्याची सोय करावी. रु. १० पर्यंत खर्च करावा.

पुण्याहून आलेल्या ह्या भंगी कुटुंबाची नगरपालिकेने अशी व्यवस्था केली, ती केवळ मानवतेने व भूत-दयेने प्रेरित होऊन केली, असे म्हणता येत नाही. नागरी जीवनाची ती एक गरज होती. त्यासाठी जरूर तो खर्च केला इतकेच. तथापि अत्यंत समा-धानाची इतकेच नव्हे तर अभिमानाची गोष्ट अशी की महार, भंगी, मांग इत्यादि अंत्यज म्हणून मानल्या गेलेल्या पददलित समाजाकडे पहाण्याचा दृष्टिकोन जसजसा बदलला, सुधारला, त्या त्या प्रमाणात बारामती नगरपालिकेने त्या कल्पनांचा पुरस्कार केलेला आढळून येतो. इतकेच नव्हे तर राज्य सरकारने आरंभिलेल्या हरिजनोद्धाराच्या कामात बारामतीची नगरपालिका ही अग्रेसर आहे असे निश्चितीने म्हणता येते.

मानवतेची दृष्टि थोड्या फार प्रमाणात होती. म्हणूनच इ. स. १८९७ मध्ये महार लोकांचे घरा-वरील घरपट्टी माफ करण्याचा ठराव केला होता.

याहीपेक्षा आणखी एक अभिमानाची गोष्ट अशी की, जे एक कुटुंब प्रथम बारामतीला मैला सफाईच्या कामासाठी आले त्याचे काही वंशज 'भंगी काम-मुक्ति ' पावले आहेत. आणि एक तर ह्याच नगर-पालिकेत क्लार्क म्हणून काम करीत आहे. ह्या घटनेचे सविस्तर वर्णन अन्यत्र दिले आहे, असे नमूद करून हाती घेतलेल्या विषयाचे विवेचन पुढे न्यावयाचे आहे.

पहिल्यां १५-२० वर्षांत सार्वजनिक स्वरूपाच्या शौचकूपाची व्यवस्था नव्हती आणि खाजगी शौच-कूपाचे काम नगरपालिकेकडे मुळीच नव्हते. उत्पन्न स्थिर झाल्यावर क्रमाक्रमाने एकएका भागात सार्व-जनिक शौचकूप बांधण्यात आले. ते बहुधा भर-वस्तीत नसून गाव-कुसाच्या बाहेर आहेत. पुरुष व स्त्रिया यासाठी निरनिराळी व्यवस्था करण्यावर प्रथम-पासून नजर आहे.

ह्या कामाची वाढ सहाजिकच मंदगतीने झाली. कारण ता. ३०-११-१८७८ ला असा ठराव केला होता की, पायखाने बांधण्याकरिता १८७८-७९ सालात रु. ४५० ची तरतूद आहे. पण ते बांधले तर पुरेसे भंग्याचे अभावी फार घाण होईल. सबब चर खणून त्याभोवताली शेर-ताटीचा अडोसा करावा असे सर्वांच्या मते ठरले.

इतके सावधगिरीने काम केले तरी प्रश्न सुटत नव्हतेच. कारण, चरात मैल्यावर माती टाकणे व इतर काम तीन भंग्याकडून होत नाही, सबब आणखी दोन भंगी दरमहास रु. ५ पगारावर नेमावेत (ता. ९-४-१८८१) असा निर्णय घ्यावा लागला.

या प्रश्नावर माननीय सभासदांचे पूर्ण लक्ष होते. म्हणूनच इ. स. १८९२ मध्ये यासाठी रु. १५०० मंजूर करताना सूचना दिली की, 'शेतखाने तूर्त २०,२० असे दोन ठिकाणी बांधावेत. १० पुरुषांकरिता व १० बायकांकरिता. याबाबत पुढे असे स्पष्टीकरण केले की, सार्वजनिक सर्व शौचकूप बांधणेबाबतचे विचार करता, एकदा सर्व शौचकूप करणे-पूर्वी प्रथम तांदुळवाडी वेशीबाहेर मुंजाबाचे मैदानात व बुरडाचे घराचे पूर्वेच्या जागेत ज्या जागा डेप्युटी सॅनिटरी कमिशनरसाहेबांनी पसंत केल्या आहेत त्या जागेत बांधून स्वच्छता वगैरे कशी रहाते याचा अनुभव पाहून नंतर जास्त शौचकूप बांधण्याचा विचार करावा.

आज जेथे सार्वजनिक शौचकूप आहेत, तेथे ते कसे बांधले गेले हे यावरून समजून येईल. इ. स. १९०४ पर्यंत सार्वजनिक शेतखान्यांची संख्या १०० झाली. मैला डोक्यावरून वाहून नेणे, नोकराकडून होणार नाही. म्हणून ता. १ मे १९०४ पासून मैल्याची बैलगाडी सुरू केली.

पुण्याहून आलेल्या भंगी कुटुंबाची एक पिढी येथे वाढली. तेव्हा मन्नु जुम्मन भंगी याने अर्ज केला की, बारामती येथील सर्व्हे नंबर २६८ पैकी एकर ४ गुंठे २७ आकार रु. १ आणे २ ही जमीन वीस रुपयास खरेदी घेतली आहे. त्यात कमेटीचे प्लेगचे हॉस्पिटल आहे. त्यामुळे माझे नुकसान होते. पाच वर्षे सारा भरीत आहे. त्याबद्दल नुकसान द्यावे अगर २५ रुपयास जमीन खरेदी घ्यावी. देण्यास कबूल आहे. त्यावर ठराव केला की, साथीकडील रकमे कढून रु. २५ देऊन सेक्रेटरींनी जमीन विक[illegible] घेण्याची तजवीज करावी.

गावातील खाजगी संडास साफ करण्याचे नगर-पालिकेने इ. स. १९१२ मध्ये ठरविले. त्यासाठी जवळ जवळ २० भंगी नवे नेमावे लागले. शताब्दीच्या वर्षी गावात सार्वजनिक शौचकूपाच्या बैठकी १४[illegible] आहेत व खाजगी ४९९ आहेत.

शंभर वर्षांच्या कारकीर्दीत सफाई खात्यातील कर्मचाऱ्याचे अधिकाऱ्याशी संबंध समाधानकारक राहिले असे म्हणता येते. याला अपवाद झाला तो इ. स. १९२२ मध्ये भंग्यांनी संप केला तेव्हाचा त्या वर्षीच्या अहवालात असा उल्लेख मिळतो की, भंगी लोकाकडून शिस्तीने व समाधानकारक काम करून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा भंग्यांनी संप केला. त्यांनी काही केल्या ऐकले नाही. तेव्हा बाहेरचे भंगी आणवून काम सुरू करावे लागले.

हे काम अर्थातच काही सवलती देऊन करावे लागले, बाहेरून आणलेल्यांना थोडा जादा पगार दिला होता. आणखी असे की, नवीन भंग्यांना सर्व्हे नंबर ३ मध्ये झोपड्या बांधण्यासाठी मदत दिली प्रत्येकाला रु. ४० दिले होते.

सफाई कामाची प्रथमपासून वाढ कशी झाली हे समजण्यासाठी इतका विस्तार केला. शंभर वर्षा[illegible] अखेरीस नगरपालिकेत हा नोकर वर्ग ९० आहे. त्या[illegible] मैला सफाई करणारे ४५ व रस्ता सफाई करणारे ४[illegible] आहेत. सफाई खात्यातल्या कामगारांना दुबक्त का[illegible] करावे लागते. मात्र मैला सफाईच्या कामगारांना [illegible] समितीच्या शिफारशीप्रमाणे सकाळी फक्त ५ ता[illegible] काम देता येते. या खात्याच्या कामगारांना किमान वेतन कायदा इ. स. १९५७ पासून लागू करण्यात आला आहे.

याच समितीच्या शिफारशीला अनुसरून, डोक्या-वरून मैला वाहणे इ. स. १९५९ पासून पूर्णपणे बंद झाले आहे. 'मानवाने मानवाचा मैला वाहणे नको' हे तत्त्व मान्य झाले. आता हातगाड्याने ते काम होते. गम् बुट्स व रबरी हातमोजे भंगी कामगारास दिले आहेत.



गावातला कचरा वाहून नेण्यासाठी प्रथम गाढवे अगर बैलगाड्या यांचाच वापर केला जाई. हे काम काही काळपर्यंत मक्त्याने दिले जाई. परंतु ते समाधान-कारक नाही असे दिसताच स्वतःच्या बैलगाड्या ठेवून हे काम सुरू झाले. इ. स. १९३३ मध्ये कचऱ्याची वहातुक अंशतः मोटारने सुरू झाली. आता सर्व वहा-तुक यंत्राच्या सहाय्याने होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी पेट्रोल टंचाईमुळे मोटार बंद ठेवून बैलगाड्या पुनः सुरू करणे भाग पडले होते. आता असा प्रसंग आला तर सोईचे व्हावे म्हणून डिझेलवर चालणारे ट्रॅक्टर अशा कामासाठी घेतले आहेत. कचऱ्याची मोटार प्रथम आली तेव्हा तिच्या-साठी ड्रायव्हर मिळेना. तेव्हा श्री. बाबु जयराम तेली हा ऑइल इंजिनवर होता. त्याला त्या कामाकडे घेतले. तोच अनुभव मैला वहातुकीच्या मोटारीच्या वेळी आला. तेव्हा झाडूवाल्या कामगारापैकी मातंग समाजातील किसन विठ्ठल कांबळे याला ड्रायव्हर म्हणून मुद्दाम तयार केला.

गावातील कचरा व मैला दूर नेऊन साठ-विण्याकडे नगरपालिकेने प्रारंभापासून लक्ष दिले आहे. मैला डेपोसाठी सर्व्हे नंबर ५० मधील २० एकर ३२ गुंठे जमीन रु. २८७-८-० ला सरकारकडून मिळविली. (इ. स. १९१५) कचरा एकीकडे स. नं. २ मध्ये व मैला एकीकडे टाकण्याची प्रथा होती. मैल्याचे खत विकले जाई. सोनखत करण्याच्या व्यवस्थेबाबत इ. स. १८९६-९७ मध्ये असा उल्लेख आढळतो की, एकंदर ८ भंगी आहेत. गांवाचे बाहेर उत्तरेस व दक्षिणेस शेतात खड्डे केले आहेत. त्यात मैला टाकला जातो. दरवर्षी सदर सोनखत लिलावाने विकले जाते. यासाठी यावर रु. ७१९-९-३ इतका खर्च झाला आहे. आता इ. स. १९४४ पासून कंपोस्ट संमिश्र खत बनविण्यात येते. जळोची-

८

जवळील मैदानात हे काम केले जाते. येथे यापूर्वी गोल खड्डे करून त्यात मैला टाकला जात असे. मैला व कचरा यांचे संमिश्र खत केल्यामुळे नगर-पालिकेला वाढत्या प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. इ. स. १९५० मध्ये त्याचे उत्पन्न सुमारे रु. ५ हजार होते. ते आता जवळ जवळ रु. १०,९८६ झाले आहे.

संमिश्र खताच्या निर्मितीसाठीं २५'×६'×३' फूट या मापाचे १३० आणि २५'×७'×४' या मापाचे ६३ खड्डे तयार केले आहेत. सॅनिटरी इन्स्पेक्टर श्री. मारुती शंकर कऱ्हे यांची या कामावर खास देखरेख आहे. महाराष्ट्र सरकारने संमिश्र खत-निर्मिती शिक्षण वर्ग सुरू केला. त्या वर्गात जाऊन श्री. कऱ्हे यांनी हे शिक्षण घेतले आहे. म्हणजे अगदी शास्त्रोक्त पद्धतीने बारामतीत संमिश्र खत (कंपोस्ट) तयार होत आहे, असे म्हणावयाला हरकत नाही. आणि 'हातच्या काकणाला आरसा नको' या न्यायाने, ही गोष्ट नुकतीच प्रत्ययास आली. इ. स. १९६६-६७ सालात राज्य सरकारने संमिश्र खतनिर्मितीची चढाओढ योजिली; तीत बारामती नगरपालिकेने भाग घेतला होता. ह्या स्पर्धेत बारामती नगरपालिकेच्या संमिश्र खत-निर्मितीचा पहिला नंबर लागला आणि त्यासाठी ठेवलेली फिरती ढाल बारामतीने मिळविली आहे.

गावातील शौचकूपांच्या बैठकींची संख्या ६३९ आहे. ती पहाता २१-२२ हजारांच्या लोकवस्तीच्या ह्या गावाला त्या पुरेशा आहेत असे अर्थातच मानता येत नाही. लहान मुलांचा विधी घरातील अंगणात-अगर रस्त्यावरील गटारात होतो. ही सवय नगर-पालिकेच्या आयुष्याइतकीच जुनी आहे. बऱ्याच गोष्टी बदलल्या, पण ही प्रथा बदललेली नाही. काही मोठी माणसे सोइस्कर रीतीने या पद्धतीचा आश्रय घेतात किंवा भोंवतालच्या मैदानात जातात, हे निर्विवाद आहे. घरे अगोदरच आकुंचित आणि त्यातला काही भाग शौचकूपाकडे वापरणे लोकांना जड वाटते. शिवाय पैसा खर्च करून म्हणजे कर

भरून ही व्यवस्था घरच्या घरी करून घेण्याचे अजून पुष्कळांना पटत नाही. नगराच्या स्वच्छतेची जबाबदारी सेवकाबरोबर नागरिकांची आहे. ही बाब दृष्टिआड करून चालणार नाही.

नगरपालिकेची ' सिल्व्हर ज्युबिली ' साजरी झाली तेव्हा जी परिस्थिती होती, तीत काही बदल झालेला नाही. जुन्या दाट वस्तीतल्या घरांना शौचकूपाची सोय करणे, मोकळ्या जागेच्या अभावी अशक्य आहे, पण मोकळ्या जागेतील नव्या घराचे आराखडे (प्लॅन) मंजूर करताना शौचकूपाची सोय असलीच पाहिजे, असा कटाक्ष नसतो. अर्थात् अशा रीतीने घरे बांधणारे बरेच मालक शौचकूपाची इतकेच नव्हे तर फ्लशिंगची सोय करताना आढळतात, हे नमूद करणे अवश्य आहे. घरबांधणी व शौचकूपाची सोय ह्या गोष्टी कायदेकानूप्रमाणे करण्याचे वेळोवेळी बोलले जाते, पण याबाबत कडक धोरण स्वीकारण्याच्या बाबतीत लोकशाही यंत्रणा यशस्वी झालेली नाही.

नगरपालिका स्थापन झाल्यावेळेपासून ५०–७५ वर्षे गावाभोंवताली निवडुंगाचे रान होते. ते नाहीसे करण्याला नगरपालिकेने वेळोवेळी शेकडो रुपये खर्च केले. एक सोय झाली की, दुसरी गैरसोय होते. निवडुंगाचा प्रातर्विधि करिता अडोशासारखा उपयोग करता येत असे. निवडुंग कापला गेल्यामुळे लोक उघडे पडले व सार्वजनिक शेतखाने बांधण्याला चालना मिळाली. दुसरी गोष्ट अशी, निवडुंग असलेली जागा प्रथम सरकारची होती. ती साफ केली म्हणजे नगरपालिकेला मिळेल, अशी प्रथमपासून समजूत करून दिली गेली होती. बऱ्याच वर्षांनी सरकारचे ' महसूल खाते ' ही गोष्ट सोइस्करपणे विसरले, आणि त्या जागेच्या मालकीबद्दल बरेच दिवस घोळ पडला होता.

रस्त्यावर पाणी शिंपडणे, हे नगरपालिके कर्तव्य मानले जाते. त्यायोगे थोडा गारवा हे एक आणि वाहन येता जाताना धूळ उडून लोकांच्या प्रकृतीस बिघाड होतो. तो टाळता दुसरे. रस्ते खडी–मुरुमाचे असतील तोपर्यंत ह करावी लागेलच. नगरपालिकेने प्रथम या विचार इ. स. १८७६ मध्ये सुरू केला. तेव्हा ठरविले की, पेठ मजकुरी उष्णकाळ अतिशय रस्त्यांनी पाणी शिंपडले तर त्यापासून रयतेस आहे. पाण्याची गाडी आणण्याबद्दल रुपये १ तरतूद आहे. व ती घेण्याबद्दल प्रकरण मंजुरी आहे. ते मंजूर होऊन येईपर्यंत उष्णकाळ जाईल. साठी, तूर्त एक महिना सुमारे १ १८७६ पर्यंत उभ्या चारी रस्त्यांनी पखालीने शिंपडावे व त्या कामी रु. ५० खर्च करावेत.

इ. स. १८७९ मधील आणखी एक उल्लेख हल्ली उष्णकाळ फार असल्यामुळे बाजाराच्या लोक पाण्यावाचून फार हैराण होतात. बाजाराच्या दिवशी तीन गडी ठेवून लोकास पाणी देण्याची तजवीज ठेवावी. ती म्हणजे :— १. म्युनिसिपल ऑफिसात बाजारांत व ३. दाण्याचे बाजारात, सहा खरेदी करून त्यास खर्च अदमासे रु. ३ पर्यंत पाणी देण्याची तजवीज करावी.

वर म्हटल्याप्रमाणे बैलगाड्यांनी पाणी शिं काम कित्येक वर्षे झाले. इ. स. १९५० पाण्याची मोटार आली. आग विझविण्या मोटारीचा उपयोग केला जातो.

सन १९५२–५३ पासून गावातील मैला मोटारने वा ट्रॅक्टरने गावाबाहेर जात आहे.

# शहरातील दोन दवाखान्यांची वाटचाल

बारामती नगरपालिकेच्या विद्यमाने चालविल्या जाणाऱ्या ' सिल्व्हर ज्युबिली ' हॉस्पिटलचा प्रारंभ इ. स. १८७३ मध्ये अल्प प्रमाणात झाला.

इ. स. १८६९–७० च्या दप्तरावरून असे दिसते की, त्या वर्षी दवाखान्याच्या खर्चासाठी रु. १०६–८–० ची तरतूद झाली होती. असा ठराव केला होता की, अद्याप दवाखाना झाला नाही. तो होणे जरूर आहे. तरी त्याची तजवीज करावी. त्याप्रमाणे तजवीज केली तर निम्मी रक्कम सरकारातून व लोकल फंडातून मिळावी.

ही इच्छा पुढे दोन वर्षांनी पूर्ण झाली. सरकारने काही शस्त्रास्त्रे दिली. बाकीची सामान–सुमानाची व्यवस्था नगरपालिकेने केली. डॉक्टर व त्यांचे हाताखालील नोकर यांचा पगारही प्रथम कित्येक वर्षे नगरपालिकेला आपल्या पैशातूनच करावा लागला.

इ. स. १८८४ मध्ये सरकारने शिक्षण व वैद्यक हे विषय नगरपालिकेकडे सोपविण्याचे ठरविले. प्रत्येक तालुक्याचे गावात एक तरी दवाखाना असावा, अशी योजना ठरली होती. जेथे नगरपालिका स्थापन झाली होती, तेथे ते काम नगरपालिकेकडे आले. जेथे नगरपालिका नव्हती तेथे ते काम जिल्हा लोकल बोर्डाकडे सुपूर्त केले गेले. दवाखान्याची पहाणी व तपासणी व त्यांचा सरकारशी संबंध इत्यादि बाबीविषयी नियम ठरले आणि सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सहकारित्वाने वैद्यकीय खाते चालू झाले.

बारामतीच्या दवाखान्यासाठी प्रारंभी सध्याच्या सिद्धेश्वर आळीतील श्री. दामुअण्णा दाते यांची इमारत भाड्याने घेतली होती. तेथेच बहुधा पहिले प्रेतगृह ( मार्च्युअरी म्हणजे मुडदा ठेवण्याची खोली ) बांधले होते. त्याबाबत ता. १२–१०–१८७४ ला एक असा ठराव झाल्याचे आढळले की, डिस्पेन्सरीजवळ हल्ली मुडदा ठेवण्याची खोली कमेटीने बांधली असून मुडदा आला म्हणजे आसपास राहाणारास व जाणारे येणारे लोकांस तिजपासून फार त्रास उत्पन्न होतो. म्हणून सर्व रयतेचा अर्ज आलेला कमेटीपुढे ठेवता, सदरहू बांधलेली खोली काढून तोच मालमसाला नेऊन गुणवडी वेशीबाहेर धर्मशाळेच्या पश्चिम अंगास बिनहरकतीच्या ठिकाणी बांधण्याची चेअरमन यांनी तजवीज ठेवावी, म्हणून ठरले असे.

पुढच्याच वर्षी दवाखान्यासाठी सरकारी मदत रु. ५०० व लोकल फंडातून रु. १०८ मिळाली. असे अंदाजपत्रकावरून आढळते. इ. स. १८८२ मध्ये कंपाउंडर नेमण्याचा प्रश्न उपस्थित झाला असावा. एक मेडिकल इसम नेमावा, म्हणजे डॉक्टरचे कामाची हरकत होणार नाही, असे ठरविण्यात आले. त्या काळी कंपाउंडर होण्यास विशेष परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागत नसे. इंग्रजी लिहिता वाचता येणे व औषधांची नावे माहीत होणे इतकेच ज्ञान पुरत असे. श्री. पंढरीनाथ बापूजी पराडकर यास कंपाउंडर म्हणून ता. १–४–१८८४ पासून नेमले होते. हे गृहस्थ कंपाउंडर म्हणून दरमहा रु. ७ असा मिळणारा पगार कमी म्हणून, पाटबंधारे खात्यात जास्त पगार मिळतो म्हणून, कारकून म्हणून काही दिवस गेले होते. मग ते पुनः दवाखान्यात आले.

दवाखान्यात पलंग देण्याचा विचारही नगरपालिकेत तेव्हा झाला. निर्णय असा घेतला होता की, ' मेहेरबान कलेक्टरसाहेब यांचे तपासणी शेऱ्याप्रमाणे दवाखान्यासाठी दोन पलंग देण्याबाबत १५ रुपयांपर्यंत मिळतील तर द्यावेत, आधिक पडल्यास तूर्त एकच द्यावा. '

पुण्याच्या सिव्हिल सर्जननी ह्या दवाखान्याची वार्षिक तपासणी करावयाची असते. ता. ७ डिसेंबर १९०० ला अशी तपासणी झाली त्या वेळच्या अहवालावरून काही गोष्टी समजून येतात. दवाखाना नीटनेटका आहे, असे मत व्यक्त करून पुढे म्हटले

की, ' दवाखाना समितीने दवाखान्याला वर्षात भेट दिलेली नाही. '

या भागात नेहमी आढळणारे रोग म्हणून असे नमूद केले की, मलेरिया, डोळ्याचे रोग, अपचनाचे विकार, जंत, त्वचारोग. ह्या भागात मलेरिया आढळण्याचे एक कारण असे देण्यात आले की, गावानजिक पाटाचे पाणी वहात आहे. व ऊस मोठ्या प्रमाणात होतो, हे मलेरिया होण्याचे कारण असावे. इतर रोग होण्याची कारणे म्हणजे अस्वच्छता, चांगले न शिजविलेले अन्न, लोकांच्या सवयी इत्यादि. गावापासून एक मैलपर्यंत ऊस लावू दिला नाही व स्वच्छता सुधारली तर रोगराई कमी होऊ शकेल.

या वेळी गावाची लोकसंख्या ८१४१ होती. दवाखान्यात सरासरीने रोज ९०.७ रुग्ण औषधोपचारासाठी आउट डोअर येतात व २.९ रुग्ण इन्डोअर असतात.

इ. स. १८९० मध्ये दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधण्याचा प्रश्न उपस्थित झाला, परंतु बहुधा पैशाच्या अभावी ' तूर्त सदर काम तहकूब करण्यात आले. त्याचवेळी ' प्रेतगृहाची खोली ' पडली होती. ती गावाचे दक्षिण बाजूस जनावराचे भाडे घेण्याचे नाके आहे त्याचे शेजारी सदर खोली बांधून जरूर ते सामान घेणे; खर्चास रु. ३० मंजूर; नवीन टेबल घ्यावे ' असे ठरले. प्रेतगृहाचा प्रश्न आजपर्यंत इ. स. १९६७ पर्यंत अनिर्णित आहे म्हणून ह्या बारीकसारीक गोष्टींचा उल्लेख करणे अवश्य वाटते.

आणखी पाच वर्षांनी तपकीरे धर्मशाळेचे (सध्याच्या मार्केट यार्डजवळचे) दवाखान्याचे इमारतीत रूपांतर होत असल्यास नगरपालिका रु. ३००० खर्च करण्यास तयार आहे. मात्र डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानेहि मदत द्यावी असे ठरविण्यात आले. (ता. ३१।१०।१८९५)

दवाखान्याचा वैद्यकीय अधिकारी सरकारचा असे. त्याच्या दर्जाप्रमाणे त्याचे वेतन नगरपालिकेला द्यावे लागे. श्री. विठ्ठल बळवंत पाठक हे फर्स्ट क्लास असिस्टंट म्हणून येथे आले. तेव्हा त्यांच्या पगाराप्रीत्यर्थ दरवर्षी रु. ५३५ द्यावे लागत. म्हणजे अगोदरच्या खर्चापेक्षा ही रक्कम रु. २[illegible] जास्त होती. म्हणून ' फर्स्ट क्लास असिस्टंट [illegible] बदली व्हावी व त्याचे जागी सेकंड क्लास [illegible] डॉक्टर नेमावा ' अशी मागणी करण्यात [illegible] (ता. १८।५।१८९६)

दवाखान्याचे जे डॉक्टर असत, ते नगरपालि[illegible] सभासद (म्हणजे कमिशनर) मानले जात. [illegible] फाटक हे आले असता त्यांना त्यांच्या कामा[illegible] ' हेल्थ ऑफिसर ' नेमण्याचा प्रश्न आला. [illegible] ह्या जागी त्यांची नेमणूक झाली तर त्यांनी [illegible] सदस्याचा राजीनामा द्यावा व हेल्थ ऑफिसर [illegible] त्यांना दरमहा रु. १० भत्ता द्यावा असे ठर[illegible] आले. (ता. २७।७।१८९८)

गाडी–तळासाठी जी जागा वापरली जा[illegible] तेथे दवाखान्याची नवीन इमारत बांधण्यात [illegible] कै. रा. बाळाजी मार्तंड कैंजळे यांनी या का[illegible] रु. १०,००० देणगी दिल्यामुळे हे शक्य [illegible] तेव्हा ते नगरपालिकेचे एक सभासद होते. [illegible] दवाखान्याला ' रावबहादूर बाळाजी मार्तंड [illegible] असे नाव देण्याचा सरकारी ठराव आहे. त्या[illegible] संगमरवरी दगड घेऊन त्यावर वरीलप्रमाणे [illegible] घालावे व दगड बसविण्याचा निर्णय घेण्यात [illegible] (ता. २६।७।१९००) हल्ली ह्या इमारतीत [illegible] नगरपालिकेचे सार्वजनिक वाचनालय आहे. [illegible]

दवाखान्याची ही इमारत व नोकर वर्ग [illegible] साठी जागा यासाठी नगरपालिकेने वरील रक्कम [illegible] घातली होती. गावातील लोकाकडून रु. [illegible] मिळाले होते. या नव्या योजनेमुळे दवा[illegible] राहून औषधोपचार घेण्याची सोय झाली. [illegible]

बारामतीची जसजशी वाढ होत गेली, [illegible] या व्यवस्थेतील उणीवा कळून आल्या. जुजबी [illegible] व्यतिरिक्त नगरपालिका विशेष काही करू [illegible] नाही. शस्त्रक्रिया व प्रसूतीसंबंधी सोय [illegible] जरुरी विशेष प्रत्ययास येत होती. (१[illegible] कामासाठी एक नर्स नेमण्यात आली. [illegible] पण तेवढ्याने प्रश्न सुटला नाही. लेफ्टनंट [illegible] कॅंडी यांनी तेव्हा सिव्हिल सर्जन या नात्याने [illegible] १९३५ मध्ये दवाखान्याची पहाणी करून [illegible]



व्यक्त केला की, हल्लीचा दवाखाना डिस्पेन्सरी स्वरूपाचा आहे. त्याची वाढ करून, त्याला लहानशा हॉस्पिटलचे स्वरूप आणण्याची वेळ आली आहे. हल्लीच्या इमारती भर रस्त्यावर असल्यामुळे तेथे धुळीचा फार उपद्रव होतो. सबब लोकांच्या सहाय्याने काही नवी व्यवस्था करणे शक्य आहे की कसे ते पहावे.

याच सुमाराला माजी बादशहा पंचम जॉर्ज यांच्या कारकीर्दीचा रौप्य–महोत्सव साजरा करण्याचा विचार करण्यासाठी बारामतीच्या नागरिकांची सभा भरली होती. दवाखान्यासाठी एक निधि उभारावा व त्यात नगरपालिकेने जरूर ती भर घालून सूतिकागृह व शस्त्रक्रिया यासाठी दवाखाना बांधावा. नगरपालिकेने ही गोष्ट मान्य केली. वर्गणीच्या रूपाने रु. १३,००० जमले. त्यामध्ये नगरपालिकेने रु. ११,००० ची भर घालून रु. २०,००० ची इमारत बांधली. रेडक्रॉस फंड सोसायटीने सूतिकागृहाच्या उपयोगी असे सुमारे रु. ५०० चे सामान दिले, पुण्याच्या टर्फ क्लबकडून हत्यारे घेण्यासाठी रु. २००० मंजूर झाले; आणि ' बादशहांचा मध्यवर्ती ज्युबिली फंड ' जमला होता, त्यामधून नर्सेसना रहाण्याकरिता जागा बांधण्यासाठी रु. ५००० मंजूर झाले. डॉक्टर व इतर नोकरवर्ग रहाण्याच्या इमारतीसाठी नगरपालिकेने नंतर बराच खर्च केला. अशा रीतीने तयार झालेल्या ह्या दवाखान्याच्या इमारतीचे उद्घाटन त्या वेळचे सर्जन जनरल मेजर आर. एच्. कॅंडी यांचे हस्ते ता. २६ ऑक्टोबर १९३५ ला झाले.

श्री. नारायण मनोहर दाते हे तेव्हा नगराध्यक्ष होते. इरिगेशन इंजीनियर श्री. एच्. व्ही. कटककर यांनी इमारतीची आखणी केली होती व श्री. शिवराम रावसाहेब खत्री हे बांधकामाचे कंत्राटदार होते.

दवाखान्याचा असा कायाकल्प होईपर्यंत एकूण खर्च सुमारे रु. ५००० होता. त्यात पगारासाठी सरकारची मदत रु. १०००, जिल्हा लोकल बोर्डाची मदत रुपये ३०० व फीचे उत्पन्न रु. ३०० इतके असे. म्हणजे नगरपालिकेला आपल्या उत्पन्नातून रु. ३५०० खर्च करावे लागत. मग तो खर्च रु. १००० जास्त झाला.

दवाखान्यासाठी जी सार्वजनिक वर्गणी जमविली तीत पुढील प्रमुख वर्गणी देणारे होते :—

| | |
|---|---|
| सरदार गोविंदराव कृष्णराव काळे | रु. १००० |
| रावसाहेब सोपानराव तुकाराम जाचक | रु. १००० |
| रावसाहेब गणेश गोपाळ शेंबेकर | रु. १००० |
| शेठ रंगिलदास नारायणदास गुजर | रु. १००० |
| श्री. शिवराम नथुराम खत्री | रु. ९०० |
| श्री. नानासाहेब बापूजी जगताप | रु. ५०० |

दवाखान्याच्या इमारतीसाठी सरकारकडून कर्ज मिळण्यास विलंब लागला, तेव्हा उघड बाजारात, रु. १०० चा एक भाग या पद्धतीने रु. १२,००० चे कर्ज उभारले. ह्या कर्जाची फेड योग्य रीतीने झालेली आहे. ज्यांच्याकडून कर्ज घेतले होते त्यांची नावे:—

| | |
|---|---|
| सौ. शांतादेवी दत्तात्रय गुजर | रु. २००० |
| सौ. ललिताबाई हिरालाल देसाई | रु. २००० |
| सौ. ललिताबाई हिरालाल देसाई | रु. १००० |
| श्री. बाळकृष्ण मार्तंड ठोंबरे | रु. ५०० |
| श्री. केशव शंकर वाडेकर | रु. ४००० |
| श्री. रघुनाथ वामन जमदग्नी | रु. ५०० |
| श्री. मुकुंद वासुदेव ब्रह्मे | रु. २००० |

प्रारंभी ह्या नव्या इमारतीत ८ रुग्ण : ४ पुरुष व ४ बाया ठेवण्याची सोय होती. इ. स. १९४१ मध्ये शेठ रामचंद मलुकचंद यांनी आपल्या मुलीच्या स्मरणार्थ एक खोली बांधून दिल्याकारणाने बाळंतिणींची आणखी सोय होऊ शकली.

पुढच्या दहा वर्षांतच ह्या दवाखान्याच्या जोडीला डोळ्यांचा दवाखाना जोडण्याची शक्यता निर्माण झाली. पूर्वी इ. स. १९३२ पासून श्याम टॉकीजचे शेजारचे इमारतीत रूपाबाई लीलाचंद गांधी धर्मार्थ डोळ्यांचा दवाखाना या नावाने उघडला होता. मुंबईचे ख्यातनाम डोळ्यांचे डॉक्टर श्री. डी. एस. सरदेसाई व त्यांचे एक जोडीदार डॉ. डी. एम्. आकुत यांची या दवाखान्यावर देखरेख असे.

गावातील डोळ्याच्या रुग्णांना या दवाखान्याचा लाभ मिळाला. इतकेच नव्हे तर आसपासच्या तीन तालुक्यातील रुग्ण या दवाखान्यात येत असत.

दवाखान्याचा व्याप वाढत चालला व जागा अपुरी म्हणून सदर संस्थेचे ट्रस्टी श्री. गं. लि. गांधी व श्री. स. वा. करंदीकर यांनी नगरपालिकेकडे मागणी केली की, पहिला दवाखाना नवीन जागेत गेल्यामुळे रिकामी झालेली जागा ह्या डोळ्यांचे दवाखान्यासाठी मिळावी. दरमहा नाममात्र रु. १ भाडे घेऊन प्रथम ५ वर्षे मुदतीने ही जागा सदर दवाखान्यास देण्याचे नगरपालिकेने ठरविले. नंतर ही मुदत ३० वर्षांची करण्यात आली. नगरपालिका या डोळ्यांच्या दवाखान्याला दरवर्षी रु. २५० ची मदत देऊ लागली होती.

पुढे काही वर्षांनी सदर दवाखान्याच्या विश्वस्तानी नगरपालिकेला डोळ्यांचा दवाखाना चालविण्यास घेण्याची विनंती केली. नगरपालिकेने ती मान्य केली. इ. स. १९५२ पासून हा दवाखाना नगरपालिकेकडे आला. मुंबईचे प्रसिद्ध नेत्ररोग-चिकित्सक डॉ. व्ही. के. चिटणीस यांचे हस्ते हा समारंभ दि. ४।२।१९५२ ला झाला.

माननीय श्री. मा. तु. शाह हे यावेळी नगरपालिकेचे अध्यक्ष होते. शेठ गंगाराम लीलाचंद गांधी यांनी दवाखान्याच्या उपयोगाची उपकरणी सुमारे २००० रु. ची दिली. तसेच बारामतीचे कृषितज्ज्ञ रावबहादूर श्री. दादासाहेब शेंबेकर यांनी यावेळी रु. १२,००० ची देणगी दिली. ही रक्कम १० वर्षे मुदतीने पुणे सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये ठेवली. तिच्या व्याजाचा विनियोग दवाखान्याचे खर्चाकडे करण्याचे ठरले. डॉ. के. आर. कुंचूर यांना या डोळ्याच्या दवाखान्याचे ऑनररी डॉक्टर म्हणून यावेळी नेमले होते.

सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलला 'सूतिका विभाग' जोडण्याची संधि लौकरच प्राप्त झाली. भारतीय कीर्तीचे कृषितज्ज्ञ बारामतीचे दानशूर नागरिक रावबहादूर श्री. ग. गो. शेंबेकर ऊर्फ दादासाहेब यांच्या दातृत्वामुळे हे शक्य झाले. हॉस्पिटलच्या इमारतीचे पश्चिम बाजूस ७०×४० फूट या जागेत ही इमारत बांधली. त्या इमारतीसाठी सर्व खर्च सुमारे रु. २०,००० दादासाहेबांनी केला. त्यांच्या मातोश्री "सौ. राधाबाई गोपाळ शेंबेकर" असे नाव देण्यात आले.

हा प्रसूति दवाखाना पुणे सेवासदन संस्थेच्या बारामती शाखेने चालवावा, अशी प्रथम कल्पना होती. पहिली चर्चा व वाटाघाटी याच दिशेने झाल्या. पण याच सुमारास पुणे सेवासदन संस्थेची बारामती शाखा बंद झाल्याकारणाने, हा प्रसूति दवाखाना नगरपालिकेकडेच असावा असा निर्णय शेवटी घेण्यात आला.

श्री. दादासाहेब शेंबेकर यांनी नगरपालिकेस स्वखर्चाने बांधून दिलेल्या प्रसूतिगृह इमारतीचा दान समारंभ गुरुवर्य महर्षि भारतरत्न श्री. अण्णासाहेब कर्वे यांच्या हस्ते ता. १४।९।१९५२ ला झाला. श्री. दादासाहेब यांनी स्वतः उपस्थित राहून ती इमारत दान केली व नगरपालिकेचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. माणिकलाल शेठ तु. शाह यांनी ह्या देणगीचा स्वीकार केला. श्रीमंत सौ. लक्ष्मीबाई मालोजीराव नाईक निंबाळकर यांचे हस्ते त्या इमारतीचे उद्घाटन झाले. फलटणशी बारामतीचे नाते स्नेहाचे व आपुलकीचे आहे. हेच यावरून पुनः एकदा दिसून आले.

नगरपालिकेचा मुख्य दवाखाना, सूतिका विभाग व डोळ्यांचा दवाखाना ही सर्व एकत्र येण्याचा योग लवकरच आला. श्री. दादासाहेब शेंबेकर यांनी आपल्या वडिलांचे स्मरणार्थ सूतिका विभागाचे एक मजला बांधून दिल्यामुळेच हे शक्य झाले. विभागाला त्यांच्या वडिलांचे नाव दिले आहे.

ह्या डोळ्याच्या दवाखाना विभागाचा उद्घाटन समारंभ त्यावेळचे स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते ता. १९।७।१९५४ ला झाला. मुंबईचे प्रख्यात नेत्ररोग चिकित्सक डॉ. एस्. सरदेसाई हे या समारंभाचे वेळी अध्यक्ष होते. श्री. दादासाहेब शेंबेकर यांनी स्वतः उपस्थित राहून ह्या इमारतीचे दान दिले. तेव्हाचे नगराध्यक्ष श्री. धों. आ. सातव यांनी ते स्वीकारले.

सोय उपलब्ध केली म्हणजे तिचा फायदा जनता घेते. याचे उदाहरण म्हणून सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलकडे बोट दाखविता येईल. इ. स. १९४० मध्ये



दररोज सरासरीने २०० रोगी (आउट डोअर) येथे येऊन औषध घेऊन जात. तेथे राहून औषधोपचाराची सोय बारांची होती; त्यात चार पुरुष रुग्ण असत व आठ स्त्रिया. त्यातल्या प्रसूतीसाठी निराळ्या खाटा राखल्या होत्या. वर्षाचा खर्च रु. ६९१५.

प्रसूतीचा विभाग जोडल्यानंतर आता दवाखान्यात २८ खाटांची सोय आहे. ८ पुरुष व २० स्त्रिया बाळंतिणींच्या खाटा त्यातच निराळ्या आहेत. डोळ्यांच्या विभागाकडे ५ खाटा आहेत. पुण्याचे डॉ. पेंडसे यांनी काही वर्षे काम केले व त्यानंतर पुण्याचे डॉ. एल्. एस्. भावे यांच्या देखरेखीखाली डोळ्यांचा विभाग सध्या आहे. डॉ. ब. मा. कोठारी हे त्याना ऑनररी डॉक्टर म्हणून मदत प्रथमपासून करीत आहेत. गेल्या दहा वर्षातील दवाखान्याची कामगिरी पान ६४ वरील तक्त्यावरून बरोबर कळून येईलः—

डोळ्यांच्या दवाखान्यातील कामाची वाढ दिवसेंदिवस होत आहे. नेत्र विभागाच्या फीचे उत्पन्न इ. स. १९६२–६३ मध्ये रु. ८११ होते. ते इ. स. १९६६–६७ मध्ये रु. १४७१–४० पैसे झाले आहे. रुग्णांची संख्या पुढीलप्रमाणे वाढत आहेः—

| इ. स. | इन डोअर | आउट डोअर | एकूण |
|---|---|---|---|
| १९६२ | २८ | ५३७ | ५६५ |
| १९६३ | ४३ | ५९८ | ६४१ |
| १९६४ | ३७ | ६३९ | ६७६ |
| १९६५ | ३७ | ६५१ | ६८८ |
| १९६६ | ५४ | ७४८ | ८०२ |

या विभागात वर्षाला लहान मोठ्या सुमारे २०० शस्त्रक्रिया केल्या जातात.

सध्या दवाखान्याचे प्रमुख डॉक्टर हे द्वितीय श्रेणीतले वैद्यक अधिकारी आहेत. डॉ. हरिगोविंद कुंदरन् बालानी हे ह्या अधिकारपदावर येथे इ. स. १९६५ पासून आहेत. त्यांना मदत करण्यासाठी एक पुरुष डॉक्टर व एक स्त्री डॉक्टर आहेत. एक क्वॉलिफाइड कंपाउंडर. एक सर्टिफाईड कंपाउंडर व एक ट्रेनी कंपाउंडर असे तीन कंपाउंडर्स व ४ नर्सेस त्यांचे सहाय्यक आहेत. मुख्य डॉक्टरांच्या वेतनाइतके अनुदान सरकारकडून मिळते. व तेवढीच रक्कम नगरपालिकेस प्रथम सरकारकडे भरावी लागते.

दवाखाना ही संस्था कधीही पूर्णतेला न पोचणारी यंत्रणा आहे. या दवाखान्यात सामान्य प्रतीच्या शस्त्रक्रिया होतात. पण अनेक सोईंची उणीव आहे. यात शंका नाही. एक्स रे फोटो काढण्याचे यंत्र, छातीचे छायाचित्र घेण्याचे यंत्र (कार्डिओग्राम) पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी अशा गरजा आज निकडीच्या आहेत. इंडोअर सोय ५० खाटांची करण्याचे तत्वतः ठरले असून त्या दिशेने जरूर ती पाउले टाकली जात आहेत. न्यायालयीन वैद्यकीय प्रकरणात (मेडिकोलीगल केसेस) प्राथमिक औषधोपचार देऊन रुग्णाइताला पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये पाठाविले जाते. अशा प्रकरणांची संख्या वाढत आहे. त्यामुळे ही बाब निकडीची समजावयाला हवी. प्रेताची तपासणीही वाढत आहे. डिसेंबर १९६६ अखेरपर्यंत येथे न्यायालयीन वैद्यक प्रकरणे ८६९ झाली असून प्रेते तपासली, ती संख्या ५३ झाली आहे.

दवाखान्यात आधुनिक अवजारें (ॲक्सेसरीज इन्स्ट्रुमेन्टस् व एड्स) ठेवून निरनिराळ्या विभागांचे तज्ज्ञ डॉक्टर (कन्सल्टिंग फिजिशियन ॲंड सर्जन) येथे येण्याची सोय करणे ही पुढच्या प्रगतीची दिशा होणार आहे.

सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलमध्ये वाढ करण्याचे काम आता कार्यान्वित होत आहे. सध्याच्या इमारतीचे पुढे ही नवीन इमारत सुमारे ४०४७ चौरस फूट क्षेत्रफळाची होणार आहे. खर्चाचा अंदाज रु. १,१०,००० आहे. बांधकामाचे टेंडर काढले व कंत्राटदाराची नेमणूकही झाली आहे. या इमारतीत सर्व 'औट पेशन्ट डिपार्टमेंट, घेण्याची कल्पना आहे. तेथे डॉक्टरी तपासणी, एक्स रे तपासणी, लॅबोरेटरी, ड्रेसिंग रूम, फॅमिली प्लॅनिंग लूप इत्यादि सोय होणार आहे. हे काम चालू वर्षाचे मध्यास पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

वर्षप्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर ह्या नव्या इमारतीचा भूमिपूजन-समारंभ नगरपालिकेचे सध्याचे अध्यक्ष श्री. जयराम पांडुरंग सातव यांचे शुभ हस्ते पार पडला असून, इमारत बांधकामास सुरुवात झाली आहे.

| | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ | १९६५ | १९६६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इन्डोअर रुग्ण रोजची सरासरी | २२.०९ | २७.०४ | २४.६२ | २२.६३ | २६.९६ | २५.६६ | २७.८१ | २९.२१ | ३४.६२ | ३३.३९ | |
| बाहेरचे रोगी रोजची सरासरी | १०२.०४ | २१४.४५ | २१८.१५ | २३१.२५ | २५१.८८ | १७४.९६ | १८०.४० | १८७.६८ | २०३.९६ | १८३.५५ | |
| प्रसूती | ३९३ | ४६६ | ४९४ | ४९५ | ६०२ | ५४४ | ५१५ | ५०२ | ५७६ | ५८२ | ५११ |
| शस्त्रक्रिया | २८० | ५८५ | ४८८ | ३५६ | ३१३ | ३०० | ३२४ | २९२ | ३३६ | ४०६ | ७९७ |
| न्यायालयीन वैद्यक प्रकरणे | ५७९ | ६७३ | ७३४ | ७५७ | ६८९ | ५९५ | ५३३ | ५९९ | ६३१ | ७०४ | ८७१ |
| प्रेत तपासणी | ३२ | २७ | २० | ३२ | २० | २१ | २२ | ४३ | ४७ | ५८ | ५३ |
| फीचे वर्षाला उत्पन्न | ३१८६ | ४६४० | ५९५० | ७६३२ | ८६५७ | ७०५० | ६८१२ | ६४१२ | ६९३८ | ६९०६ | ७९८२ |
| वर्षाला खर्च | २८५८६ | २९८२९ | २७७६० | ३०५०० | ३६२१२ | ३७२३१ | ३२९३० | ३४२०१ | ४३२४८ | ४४४६६ | ५७७५८ |



इमारतीच्या बांधकामाचा मक्ता श्री. कांजीभाई मिस्त्री यांनी घेतलेला असून इमारतीचे प्लॅन एस्टिमेट पुण्याचे आर्किटेक्ट श्री. जी. एल्. खांडेकर यांनी केलेले आहे.

प्रेतगृहाची सोय नीट लावणे ही एक अत्यंत गरजेची गोष्ट आहे. जळोची वेशीजवळच्या आवारात प्रथम दवाखाना होता. तेव्हा तेथे एका कोपऱ्यात ' शवगृहाची ' ( मार्च्युअरी ) बंगली होती. दवाखाना नवीन इमारतीत ' सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल, ' या नावाने हालला, तेव्हा हे प्रेतगृह त्याबरोबर गेले नाही. आता ती ' बंगली ' पार मोडली आहे. ती दुसरीकडे नेणे अवश्य आहे. दवाखान्याचे एक उपांग म्हणूनच ते हवे, पण आता प्रेतगृह कोठे बांधावे व त्याचा खर्च कोणी करावा, या प्रश्नावर सरकार दरबारी पत्रव्यवहार सुरू आहे. वर्षामागून वर्षे गेली पण निर्णय नाही.

## गुरांचा दवाखाना

गुरांचा दवाखाना ही बाब बारामती नगरपालिकेच्या इतिहासात विशेष उल्लेखनीय आहे. यासारख्या नगरपालिकेने अन्यत्र असा दवाखाना चालविल्याचे आढळत नाही. एका ऐतिहासिक परिस्थितीतून ह्या दवाखान्याची अवश्यकता निर्माण झाली व ती नगरपित्यांनी बिलकुल टाळलेली नाही, असे निःसंकोचपणे म्हणता येते.

बारामती येथे सरकारी वळू, घोडे आहेत. त्यांना बरसातीपर्यंत गुनवडी वेशीबाहेरील नगरपालिकेच्या धर्मशाळेत तूर्त जागा द्यावी. असा ठराव ता. १८।७।१८८१ ला झाला. घोडी हे दळणवळणाचे एक मुख्य साधन होते. त्या खालोखाल बैलगाड्या, आणि शेतीसाठी बैलांचा उपयोग तर होताच नीरा पाटबंधाऱ्याचे पाणी खेळू लागले. ऊस लागवडीला बहर येऊन जनावरांच्या जोपासनेला महत्त्व आले. यांत शंका नाही. माणसाप्रमाणेच जनावरांच्या औषधोपचाराची सोय करणे हे न्यायाने, इतकेच नव्हे तर स्वार्थीक दृष्टीने जरूर आहे.

इ. स. १८९५ पर्यंत त्या वेळच्या ब्रिटिश अंमलदाराचे लक्ष या प्रश्नाकडे गेले नव्हते. तथापि लष्करी स्वारासाठी व वहातुकीसाठी घोडे अवश्य असत. म्हणून अहमदनगरसारख्या रिसाल्याच्या वस्तीच्या टापूत घोड्यांची पैदास ( रिआउंट डेपो ) व पुरवठा करण्याचे खाते सरकारने चालविलेले होते. अश्वविद्येत व अश्ववैद्यकात निपुण असे तज्ज्ञ लष्करी अधिकारी असत आणि त्यांच्या हाताखाली तयार झालेले लोक असत. त्रिन लष्करी पशुवैद्यकाचा प्रारंभ याच प्रथेतून झाला असे मानले जाते.

बारामतीसारख्या शहरात व पूर्वीपासून व्यापाऱ्यांची व शेतकऱ्यांची स्वारीसाठी व टांग्यासाठी घोडी बरीच असत. तसेच दूधदुभत्याची जनावरेंही असत. जिल्हा बोर्डाचेकडे सरकारने हे काम सोपविले व बहुतेक नगरपालिकांनी या कामासाठीं उक्ते अनुदान देण्याचे मान्य केले. गुरांचा दवाखाना असणे, ही कल्पना बारामती नगरपालिकेने स्वीकारली. येथील गुरांचा दवाखाना इ. स. १९०८।१९०९ पासून सुरू झाला. नगरपालिकेने दाणे बाजाराच्या आवारातील आपल्या इमारतीचा काही भाग व खुली जागा या दवाखान्याला दिली. सरकार पशु डॉक्टरचा पगार स्वतः देई व शिवाय रु. ४५० चे रोख अनुदान देत असे. जिल्हा बोर्ड वर्षाला रु. २०० चे अनुदान देई व नगरपालिकेला बाकीचा सुमारे रु. ३६० चा खर्च करावा लागे.

या दवाखान्यात प्रारंभी बैल, म्हशीप्रमाणेच घोड्यांचाही वळू होता. शेती बागायत व वहातुकीसाठी उपयोगी पडणाऱ्या जनावरांची निगा पोटच्या मुलाप्रमाणे ठेवणे अवश्य असल्यामुळे ह्या दवाखान्याची लोकप्रियता शहरात व पंचक्रोशीत पसरली. बैल खच्ची करण्याचे कामही येथे होऊ लागले. चालू शतकाच्या प्रारंभीच्या काही दशकात, बारामतीच्या गुरांच्या दवाखान्याचा नंबर सर्व इलाख्यामध्ये पहिला लागला होता. लाळ, फऱ्या, बुळकुंड्या वगैरे रोगांचा प्रतिबंध करणारी लस टोचण्याची सोयही येथे झाली. इ. स. १९२० मध्ये परलोकवासी वाडिया शेठ यांच्या निधीतून या दवाखान्याच्या इमारतीसाठी देणगी मिळाली व सरकारने तीत भर घातली. अशा रीतीने

दवाखान्यासाठी रु. २०,००० ची नवी इमारत बांधली गेली. स्वातंत्र्यपूर्व काळांत दवाखान्यावरील एकूण खर्च रु. ७००/८०० च्या आसपास होता. तेव्हा सर्वसाधारणपणे कामाचे स्वरूप असे होतेः– औषधोपचारित जनावरे २०७८, खच्ची केलेली जनावरे ९८४ व लस टोचलेली जनावरे २८६१.

बारामती गावातील जनावरांना ह्या दवाखान्याचा लाभ होत आहे. त्याचप्रमाणे तालुका हद्दीतील गावेही ह्या सोयीचा उपयोग घेत आहेत. जिल्हा परिषदेच्या विद्यमाने येथे कृत्रिम गर्भधारणेचे कें[द्र] चालविले जाते. याच्या अगोदर ' फऱ्या ' रोगप्रति[बंधक] लस टोचण्याच्या मोहिमेचे कामही सरका[री] तंत्रज्ञानी याच दवाखान्यातून केले. येथील पशु-वैद्या[च्या] पगाराची रक्कम राज्यसरकार पूर्वीप्रमाणेच नगर[-] पालिकेला देत आहे. आता वर्षाचा खर्च अ[...] आहे. त्यात सरकारचे अनुदान व जि[ल्हा] परिषदेचे अनुदान असते. या दवाखान्या[च्या] कामाबाबतचे काही बोलके आकडे असेः

| वर्ष | औषधोपचार: शहर हद्दीतील | औषधोपचार: शहरा-बाहेरील | खच्ची केलेली जनावरे: शहर हद्दीतील | खच्ची केलेली जनावरे: शहरा-बाहेरील | कृत्रिम गर्भ-धारणा |
|---|---|---|---|---|---|
| १९५२<br>१९५३ | ३४८० | १७४१ | १४३३ | २२ | ४१६ |
| १९६२<br>१९६३ | ३२६९ | ५३०७ | २००३ | २८७ | ९५६ |
| एप्रिल ते<br>डिसेंबर १९६६ | ३२३४ | ३६६९ | ३८७ | — | ६८० |

' माता-बाल-संगोपन केंद्र ' ह्या शाखेचा ७ व्या प्रकरणात ३ ऱ्या परिछेदामध्ये ओझरता उल्लेख केला आहे. ही शाखा सन १९४५ पासून नगरपालिकेने मुंबईचे डॉ. म्हसकर यांच्या मदतीने सुरू केली. सन १९४५ पासून सन १९५६ पर्यंत ह्या केंद्रातील हेल्थ व्हिजिटर श्री. लक्ष्मीबाई देशपांडे, सौ. अहिल्याबाई महाजन, व सौ. सुशिलाबाई जोशी यांची नेमणूक व पगार डॉ. म्हसकर यांचे बॉम्बे मॅटरनिरी व चाइल्ड वेलफेअर सेंटरकडून होत असे. पुढे नगरपालिकेने १९५६ पासून स्वतंत्र हेल्थ व्हिजिटर श्री. जानकीबाई गोखले यांची नेमणूक केली. त्यांचे मदतीस प्रथमपासून श्री. उमाबाई प्रभुणे दायी म्हणून सन १९६१ पर्यंत काम पहात असत. सन १९६१ पासून श्री. मालतीबाई माधवराव दंडवते दायी म्हणून काम पहात आहेत.

ह्या केंद्रात ५ वर्षेपर्यंतचे बालकास नैसर्गिक दूध, कांजी, फळफळावळ वगैरे पौष्टिक आहार दिला जातो. व किरकोळ रोगावर औषधोपचार केला जातो. त्याच[-] प्रमाणे आरोग्याची शिकवण व प्रसार घरोघरी [...] देऊन केला जातो.

सन १९५६ पासून यूनोच्या मदतीने कृत्रिम [...] पावडर नगरपालिकेस मिळू लागल्याने, ह्याच [...] मार्फत ५ ते १४ वर्षांच्या शिशूना दूध पुरवठा [...] जात आहे.

राष्ट्रीय प्रश्न म्हणून कुटुंबनियोजनाकडे नगरपालि[का] सन १९५६ पासून लक्ष पुरविले आहे. नगरपालि[केने] हेल्थ व्हिजिटर यास ह्या कामी शिक्षण घेण्या[स] मुद्दाम पाठविले होते व कुटुंब-नियोजनाची सा[...] प्रसार फक्त स्त्रियात ह्या केंद्राकडून केला जात [...]

ह्या केन्द्राच्या चेअरमन म्हणून सौ. आनं[दी...] अनंत माने व त्यानंतर सौ. वसंतमाला शि[...] व्होरा यांनी काम अत्यंत आपुलकीने व जिव्हा[ळ्याने] केलेले आहे, हे नमूद करण्यास आनंद वाटतो.

ह्या केन्द्रामार्फत दररोज १०० बालकास नै[सर्गिक] दूध व पौष्टिक आहार व १०० मुलांना पाव[डर] दूध पुरवठा विनामूल्य केला जातो. ह्या केंद्रावर सालीना ७ ते ८ हजार रुपये खर्च केला जातो.



# प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय

शिक्षणाची सोय करणे ही स्थानिक स्वराज्य-संस्थेची एक मुख्य कामगिरी मानली जाते. नगरपालिकांच्या नव्या कायद्यात यासाठी एक स्वतंत्र समिती नेमण्याची तरतूद आहे.

प्राथमिक शाळांचा ताबा नगरपालिकेकडे असला म्हणजे ह्या शिक्षण समितीचे काम, प्राथमिक शिक्षण कायद्यातील तरतूदींना अनुसरून, जरा व्यापकरीत्या चालते. बारामतीत तशी परिस्थिती नाही. प्राथमिक शाळांचा ताबा आपणाला मिळावा अशी मागणी बारामती नगरपालिकेने ता. १३-३-१९६१ च्या ठरावाने केली आहे. या बाबतीत राज्य सरकारने अजून निर्णय घेतलेला नाही.

शिक्षणाच्या बाबतीत नगरपालिकेने कसकशी पावले टाकली, ते आता संक्षेपाने पहावयाचे आहे.

बारामती नगरपालिकेची स्थापना इ. स. १८६५ मध्ये झाली व प्राथमिक शिक्षणाचे क्षेत्र नगरपालिकेकडे सोपविण्यात आले. इ. स. १८८४ मध्ये मध्यंतरीच्या काळात शिक्षणासाठी काही ना काही प्रयत्न हे होतच होते.

इंग्रजांचा अंमल सुरू झाला तेव्हा बारामतीत बहुधा तात्या पंतोजीची शाळा असली पाहिजे. ह्या शाळेत जरूरीपुरते वाचन, लेखन, गणित हे विषय शिकविले जात. इंग्रज राज्यकर्त्यांनी शाळा खाते निर्माण करून शिक्षणाचे काम सुरू केले. त्याअन्वये बारामतीला पहिली शाळा ता. २ फेब्रुवारी १८४६ रोजी सुरू झाली. ती हल्लीची शाळा नं. १ होय. ह्या शाळेत पूर्वीच्या गावठी शिक्षणासारखेच, परंतु व्यवस्थितपणे शिक्षण होऊ लागले. आरंभी मुले किती होती, शिक्षक किती होते, ती शाळा कोठे होती, ही माहिती आज खात्रीलायकरीत्या उपलब्ध नाही. तथापि बाबूजी नाईकांच्या वाड्याच्या पूर्वेस, तटाबाहेर पूर्वेला असलेल्या श्री. दा. र. दाते यांच्या वाड्यात ही शाळा काही दिवस होती, असे म्हणतात. नगरपालिकेची इतर काही कामे याच वाड्यात प्रारंभी होती. यावरून ही आख्यायिका खरी, असे मानले पाहिजे. त्या वाड्याचे मूळ स्वरूप काय होते, ते आज कळण्याला मार्ग नाही.

या वाड्याच्या समोर तटाला लागून शाळेसाठी नंतर इमारत बांधली. शालागृह बांधण्यासाठी रु. १००० मंजूर करावेत असे विनंतीपत्र नगरपालिकेकडे डेप्युटी इन्स्पेक्टरकडून ता. ९ जानेवारी १८६९ ला आले होते. इ. स. १८६९-७० च्या अंदाजपत्रकात ती रक्कम मंजूर करण्याला सवड नाही असे ठरले होते. ही शाळा पेठेनजीक असल्यामुळे कसब्यातील मुलांना शाळेची अडचण भासू लागली. तेव्हा सुमारे इ. स. १८८० च्या सुमारास सरकारने कसब्यात चावडीनजीक एक शाळा उघडली. ही शाळा नंबर २ म्हणून नंतर ओळखली जाऊ लागली. शाळा नं. १ कसब्यातील मुले वरच्या शिक्षणाकरिता शाळा नं. १ मध्ये येत असत. इ. स. १८८३ मध्ये मुलींच्यासाठी शाळा सुरू झाली. ती नंबर तीनची शाळा म्हणून ओळखली गेली.

या शाळेतील शिक्षक सुरुवातीला कोणतीहि परीक्षा उत्तीर्ण झालेले नसत. नंतर पब्लिक सर्व्हिस, व्हर्नॅक्युलर फायनल व ट्रेनिंगच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षक नेमले जाऊ लागले. मुंबई सरकारने इ. स. १८८४ मध्ये प्राथमिक शाळा नगरपालिकेकडे देण्याचे ठरविले, तेव्हा उपरिनिर्दिष्ट तीन शाळा चालविण्यासाठी नगरपालिकेकडे आल्या.

या अगोदर नगरपालिकेने शिक्षणासाठी काहीच केले नाही असे म्हणता येणार नाही. इ.स. १८७१-७२ च्या अंदाजपत्रकात शालागृहासाठी रु. ३०० ची तरतूद केलेली होती. इ. स. १८८३ च्या प्रारंभीच असा निर्णय घेतला होता की, अर्जदार समस्त महार कसबे बारामती यांचा अर्ज. ' आमचे मुलास शिकण्यासाठी वेगळी शाळा स्थापन करून मास्तर आणला आहे, त्यास मदत मिळावी. ' मेहेरबान कलेक्टरसाहेब यांचे मार्फत हा अर्ज आला आहे. याचा विचार होऊन ठरविले की, जर सदरहू शाळेत तीस मुलाहून कमी नाहीत. तोपावेतो दरमहा रु. २

प्रमाणे मदत द्यावी. तीस मुले हजर असल्याबद्दल दरमहाचे दरमहा मास्तरांनी दाखला द्यावा.

प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था नगरपालिकेकडे आली, त्याचे अगोदरपासूनच इंग्रजी शिक्षणाच्या व्यवस्थेचे कामी ही नगरपालिका सहाय्यभूत झालेली होती. डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर पुणें यांनी पत्र पाठविले होते की, इंग्रजी शिक्षणाचा वर्ग सुरू करावा. इंग्रजी तीन बुकापर्यंत अभ्यास व्हावा; व रु. १५ तिजोरीत भरावेत. यावर ठरविले की, इंग्रजी शिक्षणाची सोय होते. तरी कमेटीने ही गोष्ट कबूल करून रु. १५ मामलेदार तिजोरीत भरावेत. जी मुले इंग्रजी शिकण्यास येतील त्या दरमहा दर मुलास ६ आणे प्रमाणे फी घेऊन ते कमेटीकडे जमा करावेत.

अशा रीतीने इंग्रजी शिक्षणाची सुरुवात येथे झाली; तिचा परामर्श घेण्यापूर्वी प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेचे स्वरूप आजपर्यंत आणून ठेवणे इष्ट आहे. मुलींची शाळा काढण्याचे ठरले, तेव्हा नगरपालिकेने ता. २०-१-१८६३ ला ठरविले की, २० मुलींहून कमी नाहीत, इतक्या मुली व जागा लोकांनी मोफत दिली, तर मास्तर यास दरमहा रु. ८ प्रमाणे पगार देणे. परंतु अशी व्यवस्था तीन महिनेपर्यंत न चालेल तर मदत कमी करावी.

प्राथमिक शाळा नगरपालिकेने १ जुलै १८८५ पासून ताब्यात घेण्याचा सरकारी हुकूम आला त्यावर नगरपालिकेच्या अध्यक्षांनी असा हुकूम दिला की, १ जुलै १८८५ पासून रक्कम रु. ७१४-१३-३ शाळेकडे देण्याचा ठराव केला आहे. तसेच शाळाही सदरहू तारखेपासून ताब्यात घेण्याविषयी ठराव केला आहे. परंतु शाळेकडील व्यवस्था पाहण्यासारखे माहितीचे लोक ह्या कमेटीत नसल्यामुळे ती व्यवस्था शाळाखात्याकडून पाहिली जाईल. ह्या शर्तीवर शाळेचा ताबा घेतला आहे असे कळवावे. या वेळी मुले व शिक्षक खालीलप्रमाणे होते.

| शाळा नं. | इमारत | मुले | शिक्षक |
|---|---|---|---|
| १ | सरकारी | १७८ | ६ |
| २ | गावची | २१ | १ |
| ३ | भाड्याची | ४३ | १ |

नगरपालिकेने एक शिक्षण समिती नेमून तिच्या- मार्फत प्राथमिक शाळांचा कारभार सुरू झाला. मात्र शाळांच्या परीक्षा घेणे, शिक्षकांच्या बदल्या करणे, हिशेब पाहून अनुदान ठरविणे, इत्यादि महत्त्वाची कामे सरकारी अधिकाऱ्याकडून म्हणजे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरकडून होत असत. नगरपालिका शाळांचा खर्च करी व सरकार नगरपालिकेला काही प्रमाणात अनुदान देत असे.

पहिल्या शिक्षण समितीत पुढील सभासद होते:- श्री. गोपाळ बाबाजी खाडे, श्री· भवानीराम साहेबराम, श्री. रामचंद देवचंद, श्री. मलुकचंद ताराचंद, श्री. अहमदअल्ली मुसाभाई व श्री. सिताराम आबाजी लोणकर.

लोकसंख्येचे प्रमाण वाढले, तसा शिक्षणाचा प्रसारही वाढला. मुलांची संख्या वाढू लागली. मुसल- मान व अस्पृश्य ह्या जमातीतील मुलामुलींच्या शिक्ष- णाचा विचार नेटाने सुरू झाला. 'लो-कास्ट' (मागासलेला वर्ग) शाळा सुधारणेकरिता असे ठर- विले की प्रत्येक वर्गात जो मुलगा पहिला नंबर येईल त्याला इयत्तेच्या अनुक्रमे २, ४, ६ व ८ अशी शिष्यवृत्ती ठेवावी व सध्याच्या गुरुजीस बदलावे. ता.(२७-७-१९०९) मुसलमान लोकांचा उर्दू शाळा काढण्याबाबत अर्ज आला. त्याचा विचार करता, अर्जदार २५ मुलांपर्यंत सतत हजर ठेवीत असतील तर एक वर्ग उर्दू शिकवावयास नगरपालिकेच्या जागेत ठेवावा. असा निर्णय ता. १०-१२-१९०९ रोजी घेतला. चार वर्षांनी असा ठराव केला की, ट्रेन्ड उर्दू मास्तर मिळत असेल तर उर्दू शाळा ताब्यात घ्यावी. एक शिक्षक पुरेल इतक्यापेक्षा जास्त मुले झाल्यास दुसरा शिक्षक नेमावा; पगार रु. १५ द्यावा. शाळा नंबर ४ झाली.

मुलींची शाळा भाड्याचे जागेत होती, तेथे गैरसोय फार, दुसरी सोइस्कर जागा मिळत नाही म्हणून रामगल्ली बोळात रामलाल साहेबराव मारवाडी यांची इमारत आहे, ती गांवचे वसाहतीचे मानाने रु. २००/२५० किंमतीपर्यंत मिळण्यासारखी आहे. तरी ती चिटणीसांनी त्यास खरेदी करावी, असा आदेश



ता. १०-११-१८९९ ला देण्यात आला. येथे नंतर इमारत बांधली. कसब्याच्या शाळेची इमारत इ. स. १९०९ मध्ये झाली. आणि पुढच्याच वर्षी नाक्या- नजीक अस्पृश्यांच्या मुलांकरिता एक इमारत बांधली. नंबर १ च्या शाळेला जागा पुरेना तेव्हा काही दिवस भाड्याची जागा घेतली, आणि नगरपालिकेचे कार्यालय नवीन इमारतीत गेल्यावर ती माडीची जागा ह्या शाळेला मिळाली.

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण करण्याचा निर्णय नगरपालिकेने ता. १२-१२-१९१७ च्या सभेत घेतला. त्याचे अगोदर दोन शाळांची भर पडली होती. व्यापारी लोकांच्या मुलांकरिता थोड्या वेगळ्या अभ्यासक्रमाची शाळा, नगरपालिका कार्यालयाच्या मागच्या दोन खोल्यात सुरू केली (इ. स. १९१५) होती. ही शाळा नंबर ५ होय. कसब्यातील अस्पृश्य मुलांची शाळा पुरेना, तेव्हा दाणे बाजारात एक शाळा इ. स. १९१७ मध्ये काढली. ती नं. ६ ची शाळा होय.

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे होईपर्यंत पुढे बराच काळ लोटला. मुंबई सरकारच्या इ. स. १९२३ च्या कायद्याने ती गोष्ट कार्यवाहीत झाली. तेव्हाच्या प्रांतिक सरकारने बारामती नगरपालिकेला या कायद्या- साठी 'लोकल ॲथॉरिटी', म्हणून मान्यता दिली. या तरतुदीचा परिणाम असा की, प्राथमिक शिक्षणाचा कारभार करण्यासाठी एक 'शिक्षण मंडळ' (स्कूल बोर्ड) नेमणे हा होय. ता. १७-६-१९२६ रोजी पहिले शिक्षण मंडळ स्थापन झाले. त्या शिक्षण मंडळात लोकल ॲथॉरिटीने (म्हणजे नगरपालिकेने) निवडलेले ९ आणि सरकारने नेमलेले २ किंवा ३ सभासद असत. या सभासदातूनच शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडले जात. शाळांची तपासणी व परीक्षा घेणे, 'शिक्षण मंडळा'च्या कार्यालयावर देखरेख करणे, शिक्षण मंडळाचे चिटणीसाचे काम करणे, वगैरे कामे ॲड- मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरला करावी लागत. प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था पहाणारा मुख्य अधिकारी, म्हणजे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर हा 'लोकल ॲथॉरिटीने' सरकारच्या मंजुरीने नेमावयाचा असे. शाळांवर देख- रेख करणे, हे स्थित्यंतर होण्याचे वेळेस बारामतीच्या

प्राथमिक शाळात एकूण ११०२ विद्यार्थी व ३४ शिक्षक होते. प्राथमिक शिक्षण नगरपालिकेकडे आले तेव्हा तीन शाळात मिळून २४२ विद्यार्थी व ८ शिक्षक होते. हे पाहिले म्हणजे जवळ जवळ ५०/५१ वर्षांत झालेली प्रगती लक्षात येईल. ही मोठी समा- धानाची गोष्ट होती, असे आजच्या कल्पनेवरून म्हणता येत नाही. तथापि, त्या काळात आपण थोडीच मजल मारली. असा विचार होता यात शंका नाही.

नवीन व्यवस्थेप्रमाणे जिल्हा स्कूल बोर्डावर, नगर- पालिकेचे तीन प्रतिनिधी पाठवावयाचे असत. श्री. ल. के. भागवत, श्री. ना. म. दाते व श्री. पां. के. सातव यांची या कामी प्रथम निवड झाली होती.

याच सुमारास माजी नगराध्यक्ष व दानशूर नाग- रिक श्री. रामचंद मलुकचंद यांनी प्राथमिक शाळेसाठी जळोची वेशीकडून स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर, स्वतःच्या खर्चाने एक इमारत बांधून दिली. त्या इमारतीवर नगरपालिकेने रु. ४१२६ खर्चून एक मजला बांधला. हीच बारामतीतील सध्याची शाळा नं. १ होय.

त्यानंतर परिस्थितीप्रमाणे वेळोवेळी बदल झाले. प्राथमिक क्षिक्षणाचा नवीन कायदा इ. स. १९३७ मध्ये झाल्यानंतर शिक्षण-व्यवस्थेत महत्त्वाचे बदल झाले. या कायद्यान्वये ता. १ जुलै १९३८ पासून बारामतीतील सर्व प्राथमिक शाळांचा ताबा सरकारकडे म्हणजे पुणे जिल्हा स्कूल बोर्डाकडे गेला.

प्राथमिक शाळा 'जिल्हा शिक्षण मंडळा'कडे गेल्या तेव्हापासून नगरपालिका मंडळाला दरवर्षी अनुदान देत असते. इ. स. १९३४-३५ मध्ये नगरपालिका शिक्षणासाठी रु. ९५९१ खर्च करीत असे. सरकारकडून मिळणारे अनुदान रु. ९७७४ व लोकल फंडातून वाटा रु. ११९१ व फीचे उत्पन्न रु. ९३३ मिळून शिक्षणासाठी एकूण खर्च रु. २१४८९ होत असे. शिक्षण मंडळाकडे शाळा गेल्यानंतर नगर- पालिकेने द्यावयाचे अनुदान वाढत वाढत ते इ. स. १९६४/६५ मध्ये रु. ४२६४४/- झाले आहे.

नगरपालिकेकडे प्राथमिक शाळांचा ताबा होता. तेव्हा मोठी आदर्श परिस्थिती होती असे कोणीच म्हणणार नाही. जिल्हा स्कूल बोर्डाकडे ह्या शाळांचा वारसा गेल्यानंतर त्यात काहीच सुधारणा झाली नाही. यावर एकमत आढळून येते. एका लोकशाही संस्थेने दुसऱ्या लोकशाही यंत्रणेला अकार्यक्षम म्हणण्याचा हा प्रकार आहे. एकाच लोकशाही परंपरेत वावरणाऱ्या दोन्ही संस्था होत. बारामतीच्या नागरिकांना शाळांच्या कारभाराबाबत पूर्वीपेक्षा जास्त असमाधान निर्माण झाले असे मात्र निश्चितीने म्हणता येते. शाळाबाबत नगरपालिकेच्या तक्रारी दूर झाल्याशिवाय 'प्राथमिक शाळा पंच समिती' ची निवड करू नये, असा ठराव प्रतिनिधी मंडळाने ता. २६।३।१९५० ला केला होता. यावरून हे असमाधान किती तीव्रतेला पोचले होते याची कल्पना येईल.

गावात सध्या ८ प्राथमिक शाळा आहेत. त्यात एकूण विद्यार्थ्यांची संख्या ४३८७ आहे. या शाळे-पैकी ७ शाळा आता जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्याकरवी चालविल्या जातात आणि एक ऑस्ट्रेलियन मिशनने चालविली आहे.

यापैकी बहुसंख्य शाळा भाड्याच्या जागेतच भरतात. त्या इमारती चांगल्या नाहीत व पुरतही नाहीत. असे विकास नियोजन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. योग्य इमारतीचे अभावी कसब्यातील शाळा (नं. २) निरनिराळ्या तीन इमारतीत भरते. शाळा नंबर १ खेरीज कोणत्याहि शाळेजवळ क्रीडांगण नाही. मिशनची शाळा स्वतःच्या इमारतीत आहे.

## माध्यमिक शिक्षणाची सोय

प्राथमिक शिक्षणाची वाटचाल येथवर पाहिल्या-नंतर त्याचबरोबर सुरू झालेली माध्यमिक शिक्षणाची (म्हणजेच व्यावहारिक भाषेत 'इंग्रजी' शिक्षणाची) सोय कसकशी झाली ते आता पहावयाचे आहे.

बारामतीत सध्या एक कॉलेज व तीन हायस्कूल्स आहेत. म्हणजेच विश्वविद्यालयीन व माध्यमिक शिक्षणाची सोय येथे आहे. ह्याच उच्च शिक्षणाला 'इंग्रजी शिक्षण' असे व्यावहारिक नाव आहे. हल्ली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल, श्री शाहु छत्रपती हायस्कूल व ऑस्ट्रेलियन मिशनचे हायस्कूल असे तीन माध्यमिक शाळा आहेत; या तीन शिक्षण-संस्थात विद्यार्थ्यांची संख्या आता ११५० च्या घरात आहे.

इंग्रजी राजवटीत माध्यमिक शिक्षण सुरू झाले तेव्हा शिक्षणाचे माध्यमच 'इंग्लिश' असे म्हणून हे शिक्षण 'इंग्रजी शिक्षण' व्यावहारिक या नावाने ओळखले जाऊ लागले. पहिली माध्यमिक शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीकडे जाईपर्यंत (इ. स. १९१३) बारामती नगरपालिकेने 'इंग्रजी शिक्षणा'ची वरील जोपासना केली असे म्हणता येते.

येथे इंग्रजी शिकण्याचा वर्ग सुरू झाला. तो इ. स. १८७९ मध्ये डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, पुणे विभाग याजकडून यादी आली की, इंग्रजी शिकण्याचा वर्ग सुरू करावा व तेथे इंग्रजी तीन बुकापर्यंत अभ्यास व्हावा व रु. १५ तिजोरीत भरावे. यावरून ठरविले की, मुलास इंग्रजी शिकण्याची सोय होते. तरी कमेटीने ही गोष्ट कबूल करून रु. १५ तिजोरीत भरावेत. जी मुले इंग्रजी शिकण्यास येतील त्या दरमहा दर मुलास सहा आणेप्रमाणे फी घेऊन ते कमेटीकडे जमा करावेत. या शाळेला तेव्हा 'अँग्लो-व्हर्नॅक्युलर स्कूल' असे म्हणत असत.

अशी फी ठेवल्यामुळे इंग्रजी शिकण्यास अगदी थोडी मुले आली. तेव्हा जानेवारी १८८० पासून सहा महिनेपर्यंत, सदरहू फी माफ केली. इंग्रजी शिकणाऱ्या मुलांची संख्या पाहून पुढील सहामाहीत फी विचार करण्याचे ठरले. (ता. १६-१-१८८०) पुढे फी माफ करण्याचा निर्णय घेतला.

चौथी इयत्ता सुरू करण्याचा निर्णय इ. स. १८८२ मध्ये घेतला, तेव्हा आणखी दरमहा रु. ५ जास्त मदत देण्याचे नगरपालिकेने ठरविले; म्हणजे या शिक्षणासाठी नगरपालिकेने वर्षाला रु. ३६०/- खर्च करण्याचे कबूल केले.

यानंतर, इंग्रजी शिक्षणाचा खर्च नगरपालिकेच्या उत्पन्नावर पडूं नये असा सरकारी आदेश आल्या-



वरून ता. १६-१-१८८८ ला इंग्रजी शिकणाऱ्या मुलांची फी ठरवून दिली. ती अशी:—

| | |
|---|---|
| पहिली व दुसरी इयत्ता | ४ आणे |
| तिसरी इयत्ता | ६ आणे |
| चौथी इयत्ता | ८ आणे |

इयत्तावार मुलांची संख्या होती, ती अशी:---

पहिली इयत्ता ९ मुले; दुसरी इयत्ता ८ मुले; तिसरी इयत्ता ४ मुले; व चौथी इयत्ता २ मुले; एकूण मुले २३.

इंग्रजी शाळेच्या शिक्षकाने जागेचे भाडे दरमहा रु. २ द्यावे, असा अर्ज केला. तेव्हा नगरपालिकेने ३० जानेवारी १८८९ च्या सभेत ठरविले की, १ फेब्रुवारी १८८९ पासून सदरहू इंग्रजी शाळा कमेटीचे धर्मशाळेत म्हणजे पानवथा वेशीनजीक सरकारी वाड्यास लागून धाकटी धर्मशाळा आहे, त्यात कवाड चौकट बसवून सोय करावी. या कामी रु. १५ खर्चास मंजूर केले आहेत. सामान म्हणजे चाकू, कात्री, रूळ हे सामान द्यावे. रु. २ खर्चास मंजुरी आहे.

इतकी दक्षता घेतली, पण अपेक्षेप्रमाणे इंग्रजी शिकणाऱ्या मुलांची संख्या येईना. इंग्रजी शाळेत मुले सात आहेत. निदान १५ मुले इंग्रजी शिकणारी असावीत, तसे न होईल तर शाळा बंद करावी लागेल, म्हणून मास्तर यास कळवावे. असा निर्णय घेऊन हे प्रकरण पुढच्या तिमाहीवर ठेवले (ता. ३१-१-१८९०)

पांचवी इयत्ता सुरू करण्याची जरूरी इ. स. १९०२ च्या सुमारास भासू लागली. नगरपालिकेपुढे हा प्रश्न आला व ता. १३-१-१९०२ च्या सभेत निर्णय घेतला की, चालू साली चौथे इयत्तेतील सर्व मुले पास झालेली आहेत. पुण्यास प्लेगमुळे मुलांची रहाण्याची सोय नाही. पांचवी इयत्ता सुरू केली म्हणजे मुलांची संख्याही जास्त वाढेल; व येथे थोडक्यात मुलांची शिक्षणाची सोय होईल. करिता, बी. ए. परीक्षा पास झालेला मास्तर पगार रु. २० ते २५ पर्यंत नेमावा व पाचवी इयत्ता सुरू करावी.

ही इंग्रजी शाळा चालविण्यासाठी या दरम्यान महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यात आली असावी. त्या शाळेची स्थिती व हिशेब वगैरे पाहून रु. १००|- मदत करावी असे ठरविले. (ता. २६-१-१८९७)

आणखी असे ठरविले की, शाळेतील क्रामिक पुस्तके देण्यात यावीत. पाचव्या इयत्तेला फी रु. १ चौथ्या इयत्तेला फी. १२ आणे, तिसऱ्या इयत्तेला फी ८ आणे, दुसऱ्या इयत्तेला फी. ६ आणे व पाहिल्या इयत्तेला फी ४ आणे ठेवावी.

उन्हाळ्याची सुट्टी देण्याचा विचार उपास्थित झाला. असा आदेश दिला की, इंग्रजी शाळेचे मास्तर यांचा रिपोर्ट, मे महिन्याची सुट्टी मिळण्याबाबत आला. त्याचा विचार करता इंग्रजी शाळा हायस्कूल नसून फीचे वगैरे नियमही नाहीत. मे महिन्याची सुट्टी दिल्याने, मुलांचे शिक्षणाचे नुकसान होईल. सबब तशी सुट्टी देण्याचे काही कारण नाही. उन्हाळ्याकरिता ता. १ मे पासून ता. ५ जून अखेरपर्यंत सकाळची चार तास शाळा करावी.

इंग्रजी शाळा नोंदविण्याचा निर्णय ता. २३ मार्च १९०९ ला घेतला. मग इंग्रजी शाळेबद्दल ता. १८-२-१९११ च्या सभेत, पुढील आशयाचा ठराव झाला:—नगरपालिकेची इंग्रजी शाळा बरोबर चालत नाही. सबब पुणे नेटिव्ह इन्स्टिटयूशनकडून माहिती मागविली. त्यांचे तर्फे एक गृहस्थ श्री. झांबरे येथे आले. त्यांनी आपल्या अटी कळविल्यावरून खाली लिहिलेले शर्तीवर इंग्रजी शाळा सदर संस्थेच्या ताब्यात द्यावी.

(१) हल्ली इंग्रजी शाळेत असलेले सामान सद-रहू संस्थेस पावती घेऊन देण्यात यावे.

(२) शाळेकरिता, नवीन एडवर्ड म्युनिसिपल हॉलचे पिछाडीस स्टोअरची इमारत तयार आहे, ती होईपर्यंत हल्ली असलेली इंग्रजी शाळेची जागा द्यावी. नवीन जागा तयार झाल्यावर नवीन जागा द्यावी. जागेबद्दल भाडे घेऊ नये.

(३) क्रीडांगणाकरिता नवीन जागेलगत शाळेचे मुख्य अध्यापक पसंत करतील ती जागा द्यावी.

(४) शाळा खर्चाकरिता दरमहा रु. ६० अनुदान नगरपालिकेकडून द्यावे.

(५) पाचवी इयत्ता सुरू झाल्यास, शाळेचे उत्पन्न व खर्च यांचे मान पाहून अनुदान वाढविणे. जरूर दिसल्यास त्याबद्दल नगरपालिका विचार करील.

(६) शाळा नोंदविण्याची तजवीज संस्थेने करावी.

(७) सदर हायस्कूलमध्ये जी फी असेल, तिचे दोन तृतीयांशापेक्षा जास्त ठेवू नये.

(८) ता. १-३-१९११ पासून सदरहू संस्थेने येथे शाळा सुरू करावी.

पुणे दक्षिण विभागाच्या डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरांनी आपल्या अहवाल (नं. १६६-१९११-१२ चा) सदर शाळा 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोशिएशन' कडे दिल्याचा उल्लेख केला आहे.

पोलीस लाइनीची जागा सरकारातून नुकतीच मिळाली आहे. त्यापैकी शिल्लक राहिलेली जागा कलेक्टरसाहेबांचे मार्फत खटपट करून इंग्रजी शाळेच्या इमारतीकरिता मिळवून द्यावी. असा ठराव ता. १६-१-१९२० च्या सभेत झाला.

पुढे ता. २६-३-१९३३ ला सेवासदन संस्थेने चालविलेल्या इंग्लिशच्या वर्गासाठी रु. १०० ग्रँट द्यावी, असा ठराव झाला.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे जे हायस्कूल येथे आहे त्यासाठी द्यावयाच्या अनुदानाच्या अटी ता. २०-४-१९३८ च्या सभेत पुढील प्रमाणात दिल्या—

(१) वरील संस्थेची जी गव्हर्निंग बॉडी आहे, तीवर नगरपालिकेतर्फे एक प्रतिनिधी घ्यावा.

(२) इंग्रजी शाळेच्या पहिल्या तीन इयत्ता गावात आणाव्यात.

(३) शाळेत एकंदर जी मुले असतील, त्या मानाने शेकडा ५ प्रमाणे 'फ्री' (नादार) व शेकडा ५ प्रमाणे 'हाफ् फ्री' (निम् नादार) असे विद्यार्थी नगरपालिके[...] शिफारशीने घेण्यात यावेत. ति[...] अटीत उपस्थित केलेला मुद्दा [...] २६-३-१९३३ च्या सभेत संमत झाले[...] होता.

एम. ई. एस्. हायस्कूलच्या ऑडिटोरिय[...] रु. ४००० चे आर्थिक सहाय्य सरकारचे मंजु[...] द्यावे असा ठराव ता. २८-१-१९५८ च्या [...] झाला. सरकारच्या मंजुरीने हे अनुदान दिले [...] आहे.

## बहिःशाल शिक्षण व्याख्यानमाला

बदललेल्या परिस्थितीत व कल्पनेने, नगरपालि[...] बहिःशाल शिक्षण व्याख्यानमाला व ग्रंथालय वा[...] लय ही दोन कामे शिक्षणाचा एक भाग [...] अलीकडे स्वीकारली आहेत.

पुणे विद्यापीठाच्या अधिपत्याखाली बहि[...] शिक्षणमंडळ १९५२ पासून नगरपालिका [...] आहे. ज्यांना विद्यालयीन अगर महाविद्या[...] शिक्षण घेता आले नाही अशा नागरि[...] निरनिराळ्या विषयात सामान्यज्ञानाची [...] वाढविण्याचा पुणे विद्यापीठातर्फे हा प्रयोग [...] आहे. ह्या योजनेची कल्पना बारामतीचे [...] सेक्रेटरी कै. म. ना. सहस्रबुद्धे [...] त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. मा. तु. शाह [...] सांगितली व कोणतीहि चांगली गोष्ट [...] स्वीकारण्याची त्यांची उपजत प्रवृत्ति असल्याने [...] ह्या योजनेचा पुरस्कार करून बहिःशाल [...] मंडळाचे केन्द्र बारामतीस नगरपालिकेतर्फे सुरू [...] व त्यांनी सुरुवातीपासून जी कार्याची रूपरेषा [...] दिली होती, त्याबरहुकूम सन १९५२ [...] आजपर्यंत ह्या कार्याची धुरा नगरपालिकेचे [...] चीफ ऑफिसर श्री. नि. श्री. कानिटकर हे [...] पहात असून दर वर्षाचा व्याख्यानाचा [...] कार्यक्रम १ ल्या वर्षापासून आजतागायत [...] पडलेला आहे व ह्या केंद्राचे कार्य १ ल्या [...] असल्याबद्दल पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शि[...]



मंडळाच्या अहवालात नमूद केले आहे. हे येथे लिहिण्यास अभिमान वाटतो. प्रथमपासून आजपर्यंत ज्या ज्या विषयावर ज्या ज्या व्याख्यात्यांची व्याख्याने झाली त्याचा तपशील पुढीलप्रमाणे दिला असून त्यावरून असे दिसून येईल की, आजपर्यंत चांगल्या नामवंत व्याख्यात्यांची बहुविध विषयावर व्याख्याने झाली आहेत. व्याख्यानास उपस्थित असलेल्या श्रोत्यांचे संख्येवरून असे दिसून येईल की, ह्यापेक्षा जास्त श्रोत्यांची उपस्थिती असणे आवश्यक आहे.

नगरपालिका पुणे विद्यापीठास वार्षिक रु. १०० वर्गणी देते व त्याचे प्रीत्यर्थ वर्षास पाच विषयावर १५ व्याख्याने पुणे विद्यापीठातर्फे होतात. व्याख्यात्यांचा जाण्यायेण्याचा १ ल्या वर्गाचा प्रवासखर्च व दर दिवसाचा भत्ता पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येतो. ह्यावरून नागरिकांच्या सर्वसामान्य शिक्षणाकडेहि नगरपालिकेने आस्थेने व आपुलकीनेच लक्ष पुरविल्याचे दिसून येते.

परिशिष्ट १

# बहिःशाल व्याख्यानमाला, वक्ते व त्यांचे विषय

बारामती नगरपालिकेने, पुणे विद्यापीठाची बहिःशाल शिक्षणमंडळाची शाखा इ. स. १९५२ पासून आतापर्यंत चालविली आहे. या अवधीत येथे आलेले महनीय वक्ते व त्यांचे विषय यांची यादी पुढे दिली आहे :—

सुरुवातीपासून आजपर्यंत ज्या ज्या व्याख्यात्यांची ज्या ज्या विषयावर व्याख्याने झाली ती खालील...

### सन १९५२-५३

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थि... |
|---|---|---|---|---|
| १ | ५-१०-५२ | श्री. ना. अ. गोरे एम्. ए. डि. लिब. | पुणे विद्यापीठाची जनता शिक्षणाची योजना | |
| २ | १-११-५२<br>२-११-५२ | प्रा. चिं. वि. जोशी | गौतमबुद्ध चरित्र व तत्त्वज्ञान | |
| ३ | ८-११-५२ | प्रा. व्ही. एन्. कुलकर्णी | कृत्रिम खते | |
| ४ | २२-११-५२<br>२३-११-५२ | प्रा. कु. शांता निपाणकर | रसायनशास्त्र व स्वयंपाकघर | |
| ५ | ६-१२-५२ | प्रा. डि. एस. जोग | विज्ञान व तत्त्वज्ञान | |
| ६ | १३-१२-५२<br>१४-१२-५२ | प्रा. एल. बी. हरोळीकर बी. ए., एलूएल्. बी., बी. टी. | मुलांचा मनोविकास | |
| ७ | १७—१-५३ | प्रा. गं. भा. निरंतर | संत वाङ्मयाची सामाजिक पार्श्वभूमि | |

### सन १९५३-५४

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थि... |
|---|---|---|---|---|
| १ | १४—२-५३<br>१५—२-५३ | प्रा. श्री. वि. गाडगीळ एम्. ए., एलूएल्. बी. | कायदे पाळणे व लोकशाही | |
| २ | २१—२-५३<br>२२--२-५३ | डॉ. एस. के. जतकर डी. एस्. सी. | गुळावरील संशोधन | |
| ३ | ४--४-५३<br>५--४-५३ | प्रा. सी. आर. पोतनीस, एम्. ए. | प्रागैतिहासिक संस्कृति | |
| ४ | १६-५--५३<br>१७-५-५३ | प्रा. रा. म. गोखले एम्. ए., एलूएल्. बी. | भारताची पहिली पंचवार्षिक योजना. | |



| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ५ | ६--६-५३<br>७--६-५३ | प्रा. व. म. शिरसीकर, एम्. ए. | सोव्हिएट क्रांति व नवचीनची क्रांति | १०२ |

### सन १९५४-५५

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २३-१०-५४<br>२४-१०-५४ | पं. रघुनाथशास्त्री कोकजे | हिंदु विधेयकावरील वाद | ८१ |
| २ | २७-११-५४<br>२८-११-५४ | प्रा. वा. शं. कुलकर्णी एम्. एम्सी. | वनस्पति तुपाचे अंतरंग | ७९ |
| ३ | ११-१२-५४<br>१२-१२-५४ | प्रा. मो. स. भावे एम्. ए. | तेजी-मंदी आणि सरकारी अपव्यय धोरण | ५७ |
| ४ | १--१-५५<br>२--१-५५ | प्रा. ल. ब. हरोळीकर, एम्. ए., एलूएलू बी., बी. टी., | वृद्धांचे मानसशास्त्र | ४३ |
| ५ | २२--१-५५<br>२३--१-५५ | डॉ. मो. ना. नातू, बी. एस्सी. एम्. बी. बी. एस्. | लोकशाहीकरता शिक्षण | ३९ |
| ६ | ५--२-५५ | श्री. ना. वा. तुंगार | अशोकाचा राजधर्म व जैन संस्कृति | ७५ |

### सन १९५५-५६

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २७—१-५६ | श्री. नी. शं. नवरे, बी. ए., बी. टी. | तोंडचे वाङ्मय | ५९ |
| २ | २--२-५६ | श्री. गो. वि. देवस्थळी | सवड नसल्याने निमंत्रण नाकारले | |
| ३ | | एम्. ए., पीएच्. डी. | भारताची मूलभूत एकराष्ट्रीयता | ४९ |
| ४ | १०--३-५६ | श्री. अ. वि. नाईक<br>सुमनताई गोरे, बी. ए., बी. टी. | सामाजिक व राजकीय सुधारणा व स्त्री जीवन | ३८ |
| ५ | ५—५-५६ | श्री. भा. र. कुलकर्णी, बी. ए. | विनोद आणि जीवन | |

### सन १९५६-५७

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | १०--८-५६<br>११--८-५६<br>१२--८-५६ | श्री. ग. ह. खरे | महाराष्ट्राची चार दैवते | ४३ |
| २ | २--३-५७<br>३--३-५७ | श्री. न. गं. आपटे, बी. एजी. एम्. एस्सी. | महाराष्ट्रातील पाणीपुरवठा | २६ |
| ३ | २४--३-५७<br>२५-३—५७ | प्रा. कृ. वें. गजेन्द्रगडकर, एम्. ए. | समाजधुरीणत्वाचे मानसशास्त्र दृष्टया विवेचन | ६६ |
| ४ | २६--३-५७<br>२०--४-५७ | प्रा. गो. ह. महाजन, एम्. ए. | १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्राचे समाजसुधारक. | ३२ |

## सन १९५७-५८

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थि |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २५--१-५८ | प्रा. प्र. नि. नवरे, एम्. ए. | बुद्धिवाद आणि सामाजिक सुधारणा | |
| | २६--१-५८ | | | |
| | २७--१-५८ | | | |
| २ | ८--३-५८ | सौ. सरलाबाई साने, बी. ए., बी. टी. | अपंग मुलांचे शिक्षण | |
| | ९--३-५८ | | | |
| ३ | १६—३-५८ | प्रा. के. खं. पाकणीकर बी. ए., एम्. एड्. | नाठाळ मुले कशी सुधारावी | |
| | १७—३-५८ | | | |
| | १८--३-५८ | | | |
| ४ | १९--४-५८ | प्रा. गो. ह. महाजन एम्. ए. | अशोक व अशोक काल | |
| | २०—४-५८ | | | |
| ५ | ३--५-५८ | प्रा. म. ना. अदवंत, एम. ए., बी. टी. | भागवत धर्माचे मंदिर | |

## सन १९५८-५९

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थि |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २३--८-५८ | श्री. एम. व्ही. मदाने, एम. ए., एल्एल्. बी. | सहकारी पद्धतीने शेती व शेती मालाची योग्य विक्री | |
| | २४--८-५८ | | | |
| २ | ४-१०-५८ | डॉ. न. का घारपुरे, एम. ए., एल्एल्. बी. पीएच्. डी. | महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेची स्थित्यंतरे | |
| | ५-१०-५८ | | | |
| | ६-१०-५८ | | | |
| ३ | १०-१०-५८ | श्री. द. ग. येरवडेकर, एम. ए., एल्एल्. बी. | भारतातील न्यायमंदिरे व न्यायदानपद्धति | |
| | ११-१०-५८ | | | |
| | १२-१०-५८ | | | |
| ४ | १७-१०-५८ | प्रा. श्री. वा. खेर. एम. ए., एम. एड्. | परदेशातील काही शैक्षणिक प्रयोग | |
| | १८-१०-५८ | | | |
| | १९-१०-५८ | | | |
| ५ | ७—१-५९ | प्रा. शं. वा. दांडेकर | श्रीज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान | |
| | ८—१-५९ | | | |
| | ९--१-५९ | | | |

## सन १९५९-६०

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थि |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २--१-६० | प्रा. भा. पं. बहिरट एम. ए. | एकनाथ जीवन व वाङ्मय | |
| | ३--१-६० | | | |
| | ४--१-६० | | | |
| २ | ११-१-६० | श्री. भा. वा. सावंत, बी. ए., एल्एल्. बी. एम. एल. ए. | सहकारी शेती | |
| | १२-१-६० | | | |
| | १३-१-६० | | | |



| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
| --- | --- | --- | --- | --- |
| ३ | १६-१-६० | श्री. ना. कृ. कट्टी | आदर्श स्थानिक स्वराज्य संस्था | ४७ |
| | १७-१-६० | | | ४० |
| | १८-१-६० | | | २४ |
| ४ | १९-२-६० | प्रा. वि. वा. कोगेकर, एम्. एस्सी. | कृत्रिम उपग्रह आणि विश्वसंचार | ५५ |
| | २०-२-६० | | | १६७ |
| | २१-२-६० | | | ८८ |
| ५ | २५-३-६० | डॉ. भा. पं. मंगुडकर एम्. ए; पीएच्. डी. | आधुनिक महाराष्ट्रातील विचार-प्रणालीचा इतिहास | ७४ |
| | | | | २२ |

## सन १९६०-६१

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | ५-११-६० | प्रा. द. के. सोहोनी, एम्. एस्सी., एलएल. बी. | रेडिओ रिसीव्हर सेट कसा चालतो | ४५ |
| | ६-११-६० | | | ७१ |
| | ७-११-६० | | | ४२ |
| २ | ११-११-६० | प्रा. वा. सि. काळे, एम्. कॉम्. | भारतीय शेतीचे अर्थशास्त्र | ५६ |
| | १२-११-६० | | | ६३ |
| | १३-११-६० | | | २२ |
| ३ | २६-११-६० | प्रा. श्री. शं. पतके, एम्. ए., बी. टी. | संयुक्त राष्ट्र संघटना व भारत | ५५ |
| | २७-११-६० | | | ४७ |
| | २८-११-६० | | | २४ |
| ४ | २-१२-६० | श्री. न. का. घारपुरे, एम. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी. | मराठी वाङ्मय संपदा. | ७४ |
| | ३-१२-६० | | | ९० |
| | ४-१२-६० | | | ४३ |
| ५ | १५—६-६१ | श्री. दु. का. संत एम्. ए., पीएच्. डी. | अर्वाचीन महाराष्ट्रातील स्त्री-जीवनाचा विकास. | २५ |
| | १६—६-६१ | | | ६२ |
| | १७—६-६१ | | | ३२ |

## सन १९६१—६२

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | २७-१०-६१ | श्री. नी. शं. नवरे, बी. ए., बी. टी. | मोरोपंत चरित्र, विद्वत्त्व, कवित्व आणि महत्त्व, | २६ |
| | २८-१०-६१ | | | १४ |
| | २९-१०-६१ | | | २१ |
| २ | २४-१२-६१ | सौ. विजयाबाई पेंडसे | संसारातील संस्कारांचे महत्त्व. | ६३ |
| | २५-१२-६१ | | | ४४ |

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ३ | २३—६-६२ | प्रा. भा. आ. पाटील | समता, स्वातंत्र्य व बंधुत्व. | ५४ |
| | २४—६-६२ | | | ५१ |
| | २५—६-६२ | | | |
| ४ | २८—६-६२ | प्रा. द. के. सोहोनी, | बोलपटातील ध्वनि लेखन व | २८ |
| | २९—६-६२ | एम्. एस्सी., एल्एल्. बी. | ध्वन्युत्पादन. | ११ |
| | ३०—६-६२ | | | |

सन १९६२-६३

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | १९—९-६२ | श्री. नी. शं. नवरे, | जीवनातील आनंदाची मीमांसा. | ३९ |
| | २०—९-६२ | बी. ए. (ऑन.) | | ४५ |
| | २१—९-६२ | | | ५५ |
| २ | ३-१०-६२ | प्रा. चिं. वि. जोशी, | हास्य आणि विनोद. | १९१ |
| | ४-१०-६२ | एम्. ए. | | १५३ |
| | ५-१०-६२ | | | १२१ |
| ३ | १२—३-६३ | प्रा. डॉ. बा. मो. कानिटकर, | साखर, शोध, इतिहास आणि | ३५ |
| | १३—३-६३ | एम्. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी. | उत्पादनाचा व्यवसाय. | ३० |
| | १४—३-६३ | | | २६ |
| ४ | १२—४-६३ | श्री. श्री. वि. गाडगीळ, | मूलभूत हक्क | २६ |
| | १३—४-६३ | एम्. ए., एल्एल्. बी. | | २५ |
| | १४—४-६३ | | | १२ |

सन १९६३-६४

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | ७—३-६४ | श्री. वि. वि. गोखले, | विज्ञानाचे विस्मय मंदिर | ८९ |
| | ८—३-६४ | एम. एस्सी., एम्. सी. | | ५८ |
| | ९—३-६४ | एच. सी. आय. ए. एस्. | | ४७ |
| २ | १२—३-६४ | श्री. ग. ह. खरे, पुणे. | शिवाजी, कार्य, स्वभाव, | ५९ |
| | १३—३-६४ | १३२१ सदाशिव पेठ. | गुणदोष, महत्त्वमापन. | ६८ |
| | १४—३-६४ | | | १५ |
| ३ | २५—३-६४ | श्री. मा. वि. गुळवणी, | श्रीमान् भगवत्गीता | ८२ |
| | २६—३-६४ | बी. ए., एल्एल्. बी. | | ८५ |
| | २७—३-६४ | इस्लामपूर. | | ८४ |
| ३ | ३—४-६४ | श्री. गो. शं. राहिरकर, | संत तुकाराम चरित्र, काव्य व कार्य | ९७ |
| | ४—४-६४ | बी. ए., एल्एल्. बी. | | |
| | ५—४-६४ | ७२२ शुक्रवार पेठ. | | |



| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ४ | १५-४-६४ | श्री. भा. गो. बापट, | भारतीय संरक्षणाचा प्रश्न | ९९ |
| | १६-४-६४ | बी. एससी., एल्एल्. बी, पीएच्. डी. | | १३० |
| | १७-४-६४ | | | १२२ |

सन १९६४-६५

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २-१०-६४ | श्री. वि. वि. भागवत, | पंडित जवाहरलाल नेहरू | ६६ |
| | ३-१०-६४ | एम्. ए., एल्एल्. बी., चाळीसगाव | जीवन आणि कामगिरी | ७० |
| | ४-१०-६४ | | | ३४ |
| २ | ९-१०-६४ | डॉ. मो. वि. पटवर्धन, | अणुबॉंब स्फोट | ४२ |
| | १०-१०-६४ | बी. एससी., एम्. बी. बी. एस्. | दुष्परिणाम व संरक्षण | ५१ |
| | ११-१०-६४ | | | ५० |
| ३ | २३-१०-६४ | भा. पं. बहिरट, | ज्ञानेश्वराचे तत्त्वज्ञान | ४३ |
| | २४-१०-६४ | एम्. ए. | | ४८ |
| | २५-१०-६४ | | | १९ |
| ४ | १०--२-६५ | प्रा. म. वि. सहस्रबुद्धे, | मराठ्यांच्या इतिहासातील | ३२ |
| | ११--२-६५ | एम्. ए., बी. टी. | तेजस्वी स्त्रिया | ३० |

सन १९६५-६६

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २९-११-६५ | श्री. के. बी. दीक्षित, | ग्रंथालये | १९ |
| | ३०-११-६५ | डिप्. लिब्. | | ५८ |
| | १--१२-६५ | | | १७ |
| २ | १०-१२-६५ | श्री. ग. वा. जोशी, | भारताचे भाग्यविधाते | ५१ |
| | ११-१२-६५ | बी. ए., एल्एल्. बी. | टिळक, गांधी, नेहरू | ३० |
| | १२-१२-६५ | | | ३१ |
| ३ | ७—१-६६ | श्री. शा. छो. शाह, | काळजी करण्याचा स्वभाव | ३९ |
| | ८—१-६६ | बी. कॉम्. | कसा घालवावा. | ५९ |
| | ९-१—६६ | | | ४२ |
| ४ | १७-१२-६५ | प्रा. द. ग. कोपरकर | शब्द व अर्थ यांचा अद्भुत इतिहास | ३३ |
| | १८-१२-६५ | | | ४२ |
| | १९-१२-६५ | | | १८ |
| ५ | १--३-६६ | श्री. रा. स. ढवळे, वकील | नागरिकांचे हक्क व कर्तव्ये | २३ |
| | २--३-६६ | | | १९ |
| | ३--३-६६ | | | १९ |

सन १९६६-६७

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २७-११-६६ | प्रा. पु. ग. रारावीकर, | परकीय चलनाचा प्रश्न | ६९ |
| | २८-११-६६ | एम्. ए. | व रुपयाचे अवमूलन | ६० |
| | २९-११-६६ | | | ४५ |

| अ. नं. | तारीख | व्याख्याते | विषय | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| २ | ३--१-६७ | प्रा. ना. द. शिरोळकर, | जागतिक साम्यवादाचे | ५४ |
| | ४--१-६७ | एम्. ए., एलएल्. बी. | बदलते स्वरूप | ४२ |
| | ५--१-६७ | | | ३१ |
| ३ | २८-२-६७ | प्रा. भा. ग. महाजन, | जीवन विकास आणि | ३८ |
| | १—३-६७ | एम्. एस्सी. | विभूति-पूजन | ४६ |
| | २--३-६७ | | | ५१ |
| ४ | १२-३-६७ | श्री. ज. र. देशमुख, | भारताच्या शेतीचा भूत, | ३४ |
| | १३-३-६७ | बी. एस्सी. | भविष्य व वर्तमानकाळ | २१ |
| | १४-३-६७ | | | १७ |
| ५ | २२-३-६७ | प्रा. मी. अ. कुलकर्णी, | पानिपतचे युद्ध व भाऊसाहेब | २८ |
| | २३-३-६७ | एम्. ए. | पेशवे | ५७ |
| | २४-३-६७ | | | ४२ |

—



बारामती रेल्वे स्टेशन, सेंट्रल रेल्वे



बारामती एस् टी स्टॅण्ड



ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस् मार्केट कमेटी, बारामती



गुरांचा बाजार, मार्केट यार्ड



बारामती इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी प्रा. लिमिटेड



पेशव्यांचे सावकार बाबूजी नाईक यांचा वाडा, प्रवेशद्वार



श्याम टॉकीज् बारामती



महात्मा गांधी बालक मंदिर - बारामती



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे बारामती कॉलेज



रिमांड होम-बारामती



ग्राम दैवत सिद्धेश्वराचे मंदिर



अप्पर भाग प्राथमिक शाळा व त्यापलीकडे निरा कॅनॉल सोसायटी खरेदी विक्री संघाचे गोडाऊन



महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल, बारामती



श्रीशाहू छत्रपती हायस्कूल, बारामती



ऑस्ट्रेलियन मिशनचे हायस्कूल व प्राथमिक शाळा



श्री जैन दिगंबर पंचांची चाळ व शेजारी जैन मंदिर

श्री १०८, मुनिसुव्रत भगवान्



बालाजीचे मंदिर

श्री बालाजी महाराजांची मूर्ती



देवळे यांचे राम मंदिर



श्रीरामाची मूर्ती



नामदेव शिंपी समाज विठोबा मंदिर



विठोबा रखुमाईची मूर्ती



पानवठा वेशीजवळील मारुती मंदिर



हनुमान् मंदिर



श्री. उघडा मारुतीचे मंदिर ( तांदुळवाडी वेस )



माळावरील देवीचे मंदिर
येथे नवरात्रात नऊ दिवस दर्शनोत्सुक भक्तांची गर्दी असते.



माळावरील देवीची मूर्ती



भिगवण चौक मारुती व दुर्गादेवी मंदिर



दुर्गादेवीची मूर्ती



श्री रामेश्वर मंदिर



श्री रामेश्वर मंदिरांतील पिंड (शाळुंका)



श्री. पांढरीच्या महादेवाचे मंदिर



श्री पांढरीच्या महादेवाची पिंड (शाळुंका)



श्री जैन श्वेतांबर मंदिर



मंदिरांतील मूर्ती

## बारामती



श्री महादेव मंदिर



सिद्धेश्वराची पिंड ( शाळुंका )



सिद्धेश्वर देवळातील पराडकरांचा दत्त



सिद्धेश्वरापुढील भव्य व प्रसिद्ध नंदी




श्री काशीविश्वेश्वर मंदिर ( कसबा ) व कऱ्हामाई ज्या मंदिरात श्रीधर स्वामींनी शिवलीलामृत ग्रंथ लिहिला ते मंदिर.



काशी विश्वेश्वराचे देवळांतील गणपती, येथे बसून श्रीधर स्वामींनी शिवलीलामृत ग्रंथ लिहिला.

बारामती



श्री काशी विश्वेश्वर मंदिरातील पिंड (शाळुंका)



श्री काशी विश्वेश्वर मंदिरातील राशीचक्र




शिवाजी उद्यान कसबा बारामती




म्यु. पल भाजी बाजार (मंडई) बारामती.



पाण्याची टाकी



स्वातंत्र्य स्तंभ



म्यु. पल सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल बारामती व दानशूर रा. ब. गो. ग. शेंबेकर यांनीं वडील व मातुश्री यांचे स्मरणार्थ प्रसूतिगृह व डोळ्यांचा दवाखाना ह्यासाठीं बांधून दिलेली इमारत. ( दुमजली )



म्यु. पल गुरांचा दवाखाना, बारामती



**बारामती नगरपालिका सार्वजनिक वाचनालय**




**म्यु. पल माता-बाल-संगोपन केंद्र, बारामती**
**नैसर्गिक दूध वाटप व औषधोपचार.**



## ग्रंथालय व वाचनालय

ग्रंथालयाविषयी शक्य तितके सहानुभूतीचे धोरण नगरपालिकेकडून स्वीकारले गेल्याचे आढळून येते. आक्टोबर ता. १६।१०।१८८९ ला असा ठराव केला की नेटिव्ह जनरल लायब्ररीकडे म्युनीसिपालिटीची वर्गणी दरसाल रु. १५ देण्यात येते. दुसरे कोणी वर्गणीदार नाहीत. साठी तीन महिन्यांचे आत दुसरे वर्गणीदार मिळवून लायब्ररीची व्यवस्था नीट चालेल, तर म्युनिसिपालिटीची वर्गणी पुढे द्यावी, नाहीतर बंद करण्यात यावी.

इ. स. १८९२ मध्ये लायब्ररीकडून नगरपालिकेकडे वर्गणी व मदत मिळावी. तसेच लायब्ररीचे सामान कमेटीकडे आहे ते मिळावे, अशी मागणी आली असता ठरविले की, सामान द्यावे व देणगी रु. २० मंजूर-पुढच्या वर्षी वर्गणी रु. ४० व मदत म्हणून रु. २० द्यावे असा ठराव झाला.

लायब्ररी हा विषय नगरपालिकेच्या अगदी आपुलकीचा विषय होता. हे पुढील ठरावावरून लक्षात येईल:– म्युनिसिपालिटीचे स्थापनेपासून लायब्ररीचे घड्याळ वापरीत असे. नेटिव्ह जनरल लायब्ररीकडे म्युनीसिपालटीनें लायब्ररी दिली, तेव्हां घड्याळ तिकडे गेले. तरी ऑफिससाठी एक घड्याळ रु. १५ पर्यंत घ्यावे.

मध्यंतरी बरीच वर्षे वाचनालयाचा मागोवा मिळत नाही. येथील ऑस्ट्रेलियन मिशनचे प्रमुख मि. स्टूटन हे नगरपालिकेचे एक सभासद असत, त्यांनी चौकातील नगरपालिकेच्या इमारतीची माडी सार्वजानिक वाचनालयासाठी मागितली होती. त्याप्रमाणे ती माडी द्यावी असा ठराव ता. २०–१०–१९११ ला झाला. याबाबत आधिक चौकशी करता कळले की, हे वाचनालय म्हणजे नेटिव्ह जनरल लायब्ररी नव्हे. सध्या सिनेमा रोडला जे वाचनालय आहे, त्याचा तो प्रारंभ होता.

राज्यारोहण–उत्सव निधीतून शिल्लक राहील ती नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या इमारतीसाठी खर्च करावी, असाही ठराव या वेळी झाला होता. ता. २-१२-१९११ पुढे नगरपालिकेकडे जागा मागितली असता नगरपालिकेचे मालकीची गुनवडी वेशीलगतची धर्मशाळा नादुरुस्त स्थितीत आहे, ती दुरुस्त करून खालील शर्तींवर भाड्याने द्यावी असे ठरविले.

१ ) दरमहा भाडे १।– ठरवावे

२ ) भाडेचिठ्ठीची मुदत ७ वर्षांची असावी.

३ ) किरकोळ दुरुस्ती, रंगसफेती वाचनाल्याने करावी.

४ ) वाचनालयाखेरीज अन्य कामाकडे उपयोग करू नये.

ही मुदत वेळोवेळी वाढविली गेली.

इ. स. १९१३ मध्ये नेटिव्ह जनरल लायब्ररी शिक्षण खात्याकडे सरकारी नियमाप्रमाणे नोंदविली गेली. (रजिस्टर ) तेव्हा वाचनालयाचे एकूण सभासद २१ होते. दरमहा रु. १ वर्गणी देणारे ३, दरमहा ८ आणे वर्गणी देणारे ५, दरमहा ४ आणे वर्गणी देणारे १०, आणि दरमहा २ आणे वर्गणी देणारे ३. अशा रीतीने वर्गणीचे दरमहा उत्पन्न रु. ८॥ असे. यावेळी संस्थेला अनुदान असे कोणाचे नव्हते. टाइम्स ऑफ इंडिया व इतर नियतकालिके घेण्यासाठी बारामती नगरपालिका वर्षाला रु. ६० खर्च करीत असे. पांच सभासदांची एक व्यवस्थापक समिती असे.

वर म्हटल्याप्रमाणे राज्यारोहण समारंभ निधीतून जी शिल्लक राहिली, तीमधून ह्या वाचनालयासाठी एक इमारत बांधण्याचे प्रयत्न झाले. आराखडे वगैरे तयार झाले. पण माशी कोठेतरी शिंकली न कळे, पण योजना मूर्त स्वरूपात आली नाही हे खरे.

संस्थेचे ' नेटिव्ह जनरल, लायब्ररी, हे नाव बदलून ते ' सार्वजनिक वाचनालय,' बारामती असे करण्याचा ठराव २६ मार्च १९३९ च्या सभेत संमत झाला. त्याचे अगोदर येथील एक जुने वकील श्री. रामचंद्र गणेश घारपुरे यांची चिटणीसपदी निवड झालेली होती. व्यवस्थापक समिती अशी काही यावेळी नव्हती. काही महत्त्वाच्या गोष्टी उपस्थित झाल्या म्हणजे खास सर्वसाधारण सभा घेऊनच निर्णय घेण्यात येत.

इ. स. १९२३-२४ मध्ये नगरपालिकेचे अनुदान रु. ९२ करण्यात आले.

श्री. घारपुरे यांनी या वेळच्या ग्रंथालयाच्या कारभाराविषयी असे सांगितले की, तेव्हा वाचनालय दिवसातून एकदाच उघडे ठेवले जात असे. १ रु. वर्गणी देणारे ५०।६० वर्गणीदार असत. 'सिल्व्हर ज्युबिली लॉन टेनिस क्लब' च्या शेजारची जागा नगरपालिकेने दरमहा रु. १ अशा नाममात्र भाड्याने वाचनालयासाठी दिली होती. या जागेत सध्या तालुका काँग्रेसचे कार्यालय भाड्याने आहे. वाचानालय इ. स. १९१० मध्ये सुरू झाले असेच आता मानले जाते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन दिले गेले. बारामती सार्वजनिक वाचनालय हे तालुका वाचनालय म्हणून मध्यवर्ती ग्रंथपालांनी मान्य केले. तेव्हा संस्थेचे उत्पन्न इ. स.१९४९-५० मध्ये होते ते असे—

| | |
|---|---|
| सभासदांची वर्गणी | रु. १२३-८-० |
| सरकारचे अनुदान | रु. ४५०-०-० |
| नगरपालिकेचे अनुदान | रु. ९२-०-० |
| ठेवीवरील व्याज | रु. ५१-०-० |
| इतर उत्पन्न | रु. ८१-९-० |

पुस्तकांची संख्या ७६० होती.

अशा रीतीने हे वाचनालय चालू लागल्यावर इ. स. १९५२ मध्ये बारामती नगरपालिकेने ते चालविण्यास घेण्याचा निर्णय घेतला. ता. १ एप्रिल १९५२ पासून नगरपालिकेने वाचनालयाचा ताबा घेतला. वाचनालय सल्लागार समितीची नेमणूक करताना संस्थेचे जुने चिटणीस श्री. रा. ग. घारपुरे हे त्या समितीचे एक सभासद असावेत, असा ठराव केला. श्री. आर. जी. भागवत असिस्टंट क्यूरेटर ऑफ लायब्ररीज, पुणे यांना हे स्थित्यंतर कळल्या-नंतर श्री. घारपुरे यांनी केलेल्या कार्याबद्दल गौरवपर उद्गार काढले व आता वाचनालयाला पैशाची उणीव भासणार नाही, अशी श्रद्धा व्यक्त केली.

सध्या वर्गणीदारांची संख्या ३१५ आहे. त्याचे दोन वर्ग आहेत:–वर्ग १:–महिना ८ आणे वर्गणी देणारे, वर्ग २ महिना ४ आणे देणारे, नगरपालिकेच्या सेवकांना 'अनामत' घेण्याची अट माफ आहे. बाकीचे नियम सारखेच. वाचनालयाचा जो विभाग आहे तेथे रोज सर्वसाधारणपणे २५० ते २७५ वाचक येतात. ग्रंथ वाचण्यासाठी नेणारांची संख्या सुमारे ६० ते ७० आहे. पुस्तकांची संख्या आता ४९०८ आहे. इंग्लिश पुस्तकांची संख्या ९१७ आहे. खाजगी संस्थेकडून वाचनालय घेतले तेव्हा (इ. स. १९५२) पुस्तकांची संख्या ९७८ होती. दरवर्षी रु. १००० ची नवीन पुस्तके घेतली जातात. पुस्तकांची स्थूल मानाने वर्गवारी अशी केली जाते:–कादंबरी, इतिहास, विज्ञान व शास्त्र, चरित्र–वाङ्मय, काव्य इत्यादि. बाल वाङ्मयाचा विभाग स्वतंत्र असून हिंदी व इंग्रजी भाषेतील पुस्तकेही वरीलप्रमाणे वर्गीकृत आहेत.

नगरपालिका वाचनालयासाठी सध्या एकूण (इ. स. १९६५–६६) रु. ५१२५–३६ पैसे खर्च करीत आहे. सभासदांची एक वाचनालय सल्लागार समिती असते. आता सरकारी अनुदान वर्षाला रु. १००० मिळते.

# शहर विकास व नियोजन

नगरपालिकांच्या नव्या कायद्यात 'शहर विकास व नियोजन समिती' नेमण्याची तरतूद आहे. जी निरनिराळी कामे आहेत त्यांची कशी वाढ झाली, होते व होईल, याचा विचार म्हणजे शहराचा विकास व त्यासाठी नियोजन होय. इतिहासाला पहिले पान माहीत नाही. तसेच विकास योजनेला समाजाच्या वाढीला शेवटचे पान माहीत नाही. पूर्णविराम नाही. अशा कल्पनेतूनच ह्या तरतूदींचा जन्म झाला आहे. तो उचित असाच होय.

बदलत्या काळाची पावले ओळखून आपले कार्यक्रम आखावेत; नाहीतर तो काळपुरुष सर्व समाजाला चिरडून भरडून टाकील, हे समजून घेणे, म्हणजेच 'विकास व त्यासाठी नियोजन' होय. लावी पक्षीण 'उद्या' घरटे बांधण्याचा विचार करते, तद्वतच काही आवश्यक कामे नगरपालिकेच्या यंत्रणेकडून 'उद्या' करण्याचे मनसुबे होत असतात. अखेर लोकांना स्वतःच स्वतःवर रागावण्याचा प्रसंग येतो.

या बाबतीत नगरपालिकांना मदत व्हावी व जरूर ते मार्गदर्शन व्हावे, म्हणून राज्य सरकारने एक कायदाही (टाउन प्लॅनिंग ॲक्ट) केला आहे. त्यासाठी एक स्वतंत्र सरकारी यंत्रणाही राबत आहे. इ. स. १९१५ मध्ये प्रथम टाऊन प्लॅनिंग ॲक्ट झाला होता. त्याअन्वये एक योजना तयार करण्याचा संकल्पही बारामती नगरपालिकेने केला होता. तो फलद्रूप झाला नाही. तेव्हाच्या ठरावात म्हटले होते की, हल्लीचा नकाशा होऊन ३० वर्षे झाली आहेत. नकाशाचे स्केल लहान असल्यामुळे, त्यानंतर वेळोवेळी झालेल्या घडामोडी नकाशावर उतरविणे शक्य झाले नाही. म्हणून शहराची पुनः 'सर्व्हे' होणे जरूर आहे.

तेव्हाची परिस्थिती काय होती हे यावरून लक्षात येईल. मूळ विकास योजना कायदा फलदायी झाला नाही म्हणून इ. स. १९५४ मध्ये तो रद्द करून पुनः एक कायदा केला. त्याअन्वयेच आता कारभार सुरू आहे. या कायद्यातील तरतूदीप्रमाणे, नगरपालिकेने प्रथम शहरासाठी एक विकास योजना (डेव्हलपमेंट प्लॅन) तयार करण्याचा उद्देश जाहीर करावयाचा असतो. बारामती नगरपालिकेने ता. ६-४-१९५८ ला ठराव करून हे उद्दिष्ट जाहीर केले. नंतर तो निर्णय राज्यसरकाच्या 'राज्यपत्रातही (गॅझेटमध्ये) प्रसिद्ध करण्यात आला. (१६ आक्टोबर १९५८) वर्तमानपत्रातूनही त्याची प्रसिद्धि केली होती. त्यानंतरही सदरहू कायदा अपुरा वाटू लागल्याने सरकारने महाराष्ट्र ॲक्ट नं. ३७ सन १९६६ चा केला असून, त्यास 'महाराष्ट्र रीजनल ॲंड टाउन प्लॅनिंग ॲक्ट' असे नाव दिले आहे.

नगरपालिकेजवळ हे काम करण्यासाठी आवश्यक ती तंत्रज्ञाची यंत्रणा नाही, म्हणून राज्य सरकारच्या 'टाउन प्लॅनिंग ॲंड व्हॅल्युएशन डिपार्टमेंट' कडे हे काम सोपविले. नागरिकांची एक सभा घेऊन (२ नोव्हेंबर १९५८) ह्याचे उद्दिष्ट समजावून सांगण्यात आले. या कामाशी सहकार्य करण्याची व सूचना करण्याची विनंती नागरिकांना करण्यात आली. या सभेत नागरिकांकडून आलेल्या सूचना व लेखी शिफारशी आणि निरनिराळ्या सरकारी व बिन-सरकारी खात्यानी त्यांच्या गरजाबद्दल कळविलेली माहिती, लक्षात घेऊन विकासयोजनेचा कच्चा आराखडा राज्य सरकारच्या उपरिनिर्दिष्ट खात्यातील तंत्रज्ञानी तयार केला. हा कच्चा मसुदा नगरपालिकेने ४ मे १९५९ ला प्रसिद्ध केला व तो राज्यसरकारच्या 'राज्यपत्रात' ता. १४ मे १९५९ ला प्रसिद्ध झाला. कच्चा आराखडा पाहून नागरिकांना याविषयी सूचना करण्याची विनंती केली होती. जवळ जवळ २२५ सूचना आल्या. त्या सर्वांचा नगरपालिकेच्या सभेत विचार होऊन ता. २५ फेब्रुवारी १९६१ च्या सभेत त्यावर योग्य त्या दुरुस्त्यासह शिक्कामोर्तब करून राज्यसरकारकडे तो मसुदा मंजुरीसाठी पाठविला.

मूळचा कच्चा आराखडा आणि नगरपालिकेने त्यावर सुचविलेल्या दुरुस्त्या वा बदल या सर्वांचा

विचार करून राज्य सरकारने ह्या शहर विकास योजनेला मंजुरी दिली. त्याबाबतचे सरकारी परि- पत्रक ता. ३०-३-१९६३ च्या राजपत्रात प्रसिद्ध झाले.

ता. २५।८।१९६२ ला नगरपालिका प्रतिनिधी मंडळाची सभा होऊन असे ठरले की, शहर विकास योजनेच्या नकाशात नमूद केल्याप्रमाणे योजनेपैकी सालवार कोणकोणती कामे दरवर्षी हाती घेऊन पार पाडावीत, याबाबतच्या १० वर्षांचा कार्यक्रम परिशिष्ट जी (सरकारने सुचविल्याप्रमाणे) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मंजुरी आहे.

पहिल्या वर्षांचे कार्यक्रमाचा अंदाजी खर्च रु. ३३,१८० धरला होता. (ता. २९।१२।१९६३)

विकास योजनेचा आराखडा तयार करताना प्रथम सध्याच्या परिस्थितीची पहाणी करून, ती- मधील गुणदोषांची छाननी केली जाते. हे सिंहाव- लोकन करताना वेळोवेळी सध्याच्या परिस्थितीचा उल्लेख आला आहे.

शहराचा विकास म्हटला की, तेथची लोकसंख्या व गावाची हद्द हे प्रश्न चटकन नजरेसमोर उभे रहातात. लोकसंख्या व शहराची हद्द यांची कसकशी वाढ झाली, हे नजरेत आणून मग पुढील प्रगतीचा विचार करणे इष्ट होईल.

जरी कायदे दरवेळी नवे नवे पास होत गेले तरी त्या त्या कायद्याप्रमाणे सुधारणा करणे नगरपालिकेस आर्थिक परिस्थितीने शक्य झाले नाही. कारण नवीन रस्ते करणे, असलेले अरुंद रस्ते रुंद करणे, ह्यासाठी जागा ॲक्वायर करणे, व इमारती पाडून रस्तेरुंदी वाढविणे शक्य झाले नाही. व लहान लहान नगर- पालिकांना जुन्या शहरात सुधारणा करणे आर्थिक परिस्थितीने शक्य होणार नाही. मात्र ह्या कायद्यान्वये शहराची होणारी नवी वाढ शहरसुधारणा नकाशा- प्रमाणे नियंत्रण ठेवून करता येणे मात्र शक्य आहे.

## लोकसंख्येतील वाढ

बारामती नगरपालिका स्थापन झाली तेव्हा गावची लोकसंख्या किती होती, हे नक्की सांगता येत नाही. तथापि इ. स. १८७२ च्या शिरगणतीचे वेळी ती ४९७५ होती असे आढळून येते. म्हणजे नगर- पालिकेच्या प्रारंभी येथे सुमारे ५ हजारांची वस्ती होती, असे म्हणता येते. गेल्या शंभर वर्षांत ती चौपट झाली आहे. अर्थात् त्याचबरोबर तिच्या चतुःसीमाहि वाढलेल्या आहेत, हे लक्षात घेणे अवश्य आहे.

यानंतर आतापर्यंतचे शिरगणतेचे आकडे पुढील- प्रमाणे आहेत––

| वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| १८८१ | २७०० | २५७२ | ५२७२ |
| १८९१ | २७५५ | २६५५ | ५४१० |
| १९०१ | ४७९० | ४६१७ | ९४०७ |
| १९११ | ३९८१ | ३८५० | ७८३१ |
| १९२१ | ४५११ | ४२०० | ८७११ |
| १९३१ | ५४६० | ४९८७ | १०४४७ |
| १९४१ | ६६४४ | ६३६३ | १३००७ |
| १९५१ | ८७३४ | ८३५१ | १७०८५ |
| १९६१ | १०८७७ | १०२४१ | २१११८ |

बारामती नगरपालिकेच्या स्थापनेपासून पहिल्या ३५ वर्षांत लोकसंख्येत विशेष वाढ झाली नाही. नगरपालिका स्थापन झाली, कॅनालचे पाणी आले, रेल्वे आली, या सर्वांवर परिणाम म्हणजे नदीच्या पूर्वेच्या भागात म्हणजे बाबूजी नाईक यांनी वस- विलेल्या गावाचे भागात लोकवस्ती वाढत गेली. कसबा भागातील वस्ती विरळ झाली असे आढळून येते. इ. स. १९०१ ते १९२१ या काळात लोकसंख्या कमी झाली, यांचे मुख्य कारण म्हणजे प्लेगची साथ होय.

शहरातील लोकवस्तीची पहाणी करता असे आढ- ळून आले की, इ. स. १९५१ मध्ये शहरात एकूण घरे २८५९ होती. आणि त्यात १७०६४ स्त्री- पुरुष रहात होते. म्हणजे घरटी ५।९ इसम रहात होते. वॉर्ड नं. ४ मध्ये (बुरुड गल्ली, मारवाड पेठ) सर्वात दाट लोकवस्ती आहे. म्हणजे ती एकरी १७२.२० इसम आहे. आणि वॉर्ड नं. ५ मध्ये



(माळाण आळी) ती कमीत कमी म्हणजे एकरी ११ इसम आहे. शहर विकास योजना अधिकाऱ्याचे असे मत आहे की, वॉर्ड नं. ३ गांधी चौकाच्या पूर्वेला मोतीबागेपर्यंत व ४ यामध्ये फार दाट लोकवस्ती आहे. आणि वॉर्ड नं. ५, ६ व ७ हे अविकसित आहेत.

## चतुःसीमांची वाढ

बारामती नगरपालिकेची स्थापना इ. स. १८६५ मध्ये झाली. तेव्हा तिची मर्यादा जुन्या गावाच्या गावठाणापुरतीच होती. म्हणजे स्थूलमानाने उत्तरेस तांदुळबाडी वेशीबाहेरील नाला, पूर्वेस हल्लीचा कॅनाल वहातो तो भाग, दक्षिणेस मुसलमानांचे कबरस्तान व पश्चिमेस कसब्याचे खंदकालगत लेंडी नाल्याकडे जाणारा रस्ता अशा ह्या नगरपालिकेच्या चतुःसीमा होत्या.

इ. स. १८७७–१८७८ मध्ये डेक्कन टोपो- ग्राफिकल सर्व्हे खात्याकडून भिमथडी तालुक्याचे मोजणीचे व नकाशाचे काम झाले. तेव्हा बारामती नगरपालिकेच्या गावचा नकाशा तयार झाला. त्यात ही सुरुवातीची हद्द अशा खुणेने दाखविली होती. हे एकूण क्षेत्र १२६.५ एकर होते. त्यात शेतजमिनीचा समावेश नव्हता.

इ. स. १८९० मध्ये नीरा कॅनालचे पाणी सुरू झाल्यावर गावाच्या हद्दीला लागून असलेल्या शेत- जमिनीत उसाचे पीक बारमाही होऊ लागले. आणि त्या ओलाव्यामुळे हिवतापाचा आजार या भागात विशेष वाढला. तेव्हा नगरपालिकेच्या व लोकांच्या प्रयत्नाने नगरपालिकेच्या हद्दीलगतच्या काही सर्व्हे नंबरात उसाचे पीक होऊ नये असे ठरले. आणि हे सर्व्हे नंबर नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आले. हे सर्व्हे नंबर म्हणजे १, ३, ४, ५, ३६, ३७, ३८, ३९, १३३, १३४, २१६, २१७, २१८, १९२, २२०, २६५, २६६, २८९, २६४ असे समाविष्ट करावेत, असा ठराव नगर- पालिकेने ता. १५–३–१९०० च्या सभेत केला. मूळ गावठाण व ही शेत जमीन मिळून नगरपालिकेचे क्षेत्रफळ २८५ एकर झाले.

यानंतर नगरपालिकेत गावाच्या विस्तारासाठी निरा कॅनालच्या पूर्वेस, बारामती-डिकसळ रस्त्याच्या (आता बारामती भिगवण रस्त्याच्या) दक्षिणेस व उत्तरेस असलेले सर्व्हे नंबर २८६, २८७, २८८ हे विकत घेतले. त्याचे क्षेत्र ३१ एकर १९ गुंठे होते. ही जमीन पुढे गावठाणात सामील करण्यात आली. व नगरपालिकेचे क्षेत्रफळ ३१६ एकर १९ गुंठे इतके झाले.

इ. स. १८७७–७८ मध्ये गावचा नकाशा तयार झाला. पण तो विशेष उपयोगाचा नव्हता. एका इंचास २२० फूट अशा प्रमाणात तो काढला होता व उपयोगासाठी त्या वेळची टिपणे, पहावयाची तर ती टिपणेच उपलब्ध नव्हती. त्यामुळे तो नकाशा असून नसून सारखाच. अशी स्थिती झाली होती. नवीन पहाणी करून नकाशा करणे हे काम लँड रेव्हेन्यू कोडाच्या तरतुदीप्रमाणे सरकारने स्वतःच्या खर्चाने करावयाला पाहिजे होते. पण पैशाच्या टंचाईमुळे ते काम रखडले. अखेर नगरपालिकेने रु. ६९०० सरकारात भरले (इ. स. १९३४) व पुढच्या वर्षी सर्व्हेचे काम पुरे झाले. १ इंचास ४० फूट अशा प्रमाणात नवीन नकाशा तयार केला गेला व निरनिराळ्या भागांचे २६ नकाशे छापून घेतले गेले.

प्रथम कार्यक्षेत्र वाढविले ते उसाच्या लागवडीचा त्रास टाळण्यासाठी उत्पन्न टिकाविणे व वाढाविणे इकडेही नगरपालिकेच्या शासनाला पहावे लागते म्हणूनच ता. १३–१०–१९२६ ला असा ठराव करण्यात आला की, बारामती गावाचे आसपास कापसाची लागवड होत आहे. म्हणून नगरपालिकेचे हद्दीबाहेर एक कापसाची जीन होणार आहे. सबब नगरपालिकेची हद्द वाढवावी त्यासाठी पुढील पोटसमिती नेमली. श्री. रामचंद मलुकचंद, श्री. ल. के. भागवत, श्री. एच्. आर. कॉन्हेन्ट्री, श्री. ना. म. दाते व श्री. रा. स. लेंगरेकर.

याच धोरणाला पोषक असा ठराव ता. २१।१२।३१ ला केला की, हल्लीचे नगरपालिकेचे हद्दीत बारामतीचे सिटी सर्व्हे नंबर २६७, ३४२ पैकी रेल्वेच्या रेल्वे स्टेशन व गुड्स यार्ड २७८

दक्षिणेचा भाग २८४ पैकी रेल्वेच्या दक्षिणेचा भाग २८४ ब, २७९, २८०, २८१ व जळोची सर्व्हे नंबर ४२, ४३, ४४ हे सामील करावेत.

एवढ्याचसाठी नगरपालिकेचे नाके रेल्वे स्टेशनचे आवारात सार्वजनिक सोईकरिता बांधले. त्यास ता. २७-२-१९३२ च्या ठरावाने मंजुरी देण्यात आली.

वरीलप्रमाणे ज्या सूचना करण्यात आल्या, त्यांचा वेळोवेळी विचार होऊन सरकारने ता. ३।१।१९४० ला एक हुकूम काढून शहराच्या चतुःसीमा वाढविल्या. अशा प्रकारे शहाराचे एकूण क्षेत्रफळ ७२१ एकर झाले.

गेल्या दहा वर्षांत शहराच्या लोकसंख्येची वाढ होत आहे व शहररचनेच्या योजना हाती घ्यावयाच्या तर सध्याचे क्षेत्रफळ अधिक वाढविणे अवश्य झाले आहे. नवीन सूचना राज्य सरकारकडे पाठविली आहे. ती मान्य झाली म्हणजे शहराचा विस्तार ११९० एकर इतका होईल. आणि एवढ्या विभागातली लोकसंख्या सुमारे २२॥ ते २५ हजार होईल, असा अंदाज आहे.

जनरल कमेटी ठराव नं. १११/४-३-६१ व ठराव नं. ९/१२-८-६१ अन्वये शहराचा विस्तार शहराच्या पूर्वेस व उत्तरेस करावा व खालील सर्व्हे नंबर म्यु. हद्दीत समाविष्ट करावेत. असे ठराव होऊन राज्य सरकारकडे नगरपालिकेकडून पत्र नं. LL-6-Ws-I -959-19-10-61 मंजुरीसाठी सरकारकडे गेलेले आहे. पण ६ वर्षांचेवर कालावधी लोटला तरी सरकारकडून ह्या प्रकरणी अद्याप बराच पत्रव्यवहार होऊनही मंजुरी आलेली नाही, हे मोठ्या खेदाने नमूद करावे लागत आहे.

समाविष्ट करण्यासाठी खालील स. नं. ची नोंद आहे. जळोची हद्दीतील स. नं. ४१, ४५, १७४ अ, ४९, ४९ ब, ५०, ५१, ५३, बारामती :हद्दी- तील स. नं. २७६, २७७, २७८ ए, २८४ सी, २८५ बी, २८५ ए, २६८, २६९ बी, २६९ ए. २७०, २७१, ३१३, २६०, २६१, ३४३, ३१५, २६३, इरिगेशन बंगला ३१९, ३१४, २५९, २४२, २४०, ३५८, २६२, २२१, २१९; २१९ ए, २२०, २२४, २२५ ए. २२५ बी, ३४४, २२८, कन्हा नदीची पश्चिम बाजू स. नं. २१२, २१३, २१४, २१४ ए च्या पूर्व हद्दीस लागून.

विकास योजनेच्या आराखड्यात अस्तित्वात असलेल्या शहराची सुधारणा आणि नवीन वस्तीची उभारणी असे प्रामुख्याने दोन भाग आहेत. सध्याच्या वस्तीतील सुधारणेचा मुख्य भाग म्हणजे रस्त्यांची रुंदी वाढविणे हा आहे. काही जुने बोळ आहेत. त्यांचे रस्त्यात रूपांतर करण्याची योजना आहे. शहराच्या बाहेर जी वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. तिची चिन्हे दिसत आहेत. त्यातील रस्त्यांची आखणी या योजनेत केली आहे. गावच्या सध्याच्या लोकवस्तीत सुधारणा करताना काही लोक बेघर होतील हे स्पष्ट आहे.

पुढच्या शिरगणतीपर्यंत गावची लोकसंख्या साधारण पाच :हजाराने वाढेल अशी अपेक्षा आहे. म्हणजे हे बेघर होणारे लोक व वाढती लोकसंख्या यांची रहाण्याची सोय व्हावी, या उद्देशाने नवीन वस्तीच्या उभारणीचा नकाशा तयार केला आहे, असे तंत्रज्ञानी स्पष्ट केले आहे.

सध्या रेल्वे स्टेशन आहे. त्याचे पलीकडे बारामती-भिगवण रस्त्यावर जळोची नाक्याचे पलीकडे बारामती-इंदापूर रस्त्यावर कॅनालचे पलीकडे शहराची वस्ती वाढेल व वाढू देण्याला वाव आहे हे लक्षात घेऊन, विकास योजनेच्या शिफारशी प्रामुख्याने केल्या आहेत. गावाच्या माथ्यावरून कॅनाल जातो तो ओलांडण्यासाठी सध्या रेल्वे स्टेशननजीक एकच पूल आहे. भावी विकासाची दिशा लक्षात घेऊन सध्या देवीचे देऊळ आहे तिकडे कॅनालवर एक पूल असावा, असे नगरपालिकेकडून सुचविण्यात आल्या-वरून इरिगेशन खात्याने पादचारी लोकांकरिता पूल सन १९६४-६५ साली बांधला. त्याचा सर्व खर्च रु. ६२१४·२५ नगरपालिकेने केलेला आहे.

नवीन वस्तीची वाढ लक्षात घेऊन वहातुक व दळणवळण सोपे जावे यासाठी जळोची नाक्यापासून



निघून भोवतालच्या प्रदेशाला वेढणारा गोलाकार रस्ता ( रिंग रोड ) करावा असेही आराखड्यात म्हटले आहे.

शहराच्या विकासाला पूरक ठरणारा हा गोलाकार रस्ता ५० फूट रुंदीचा सुचविला आहे. रेल्वे स्टेशनच्या पलीकडे ३।४ फर्लांगावर हा रस्ता निघून सध्या तिकडे जीन आहे, त्याचे पूर्व बाजूने दक्षिणेकडे जाऊन नीरा कॅनालला मिळतो.

येथे वर उल्लेख केलेला पूल असेल अशा रीतीने कॅनाल ओलांडून इंदापूर रस्त्यापर्यंत जाईल. बारामती-इंदापूर रस्त्यावर एस्. टी. चा डेपो आहे. तेथून सुमारे अर्धा मैल अंतरावर गोलाकार रस्ता, इंदापूर रस्ता ओलांडील. तसाच तो पुढे जाऊन गुनवडीकडे जाणाऱ्या बारामती-गुनवडी रस्त्याला मिळेल. या भागात कन्हा नदीवर एक पूल असावा असे सुचविण्यात आले आहे. नंतर तो रस्ता पुढे फलटण रस्ता व बारामती-पुणे रस्त्याला मिळेल. उत्तरेकडे वळला की तो बारामती-जेजुरी रस्त्याला मिळणार आहे. येथे कन्हा नदीवर आणखी एक पूल असावा असे सुचाविले आहे, अशा रीतीने नदी ओलांडल्यावर हा रस्ता बारामती तांदुळवाडी रस्त्याला मिळेल. यानंतर पुढचा रस्ता सध्या आखलेला नाही. परंतु कालांतराने तांदुळवाडी रस्ता व भिगवण रस्ता एकमेकांना जोडणारा असा रस्ता व्हावा, अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारे नवीन वस्तीभोवती हा गोल रस्ता होईल.

कसब्यातून गावात येण्यासाठी सध्या एक पूल आहे. पादचारी लोक श्रीकाशीविश्वेश्वराच्या देवळा-पासून नदी ओलांडून पानवथा वेशीने गावात येतात. या भागात एक सांडवा असावा, अशी विकास योजनेत तरतूद आहे.

शहर विकास योजनेत कामासाठी जागा राखून ठेवलेल्या आहेत. त्यापैकी काही जागांचा नामनिर्देश करतो. ( १ ) कसब्यातील प्राथमिक शाळा आता तीन निरनिराळ्या इमारतीत भरते. एकाच इमारतीत शाळा असणे योग्य म्हणून सिटी सर्व्हे नंबर ४५९, ४६१ ते ४६३ आणि ४६६ ते ४७० ह्या भागात एकूण २०,८४ गुंठे जमीन ह्या शाळेच्या नव्या इमारतीसाठी व क्रीडांगणासाठी राखून ठेवली आहे.

( २ ) रामाच्या आळीनजीक सिटी सर्व्हे नंबर २२३ मधील २३-२० गुंठे जागा शाळेची इमारत व क्रीडांगण यासाठी राखून ठेवली आहे.

( ३ ) मारवाड आळीतील शाळा आता भाड्याच्या इमारतीत आहे. त्या शाळेच्या इमारतीसाठी व क्रीडागणासाठी १ एकर २२-२६ गुंठे जागा त्या शाळेनजीकच राखून ठेवली आहे.

( ४ ) वॉर्ड नंबर ५ मधील शाळा वाळवे यांच्या माडीत आहे. या शाळेसाठी नवीन इमारत बांधण्या-करिता रिव्हिजन सर्व्हे नंबर २१७ मध्ये १ एकर ९३ गुंठे जागा राखली आहे.

( ५ ) आंबराई भागात सध्या शाळा नाही म्हणून रिव्हिजन १३ नंबरमध्ये ३८-३८ गुंठे जमीन शाळेसाठी आहे.

( ६ ) सध्या जेथे मंडई आहे, त्यालगतचा इंदा-पूरकडे जाणारा रस्ता रुंद करताना मंडईची सध्याची इमारत पाडावी लागेल, आणि बाकीची जागा अपुरी होईल म्हणून मंडईसाठी वॉर्ड नं. ३ मध्ये सर्व्हे नंबर ५७२,६१७ इत्यादि विभाग राखून ठेवला आहे. ही जागा म्हणजे सध्याची दाणे बाजाराची जागा होय. एकूण क्षेत्रफळ २ एकर १५-९ गुंठे आहे.

( ७ ) आठवडा बाजार सध्या जेथे भरतो त्या-ऐवजी त्यासाठी रिव्हिजन सर्व्हे नंबर ६ मध्ये ३ एकर २-१३ गुंठे जागा राखली आहे.

( ८ ) आठवडा बाजारसाठी जी जागा राखली आहे, ती जवळच मटन व मासळी बाजारासाठी १३-७८ गुंठे जागा संकल्पिली आहे. तेथे प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र इमारत असावी, अशी शिफारस आहे. कत्तलखान्यासाठी रिव्हिजन सर्व्हे नंबर ३७ मध्ये १३-७७ गुंठे जागा आहे, ती योग्य आहे.

( ९ ) नगरपालिकेच्या कार्यालयाचे समोर ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट आहे. ही जागा अपुरी वाटते; म्हणून ते मार्केट रिव्हिजन सर्व्हे नंबर १५ मध्ये २० एकर जागा यासाठी राखली आहे.

( १ ) बारामती भिगवण रस्त्यावर, स्टेशन

नजीकच्या भागात, रिव्हिजन सर्व्हे नंबर २८१ मध्ये १६–५३ गुंठे जागा एक दवाखाना बांधण्यासाठी राखून ठेवली आहे.

(११) नवीन आठवडा बाजाराशेजारी गाडीतळाकरिता १८–३६ गुंठे जागा विकास योजनेत दाखविली आहे.

(१२) नीरा कॅनाल व रेल्वे स्टेशन यांचे दरम्यानच्या भागात २७–५५ गुंठे जामिनीत पोहण्याचा तलाव बांधावा असे सुचविले आहे. ही जागा सध्या राज्यसरकारच्या पाटबंधारे खात्याकडे आहे. ती पोहण्याच्या तलावासाठी सरकारकडून मागून घ्यावी लागेल.

(१३) सध्या मंडई जिथे आहे, ती जागा (१ एकर ४–५० गुंठे) चित्रपटगृहासाठी वापरावी अशी शिफारस विकास योजनेत आहे. या जागेपासून ३५० फूट अंतरावरच हल्ली एक चित्रपटगृह आहे. शहर वाढत आहे. म्हणून दुसरे चित्रपटगृह गावात असणे अवश्य आहे, असे नियोजन तज्ज्ञांचे म्हणणे आहे. व ही गरज भागविण्यासाठी, त्यांनी वरील कल्पना सुचविली आहे. ही जागा नगरपालिकेच्या मालकीची आहे. नागरिकांच्या हे लक्षात आणून दिले पाहिजे की, सध्याचे चित्रपटगृह गांवाच्या दक्षिणेस आहे. उत्तर भागात तांदुळवाडी वेशीच्या भागात एक चित्रपटगृह बांधले जात आहे. पुढच्या १०–१२ महिन्यात ते पुरे होईल.

(१४) गावाच्या ईशान्य भागात रेल्वे स्टेशनचे पलीकडे ३१ एकर ३–७० गुंठे इतका जागा लहान-मोठ्या उद्योगधंद्यांच्या वसाहतीसाठी राखून ठेवली आहे. जीन, प्रेस, तेल गिरणी, इत्यादि कारखाने निघतील, अशी अपेक्षा आहे. आता ८० जीन आहेत. ती संख्या आणखी ६० नी वाढविण्याची तरतूद या वसाहतीत करावी, अशी शिफारस आहे. कामगारांना रहाण्याकरिता इमारती या भागात बांधाव्यात अशी कल्पना आहे.

(१५) शहरवाढीच्या व विकासाच्या कार्यक्रमामुळे जे लोक बेघर होतील, त्यांच्यासाठी कसब्यात ३९–५७ गुंठे जागा राखून ठेवली आहे. त्याचप्रमाणे वॉर्ड नंबर ४ मध्ये (हॉस्पिटल रोड व पाटस रस्ता यांच्या कोपऱ्यावर) रिव्हिजन सर्वे नंबर २६५ मध्ये जागा राखून ठेवण्याची कल्पना आहे.

सार्वजनिक हितासाठी जी कामे करावयाची त्यासाठी जागा ताब्यात घ्यावी लागेल. ह्यासाठी रु. ३,०६,१५३ खर्च येईल, असा अंदाज धरला आहे.

शहर विकास योजना नगरपालिकेच्या शिफारशीप्रमाणे राज्य सरकारने मंजूर केली. (इ. स. १९६१) नंतर त्याप्रमाणे अंमलबजावणीचे काम नगरपालिकेने सुरू केलेले नाही. एकंदर जागा व बांधलेली इमारत, उंची, हवा व प्रकाशासाठी सोई इत्यादिबाबत ह्या तरतूदी असतात. त्यांची अंमलबजावणी अजून सुरू झालेली नाही. या लिहिण्याचा अर्थ असा की योजनेतील रस्ते रंदी, मोकळी मैदाने, इत्यादि बाबतच्या तरतुदी पाळल्या जात आहेत. बांधकामाच्या बाबतीत नवीन नियम (बिल्डिंग बायलॉज) झालेले नाहीत.

---

# नगरपालिकेच्या कारभारातील विविध छटा

**नगरपालिकेच्या निरनिराळ्या खात्यातील कामकाजाची थोडक्यात माहिती देण्याचा आतापर्यंत प्रयत्न केला. नगरपालिकेच्या कारभारात अनेकविध घटना असतात. प्रत्येकीचा स्वतंत्र प्रकरणाचे रूपाने समाचार घेणे शक्य नाही. अशा विविध प्रकारांचा या प्रकरणात समावेश करण्याचे योजले आहे.**

## मुख्य अधिकारी

कोणत्याही प्रकारच्या शासनाला एक मुख्य अधिकारी लागतो. शासनाने ठरवून दिलेल्या कायदेकानूप्रमाणे त्याने सर्व काम मुख्य अधिकारी (सेक्रेटरी) या नात्याने पहावयाचे असते. त्या अधिकारपदाच्या काही जबाबदाऱ्या असतात, त्याचबरोबर त्याचे काही अधिकारही असतात.

नगरपालिका हेही एक शासनच आहे. त्याच्या कार्यांची पूर्तता होण्यासाठी एक मुख्य अधिकारी असणे अगत्याचे आहे. नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याला 'सेक्रेटरी' म्हणत. जिल्हा व शहर नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याचे हे नांव होते. 'बरो म्युनिसिपालटी'च्या मुख्य अधिकाऱ्याला 'चीफ ऑफिसर' म्हणत. आता नवीन कायद्यान्वये सर्व प्रकारच्या नगरपालिकांच्या मुख्य अधिकाऱ्यांना 'चीफ ऑफिसर' ही संज्ञा ठरली आहे.

नवा कायदा अमलात येईपर्यंत बारामती नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याला 'सेक्रेटरी'च म्हणत; आता चीफ ऑफिसर म्हणतात. बारामती नगरपालिका स्थापन झाली तेव्हांपासून सेक्रेटरी या अधिकारपदावर कोण कोण होते, याची संशयातीत यादी करता आली नाही. दप्तरातील कागदपत्र या कामी अपुरे पडले. त्यातल्या त्यात जी नावे आढळली ती अशी :—

(१) श्री. गोपाळ आप्पाजी इ. स. १८८४–८५
(२) श्री. सिताराम रघुनाथ इ. स. १८९६–१९०३
(३) श्री. ए. आर. उंडे इ. स. १९०३–१९०६
(व) इ. स. १९०९–१९१०

मध्यंतरीच्या काळात
(४) श्री. व्ही. आर. शिराळकर इ. स. १९०७ ते १९०८ हे होते.
(५) श्री. गणेश सिताराम इ. स. १९११
इ. स. १९११–१९१८
(६) श्री. म. ना. सहस्रबुद्धे इ. स. १९३० ते १९४५
व पुन्हा इ. स. १९१९–२०
(७) श्री. महादेव रघुनाथ बोकील इ. स. १९१९–२०
(८) श्री. केशव महादेव मोहळकर इ. स. १९२० ते १९२१
(९) श्री. खंडागळे इ. स. १९२१ ते १९२२
(१०) श्री. डी. बी. बर्डे इ. स. १९२२ ते २३
(११) श्री. शंकर श्रीधर कवठेकर इ. स. १९२९
व इ. १९२८ ते १९२९
इ. स. १९४५ ते ४६
(१२) श्री. शिवराम गोपाळ जोशी इ. स. १९४७
(१३) श्री. नीलकंठ श्रीधर कानिटकर पासून आजपर्यंत चालू.

यापैकी सर्व व्यक्तींची माहिती मिळू शकली नाही. अलीकडच्या काळातले एक सेक्रेटरी श्री. म. ना. सहस्रबुद्धे ह्यांची दोन वेळा मिळून प्रदीर्घकाळ कारकीर्द झाली. त्याचबरोबर एक थोर साहित्यिक म्हणूनही त्यांची कीर्ती मोठी झाली आहे. सध्याचे चीफ ऑफिसर श्री. कानिटकर हे 'सेक्रेटरी' म्हणून आले व आता बारामती

नगरपालिकेचे ते ' चीफ ऑफिसर ' झाले आहेत. या दोघांचा अल्प परिचय नमूद करणे उचित होईल.

## श्री. म ना. सहस्रबुद्धे

श्री. महादेव नारायण सहस्रबुद्धे बारामती नगरपालिकेचे दोन वेळेला मिळून सुमारे २२ वर्षे सेक्रेटरी होते. प्रथम ते इ. स. १९११ ते १९१६ पर्यंत सेक्रेटरी होते. आणि इ. स. १९३० ते १९४५ पर्यंत ते पुनः या अधिकारपदावर होते. नगरपालिकेचे एक कडक अंमलदार, गावातील सार्वजनिक कार्याशी आत्मीयतेने समरस होण्याची प्रवृत्ति व नंतर शाहिरी वाङ्मयाचे गाढे संशोधक या नात्याने ते बारामतीला एक भूषण तर झालेच, पण सर्व महाराष्ट्रात ते ख्यातनाम आहेत. कविवर्य मोरोपंत यांच्यानंतर सरस्वतीची सेवा करण्याबद्दल श्री.म. ना. उर्फ अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी बारामतीच्या इतिहासाला प्रशंसनीय असा उजळा दिलेला आहे. बारामतीचे सुजाण नागरिक याबद्दल स्वतःला धन्य मानून घेतात व त्यांच्यापुढे नतमस्तक असतात.

श्री. सहबुस्द्धे हे मूळचे नाशिकचे. लहानपण नाशिकला गेले पुढे इ. स. १८९६ मध्यें पुण्याला नूतन मराठीतून स्कूल फायनल झाले. कायद्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यावर ते काही वेळ नूतन मराठीत शिक्षक होते. तेव्हा त्यांचे मामा ' आनंद ' कर्ते कै. श्री. वासुदेव गोविंद आपटे हेही तेथे एक शिक्षक होते. पुण्यातील ' ज्ञानप्रकाश ' साप्ताहिक श्री. वा. गो. आपटे यांच्या संपादकत्वाखाली दैनिक झाले. ( इ. स. १९०४.) तेव्हा श्री. सहस्रबुद्धे हे तेथे एक सहसंपादक म्हणून काम करीत होते. पुण्याला असताना त्यांनी अकोल्याच्या ' प्रजापक्ष ' मध्ये मजकूर लिहिला. तसेच ' विविधज्ञान-विस्तार ' मध्येही कांहीं इतिहासविषयक लेख लिहिले.

या उद्योगात असताना स्वतःवर अवलंबून असलेली कुटुंबीय मंडळी जास्त, म्हणून त्यांनी नासिकच्या नगरपालिकेत हेडक्लार्क म्हणून नोकरी पत्करली. ( इ. स. १९१०च्या सुमारास ) तथूनच ते बारामतीला नगरपालिकेचे सेक्रेटरी म्हणून आले. ( इ. स. १३-१०-१९११ ).

बारामतीला ते सहा वर्षे होते. नासिकला नगरपालिकेत जास्त वेतन मिळाले, म्हणून ते पुनः हेडक्लार्क म्हणून गेले. तेथे असतानाच ते मुंबईला जाऊन लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूटच्या सॅनिटरी इन्स्पेक्टरचा अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले. नासिकला असताना त्यांना हंगामी चीफ ऑफिसर म्हणून काम करण्याची ३ महिने संधि मिळाली होती.

हा शिक्षणक्रम पुरा झाल्यावर रत्नागिरी म्युनिसीपालटीचे चीफ ऑफिसर म्हणून जाण्याचे अगोदर (इ. स १९२१ ) वर्ष सव्वा वर्ष ते बारामतीत राहिले होते. बारामतीच्या त्या वेळेला राजकीय कामात त्यांनी फार काम केले. पुणे जिल्हा काँग्रेसचे चौथे अधिवेशन विजापूरचे काँग्रेसचे थोर नेते श्री. हणुमंतराव कौजलगी यांचे अध्यक्षतेखाली भरले, तेव्हा अधिवेशनाची तयारी करणारात श्री. सहस्रबुद्धे हे एक प्रमुख होते. श्री. वाबळे वकील हे स्वागताध्यक्ष होते. बारामतीच्या बागायतदारांची गाऱ्हाण्यांची चौकशी करण्यासाठी ( भिमथडी तालुका ) काँग्रेसने मालेगावचे राजेसाहेब शंभूसिंग यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली. तेव्हा ते ह्या समितीचे चिटणीस होते. या दोन्ही कामासाठी त्यांनी ' बारामती समाचार ' ह्या साप्ताहिकात तेव्हा खूप लिखाण केले.

इ. स. १९२१ ते १९२९ ह्या अवधीत ते रत्नागिरीला नगरपालिकेचे चीफ ऑफिसर होते. तेथे असताना त्यांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात काम केले. रत्नागिरीहून बारामतीला परत आल्यावर त्यांनी नगरपालिकेची सेवा करताना गावातल्या हरएक कामात भाग घेतला. येथे परत आल्यानंतर थोड्याच अवधीत सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलचे काम उभे झाले. सेक्रेटरी या नात्याने स्थानिक प्रमुख नागरिकांचे व सरकारी अंमलदाराचे सहकार्य नि मदत मिळवून ते यशस्वी झाले. इ. स. १९४५ ( ता २२-२-४५ ) मध्ये ते निवृत्त झाले. दीड वर्ष फलटणला संस्थानच्या पुरवठा खात्यात डेप्युटी डायरेक्टर म्हणून त्यांनी काम केले. तेव्हा जुन्नर नगरपालिकेने त्यांना आपल्या नोकरांना नगरपालिका कायद्याची माहिती देण्यासाठी ३ महिने नेमले होते.

वयाच्या ६६।६७ व्या वर्षी कृतार्थ होऊन ते बारामतीस पुनः रहाण्यासाठी आले. मग त्यांच्या अतिशय दैदीप्यमान कामगिरीला प्रारंभ झाला. ते काम



म्हणजे शाहिरी वाङ्मयावर नव्या दृष्टीने प्रकाश पाडणे हे होय. मधून मधून ते वृत्रपत्रातून लेख लिहीत असत. ' सत्यकथा ' सिमाकातून त्यांनी शाहिरी वाङ्मय व अगणुकीचा ( तमाशा ) प्रकार याबद्दल लेख लिहिले. तेव्हा मुंबई सरकारने महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तमाशा सुधारणा समितीचे ते चिटणीस होते. या कामगिरीतून मोकळे झाल्यावर, मुंबई मराठी साहित्य संघाच्या कै. वामन मल्हार व्याख्यानमालेत मराठी ' शाहिरी वाङ्मय ' या विषयावर त्यांना महनीय प्रवक्ते म्हणून पाचारण करण्यात आले होते. पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल व्याख्यानांच्या कार्यक्रमातही त्यांची या विषयासाठी निवड झालेली होती. त्यांनी ' मराठी शाहिरी वाङ्मय ' हा ग्रंथ लिहिला. त्याला महाराष्ट्र सरकारने पारितोषिक दिले, याबद्दल बारामतीच्या नागरिकांनीं श्री. नानासाहेब गोरे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा जाहीर सत्कार केला. बारामती नगरपालिका या समारंभात सहभागी झाली होती. ता. ६ आक्टोबर सन १९६३ ला ते दिवंगत झाले.

## श्री. नी. श्री. कानिटकर

डी. सी. ई.

श्री. नीलकंठ श्रीधर कानिटकर हे बारामती नगरपालिकेचे ' सेक्रेटरी ' ( चिटणीस ) म्हणून इ. स. १९४७ पासून काम पहात आहेत. आता त्यांच्या हुद्याचे नांव ' चीफ ऑफिसर ' ठरले आहे.

श्री. कानिटकर यांचा जन्म नासिकला ता. ८-१०-१९१० ला झाला. त्यांचे वडील पाटबंधारे खात्यांत नोकर होते. नासिकला प्राथमिक व पुण्याला माध्यमिक शिक्षण पुरे झाल्यावर फर्ग्युसन कॉलेजमध्ये फर्स्ट इअरला असताना इंजिनियरिंग कॉलेजमध्ये जाऊन त्यांनी डिप्लोमा मिळविला. इ. स. १९३० ते १९३४ पुण्याला ते आनंदाश्रमात आश्रित विद्यार्थी म्हणून रहात असत. आनंदाश्रमाचे प्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे याचे ते ऋण मानतात.

अकोला नगरपालिकेत ' सर्व्हेअर ' म्हणून ( इ. स. १९३४-३५ ) आणि शहादे नगरपालिकेचे चिटणीस म्हणून इ. स. १९३५ ते १९४७ पर्यंत काम केल्यावर ते बारामतीला आले.

इ. स. १९४१, १९५१ व १९६१ यावेळी झालेल्या शिरगणतीच्या कामाचे अधिपत्य चांगल्या रीतीने केल्याबद्दल वेळोवेळी त्यांना प्रशंसापत्र मिळाले व इ. स. १९५१ मध्ये रौप्यपदक मिळाले.

महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्टच्या मसुद्यावर पुणे जिल्हा म्युनिसिपल असोसिएशनतर्फे विधायक सूचना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता व त्यापैकी काही सूचना कायद्याचे कलमात ग्रथितही झालेल्या आहेत. पुणे जिल्हा म्युनिसिपल असोसिएशनचे ते तीन वर्षे सेक्रेटरी होते. म्युनिसिपल कायद्याचा त्यांचा विशेष अभ्यास आहे व त्यांचा सल्ला प्रसंगविशेषी इतर म्यु. कडून घेतला जातो.

श्री. कानिटकर यांनी ' काळ फंडाची ' योजना केली होती. त्याचा उद्देश नगरपालिकेच्या सेवकापैकी कोणाचाही मृत्यु झाल्यास सर्व सेवकांनी प्रत्येकी एक रुपयाप्रमाणे वर्गणी करून मयताचे कुटुंबियास मदत करावी. काही वर्ष ही योजना अंमलात होती व दोन अडीच हजार रुपये वाटलेही गेले. परंतु ही योजना कार्यान्वित राहिली नाही; ती राहणे जरूर आहे.

## श्री. नी. वि. काकडे

श्री. नीलकंठ विष्णु काकडे हे बारामती नगरपालिकेत इ. स. १९२५ मध्ये नगदी कारकून म्हणून नोकरीला आले. नंतर ते हेडक्लार्क या हुद्यापर्यंत गेले. ते रहाणारे बारामतीचेच. त्यांचे माध्यमिक शिक्षण पुण्याला झाले.

श्री. काकडे यांनी बारामती नगरपालिकेची जवळ जवळ ४० वर्षे सचोटीने, निरलसपणे व वाकबगारीने सेवा केली. गतवर्षीच ते निवृत्त झाले. ह्या ' समाचार पुस्तिके ' ची तयारी करण्याला त्यांची खूप मदत झाली असा उल्लेख अन्यत्र केला आहेच.

' सेक्रेटरी ' पदावर नवीन व्यक्ती यावयाचे वेळी श्री. काकडे हेच हंगामी सेक्रेटरी असत. असे तीन वेळेला झाले. मागे राज्य सरकारने दहा वर्षे शिक्षक म्हणून काम केलेल्या व्यक्तीला ' डीम्ड ट्रेन्ड ' मानले त्याच न्यायाने श्री. काकडे हे अनुभवामुळे ' सेक्रेटरी ' हे अधिकारपद भूषविण्यास पूर्ण पात्र झाले. म्हणूनच त्यांचा या मालिकेत मुद्दाम उल्लेख केला आहे.

या सदराचा निरोप घेताना, एक योग उल्लेखिला पाहिजे. सेक्रेटरी श्री. सहस्रबुद्धे हे नासिकचे; सध्याचे

चीफ ऑफिसर श्री. कानिटकर यांचा जन्म नासिकचा; एक माजी सेक्रेटरी श्री. कवठेकर हे नासिकहूनच बारामतीला आले. आणि या 'समाचार पुस्तिके' ची संपादणी करणाराचा जन्मही नासिकचाच आहे. नासिक व बारामती यांची अशी जवळीक आहे.

## हरिजनोद्धार व भंगीमुक्ती

स्थानिक स्वराज्याचा विकास जसजसा होत आहे, त्याचबरोबर अस्पृश्यतानिवारण, हरिजनोद्धार, भंगीमुक्ति इत्यादि कल्पना मोठ्या हिरीरीने पुरस्कारिल्या जात आहेत. या सर्व क्षेत्रात बारामती नगरपालिकेची कामगिरी समाधानाची आहे असे नम्रतेने म्हणता येते. जे झाले तेवढेच पुरे असे सुतराम् म्हणावयाचे नाही.

बारामती नगरपालिकेत अगदी प्रारंभापासून या बाबतीत माणुसकीने वर्तन झाले. अलीकडे गृहनिर्मितीच्या बाबतीत पूर्वास्पृश्य जमातीच्या लोकांना नगरपालिकेने जे सहाय्य दिले, त्यायोगे बारामतीत गलिच्छ वस्तीचा प्रश्न उत्पन्न होणार नाही असे म्हणावेसे वाटते.

या प्रयत्नांची माहिती घेताना, त्या त्या वेळची सामाजिक परिस्थिती अवश्य नजरेसमोर ठेवली पाहिजे. ता. १४-२-१८७५ ला असा ठराव केला की, समस्त महार यांचा अर्ज की, धर्मशाळेचे जोते महार लोकांनी बांधले आहे. त्यावर इमला बांधणेस रु. १०० देणे. बाबत. त्याप्रमाणे रु. १०० देणेची तजवीज करावी. आजच्या परिस्थितीत हा ठराव नजरेत भरणार नाही. पण शंभर वर्षांपूर्वीच्या समाजरचनेत तो निश्चितच प्रगतिदर्शक होता यात शंका नाही.

सफाई कामासाठी भंगी लोकांना काही खास सवलती देऊन आणले होते. मनु जुम्मन हा त्यापैकी एक होता. (इ. स. १९०४.) त्याने सर्व्हे नंबर २६८ मधील ४-२७ इतकी जमीन रु. २० देऊन खरेदी केली होती. तिचा आकार रु. १-२ होता. त्या जागेत नगरपालिकेने प्लेगचा दवाखाना काढला होता. जमिनीचा सारा चार वर्षे तोच भरत होता. अखेर त्याने नुकसानभरपाई द्यावी किंवा जमीन खरेदी घ्यावी असा अर्ज केला. नगरपालिकेने रु. २५ देऊन जमीन घेण्याचा ठराव केला. आजच्या परिस्थितीत हे कोणालाच पटणार नाही. (ता. १६-४-१९०४ चा ठराव.)

यानंतर नवीन भंग्यांना झोपड्यासाठी सर्व्हे नंबर ३ मधील जागा द्यावी व मदत म्हणून रु. ४०।- प्रत्येकी द्यावेत असा ठराव ता. १७-१०-१९२२ ला झाला.

या दिशेने जी पावले पडू लागली, त्याचे कारण त्या वेळच्या काही व्यक्ती हे निःसंशय होय. त्या वेळचे सेक्रेटरी श्री. म. ना. सहस्रबुद्धे हे म्युनिसिपल नोकरवर्गात मिसळत असत, आणि भजन, नाटक इत्यादि कार्यक्रमात सहभागी होत. श्री. हिरा लालबिगे हा सफाई कामगार एकतारीवर उत्तम भजन करीत असे, ही गोष्ट आजही अनेकांच्या आठवणीत आहे. नगरपालिकेचे एक माजी शिक्षक व नंतरचे सभासद श्री. हरि पिराजी घायगुडे यांनी या कामात बरेच लक्ष घातले व वेळप्रसंगी वाईटपणाही पत्करला. इ. स. १९२४ मध्ये त्यांनी श्री. देवी अहिल्याबाई बोर्डिंग सुरू केले. तेथे सर्वांना जातिनिरपेक्षपणे समानतेने वागणूक दिली. श्री. घायगुडे हे अशा रीतीने पाऊले टाकीत असता काही अधिकारी व्यक्ती आपल्या परंपरागत कल्पनेने तेव्हा वागल्या; म्हणून त्यांना प्रसंगी त्यांच्याबद्दल रागही आला. पण हा सर्व गोष्टी वैयक्तिक हेव्यादाव्याने किंवा दुष्टपणाने होत नाहीत हे इतिहासाने दाखवून दिले आहे.

शाळेत अस्पृश्यता पाळली जाऊ नये, असा ठराव इ. स. १९१९-२० मध्ये झाला. त्याची अंमलबजावणी उत्तम प्रकारे ताबडतोब झाली असे नाही. यानंतरचे पुढचे पाऊल म्हणजे ता. ३१-५-१९३९ चा ठराव होय. तो असा की, म्युनिसिपालिटीच्या मालकीच्या विहिरी, धर्मशाळा, हरिजनासुद्धा सर्वांना खुल्या असल्याबद्दल त्यावर पाट्या लावाव्यात.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी जनतेचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले तेव्हा उपरिनिर्दिष्ट प्रगतीची पावले पडली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अधिक भरीव कामांना हात घातला गेला. त्याचे एक उदाहरण म्हणजे हरिजन कामगारांच्या वसतीसाठी रु. २५०००।- खर्च करण्याचा नगरपालिकेने ता. २७।२।१९४८ ला ठराव केला, हा होय. श्री. श्रीरंग सटवाजी सोनवणे, श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, श्री. उद्धवराव लक्ष्मण इंगुले, श्री. ए. जी. काळोखे व श्री. व्यं. ग. तावरे या सभासदांची एक उपसमिती नेमून हे काम झाले.

मुंबई राज्याचे त्या वेळचे अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता यांचे हस्ते हरिजन वसाहतीची कोनशिला बस-



विण्यात आली (ता. १९।५।१९४८). जवळ जवळ एक वर्षात हे काम पुरे होऊन त्या वेळचे मंत्री श्री. गणपतराव तपासे यांचे हस्ते ता. १५।३।१९४९ ला या वसाहतीचे उद्घाटन झाले. या वसाहतीत चार कुटुंबांची सोय झाली. नंतर इ. स. १९५१।१९५२ मध्ये आणखी चार खोल्या बांधल्या. आता या खोल्यांचे भाडे माफ केले आहे.

यानंतर एकामागोमाग हरिजन, वडार इत्यादि जमातींच्या बांधवांना घरे बांधण्यासाठी मदत करण्याला प्रारंभ झाला. जागा विकत न देता ९९ वर्षांचे कराराने, नाममात्र भाडे घेऊन जागा देण्याचे धोरण सर्वसाधारणपणे स्वीकारले आहे. इ. स. १९५१ मध्ये गाडी वडार हौसिंग सोसायटी, अस्पृश्योद्धार हौसिंग सोसायटी, हरिजन हौसिंग सोसायटी, या संस्थांच्या कामाला प्रारंभ झाला. त्यानंतर विकास, मांगगारुडी, इत्यादि सहकारी गृहनिर्माण संस्थांचा कारभार सुरू झाला. मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाची तात्पुरती सोय करावी म्हणून दाणे बाजारातील तीन कोठे प्रत्येकी वर्षाला रु. १ असे नाममात्र भाडे घेऊन दिले (ता. १६-६-१९५८.)

बारामती गांवात सध्या निरनिराळ्या प्रकारच्या १७ सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. नगरपालिकेने त्यांना नाममात्र भाड्याने १० एकर जागा दिलेली आहे. श्री. उद्धवराव लक्ष्मण इंगुले, श्री. मारुतराव बाळकृष्ण जाधव, श्री. गुलामअली करीमभाई शेख, श्री. घों. आ. सातव इत्यादि कार्यकर्त्यांनी या कामी मार्गदर्शन केले आहे.

अस्पृश्यता-निवारणातले पुढचे पाऊल म्हणजे भंगीमुक्ति हे होय. भंगी समाजात जन्मलेल्यांनी भंगीकाम, मैलासफाईचे काम केलेच पाहिजे असे नाही. अर्थात् नगरपालिकेचे सफाईचे काम दिवसेंदिवस यंत्रसहाय्याने होत आहे. त्यासाठी कोणीही व्यक्ती येऊ शकते. बारामतीत प्रथम कचरा वहातुकीची मोटार चालविण्याकरिता 'सवर्णीय हिंदु' ड्रायव्हर मिळत नव्हता. आता त्या कल्पना बदलल्या आहेत. या दिशेनेही बारामती नगरपालिकेने प्रगती केली आहे, असे म्हणता येते. सफाई काम करण्यासाठी येथे आलेले एक कुटुम्ब आज या गलिच्छ कामातून पूर्णपणे मुक्त आहे. इतकेच नव्हे तर त्या कुटुम्बातील एक व्यक्ती बारामतीची सन्माननीय

नागरिक व नगरपालिकेचा सेवक म्हणून मान्यता पावली आहे. हे नमूद करताना कोणत्याही प्रकारची आढ्यता मिरवावयाची नाही. कालप्रवाह बदलत आहे. त्याच्या आघाडीवर बारामती आहे ही समाधानाची गोष्ट होय.

हे घराणे म्हणजे नगरपालिकेतील एक अनुभवी कारकून श्री. गंगाधर हिराजी लालबिगे यांचे होय. त्यांचे पणजोबा, जवळ जवळ सवाशे वर्षांपूर्वी सफाईचे काम करण्यासाठी बारामतीत आले. श्री. गंगाधर लालबिगे यांचे वडील हिराजी हे अशिक्षित पण दूरदृष्टीचे व निरलस कष्ट करणारे होते, हे प्रस्तुत लेखकाला माहीत आहे. हिराजी हे एकतारीवर भजन करीत, त्यांनी आपल्या मुलाला शिकविले. मराठी सात इयत्तांपर्यंत शिक्षण झाले. त्यास नगरपालिकेत कारकून म्हणून नोकरीवर घेण्यात आले. त्यांनी आता १६ वर्षे नोकरी केली आहे. श्री. गंगाधर हिराजी लालबिगे ह्यांचे हस्ते सपत्नीक १५ ऑगस्ट १९५२ चे राष्ट्रीय सणाचे दिवशी सत्यनारायणाची पूजा झाली होती.

श्री. गंगाधर हिराजी लालबिगे यांचे दोन मुलगे शिकत आहेत. नवे जीवन प्राप्त झाले, याबद्दल समाधान वाटते व याबद्दल कृतज्ञ आहोत, असे ते प्रस्तुत लेखकाजवळ म्हणाले. ते परिस्थितीशी झगडत आहेत. मुलांना उच्च शिक्षण घेता यावे, अशी त्यांची सात्त्विक इच्छा आहे. त्यांची इतर नातेवाईक मंडळी शिकून विविध क्षेत्रात कारकून, खजिनदार, मुख्याध्यापक, दुकानदारी असे व्यवसाय करीत आहेत. काही नातेवाईक नगरपालिकेच्या सफाईखात्यात नोकरीला आहेत.

लालबिगे घराणे हे झालेल्या कामाचे व व्हावयाच्या प्रगतीचे एक द्योतक आहे, यात शंका नाही. बारामतीच्या थंडीवाऱ्यात व अपमानास्पद अशा स्थितीत राहून हे घराणे वर आले आहे. त्या कुटुंबीयांना या प्रसंगी नम्रपणे प्रणाम. पुढच्या प्रगतीपथावर आपण सहभागी आहोत; चला, जाऊ या.

## सत्कार्याला मदतीचा हात

नागरिकांच्या इच्छा-आकांक्षा नगरपालिकेच्या रूपाने व्यक्त होत असतात. सत्कार्याला मदत करणे ही गोष्ट उत्तम नागरिकत्वाचे लक्षण आहे. नागरिकांची प्रतिनिधी

अशा संस्थेलाही ही गोष्ट लागू आहे. सत्कार्यांचे स्वरूप निरनिराळे असू शकते. एखाद्या इसमाने संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी कष्ट केले; वर्ग चालविला किंवा पाठशाळा चालविली, तर नगरपालिका त्या व्यक्तीच्या पाठीशी उभी राहू शकते. शैक्षणिक क्षेत्र नगरपालिकेच्या कक्षेतले आहे. म्हणून ही गोष्ट रीतसर चौकटीत बसेल हे नेहमीच साध्य होईल असे नाही. तसेच ज्या कार्याला मदत द्यावयाची ते नगरपालिकेच्या हद्दीबाहेरचेही असेल. संकटग्रस्तांना मदतीचा हात देणे, ही गोष्ट ही नगरपालिका करते.

बारामती नगरपालिका स्थापन झाल्यानंतर १५ वर्षातच या भागाला दुष्काळाचा तडाखा बसला. वृद्ध, पंगू, आंधळे, ज्याना उदरनिर्वाह करण्याची शक्ति नाही अशांना भाकऱ्या भाजून वाटाव्यात असे ठरविले होते. या कामासाठी स्वयंपाकी एक ब्राह्मण जेवून रोज दोन आणे, आणि मराठ्यांच्या बाया दोन, रोज जेवून एक आणाप्रमाणे द्यावेत असे ठरले होते. राणोजी कान्होजी डॉक्टर यांच्या देखरेखीखाली हे काम झाले. उपासमार, अन्नान्नदशा झालेल्या व्यक्तीला वैद्यकीय मदत लागते, म्हणूनच बहुधा हे सर्व काम डॉक्टरचे देखरेखीखाली योजले असावे. या कामाची पहाणी करण्याकरिता सभासदांची एक समिती नेमली होती (इ. स. १८७७–७८).

कालांतराने महागाई वाढली, तेव्हा नोकरांना भरपाई देण्याचा विचार वेळोवेळी झाला. त्याचप्रमाणे नागरिकांना माफक दराने धान्य मिळण्याची व्यवस्था झाली; तीत नगरपालिकेने भाग घेतला होता. स्वस्त धान्याचे दुकान काढावे अशी सूचना सरकारने केली व त्यासाठी रु. ५०००।- देऊ केले. स्वस्त धान्याच्या दुकानाकरिता रु. ५०००।- मिळावेत असा ठराव करण्यात आला (ता. ७–४–१९१९).

नंतर गुजरातमध्ये जलप्रलयाने नुकसान झाले, त्यावेळी संकटग्रस्तांना मदत म्हणून रु. २००।- मंजूर केले (ता. ५–१०–१९२७)

बारामती येथील रिमांड होमच्या इमारतीसाठी रु. ५००१।- ची देणगी मंजूर करण्यात आली. (ता. ३१·१२·१९६०)

तसेच अनेकांन्त शिक्षणसंस्थेने बारामतीला स्थापलेल्या कॉलेजला आर्थिक सहाय्य म्हणून रु. १,००,००० चे अनुदान मंजूर केले. (ता. २४–३–१९६२). शिवाय, दरवर्षी रु. १०,००० कॉलेजला अनुदान दिले जाते.

पुण्याला पानशेत धरण व खडकवासला धरण फुटल्यामुळे जो हाहाःकार उडाला, त्या संकटग्रस्तांना मदत म्हणून नगरपालिकेने सरकारच्या अगाऊ मंजुरीने रु. ५०००।- द्यावेत, असा ठराव झाला. (ता. १५–७–१९६१). गावातून व सेवकवर्गाकडून वर्गणी गोळा करून आर्थिक मदतही नगरपालिकेने केली.

प्रासंगिक रीत्या वरील प्रकारे मदतीचा हात दिला गेला, त्याचबरोबर गावातील पुढील संस्थांना दरवर्षी अनुदान दिले जाते.

त्या संस्था अशा :—

| | |
|---|---|
| ( १ ) एम. ई. एस्. हायस्कूल :— | रु. ३६०० |
| ( २ ) जैन धर्मार्थ दवाखाना :— | रु. ६५०० |
| ( ३ ) रिमांड होम, बारामती :— | रु. ४०० |
| ( ४ ) बारामती जिमखाना :— | रु. २०० |
| ( ५ ) गांधर्व महाविद्यालय :— | रु. २०० |
| ( ६ ) लोकसेवा मंडळ :— | रु. २०० |
| ( ७ ) छत्रपती शाहू हायस्कूल :— | रु. २५०० |
| ( ८ ) श्री शाहू मराठा बोर्डिंग :— | रु. १००० |
| ( ९ ) महिला मंडळ :— | रु. १०० |
| ( १० ) श्री बालक मंदिरः — | रु. ६०० |
| ( ११ ) डॉ. आंबेडकर वसतिगृह :— | रु. १००० |

सन १९५८–५९ सालात एम. ई. एस. हायस्कूलच्या 'नाट्यमंदिर' ला नगरपालिकेने रु. ४०००।- अनुदान सरकारचे पूर्वमंजूरीने दिलेले आहे.

जिल्हा व तालुका पातळीवर ज्या क्रीडा–स्पर्धा होतात, त्यासाठीही अनुक्रमे रु. १५१ व रु. १०१ असे दरवर्षी दिले जातात. जिल्हा क्रीडा–स्पर्धेत, एक कायम स्वरूपी ढाल रु २५०।- खर्चून दिली आहे.

रिमांड होमच्या इमारतीकरता ५००१ ची देणगी सरकारचे पूर्वमंजूरीने सन १९६०–६१ सालात नगरपालिकेने दिली आहे.

अशा रीतीने नगरपालिकेने पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतच्या शैक्षणिक संस्थांस आर्थिक मदती यथाशक्ती केलेल्या आहेत व करीत आहे. इतकेच नव्हे तर सामाजिक कार्यासाठीही उदाहरणार्थ, महिला मंडळ वगैरेसारख्या सार्वजनिक संस्थांसही मदतीचा हातभार लावलेला आहे.



# उत्सव व गौरव–समारंभ

व्यक्तीच्या तसेच संस्थेच्या आयुष्यक्रमात काही घटना, कांही दिवस व कांही निर्णय आनंददायक आणि चिरस्मरणीय असतात. नगरपालिकेसारख्या संस्थेच्या बाबतीत बोलावयाचे तर शताब्दि साजरी करण्याचा योग ही अत्यंत महत्त्वाची बाब होय. त्या अगोदर ७० वर्षे पुरी झाल्याचा उत्सव साजरा केला, तो दिवस त्या खालोखाल स्मरणीय होय.

राजकीय दृष्ट्या बोलावयाचे तर, भारत स्वतंत्र झाला तो दिवस (१५ ऑगस्ट १९४७) सर्वश्रेष्ठ व सर्वोत्तम आनंदाचा यात शंका नाही. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तो क्षण (१ मे १९६०) तसाच चिरस्मरणीय होय.

नगरपालिकेत राजकारण असावे की असू नये, हा वादग्रस्त प्रश्न आहे. तथापि नगरपालिकेच्या जीवनक्रमावर राजकारणाचा परिणाम होतो याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. एवढ्याच संदर्भात काही उल्लेखनीय घटनांची नोंद आता करण्याचे योजिले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात बारामती नगरपालिकेने पाच परकी राजवटी (कारकीर्दी) पाहिल्या आहेत. त्याचे काही ठसे आजही शिल्लक आहेत.

व्हिक्टोरिया महाराणीच्या कारकीर्दीचा रौप्यमहोत्सव इ. स. १८९७ मध्ये साजरा झाला. तेव्हा बारामती नगरपालिकेने जिल्हा कलेक्टरांच्या मार्फत महाराणीकडे एक मानपत्र पाठविले. त्यासाठी रु. ५० मंजूर केले होते. तसेच ता. २१ जून १८९७ ला लोकांस पुरणपोळीचे जेवण घालण्याचा निर्णय घेतला होता.

नगरपालिकेची नवीन इमारत इ. स. १९१० मध्ये झाली, तेव्हा सभागृहाला 'सातवे एडवर्ड हॉल' असे नाव ठेवले (ता १९–७–१९१०).

पंचम जॉर्ज बादशहाचे राज्यारोहणाचे आनंदाप्रीत्यर्थ सर्व कायम म्युनिसिपल नोकरास १५ दिवसांचा पगार बक्षीस म्हणून द्यावा, असा ठराव ता. २० मार्च १९१२ च्या सभेत केला होता.

पंचम जार्ज बादशहा यांच्या कारकीर्दीचा रौप्य-महोत्सव साजरा झाला (इ. स. १९३५). तेव्हा बारामतीत नवीन दवाखान्याचे रूपाने तो प्रसंग चिरस्मरणीय झाला. आजही त्या दवाखान्याला 'सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल' असेच नांव आहे.

सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलची पायाभरणी ता. १० मे १९३५ ला झाली व त्यावेळचे सर्जन जनरल लेफ्टनंट कर्नल आर. एच. कँडी यांचे हस्ते ता. २६ ऑक्टोबर १९३६ ला त्याचे उद्घाटन झाले. वैद्यकीय मदतीची माहिती देताना या दवाखान्याचा सविस्तर उल्लेख केला आहेच. त्या समारंभाचे आदले दिवशी म्हणजे ता. २५–१०–१९३६ ला सर्व रहिवाशांना पानसुपारी करण्याचा ठरावही केला होता.

सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल उभारले गेले, या घटनेवरून काही गोष्टी नमूद करणे आवश्यक आहे. नगरपालिकेच्या कार्यालयाने, सभासदांनी व नागरिकांनी ही कल्पना नेटाने उचलून धरली, म्हणून हे काम होऊ शकले. राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी ह्या कल्पनेचा हिरीरीने पुरस्कार केला. ही गोष्ट दुधात साखर पडावी, तशी झाली.

त्यावेळी कर्ज मिळण्याचे बाबतीत शासनाकडून जरा खळखळ होत आहे. सरकार या म्युनिसीपालटीचे बाबतीत अपवाद करायला तयार नाही, असे दिसताना नगरपालिकेने खुल्या बाजारात कर्ज उभारण्याचा निर्णय घेतला. सरकारकडून कर्ज मिळण्याचे बाबतीत किती किचकट चर्चा झाली याचे एक उदाहरण देतो. ता. २६–९–१९३५ ला 'सर्क्युलर मीटिंग' घेतली, तेव्हाचा एक ठराव असा की, हॉस्पिटल इमारतीसाठी कर्जाचे बाबतीत ता. १९–९–३५ रोजी 'सर्क्युलर मीटिंग'चा ठराव करण्यात आला आहे. त्यात 'जी थोडीशी तूट' येईल, ती म्युनिसिपालटी चालू उत्पन्नातून भरून काढील असे म्हटले आहे. सदरहू ठराव कलेक्टरसाहेब यांचेकडे पाठविल्यावर त्यांचेकडून पत्र आले, त्यात "थोडीशी" हा शब्द राहू देणे इष्ट नाही; त्याचे ऐवजी 'जी काही' असे शब्द घालून ठराव पाठवावा असे आमचे मत आहे, असे म्हटले होते. म्हणून पुनः हा विषय सभासदांचेकडे पाठवून त्याप्रमाणे दुरुस्ती करावी असे ठरले.

खुल्या बाजारात कर्ज उभारण्याचे ठरले, तेव्हा इतर नेहमीच्या अटींबरोबर, पुढील अटी जाहिरातीत नमूद केल्या होत्याः—(१) कर्जाची रकम रु. १२००० (बारा हजार रुपये). (२) परतफेड १ एप्रिल

१९३६ पासून बारा वर्षांनी अगर त्यापूर्वी म्युनिसिपाल्टीच्या सवडीप्रमाणे. ( ३ ) व्याजाचा दर दरसाल दर शेकडा रु. ६ (सहा) जास्तीत जास्त असावा. ( ४ ) प्रत्येक कर्जरोखा रु. १०० चा असावा. ( ५ ) व्याज वर्षाचे अखेरीस एकदा दिले जाईल.

पाणी-पुरवठा, गटार योजना इत्यादि कामासाठी कर्ज उभारण्याचे उपक्रम सध्या सुरू आहेत. त्या संदर्भात ह्या जुन्या गोष्टी उद्बोधक ठरतील.

हा दवाखाना ही एक कामगिरी तेव्हां झाली त्याच बरोबर नगरपालिकेचा रौप्य महोत्सव (ज्युबिली) साजरा केला. त्या निमित्तानें एक अहवाल तयार केला. तेव्हां 'सरकारचे प्रतिनिधी' या नात्याने इ. डब्ल्यू. ट्रॅट्मन कलेक्टर यांना आणि बारामतीचे नागरिकांचे नैसर्गिक पुढारी या नात्यानें सरदार गोविंदराव कृष्णराव काळे. यांना तो अहवाल अर्पण करण्यांत आला. त्यावेळी नगरपालिकेचे अध्यक्षपदी श्री. नारायण मनोहर दाते हे होते. त्यांनी सदर अहवाल सादर करतांना असे म्हटले कीं, "या पुस्तकाचे लेखन, सुमारे २५ वर्षे म्युनिसीपालटीचे कारभारांत सेक्रेटरी म्हणून काम केले असल्यामुळें सर्व शाखांचे पूर्ण अवलोकन केलेले रा. महादेव नारायण सहस्त्रबुद्धे यांनीं केले आहे."

'म्युनिसिपल ज्युबिलीबाबत रु. ६१९-१०-० खर्च झाला. त्यातील कांही खर्च ( रु. १२९-८-६ ) दि. सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलच्या कामी झाला, तो ज्या त्या खाती टाकण्यांत यावा, असा कार्यालयीन हुकूम ता. ५-११-१९३६ ला काढण्यांत आला होता.

यानंतर बारामती गांव इतर सर्व देशाप्रमाणेच दुसऱ्या महायुद्धाच्या धकाधकीत सांपडले होते. युद्ध संपले व व भारत स्वतंत्र झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला तो दिवस सण म्हणून साजरा केला. त्यासाठी रु. ५०० खर्च केले. याचे स्मरण म्हणून जळोची चौकात विजयस्तंभ उभारण्यात आला. नागरिकातर्फे उभारलेल्या विजय स्तंभाला नगरपालिकेने रु. २००० देण्याचा ठराव केला (ता. ११-९-१९५३ ).

प्रजासत्ताक दिन साजरा होऊ लागल्यानंतर मराठी भाषिकांच्या दीर्घ कालच्या आशाआकांक्षा मूर्त स्वरूप झाल्या, तो दिवस म्हणजे, १ मे १९६० हा महाराष्ट्र राज्य स्थापनेचा दिवस होय. याचे अगोदर सर्व मराठी समाजांत मोठे आंदोलन झाले आणि हा 'संयुक्त महाराष्ट्राचा कलश' ता. १ मे १९६० ला अवतीर्ण झाला. रोषणाई करून नि खिरापत वाटून हा दिवस बारामतीकरांनी साजरा केला.

श्रीछत्रपती शिवाजीमहाराज स्मारकाप्रीत्यर्थ रु. १००१ ची देणगी देण्याचा ठरावही नगरपालिने ता. २०-४-१९६० ला केला.

श्री शिवजयंतीच्या सुमारासच नगरपालिकेची आता शताब्दी साजरी होत आहे, हे नमूद करण्यास विशेष आनंद होतो.

ह्या उत्सव-समारंभाची आठवण करीत असतानाच, नगरपालिकेने वेळोवेळी थोर पुढाऱ्यांचे व विचारवंतांचे स्वागत केले, त्यांना मानपत्रे अर्पण केली. यांच्या स्मृती जागरूक होतात, या बाबत सविस्तर लिहिता येईल अशी सामग्री उपलब्ध झाली नाही. तसेच कांही समारंभांचे वेळी थोर व्यक्तींना मुख्य पाहुणे म्हणून पाचारण करून त्या थोर पुरुषांची पायधूळ बारामतीला पुनीत करण्यास कारणीभूत झाली आहे. ते उल्लेख त्या त्या कार्यक्रमाचे वेळी केलेले आहेत.

'शुगर कमिशन 'चे सभासद बारामतीला भेट देणार आहेत. त्याचे स्वागत करण्यासाठी रु. ५० खर्च करण्यास मंजुरी देणारा ठराव ता. २४-३-१९२० ला झाला. हे कमिशन त्या महिन्याच्या २७ तारखेस भेट देणार असा उल्लेख त्या ठरावात आहे. या कमिशनबाबत अधिक माहिती दसरी मिळू शकली नाही. भिमथडी भागातील बागातयदारांच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठीं बारामती तालुका कॉंग्रेसने मालेगावचे राजे शंभूसिंह महाराज यांचे अध्यक्षतेखाली एक 'शुगर केन कमिशन' नेमले होते. तेच हे कमिशन असावे असा प्रस्तुत लेखकाचा कयास आहे.

यानंतर त्या काळचे कॉंग्रेसचें पुढारी व केसरीचे संपादक साहित्यसम्राट श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांना ता. ५ जुलै १९२५ ला मानपत्र दिले.

म. गांधींचा मुक्काम बारामती येथे असतांना त्यांना मानपत्र देण्याचा ठराव ता. २१-९-१९२५ ला झाला.

ब्रिटिश पार्लमेंटचें एक सभासद श्री. सकलातवाला हे बारामतीला येतील तेव्हां त्यांना मानपत्र द्यावे, असा



ठराव ता. ४ मार्च १९२७ ला झाला. श्री. दादासाहेब [illegible]कर यांनी या वेळी स्वागत समारंभ चहापाणी इत्यादिचा खर्च करण्याचे मान्य केले आहे, असेही सदर ठरावात नमूद केले होते. या कार्यक्रमाबद्दल आणखी कांही माहिती मिळू शकली नाही.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून बारामतीला आले असता, त्यांना बारामती नगरपालिकेने मानपत्र दिले. ता. २३ जानेवारी १९३७ ला याबाबत ठराव झाला व कार्यक्रम फेब्रुवारीत झाला. निवडणूक प्रचारासाठी पंडित जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्रात तुफानी दौरा केला, त्यावेळची ही भेट होय. दाणे बाजारात पं. नेहरूंचे तेव्हां प्रचंड जनसमूहापुढे ओजस्वी भाषण झाले होते.

यानंतर पुढीलप्रमाणे मानपत्र देण्याचे कार्यक्रम झाले :—

श्री. ल. मा. पाटील, स्थानिक स्वराज्य व युद्धोत्तर पुनर्रचना खात्याचे मंत्री :—ता. ६-६-१९४७.

श्री. मुरारजी देसाई, मुंबई राज्याचे गृहमंत्री, यांचा सत्कार केला ( नोव्हेंबर १९४७ ).

श्री. वैकुंठलाल मेहता, मुंबई राज्याचे अर्थमंत्री, यांना मानपत्र दिले ( ता. ३० मे १९४८ ).

श्री. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ, भारत सरकारचे बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून बारामतीला आले, तेव्हां त्यांना मानपत्र दिले ( २५-४-१९५० ).

श्री. फुलचंद रामचंद गांधी, आरोग्य व स्थानिक स्वराज्य मंत्री, हैद्राबाद, आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था परिषद, दिल्ली या संस्थेचे उपाध्यक्ष यांचे स्वागत केले. ( ता. ९-५-१९५१ चा ठराव).

श्री. गो. घ. उर्फ अण्णासाहेब वर्तक, मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री, यांना मानपत्र दिले. ( १७ ऑगस्ट १९४८ ).

राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांना मानपत्र देऊन त्यांचे हस्ते नगरपालिकेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन झाले. ( मे १९५७ ) दूध-केंद्राचे उद्घाटनही त्यांचे हस्ते झाले.

श्री. दादासाहेब कन्नमवार, आरोग्यमंत्री मुंबई राज्य, यांचे स्वागत केले. ( डिसेंबर १९५९ ).

श्री. यशवंतराव चव्हाण, मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांना ते कॉलेजचे उद्घाटन करण्यासाठी बारामतीला आले असता मानपत्र देण्यांत आले ( ता. २३-६-१९६२ ).

मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश श्री. एच्. के. चैनानी हे बारामतीला आले असता, त्यांना मानपत्र दिले (ता. ११-८-१९६२ ).

श्री. यशवंतराव चव्हाण हे भारताचे संरक्षण मंत्री म्हणून बारामतीला ( ता. ११-५-१९६३ ) आले, तेव्हां त्यांचा सत्कार करण्यांत आला.

श्री. वसंतराव नाईक, मुख्य मंत्री, महाराष्ट्र, यांना मानपत्र दिले ( ता. ११ फेब्रुवारी १९६४ ).

## खजिना व सावकार

नगरपालिकेसारखी सार्वजनिक संस्था ही बाब आपलेकडे नवीनच, आणि ब्रिटिश अमदानीचे प्रारंभीचे दिवस यामुळे बारामतीची नगरपालिका स्थापन झाल्यानंतर कांही वर्षेपर्यंत खजिन्याची व्यवस्था कसकशी केली गेली हे पहाणे मोठे मनोरंजक आहे.

संस्थेचा जन्म झाल्याचे पहिल्याच महिन्यात २३-१-१८६५ च्या सभेत, कांही वस्तु घेण्यासाठी रु. ५० मंजूर केले, त्यात 'पैसा ठेवणेवाठी एक पेटी' घ्यावी असे ठरले होते.

नगरपालिकेचा पैसा कोठे ठेवणेचा याबद्दल ता. १७ नोव्हेंबर १८६६ च्या सभेत विचार झाला. याबद्दल ठरले की, रु. ५०० हून जास्ती पैसा सावकाराकडे व्याजी ठेवावा. त्याची जोखीम चेअरमन व सर्व कमेटीवर राहील.

इ. स. १८८४ मध्ये ठरविले की, म्युनिसिपाल्टीची शिल्लक आहे. त्यातून रु. ५००० च्या सरकारी प्रॉमिसरी नोटा खरेदी कराव्यात व बाकी शिल्लक खर्चासाठी ठेवावी.

सरकारने नंतर इ. स. १८९१ मध्ये आदेश दिल्याप्रमाणे ठरविले की, सेक्रेटरी यांचेजवळ शिल्लक एक हजार रुपयाचेवर झाली आहे. नवीन सरकारी ठरावाप्रमाणे, रु. २०० पोस्टाचे सेव्हिंग बँकेत चेअरमन म्युनिसिपालिटी बारामती यांचे नावे ठेवावे व बाकीच्या शिल्लकीचा शहरात पाणी घेणेचे काम लौकरच सुरु होणार आहे त्यावेळीं विचार करण्यात येईल.

ता. ६ फेब्रुवारी १८९२ चा ठराव असा की, सेक्रेटरी जवळ शिल्लक रु. २८९१-१५-८ पै आहे, त्यापैकी रु. २००० मेहेरबान मलुकचंद ताराचंद गुजर यांचे येथे मामलेदार कचेरी येईपर्यंत अगर कमेटीस जरूर लागे पर्यंत ठेवावे. सदरहूबद्दल त्याजपासून जबाबदारीची रिसीट घ्यावी.

दोनच वर्षांनी असा निर्णय घेण्यात आला कीं, सेक्रेटरी यांचेजवळ रु. १०० पेक्षा जास्त शिल्लक असल्यास ती खजिन्यांत भरावी.

प्लेगसारख्या साथी आल्या म्हणजे पैशाची उलाढाल मंदावते. अशा स्थितीत ता.१-१०-१९०४ ला ठराव केला कीं, हल्ली प्लेगमुळे म्युनिसिपालिटीचे रोजचे जमेचे उत्पन्न कमी झाले आहे. शिवाय घरपट्टी, गाडीपट्टी, बाजारभाडे यांचा वसूल होत नाहीं. त्यामुळे खर्चाची फार अडचण झाली असून नोकर लोकांस दोन महिने पगार नाहीत. प्लेगसंबंधानेही इतर खर्चाची जरूरी आहे. सबब ४ हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा मोडणेबद्दल अलाहिदा काम सुरू आहे. त्या नोटा मोडून त्याची रक्कम येईपर्यंत एक हजार रुपये मेहेरबान रामचंद मलुकचंद हे विनव्याजी उसनवार देत आहेत, त्याजकडून घेऊन पगार वगैरे जरूरीचे खर्च करावेत आणि नोटांची रक्कम आली की हे पैसे परत करावेत.

इ. स. १९२०-२१ मध्ये आणखी एक बदल झाला. नगरपालिकेची रक्कम तालुका तिजोरीत ठेवीत असत; ती तिकडून काढून दि बॉम्बे बॅंकेच्या बारामती येथील शाखेत ठेवावी असे ठरविले.

## गांवांतील पोलीस बंदोबस्त

नगरपालिकेच्या प्रारंभीच्या कालखंडात पोलीस खात्याचा कारभार पालिकेकडेच असे. प्रथम पोलीस पाटील हा पालिकेचा सभासद असे, नंतर हेड कॉन्स्टेबल सभासद असे. त्या वेळेला काही प्रकरणे कशी उत्पन्न झाली ते पहाणे आज उद्बोधक होईल. आता ही दोन्ही खाती अलग आहेत. पण अनेक बाबतीत पोलीस व नगरपालिका यांचा निकटचा संबंध येतो. हे अपरिहार्य आहे.

ता २२ जुलै १८६७ ला असे प्रकरण आले होते कीं, धर्मशाळेजवळ पोलीस लोकांचे रहाण्याचे गेट आहे ते नादुरुस्त आहे, तरी दुरुस्त करणेबाबत भिमथडीच्या फौजदारांनी ३ मे १८६७ ला पत्र पाठविले, त्यावर ठरले की, सदर दुरुस्तीचे काम नगरपालिकेकडून होणार नाही असे कळवावे.

त्याच वेळेला, ठाणे नगरपालिकेप्रमाणे, १ पोलीस कॉन्स्टेबल, ५ शिपाई व सादिलसाठी रु. २ तरतूद करण्याचे प्रकरण सरकारातून आले होते, त्यावर असा निर्णय घेतला की, १ कॉन्स्टेबल पगार दरमहा रु. १५, चार शिपाई दरमहा पगार रु. ५ व सादिलसाठी दरमहा रु. १ प्रमाणे नेमणेस मंजुरी आहे.

पोलीस वाढविण्याची जरूर वाटू लागली. तेव्हा असे ठरविले की, या नगरपालिकेचे उत्पन्न फार कोठे आहे ? सबब दोन पोलीसचा खर्च देणेस नाही. हल्ली शहरांत दिवे रात्री अकरा वाजेपर्यंत असतात, तेच दिवे बारावर तीन वाजेपर्यंत ठेवावेत.

पोलीस गस्त घालतात त्यांना कंदील देणेची मागणी आली तेव्हा 'दोन चार कंदील व प्रत्येक कंदिलास रोज एक छटाक तेल याप्रमाणे १५ दिवस देत जावे असा निर्णय घेतला (ता. ५-७-१८८०) [ यावेळी पेठेत ३५ व कसब्यात ८ मिळून ४३ दिवे प्रत्येक महिन्यात कृष्ण पक्षात १५ दिवस लावण्यात येत, असे दसरी उल्लेख आहेत. वासलेटचे कंदील इ. स. १८८५ पासून सुरू झाले. पुण्याहून दोन कंदिल नमुन्यासाठी आणले, त्याचा अनुभव घेऊन ५० कंदील आणण्याचे ठरले. त्यासाठी रु. २२५ मंजूर केले. ]

इ. स. १८८९ मध्ये रयतेने अर्ज केला होता की, सध्या पाऊस नसल्यामुळे गांवोगांव चोऱ्या होत आहेत व दरवडे पडत आहेत. याचा विचार करता लोकांचे संरक्षण करावे, म्हणून ३१-१०-१८८९ पासून ३ महिनेपर्यंत ८ पोलीस कॉन्स्टेबल आणून दरमहा रु. ६-८-० पगार द्यावा. त्याप्रमाणे तजवीज करणेचे ठरले (१९-७-१८८९).

याच वेळेला एक प्रकार असा झाला होता कीं, नगरपालिकेच्या कार्यालयाच्या इमारतीत खालील दुकाने भाड्याने दिली होती. भाडेकरी लोक दुकाने सोडून गेले. तेव्हां असे ठरविण्यांत आले की, दर एक महिन्याचे मासिक भाडे ठरवून नंतर अकरा महिन्यांचे मुदतीचा भाड्याचा लिलाव करावा. जो रक्कम अधिक बोलेल, त्याचे कडून रोख रक्कम घ्यावी.



गांवांतील रामोशी रखवालदारांनी इ. स. १८९० च्या प्रारंभी अर्ज केला होता की, चोऱ्या दरवडे होत असल्यामुळे हल्ली नोकरी फार पडते. तरी रखवालीबद्दल कांही मिळावे. नगरपालिकेने ठरविले की, आपले खर्चाने ६ कॉन्स्टेबल आणले आहेत. त्यांची मुदत संपली म्हणजे मग विचार होईल, असे कळवावे.

पोलीस गेटास दिवा देणे बाबत, पोलीस सुपरिटेंडेंट कडून लिहून आले असता ता. २६ जानेवारी १८९७ ला ठरविले की, एक समई व तेल देणे. आत रॉकेल तेल जाळणेपासून इमारतीस अपाय होण्याचा संभव आहे. सबब ते जाळणेस मना करावी.

एकोणीसावे शतकाचे अखेरीस पोलीसखाते नगरपालिकेकडून गेले. नंतर नगरपालिकेने चौकांत स्वतःच्या इमारतीत तळमजल्यावरची जागा पोलीस चौकीसाठी देण्याचा ठराव ता. ३०-६-१९१६ ला केला. 'गांवाच्या रक्षणा' साठी असे उद्दिष्ट ठरावात नमूद आहे. परंतु पुढे गंमत अशी की, पोलीस गेटला दिलेली इमारत सरकारी इमारत म्हणून ठरू पहात होती. खालचा मजला सरकारी व वरचा मजला म्यु. चा अशा अनवस्था प्रसंग ओढवला. शेवटी सरकारला नोटीस देण्यापर्यंत पाळी आली तेव्हा सदरहू जागेचा ताबा अगदी अलीकडे चारपाच वर्षांपूर्वी बऱ्याच पत्रव्यवहारानंतर नगरपालिकेस मिळू शकला.

इ. स. १९११ मध्ये कोंडवाडे ताब्यात घेण्याचा प्रश्न उपस्थित झाला असता, तूर्त कोंडवाडा ताब्यात घेऊ नये. सध्या कोंडवाड्याचे उत्पन्न तीन चतुर्थांश मिळते, ते मिळत रहावे आणि एक चतुर्थांश हिस्सा पोलीस व कोंडवाड्याकडे मिळावा असे ठरविण्यात आले. आता महाराष्ट्र म्यु. पल अॅक्ट १९६५ कलम २८२ प्रमाणे पूर्वीचा कॅटल ट्रेसपास अॅक्ट १८७१ चा रद्द करून ह्या नव्या कायद्यात कलम २८२ ते २९० ह्यात कोंडवाड्यासंबंधी नवीन तरतुदी केलेल्या आहेत.

## जागाभाडे व मालमत्ता

बारामती नगरपालिकेच्या मालकीची सर्व्हेनंबर २, ३ व २२० हे आहेत. त्याचे क्षेत्र अनुक्रमे एकर १८ गुंठे ३६, एकर १३ गुंठे २७, व एकर ७ गुंठे ३६ याशिवाय बऱ्याचशा जागा नगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. कांहीं जागेवर पालिकेने इमारती बांधलेल्या आहेत त्या इमारती दुकानांकरिता भाड्याने दिलेल्या आहेत व काही जागा मोकळ्या भाड्याने दिल्या आहेत. त्यावर भाडेकऱ्यांनी इमारती बांधून दुकाने घातलेली आहेत. कांहीं जागा रहाण्यास दिलेल्या आहेत. त्यात हरिजनांना बऱ्याचशा हौसिंग सोसायट्यांसाठी जागा दिलेल्या आहेत. सर्व्हे नंबर २ व २२० मधील जागा सोसायट्यांना नाममात्र भाड्याने ९९ वर्षांचे मुदतीनें सुमारें १० एकर जमिनी दिलेल्या आहेत. त्या येणेप्रमाणेः—

(१) हरिजन को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी यांन सर्व्हे नंबर २२० मधील १ एकर २३ गुंठे जागा दिली आहे.

(२) विकास को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी यांना सर्व्हे नंबर २२० मधील ०,२७ गुंठे जागा दिली आहे.

(३) गाडीवडार समाज को. हौसिंग सोसायटी लि. बारामती यांना सर्व्हेनंबर २ मधील २ एकर जागा दिली आहे.

(४) अस्पृश्योद्धार हौसिंग सोसायटी लि. बारामती यांना सर्व्हेनंबर २ मधील ५ एकर जागा दिली आहे.

(५) पाथरवट वडार हौसिंग सोसायटी यांना सर्व्हे नं. २ मधील १ एकर ६ गुंठे जागा दिली आहे.

(६) दि बुरुड समाज को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. बारामती यांना जागा दिली आहे.

( सन १९४७ साली नीरा इंदापूर रस्त्याचे दक्षिणेस मुख्य बाजारपेठेत नगरपालिकेने २६ खोल्या बांधल्या आहेत. त्या इमारती भाड्याने दिल्या आहेत; तेथे हल्ली दुकाने आहेत. पालिकेच्या एकूण इमारती १२५ व मोकळ्या जागा १२५ आहेत. त्यात २५० भाडेकरी आहेत. भाड्याचे रूपाने पालिकेला इ. स १९३६-३७ मध्ये सहा सात हजार रुपयांचे उत्पन्न होते, ते आता सुमारे २८ हजार रुपयांचे झाले आहे. )

याशिवाय बरीचशी जागा मोकळी आहे. सन १९४५-४७ च्या दरम्यान सदरहू रस्त्यावर असलेली दुकाने सेटबॅकमध्यें नीरा इंदापूर रस्तारुंदीच्या कामात पाडून मागे घ्यावी लागली, त्यास सुमारे २५ ते ३० हजार रुपये खर्च झाला व नवीन २६ दुकानाचे गाळे बांधण्यात आले. दरवर्षांचे मुदतीने ह्या इमारती भाड्याने देण्याची

पद्धत होती त्यामुळे दुकानचे भाडेकऱ्यांना स्थैर्य वाटत नसे. ही त्यांची अडचण लक्षात घेऊन पाचवर्षाच्या मुदतीकरता नगरपालिकेने दुकानभाड्याचे जाहीर लिलाव केले. हेतु हा की, भाडेकऱ्यास जागेबद्दल शाश्वती वाटावी. जाहीर लिलावात बोलणारांनी जीवघेणी स्पर्धा करून भरमसाट बोली दिल्या व एक वर्षाचे भाडे अगाऊ दिले व ताबे घेतले. पुढे मात्र चार वर्षेपर्यंत त्याच भाडेकऱ्यांनी भाडे दिले नाही. जागा फुकटांत वापरल्या. शेवटी कोर्टकचेरी करून जागेचे ताबे मिळवावे लागले. पण ह्या व्यवहारांत नगरपालिकेस बरीच आर्थिक खोट बसली. सार्वजनिक जबाबदारी व नीतिमत्ता अद्यापपर्यंत आपणापासून फार दूर आहे असा नाइलाजाने उल्लेख केल्यावाचून रहावत नाही.

## गुमास्ता कायद्याचा अंमल

बॅांबे शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट् ॲक्ट या इंग्रजी नावाने ओळखल्या जाणाऱ्या कायद्याचे 'गुमास्ता कायदा' असे मराठीत सुटसुटीत नाव आहे. अशा प्रकारचा कायदा प्रथम आपल्या राज्यात इ. स. १९३९ मध्ये झाला; इ. स. १९४८ मध्ये त्यात प्रमुख दुरुस्त्या झाल्या व तेव्हापासून वेळोवेळी किरकोळ महत्त्वाच्या दुरुस्त्या होऊन त्याची अंमलबजावणी सुरू आहे. सर्व कायदा लक्षांत घेता मूळ कायद्यापेक्षा दुरुस्त्यांची व्याप्ती जास्त दिसते.

बारामती नगरपालिकेच्या हद्दीत हा कायदा प्रथम इ. स. १९४६ मध्ये सुरू केला. या कायद्याची अंमलबजावणी प्रारंभापासून नगरपालिकेकडेच सोपविली आहे. नगरपालिका यासाठी एक 'शॉप्स इन्स्पेक्टर' नेमते व चीफ ऑफिसर यांच्या देखरेखीखाली ह्या कायद्याच्या अंमलबजावणीचे काम सुरू असते.

श्री. एस्. एस्. कऱ्हे हे पहिले शॉप्स इन्स्पेक्टर होते. त्यानंतर श्री. पी. व्ही. चावरे L. L. B. यांच्याकडे हे काम होते. श्री. ए. आर. शेख B. A. हे आता त्या पदावर आहेत.

या कायद्याचे स्वरूप बरेच व्यापक आहे. समाजकल्याण (सोशल वेल्फेअर) साधण्याचा ह्या कायद्याचा मूळ उद्देश आहे. नगरपालिकेचे कार्यक्षेत्र कसे वाढत आहे, ही गोष्ट ह्या कायद्याचे अंमलबजावणीवरून दिसून येईल.

दुकान, व्यापारी संस्था, हॉटेल्स, विश्रांतिगृहे, भोजनगृहे, नाटकगृहे, वा चित्रपटगृहे इत्यादि व्यवसायातील नोकरवर्ग व चालक यांचे संबंध चांगले व परस्परांना पूरक व्हावेत, असा ह्या कायद्याचा हेतु आहे, असे म्हणणे योग्य होईल. केवळ नोकरांचे कामाचे तास, विश्रांती, पगाराचे मान व नियम, इतक्या पुरता हा कायदा आहे, असे समजणे चुकीचे होईल. आपण त्याला 'गुमास्ता' कायदा म्हणतो, म्हणून तो फक्त 'गुमास्त्या' साठी (शॉप-एस्टॅब्लिशमेंटसाठी) आहे असे समजणें योग्य नाही.

या कायद्यान्वये खुद्द मालकांचेवरही काही व्यवहाराचे निर्बंध घातलेले आहेत. नोकर असो अथवा नसो दुकान उघडावयाचे केव्हा व बंद केव्हा करावयाचे ते या कायद्यान्वये ठरविले आहे. सर्व कायद्यातील तरतूदींचा गोषवारा येथे देण्याची आवश्यकता नाही. तथापि काही ठळक गोष्टी नमूद केल्या म्हणजे, त्याचे स्वरूप लक्षात येईल. काही ठळक तरतूदी अशा :–

(१) दुकाने व व्यापारी संस्था सप्ताहात एक दिवस सक्तीने बंद ठेवल्या पाहिजेत.

(२) स्त्रियांना व लहान मुलांना सकाळी ६ वाजण्यापूर्वी व संध्याकाळी ७ वाजल्यानंतर दुकानात काम करण्याची या कायद्याने मनाई केली आहे.

(३) स्वच्छता, हवा, उजेड, दिवाबत्ती इत्यादींची सोय हवी. इमारतीला रंग दिला जावा.

(४) प्रत्येक संस्थेत आगप्रतिबंधक उपाय हवेत.

(५) प्रथोपचाराची साधने असलेली पेटी प्रत्येक संस्थेत (शॉप किंवा एस्टॅब्लिशमेंट) ठेवणे अवश्य आहे.

सदर कायद्यातील काही तरतुदींचा वर उल्लेख केला आहे. तेव्हा केवळ नोकरवर्गाच्या स्वास्थ्याचा यात विचार आहे असे म्हणता येणार नाही. नोकरांना भर पगारी साप्ताहिक सुट्टी देण्याची तरतूद या कायद्यात आहे. सुट्टीच्या दिवशी नोकराला दुकानांत वा कामाच्या ठिकाणी बोलावणे हा गुन्हा ठरविला आहे. जादा कामाबद्दल अधिक वेतन देण्याची तरतूद आहे. त्याचबरोबर विश्रांतीची वेळ धरून कोणत्याही दिवशी ११ तासापेक्षां अधिक वेळ कामगार कामावर असता कामा नये. सर्वसामान्यपणे सर्व दिवसांत ८ तास काम द्यावयाचे असा नियम आहे.

सणाच्या दिवशी दुकान, कार्यालय जास्त वेळ उघडे



ठेवणे, पण त्याचबरोबर इतर एखादे दिवशीं सुट्टी घेणे, अशीही तरतूद यात आहे. आणखी एक नियम असा आहे की, थिएटर, सार्वजनिक करमणुकीचे ठिकाण अगर मनोरंजनाचे इतर ठिकाण रात्री १२॥ नंतर उघडे ठेवावयाचे नाही. रजा, वेतन, इत्यादिबाबतही नियम आहेत.

आरोग्यरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टीने असा नियम आहे की, प्रत्येक संस्थेची जागा घाण पाणी अगर शौचकूप किंवा इतर घाण यापासून उत्पन्न होणाऱ्या दुर्गंधीपासून स्वच्छ राखण्यात आली पाहिजे. तसेच ती जागा ठरविले जाईल त्या वेळी व त्या पद्धतीने स्वच्छ केली पाहिजे. चुन्याचा रंग देणे, इतर रंग देणे, वॉर्निश करणे, रोगजंतुरहित करणे, दुर्गंधीरहित करणे इत्यादि पद्धतींचा यात समावेश आहे.

गुमास्ता कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली तेव्हा गावात सुमारे ६५० (शॉप्स व एस्टॅब्लिशमेंट्स) होती. आता ती संख्या ८७५ पर्यंत गेली आहे. त्यांत थिएटर, १, व्यापारी संस्था ५०, हॉटेल्स, खानावळी वगैरे ४५ अशी आहेत. इतर दुकानांची विगत अशी:— कापडाची दुकाने ४३; किराणा मालाची दुकाने १८१; मटन दुकाने ५९; शिवण कामाची दुकाने ६४; सायकलची दुकाने ५०; पानपट्टीची दुकाने ७१ इत्यादि. गावात जिनिंग व प्रेसिंगचे कारखाने पाच आहेत.

गुमास्ता कायद्याची ही अगदी स्थूल रूपरेषा दिली आहे. रेल्वे स्टेशनच्या पलीकडे रहाण्याची वस्ती वाढत आहे. व औद्योगिक वसाहतीसाठी तिकडे जागाही मंजूर केलेली आहे. कसबा भागातही आता वस्ती वाढत आहे या सर्व घडामोडी लक्षात घेता, गावात दुकाने वाढणार आहेत म्हणून या कायद्याच्या अंमलबजावणीला नजीकच्या कालावधीत विशेष महत्त्व येणार आहे, असे म्हणता येते.

नगरपालिकेच्या कायद्यातही स्वच्छता व सुरक्षितता या बाबतीत कांहीं नियम आहेत. दुकानांना 'लायसेन्सेस' दिली जातात, त्यांतही याला आवश्यक अशा काही अटी असतात. तसेच, गुमास्ता कायद्यातील ह्या व्यवस्था, यांचा [illegible]ने विचार केला म्हणचे गावची स्वच्छता, वाढण्यासाठी व नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी, नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना भरपूर अधिकार आहेत, हे निर्विवाद होय. इतक्या सर्व गोष्टींचा संग्रह केल्यावर

आमचे आरोग्य व स्वच्छता आहे ही अशीच कां? याचा दोष किंवा चांगुलपणा कोणाकडे बरे? तर 'आमची कायद्यांची अंमलबजावणी या सर्व गोष्टीला जबाबदार आहे' असेच उत्तर येते. त्याचबरोबर रयतेस आपली जबाबदारी टाळतां येण्यासारखी नाही. सफाई खात्याचा विचार करतांना काही गोष्टींचा उल्लेख केला. गुमास्ता कायद्याचा विचार करताना पुनः एकदा या विषयाकडे अंगुलीनिर्देश करता आला. हे लिहीत असता एक कल्पना मनात आली, ती कितपत योग्य वा अयोग्य, ते नागरिकांनीच ठरवावे. धो धो पाऊस पडत असता, पादचाऱ्याने हातातली छत्री उघडली नाही व खांद्यावरचा रेनकोट अंगात घातला नाही, तर काय होईल बरे?

## नोकरवर्ग, त्याचे वेतन, रजा, सवलती वगैरेबाबत

दुष्काळामुळे महागाई वाढते. म्युनिसिपालिटीच्या शिपायांचा अर्ज विचारांत घेऊन असे ठरविले होते कीं, जोपावेतो कैली मापी नऊ शेराचे आंत ज्वारी बाजरी विकली जात आहे, तोपावेतो महागाई म्हणून प्रत्येकी एक रुपाया द्यावा असे सर्वांचे विचाराने ठरले (ता. १६-४-१८६९).

यानंतर एकोणीसाव्या शतकाचे अखेरीस महागाई वाढली, म्हणून असे ठरविले होते की, दुष्काळामुळे महागाई मिळणेबाबत आलेल्या नोकरांच्या अर्जाचा विचार करता सरकारी नोकरास ज्याप्रमाणे महागाई दिली जाईल त्याप्रमाणे द्यावी (२९-११-१८९६).

महागाईला आळा बसेना तेव्हां असा निर्णय घेतला की, 'ग्रेन कॉम्पेन्सेशन' म्हणून (धान्याचे भाव वाढले त्यासाठी भरपाई म्हणून) म्युनिसिपल नोकरांना आठ दिवसांच्या पगारा इतका बोनस द्यावा. (ता. ३-३-१९०९).

सर्व म्युनिसिपल नोकरांना प्राव्हिडंड फंड योजना लागू करावी, असा ठराव ता. ६-११-१९४६ ला करण्यांत आला.

सर्व म्युनिसीपल नोकरवर्गावर वचक बसविण्याकरिता 'डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट कलम ३७ प्रमाणे' म्युनिसिपल नोकरांना सस्पेंड (नोकरीतून तात्पुरते दूर) करण्याचा

अधिकार मॅनेजिंग कमेटीस देणेत येत आहे, असा ठराव ता. २३-१२-१९४६ ला झाला.

नोकरवर्गाच्या हिताचा एक ठराव ता. ५-५-१९६० ला झाला. त्याचा सारांश असा कीं, म्युनिसिपल सेवकांना 'सॅलरी सेव्हिंग प्लॅन' आणि विमायोजना लागू करणेस या कमेटीची मान्यता आहे. त्याप्रमाणे विमा योजना लागू करावी व पगारातून हप्ते कापून घेणेची तजवीज करावी व ही योजना अमलातही आलेली आहे.

पहिल्या महायुद्धाच्या वेळी स्वस्त धान्याचे दुकान काढण्याचा प्रयत्न झाला. त्याची पुनरावृत्ति दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं इ. स. १९४२ मध्ये झाली. यावेळी स्वस्त धान्यपुरवठा करण्यासाठी नगरपालिकेच्या 'फंडातून' रु. ५००० चे भांडवल पुढे केले होते. श्री छगनलाल फुलचंद ढाकाळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली होती. केवळ खर्च घेऊन धान्य विकावे, नफा घेऊ नये, असे ठरले होते. शिवाय भांडवलास मदत सरकारातून मिळवावी. आणि गांवातून बिनव्याजी पैसा मिळत असेल तर तो भांडवलासाठी घ्यावा, असा आदेशही देण्यात आला होता (ता. ११-१२-१९४२).

कर्तव्यदक्ष नोकराचा गौरवहि नगरपालिकेने केला आहे. नाक्यावरील शिपाई श्री. रा. स. जाधव यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून, इंदापूर चौकात मोटार लॉरी पुढे स्वतःची सायकल टाकून, बिगर जकातीने वेफाम निघालेल्या मोटारला अडविले, आणि जकात वसूल केली. या प्रशंसनीय कामगिरीबद्दल त्यास रु. ११/—बक्षिस देण्याचा ठराव झाला (ता. २७-४-१९६२). सेवकाच्या चांगल्या कामाबद्दल वेळोवेळी ठराव रूपाने स्टँडिंग कमेटीने नोंदीही केलेल्या आहेत.

रजा :—

(अ) म्युनिसिपल सेवकास पूर्वी २० दिवसांची किरकोळ रजा वर्षातून देण्यात येत असे. ती पुढे सन १९५५ साली १५ दिवसांची करण्यात आली. अशी रजा सुट्टीस जोडून दोन रविवारचे सुट्टी मध्ये देण्याची तरतूद झाली.

(१) सातत्याने केलेल्या सेवेच्या कालखंडाच्या १।११ रजा वर्षातून हक्काची म्हणून देण्याची तरतूद आहे.

(२) आजारपणची रजा देण्याची तरतूद आहे. त्याचा कालखंड निश्चित नमूद आहे. पण सदर रजा पगारी अगर अर्धपगारी याचा नियमात स्पष्ट उल्लेख नसल्याने पुष्कळ वेळा ही बाब विवाद्य होते.

(३) स्पेशल रजा देण्याचीही तरतूद आहे व पगाराचे बाबत वरील (२) प्रमाणेच परिस्थिती आहे.

(४) स्त्री सेवकास बाळंतपणाची रजा देण्याची नियमांत सन १९५४ सालापर्यंत तरतूद नव्हती. म्हणून तशी तरतूद करण्यात आल्याने प्रसूति तारखेपासून चार आठवडे किंवा एकूण दोन महिन्याची पगारी रजा देता येऊ लागली.

(५) निवृत्तिपूर्व रजा देण्याचीही नियमांत तरतूद आहे.

(६) ग्रॅच्युइटी देण्याचे नियम बऱ्याच वर्षापासून अमलांत होते व रकमेची व सेवाकालाची मर्यादा खालील प्रमाणे होती—

| सेवाकाल | ग्रॅच्युइटीची रक्कम |
|---|---|
| ५ ते १० वर्षे | सरासरी तीन महिन्याचा पगार. |
| १० ते २५ वर्षे | सरासरी सहा महिन्याच्या पगारापेक्षां जास्त नाही |
| १५ ते २५ वर्षे | सरासरी ९ महिन्याच्या पगारापेक्षां जास्त नाही. |
| २५ वर्षाचे वर | सरासरी १ वर्षाच्या पगाराइतकी रक्कम. |

ग्रॅच्युइटीची रक्कम सेवाकाल व सेवेचे गुण लक्षांत घेऊन चालकांना ठरविण्याचा अधिकार होता. निश्चित रकमेची सेवकास शाश्वती नसे. मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्याच्या दयेवर व सहानुभूतीवर विसंबून रहावे लागत असे. ही अनिश्चितता प्राव्हिडंड फंड योजना ता. १-१०-१९४९ पासून लागू झाल्याने दूर झाली व सेवानिवृत्तिनंतर वृद्धापकाळाच्या तरतुदीची अंशभाराने सेवकास हमी मिळू लागली. त्या योजनेखाली सेवकांस पगाराच्या रकमेवर रुपयांस एक आणाप्रमाणे स्वतःची वर्गणी भरावी लागते व वर्षात जेवढी रक्कम सेवकाच्या खाती जमा होईल, तेवढीच रक्कमसालअखेर नगरपालिका जनरल फंडातून काढून त्या सेवकाच्या खाती जमा करते. महागाई जसजशी वाढत गेली तसतसे सरकारने सरकारी सेवकाच्या महागाईभत्यात वाढ केली व त्या त्या वाढीप्रमाणे नगरपालिकेनेही आपल्या सेवकाचे महागाईभत्यात वेळोवेळी आज तारखेपर्यंत वाढ केलेली आहे.



सरकारने महागाई भत्याच्या रकमेचा काही अंश सरकारी सेवकाचे पगारात सामील केला. ह्याचा फायदा सरकारी सेवकास पेन्शनवाढ होण्यात झाला. म्युनिसिपल सेवकास पेन्शन देण्याची तरतूद नसल्याने नगरपालिकेने महागाई भत्याचा खालील दराप्रमाणे प्राव्हिडंट फंड आकारण्याचे पगाराचे रकमेत समावेश केला व अशा रीतीने सेवकांना फायदा दिला.

| मूळ पगार मर्यादा | पगारात समावेश करणेची रक्कम |
|---|---|
| रु. ५० पर्यंत | रु. ३५ |
| रु. ५१ ते २०० पर्यंत | रु. ४५ |
| रु. २०१ ते ५०० पर्यंत | रु. ६० |

सेवकाच्या स्वतःच्या वर्गणीवर व म्युनिसिपालिटीने दिलेल्या रकमेवर सरकार ठरवून देईल त्या दराने दर वर्षी त्या त्या सेवकाचे खाती व्याजाची रक्कम जमा करण्यात येते.

(७) सफाई खात्यातील सेवकास घाण काम करावे लागते, ह्या दृष्टीने नगरपालिका सफाई खात्यातील सेवकास दरमहा रु. ४, ३ व २ असा घाणकाम भत्ताही आज बऱ्याच वर्षांपासून देत आहे.

(८) म्यु. चे सेवेत असणाऱ्या सर्व सेवकांस कनिष्ठ वरिष्ठ असा भेदभाव न ठेवता वर्षातून दोन यूनिफॉर्म्स सन १९६६-६७ पासून देत आहे. सफाई व दवाखाना खात्याचे सेवकास अशा प्रकारचे दोन यूनिफॉर्म्स सन १९५६ पासून देत आहे. नगरपालिकेच्या सर्व सेवकांना यूनिफॉर्म देऊन ह्या नगरपालिकेने इतर नगरपालिकापुढे आदर्श घालून दिला आहे, असे म्हणावयास हरकत नाही. आमच्या माहितीप्रमाणे नगरपालिकेच्या सर्व सेवकांस कोणतीही नगरपालिका यूनिफॉर्म देते असे वाटत नाही.

(९) सफाई खात्यातील सेवकांनी कितीही वर्षे नोकरी केली, तरी सदर सेवकास इतर कायम सेवकाप्रमाणे कायम समजून इतर सवलती मिळत नसत. पण सन १९४७ साली कॉंग्रेसने सरकारी सूत्रे हातात घेतल्या नंतर ह्या दलितवर्गीय सेवकास इतर सर्व सवलती मिळू लागल्या व सवलतीच्या बाबत कनिष्ठ वरिष्ठ असा असलेला भेदभाव नाहीसा झाला हीही एक सामाजिक प्रगति झाली, असे म्हणावयास हरकत नाही.

(१०) सेवकांच्या जागा निर्माण करणे व त्यांची वेतनश्रेणी ठरविणे, हे नगरपालिका सरकारचे पूर्वमंजुरीने करीत असे. पण सेवकाचे किमान वेतन ठरलेले नसे. निरनिराळ्या नगरपालिकात त्या त्या श्रेणींच्या कामगारांचे वेतन निरनिराळे असे. सरकारने किमान वेतन कायदा करून, किमान वेतन मिळवून देण्याची हमी घेतल्याने सेवक वर्गाची परिस्थिती बरीच सुधारण्यास हा कायदा उपयुक्त ठरला. त्याचप्रमाणे कामाचे कालाची मर्यादा ८ तासाची ठरली. ह्या आठ तासापेक्षा जास्त तास काम केल्यास, ओव्हरटाईम पगार देण्याचीही तरतूद झाली. ह्या कायद्याच्या आधारे नगरपालिकेने आपल्या जकात खात्यातील सेवकास ओव्हरटाइमचे जवळ जवळ ६० ते ७० हजार रु. दिले. ह्या कायद्यान्वये आठवडा सुट्टी नगरपालिकेवर सर्व सेवकास देण्याची सक्ती झाली व सेवकाची त्यामुळे सोय झाली. ह्या कायद्याचा परिणाम काही खात्यातील सेवकवर्गाची संख्यावाढ करावी लागण्यावर झाला. पूर्वी प्रत्येक नाक्यावर दोनच नाकेदार असत व १२-१२ तास ड्यूटी करावी लागत असे. पुढे नाकेदाराचे हाताखाली प्रत्येक नाक्यावर एक एक मदतनीस दिला गेला. किमान वेतन कायद्याने ८ तासाची पाळी ह्याप्रमाणे तीन पाळ्या कराव्या लागल्याने ह्या खात्याकरिता एकूण ५० सेवक नेमावे लागले. पूर्वी हेच काम १६ ते १७ सेवक करीत असत.

(११) सन १९५५ साली औद्योगिक कलह कायदा नगरपालिकास, नगरपालिका व्यापारी नफा मिळविणाऱ्या संस्था नसताही, लागू करण्यात आला. ह्यामुळे काम करणारा व कामास लावणारा ह्यातून उद्भवणारे मतभेद अगर तंटे समजुतीने मिटविण्याची सोय झाली हे खरे. पण ऊठ सूठ मतभेद उत्पन्न करण्याकडेच प्रवृत्ति वाढू लागली.

किमान वेतन कायदा व औद्योगिक कलह कायदा ह्या दोन्ही कायद्यान्वये नगरपालिकेच्या सेवकवर्गास पूर्ण संरक्षण मिळाले. किमान वेतनाची शाश्वती लाभली व कामाच्या तासाचे नियंत्रण व सेवक वर्गास स्वास्थ्य लाभले तत्पूर्वी नगरपालिकेच्या सेवक वर्गास स्वास्थ्य व स्थैर्य नव्हते. कारण बहुमताने कोणत्याही सेवकास कामावरून कमी करता येत असे. ह्या कायद्याचा जसा सेवकवर्गास काही फायदा झाला, तसे नगरपालिकेवर ह्या कायद्याचे लागल्याने अनिष्ट परिणामही झाले. सेवक वर्ग वाढवावा लागल्याने

व वेतनवाढ करावी लागल्याने, नगरपालिकेच्या तिजोरी-वर त्याचा बोजा थोडासा असह्य होऊ लागला आहे. सेवक-वर्गावरील खर्चाचे प्रमाण ३३ टक्क्यांत सरकारने नियंत्रित केलेले आहे ते प्रमाणे अद्याप वाढलेले नाही. सेवक वर्गावरील खर्चाचे प्रमाण उत्पन्नाच्या ५० टक्के झाले आहे. त्यामुळे उर्वरित उत्पन्नात नागरिकांच्या दृष्टीने उपयुक्त व सुखसोयीची कामे करणेस पैसा अपुरा पडू लागला. वरील कायद्यान्वये सेवकवर्गावर दुसरा असा अनिष्ट परिणाम झाला आहे की, नगरपालिका आपणांस काही एक शासन करू शकत नाही. आपले त्राते व मालक कामगार संघटनांचे पुढारी व संबंधित खात्याचे अधिकारीच आहेत. नगरपालिकेने आपल्या सुखसोयी व पोषण करणे येवढेच करावे. काम कमी दाम जास्त हे तत्त्व इतर कामगारांप्रमाणे म्यु. चे सेवकवर्गातही रुजू पहात आहे. ह्याला वेळीच आळा बसणे आवश्यक व जरूरीचे झाले आहे. सेवक वर्गात जरूरीपेक्षाही वाढ झाली असताही कामाचा बोजा वाढवून दाखविण्याकडे, वेळचेवेळी कामे न उरकण्याच्या इतर खात्याच्या प्रवृत्तीस नगरपालिकेचा सेवकवर्ग अपवाद सोडून अपवाद नाही. असो.

(१२) सॅनिटरी, जकात, दवाखाने ह्यासारख्या खात्यास वर्षातील गॅझेटेड सुट्या देण्यात येत नाहीत. कारण ही कामे नेहमी चालू ठेवावीच लागतात. नागरि-कांची गैरसोय होऊ देता येत नाही. त्याचबरोबर सेवकांचे हक्क व सुखसोयी डावलता येत नाहीत. ह्या दृष्टीकोनातून सेवकांच्या कामगार यूनियनसनी व पालिकेच्या पालन-कर्त्यांनी फार मोठ्या समजुतीने व उभयपक्षी सहकार्याने १४ गॅझेटेड सुट्यांचे ऐवजी ७ दिवसाच्या सुट्यांचा पगार घेण्याचे व देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे उभय-वर्गाचे समाधान झालेले आहे.

कामगार व नगरपालिका ह्यांच्यात खालीलप्रमाणे लवाद व लवादातील तडजोडी झालेल्या आहेत. ह्याचे श्रेय उभयपक्षास देणे अपरिहार्य आहे. असे तंटे विकोपास जाऊन संपाची वेळ कधीच आलेली नाही, हे नमूद कर-ण्यास आनंद वाटतो.

१ ला लवाद (आय. टी. नं. ७५।१९५४ ता. १३-९-५४ सॅनिटरी डिपार्टमेंट.)

२ रा लवाद तडजोड (आय. टी. नं. १८६।१९६० ता. २५-११-१९६०)

३ रा लवाद तडजोड (आय. टी. ४०३।१९६४ ता. २९-५-१९६४.

शेवटच्या १९६४ च्या लवादाने सर्व २३० सेवकांची वेतनश्रेणी सुधारून वाढविण्यात आली.

(१३) कामगार सेवक बंधूस ह्या निमित्ताने अशी विनंती की, आपल्या हक्कासाठी जरूर झगडावे व वेतनाचे पुरेपूर माप कामाचे रूपाने नागरिकांचे पदरात टाकल्यास सर्वांसच ते सुखकारक होणार आहे.

(१४) सेवकांच्या संख्येत व पगारात कसकशी वाढ झाली, ते शेवटच्या तक्त्यावरून दिसून येईल.

(१५) सेवकांच्या बाबत पुढील ध्येय नगरपालिकेच्या नजरेपुढे राहील व जसजशी आर्थिक परिस्थिती अनुकूल होईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

(अ) सेवकांना पेन्शन फंड योजना.

(ब) फॅमिली पेन्शन फंड योजना.

(क) सेवकवर्गास घरे बांधून भाड्याने देणे.

(१६) सेवकास व त्यांचे कुटुंबियास म्युनिसिपल दवाखान्यांत मोफत औषधोपचार केला जातो.

(१७) म्युनिसिपल सेवकांचे पाल्यास माध्यमिक शाळेतून व महाविद्यालयातून नादाऱ्या देण्यात येतात.

जेवढे सेवकांकरता करता येणे शक्य आहे, तेवढे नगरपालिकेने केलेले आहे त्याचे चीज करणे सर्वस्वी सेवकवर्गावर अवलंबून आहे. ते कार्य त्यांनी उत्तर रीतीने पार पाडून, नागरिकांच्या शुभेच्छा प्राप्त करून घ्याव्यात.

## बारामती नगरपालिकेच्या हद्दीतील वानर सेना

बारामती नगरपालिकेच्या हद्दीत सुमारे ३५०-४०० माकडांची वस्ती फार पुरातन कालापासून होती. सुमारे ४०-४५ वर्षापासून सदरहू माकडे पकडून दूर जंगलात नेऊन सोडण्याच्या हेतूने प्रयत्न झाला होता. परंतु तो त्यावेळच्या सामाजिक दडपणामुळे व परिस्थितीने प्रयत्न फसला. अलीकडे ह्या माकडांची संख्या वाढल्याने वा त्यांच्या धिटाईने नागरिक फारच त्रस्त झाले होते व त्यांचा त्रास कसा कमी करावा हा एक मोठा बिकट प्रश्न पूर्वानुभव लक्षात घेता नगरपालिकेपुढे होता. नगरपालिकेने उक्ते टेंडर पद्धतीने मक्तेदाराकडून ही माकडे सन १९६१-६२ सालात पकडविली व लांब दूर जंगलात नेऊन सोडल्याने, नागरि-कांचा त्रास अजिबात कमी झाला. सामाजिक परिस्थितीत बदल झाल्याने ह्यावेळी कोणत्याही प्रकारचा विरोधन होता हे काम पूर्णपणे अहिंसा पद्धतीने पार पडल्याने सर्वांचेच समाधान लाभले. असो.

—

# आजच्या बारामतीचे काही शिल्पकार

नगरसंस्था अथवा नगरपालिका ही काही एक किंवा दोन व्यक्तींच्या कार्याची निर्मिती नाही. अनेक ज्ञात अज्ञात व्यक्तींच्या सातत्याने झालेल्या कार्यातून ती मूर्त-रूप घेत असते. नगरसंस्थेच्या बाबतीत जर ही गोष्ट खरी, तर त्या नगराबाबतही हा विचार तितक्याच प्रमाणात रास्त होय.

बारामतीच्या नगरपालिकेच्या गेल्या १०० वर्षातील कामाचा आढावा घेताना, प्रारंभी इतिहासाकडे नजर टाकली. असता नजीकच्या इतिहासाची आठवण केली म्हणजे ह्या नगराची व पर्यायाने नगरपालिकेची वाढ होण्याला कोण कोण कारणीभूत झाले हे समजून येईल.

नगरपालिका स्थापन झाली तेव्हा शेठ मलुकचंद तारा-चंद हे एक मूळचे सभासद होते. ते नगरपालिकेचे प्रारंभीचे सावकार होते. 'सावकार' हा शब्द इंग्रजीतील बँकर या अर्थाने वापरला आहे. शेठ मलुकचंद यांनी घालून दिलेल्या वाटेनेच त्यांचे चिरंजीव शेठ रामचंद हे गेले, इतकेच नव्हे तर किती तरी पटीने उज्ज्वल आणि स्फूर्तिदायक अशी कामगिरी करून, त्यांनी आधुनिक बारामतीचे शिल्पकार हे नामाभिधान सार्थ केले. यात बिलकूल अतिशयोक्ति नाही. त्यांचा जन्म (संवत् १९३२) शके १७९८ आश्विन वद्य १० गुरुवार या दिवशी झाला.

शेठ रामचंद मलुकचंद यांच्या कर्तृत्वाचा ठसा व्यापार व औद्योगिक क्षेत्रात उमटला. त्याचप्रमाणे शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातही ते अजोड होते असे म्हणणे सार्थ होईल. नगरपालिकेचा कारभारही त्यांनी चिरस्मरणीय अशा रीतीनेच केला. व्यापार, उद्योगधंदे यासाठीं लागणारी धाडसी वृत्ति त्यांनी आपल्या वडिलांच्याकडून घेतली. धार्मिक व परोपकार वृत्तीचे बाळकडू त्यांना त्यांच्या मातोश्री-कडून मिळाले, असे माहितगार व्यक्तींच्या सांगण्यावरून कळते.

शेठ रामचंद मलुकचंद यांच्या जीवनातील घडामोडी त्या त्या वेळी कोणी लिहून ठेवलेल्या आढळल्या नाहीत. जुन्या माहितगार व्यक्तींच्या तोंडून ऐकून हा भाग जुळ-विण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या व्यापारी दूरदृष्टीची एक आठवण प्रस्तुत लेखकाला कळली ती अशी-पहिल्या महायुद्धाचे वेळी ते सहकुटुंब सहपरिवार यात्रेला गेले होते. प्रवासात असताना ते वृत्तपत्रे वाचीत. लढाईच्या बातम्या वाचून धान्याचे बाजारभाव वाढणार असे त्यांच्या लक्षात आले. यात्रेची छावणी मागे ठेवून ते बारामतीला आले. संध्याकाळी आगगाडीतून उतरताच घोड्यावरून रात्रभर इंदापूरकडे सफर केली. वस्तीवस्तीवर जाऊन ज्वारी खरेदी केली. व पहाटे परत येऊन मुनीमाला सांगून ते परत यात्रेच्या मुक्कामावर गेले. या एकाच घटनेवरून त्यांच्या अंगचे गुण कोणते होते, ते स्पष्ट होत आहे.

ते उत्तम घोडेस्वार होते. घोड्यांची ते चांगली पारख करीत. त्यांच्या लहानपणी पुण्यापर्यंत ते घोड्यावरूनच जात. घोड्यांची पैदास व जोपासना कशी करावी, हे त्यांना माहीत होते. ती त्यांची एक हौस होती. कॅनाल आल्या-वर या भागात गुळाच्या वहातुकीसाठी रेल्वे हवी असे दिसून येताच, त्यांनी दिवाणबहादूर गोडबोले यांना दौंड-बारामती रेल्वे आखण्याचे कामी प्रोत्साहन दिले. गुळाच्या वहातुकीसाठी रेल्वे फार उपयोगी पडली. तेव्हांच्या व्यापारापैकी रुपयातला बारा आणे व्यवहार रामचंद यांच्या पेढीवरून चालत असे.

केवळ मोठे व्यापारी म्हणून शेठ रामचंद यांची आठवण नाही. ते उत्पादकही होते. जळोची व कुतवळ या भागात २०।२५ एकर जमिनीत त्यांनी नारळाची बाग लावली. कॅनालजवळ मोठी आंबराई केली. आणि ५००-६०० एकर उसाचे पीक त्यांनी केले होते. उसापासून तयार होणाऱ्या गुळाला बाजारपेठ परप्रांतात मिळवून देण्याचे त्यांचे कौशल्य अजोड असेच झाले. त्यांच्या लहानपणी कर्डीचे तेल व कर्डीची पेंड ह्या व्यापाराच्या

मुख्य वस्तु होत्या.

शेठ रामचंद हे केवळ एक मोठे शेतकरी व व्यापारी असते तर त्यांची आठवण आज फारच मर्यादित स्वरूपात शिल्लक राहिली असती. लोकसेवा व परोपकार हे गुणही त्यांचे ठायी मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने, हिऱ्याला कोंदणाने तेज चढते, तद्वत् त्यांचे गुण अधिक प्रभावी व चिरस्मरणीय झाले आहेत. पहिल्या महायुद्धाचे वेळी त्यांनी धान्याचा व्यापार कसा जमविला, हे प्रारंभी सांगितले आहे. परंतु योग्य भावाने नियमित धान्यपुरवठा करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यात नगरपालिकेबरोबरच शेठ रामचंद हे एक होते. संकट प्रसंगी ते लोकांना उपयोगी पडले.

दानधर्माकडे त्यांचा कल सहाजिक असे. त्यांची एकुलती एक मुलगी, नवलबाई, हिचा विवाह थाटामाटाने झाला. तेव्हां आठ दिवस भोजन सुरू होते. गाडीने नेऊन लाडू वाटले. त्या प्रकारचे अन्नदान आजपर्यंत इतर कोणी केले नाही असे म्हणता येते. केवळ धार्मिक वृत्तीचे ते होते असे नव्हे तर, ते सहिष्णु धार्मिक वृत्तीचे होते. दिगंबर जैन मंदिर, दिगंबर अतिलक, जैन पाठशाळा, जैन बोर्डिंग, स्वेतांबर जैन मंदिर इत्यादि कार्यांत त्यांचा मोठा वाटा असे. त्याच बरोबर गावातील इतर धर्म मंदिरांना, देवळे, प्रार्थना मंदिरे, ( चर्चेस, मशिद ) यांना त्यांचे बहुमोलाचे सहाय्य झाले आहे.

इ. स. १९२७ मध्ये दिगंबर जैन धर्मीयांचे आचार्य श्री. १०८ शांतिसागर महाराज यांच्या येथील आगमनाला काही व्यक्तींनी हरकत घेतली होती. परंतु शेठ रामचंद यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून, सरकारदरबारी समाधानकारक खुलासा करून आणि इतर पंथीय व धर्मीयांचे प्रेम संपादन करून, महाराजांची सवाद्य मिरवणूक काढली.

करमणुकीच्या क्षेत्रातही त्यांचे मन तितकेच औदार्याने रमत असे. आंबराईजवळचा बंगला याची सदैव साक्ष देईल.

बारामती नगरपालिकेत ते प्रथम आले ते सरकार-नियुक्त सभासद म्हणून. ते पहिले बिनसरकारी सरकार-नियुक्त अध्यक्ष होते. तसेच लोकनियुक्त पहिले अध्यक्ष होते. सतत २२ वर्षे ते अध्यक्ष होते. शिक्षणसंस्था, दवाखाना, धर्मशाळा, इत्यादि सेवा-कार्यांकडे त्यांचे लक्ष असे. सक्रिय लक्ष असे. त्यांनी स्वतः देणग्या देऊन ही कामे उभी केली. यामुळे ते दानशूर म्हणूनही आठवणीत राहिले आहेत. नगरपालिकेच्या कारभारामध्ये त्यांचा दरारा असे. खोटेनाटे त्यांना खपत नसे. वाममार्गाने येणारा पैसा त्यांना कधीच आवडला नाही. शेठ रामचंद मलुकचंद हे बारामतीच्या शिल्पकारांचे मुकुटमणी असे म्हणणे रास्त होईल.

## श्री. गणेश गोपाळ शेंबेकर

बारामतीचे चालू शतकातील एक नामवंत व भारतीय कीर्तीचे कृषितज्ञ, श्री. गणेश गोपाळ शेंबेकर यांचा अल्प परिचय ह्या शताब्दि–पुस्तिकेत दिल्याने, बारामती नगरपालिकेला ते अधिक भूषणावह ठरणार आहे. त्यांचे कृषिकर्तृत्व, व्यवसायनैपुण्य व दातृत्व हे गुण बारामतीच्या चतुःसीमा ओलांडून आम महाराष्ट्राच्या परिचयाचे झालेले होते.

सध्याच्या बारामती नगरीची संस्थापना करणारे व महाराष्ट्र–दौलतीचे सावकार बाबूजी नाईक यांच्याबरोबर जी कांही घराणी येथे आली, त्यात शेंबेकर हे एक सुखवस्तु आणि शेतकरी–सावकारीचा पेशा करणारे कुटुंब प्रमुख होते. नगरपालिका स्थापन झाल्यानंतर पहिल्याच दशकात मोरो पांडुरंग शेंबेकर हे एक नियुक्त सभासद होते. त्यांचेच नातू म्हणजे दानशूर दादासाहेब शेंबेकर हे होत. त्यांचा जन्म ता. २५ एप्रिल १८८१ ला स्वतःच्या वाड्यात झाला. तेव्हा कुटुंबाची स्थिती साधारणच होती. वडिलांची जिराईत शेती १५।२० एकर होती. बारामती नगरपालिकेत काही वेळ ते नाके कारकून म्हणून काम करीत असत. ( इ. स. १९०१ च्या एप्रिल महिन्यात ते २७, २८ व २९ व ३० ह्या चार दिवशीच ते नाके कारकून होते; असे त्या वेळेच्या डे बुकातील नोंदणीवरून म्हणतां येते. ) काही काळ पाटबंधारे खात्यात अल्प वेतनावर दरमहा रु. १५ नोकरी केल्यावर, त्यांनी शेतीवर सर्व लक्ष केंद्रित केले.

इरिगेशन खात्यात स्वतः काम केल्यामुळे त्यांचे शेतीच्या कामाची बारिकसारिक माहिती त्यांना उपयोगी पडली. इ. स. १९१९ च्या सुमारास नीरा व्हॅली शुगर कंपनीचा साखरेचा कारखाना येथून २ मैलावर माळेगावला काढण्याच्या ज्या हालचाली झाल्या, त्या त्यांच्या समक्ष सुरू होत्या. त्या कंपनीचे व्यवस्थापक श्री. गंगाधर नारायण सहस्रबुद्धे हे दादासाहेबांच्याच वाड्यात रहात असत. त्या काळात साखरेच्या कारखान्याला खाजगी शेतकऱ्याकडून ऊस मिळवावा लागे. या प्रयत्नात श्री. सहस्रबुद्धे यांना दादासाहेबांचे सहाय्य झाले. त्याचबरोबर उसाच्या मळ्यात पहिले ऑईल इंजिन व क्रशर दादांनी बसविले. त्या कामी 'गंना' चे मार्गदर्शन लाभले, हे निकटवर्तीयांना माहीत आहे. उसाची पैदास व्हावयाची तर इरिगेशन खात्याच्या कारभाराविरुद्ध तक्रारी असत. त्याचे निर्मूलन व्हावे लागे. या कामात दादासाहेब अग्रेसर होते.

या वेळच्या सर्व उलाढाली व घडामोडीतून दादासाहेबांचे अनन्यसाधारण व्यक्तिमत्व तयार झाले. डेक्कन डेव्हलपमेंट ॲग्रिकल्चर असोसिएशनचे प्रथम चिटणीस व नंतर अध्यक्ष मिळून २० वर्षे निगडित होते. पाणी मिळण्याबाबत पक्का सरकारी हुकूम ( इ. स. १९२३ ) उसाच्या ब्लॉकमध्ये एक चतुर्थांश उसाचे क्षेत्र लावण्याचा फेरहुकूम ( इ. स. १९३० ) इत्यादि त्यांचे काम बहुमोलाचे झाले. पाझराच्या पाण्याबद्दल जो सरकारी हुकूम होता, त्यातील दोष दाखवून तो दुरुस्त करून घेतल्यामुळे बागाईतदारांची जवळ जवळ दीड दोन लाखांची बचत झाली. मुंबईच्या पहिल्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाने इ. स. १९३७ मध्ये सर विश्वेश्वर अय्या यांच्या अध्यक्षतेखाली इरिगेशन चौकशी समिती नेमली. तीत श्री. शेंबेकर हे एक सभासद होते. कृषिविशारद म्हणून त्यांनी या अगोदर जे महान् कार्य केले, त्याचाच हा परिणाम होता.

दादासाहेबांच्या अंगी अडचणींना कसे तोंड द्यावे याचे मोठे कौशल्य होते. त्यातूनच अडसाल्या उसाचा जन्म झाला. पौषात उसाची लावणी केली म्हणजे पुढे पाणी कमी पडते, म्हणून दादांनी जूनमध्ये लावणी सुरू केली. ते यशस्वी झाले.

ऊस, फळफळावळ व भाजीपाला हे त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र असे. नीरा रेल्वेस्टेशनपासून जवळच अशी नीरा नदीचे काठची निंबुत येथील ३० एकर जमीन त्यांनी खंडाने मिळविली ( इ. स. १९२७ ). हे त्यांच्या दूरदृष्टीचे स्पष्ट उदाहरण होय. नीरेचे पात्र दुभंगून पडलेली झालेले हे बेट बागायतीस चांगले व पाण्याचा सतत खात्रीचा पुरवठा हे स्थानिक परिस्थितीचे गुण-वैशिष्ठ्य त्यांनीच हेरले. त्या वेळच्या शेती खात्याच्या तज्ज्ञाचे दादासाहेबांच्याकडे एक मेहनती, तीव्र ग्रहण-शक्तीचा बागायतदार म्हणून लक्ष असे. निंबुत येथे त्यांनी द्राक्षे केली. ती आंबट होती, पण द्राक्षाचे पीक केवळ थंड हवेच्याच ठिकाणी होते. ह्या कल्पनेला त्यांनी धक्का दिला. या प्रयोगातूनच पुढें गोड द्राक्षे निघाली असल्या-कारणानें, निंबुतच्या द्राक्षांचा विसर पडता कामा नये.

यापुढची त्यांची मोठी उडी म्हणजे डिकसळ स्टेशन-नजीक ( म्हणजे आता भिगवण ) राजेगांव येथे सलग ३०० एकर जमिनीत लिफ्ट इरिगेशनचा आदर्श मळा उभारणे ही होय. येथे त्यांनी पंपाने पाणी खेचून घेतले १८ इंच डायमिटरचे पाइप टाकून ते सर्व शेतभर पोचविले. केळी, संत्री, द्राक्षे इत्यादि फळफळावळे त्यांनी केली. या त्यांच्या विविध यशामुळेच मार्सलँड प्राइस कंपनीचा कळंब येथे साखरेचा कारखाना निघाला, तेव्हा त्याचे प्रमुख शेठ वालचंद हिराचंद यांनी दादासाहेबांना आपल्या कारखान्याचे उसाचे सल्लागार नेमले. तो कारखाना म्हणजेच आजचे वालचंदनगर होय. पाटबंधाऱ्याच्या पाण्यावर उसाचे पीक जास्तीत जास्त ४० टन येईल, असा शेतकी खात्याच्या तज्ज्ञांचा अंदाज होता. तो अंदाज दादांनी, एकरी १०५ टन ऊस पिकवून खोटा ठरविला. ( इ. स. १९३४ ) इतकेच नव्हे तर उसाचे एकरी १२५ टन पीक काढणाऱ्या बागायतदारास त्यांनी रु. १२५० चे रोख बक्षीस देऊ केले. फलटणचे भूतपूर्व संस्थानिक राजे श्रीमान् मालोजीराव नाईक निंबाळकर यांनीं आपल्या संस्थानच्या चौकशी समितीवर काम करण्यास पाचारण केलेले होते. त्यांनी दिलेला निर्णय बागायतदार व कारखानदार या दोघांनाही हितकर ठरला.

द्राक्षाच्या उत्पादनातही दादांनी उच्चांक गाठला होता. कृषिक्षेत्रात असे चतुरस्र यश मिळविले असतां, भारत सरकारच्या 'इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटी' वर त्यांची नेमणूक झाली. (इ. स. १९४४) यात कांहीच नवल नाही. आणखी चार वर्षांनी त्यांनी इंग्लड–अमेरिकेची सफर करून, कृषिविद्येची प्रगति कसकशी होत आहे, ते डोळ्याखाली घातले ( १९४८–४९ ).

कृषिक्षेत्रात अनन्यसाधारण यश मिळवीत असता त्यांनी सार्वजनिक कार्यात बरेच लक्ष घातले होते. बारामतीला मार्केटिंग सोसायटी काढण्यात त्यांचा पुढाकार

होता. किर्लोस्कर कंपनीचे ते डायरेक्टर होते. कंपनीच्या सभेला उपस्थित रहाण्यासाठी हरिहरला गेले असताच, त्यांचे ता. ३१ ऑगस्ट १९५१ ला देहावसान झाले.

दादासाहेब शेंबेकरांचे आयुष्य म्हणजे प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेली अविश्रांत खटपट असे म्हणण्यात अतिशयोक्ति बिलकूल नाही. त्यांनी आपले कौटुंबिक जीवन सुसंपन्न केले; इतकेच नव्हे. तर कृषिक्षेत्राचे कर्तृत्व उंचावले, इतर, अनेक कुटुंबांना हे रान तुडविण्याची स्फूर्ति दिली. सढळ हाताने त्यांनी संस्थांना द्रव्य–सहाय्याचे पाणी दिले. नगरपालिकेच्या सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटलला त्यांनी एक हजार रुपयांची देणगी दिली. त्यापाठोपाठ डोळ्यांच्या दवाखान्यासाठी रु. १२००० आणि सूतिका दवाखान्या-साठी रु. २०,००० अशा भरघोस देणग्या दिल्यामुळे बारामती नगरपालिका हे ऋण केव्हाच फेडू शकणार नाही. ते नगरपालिकेत सभासद म्हणून कधी नव्हते. तथापि यशस्वी व्यवहाराचे रूपाने त्यांनी बारामती नगरपालिकेला श्रीमंत बनविले आहे. शंभर वर्षातील सर्व माननीय सभासदांच्या नामावलीत अग्रभागी शोभेल असे कर्तृत्व, दातृत्व व दूरदर्शित्व त्यांनी प्रकटविले आहे.

बारामतीबाहेरही दादांचे मदतीचे हात दूरवर पोचले होते.

(१) मूळ संशोधनाचे कार्य चालविण्यासाठी पुणें विद्यापीठाकडे १ लक्ष रुपयांचा विश्वस्त निधी (ट्रस्ट) सुपूर्त केला (इ. स. १९४३).

(२) गरीब कामगारांच्या मुलांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याला मदत करण्याकरिता एक लक्ष रुपयांचा आणखी एक विश्वस्त निधी निर्माण केला. ह्या निधीचे कार्य किर्लोस्कर ब्रदर्स लि. च्या देखरेखीखाली चालते.

(३) कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेस रु. ५०००.

(४) निंबूत, लासुर्णे व मळद येथील प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्याकरिता प्रत्येकी ५ हजार रु. म्हणजे एकूण रु. १५,०००.

(५) भूतपूर्व फलटण संस्थानच्या वाचनालयात शेतीविषयक ग्रंथांची खरेदी करण्यासाठी रु. २५००.

(६) डेक्कन एज्युकेशन सोसायटी, नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, इत्यादि संस्थांनाही त्यांनी देणग्या दिलेल्या आहेत. सार्वजनिक कार्यासाठी निधी गोळा करणारी व्यक्ती, त्यांच्याकडे गेली म्हणजे कधीही रिक्तहस्त बाहेर आली नाही. त्या सर्वांची नोंद करणे शक्य झालेले नाही.

## श्री. सोपानराव तुकाराम जाचक

बारामती नगरपालिकेचे एक माजी अध्यक्ष श्री. सोपानराव तुकाराम जाचक हे 'नीरा पाटबंधाऱ्या'ने निर्माण केलेल्या प्रगतिशील शेतकऱ्यांपैकी एक अग्रेसर कार्यकर्ते म्हणून सर्वांच्या स्मरणात आहेत.

श्री. जाचक हे भिगवण रस्त्यावर लिंबोडीचे रहाणारे. त्यांचे कुटुंब फार मोठे होते. ते पाच भाऊ होते. पण उदरनिर्वाहासाठी पुरेशी शेतजमीन नव्हती. थोडीशी कोरडवाहू व थोडी बागायत जमीन होती. राजेगावला प्राथमिक शिक्षण झाल्यावर ते बारामतीला मोतीबागेत आले. तेथे त्यांनी एक खाजगी शाळा काढली. त्यांना 'जाचक मास्तर' या नावानेच जुन्या पिढीतले लोक ओळखतात. त्यातलें इंगित हे आहे.

बारामतीहून जाचक मास्तर इंदापूर रस्त्यावर पिंपळी-नजीक लिमिटेकला गेले. तेथेच त्यांची वस्ती आहे. कॅनालच्या पाण्याने चांगली बागायत व शेती करावयाची आणि सहकारी पद्धतीने गेल्यानेच सामान्य शेतकऱ्याला तग धरता येईल. अशी त्यांची विचाराची बैठक होती, असे म्हणता येईल. पिंपळी (लिमिटेक) को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, भिमथडी तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन, इंदापूर तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन, भिमथडी व इंदापूर तालुका को ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियन, बॉंबे प्रॉव्हिन्शियल को ऑपरेटिव्ह बँकेच्या बारामती शाखेची सल्लागार समिती इत्यादि संस्थांमध्ये ते दीर्घ-काल होते. आणि काही ठिकाणी सभासद म्हणून तर बरेच ठिकाणी अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले.

शेतीविषयक व ग्रामीण भागाच्या सुधारणेचे प्रश्न निघाले की, श्री. जाचक यांना सल्लामसलतीसाठी बोलविण्याचा प्रघात सरकारदरबारी सुरू झाला. त्यांची प्रागतिक विचारसरणी पाहूनच त्यांना बारामती नगर-पालिकेत सरकारने प्रथम नियुक्त केले. नंतर त्यांना प्रथम



साहेब' हा किताब मिळाला (इ. स. १९३५). पुढे सहा वर्षांनीं 'रावबहादूर' हा बहुमान मिळाला. इरिगेशन ॲडव्हायसरी कमिटीचे ते एक सभासद . बारामतीच्या कॉटन मार्केट कमिटीचे ते एक सभासद . किंबहुना बारामतीला मार्केटिंग सोसायटी स्थापन याचा प्रयत्न करणारात ते एक होते. एकाच वेळेला संस्थांशी त्यांचा संबंध होता.

शेतीविषयक व सहकार कार्यप्रसार ही कामे करीत त्यांनी निरनिराळ्या शैक्षणिक कार्याला द्रव्य-साह्य केले. बारामतीला मराठा शिक्षण परिषद भरली . ते या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. त्यांनी देणग्या , त्यातल्या काही पुढीलप्रमाणे होत्या:--

(१) दौंड येथील शिपायांच्या मुलांकरिता रहाण्यास व शिक्षणास 'वसतीगृह' बांधण्यासाठी रु. ५००.

(२) शिवाजी मराठा सोसायटी पुणे रु. ३०००.

(३) पुणे जिल्हा शेतकी प्रदर्शन रु. १०,०००.

(४) श्री शाहू मराठा बोर्डिंग रु. २,००० इत्यादि.

इंदापूर तालुका शेतकी सुधारणा संघ, होस्टेल फंड ामती, इंदापूरचे नर्सिंग होम, नगरचे बोर्डिंग या संस्थांना त्यांनी लहान मोठ्या देणग्या वेळोवेळी दिल्या. प्रमाणे साताऱ्याच्या रयत शिक्षण संस्थेलाही त्यांनी १०,००० ची देणगी दिली होती.

नगर जिल्ह्यात बेलापूरला शेती करण्यासाठी त्यांनी ाच्या भावांना प्रोत्साहन दिले होते. तसेच पंढरपूरला ाजी फार्मिंग सोसायटी काढण्यातही त्यांनी पुढाकार होता. शेतीचा व्याप त्यानी त्या वेळच्या मानाने मोठा केला होता. एकाच वेळी ५०० एकर उसाची त्यांनी केली होती.

श्री. जाचक मास्तर यांना आपल्या सर्व कल्पना तडीस पुरेसा वाव मिळाला, असे म्हणता येत नाही. पद्धतीच्या शेतीचा प्रारंभ होण्याच्या उषः, म्हणजे ता. ८ जुलै १९४७ ला दिवंगत झाले. व चौकस बुद्धि, साधेपणा व निगर्वीपणा आणि ा ह्या अंगच्या गुणांमुळे ते सर्वांना आदरणीय

## श्री. स. वा. करंदीकर

बारामती नगरपालिकेचे एक ख्यातनाम माजी अध्यक्ष श्री. सदाशिव वासुदेव करंदीकर हे येथे ६०–६२ वर्षांचे रहिवासी होते. मूळ सातारा जिल्ह्यात वाईनजीक बावधन येथील रहाणारे; कॉलेजचे शिक्षण पुण्याला व लॉ कॉले-जचे मुंबईला घेऊन ते वकिली करण्यासाठी बारामतीला इ. स. १९०४ मध्ये आले. बारामतीतले ते पहिले 'एल् एल्. बी.' वकील होत. लवकरच एक हुशार वकील म्हणून त्यांचा जम चांगला बसला.

सहकारी चळवळीच्या प्रसाराचे कार्य करून त्यांनी सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. अनेक सोसायट्यांच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. तालुका डेव्हलपमेंटचे कामही त्यांनी लक्ष लावून केले. बारामती मार्केट स्थाप-ण्याचे कामी त्यांनी बरीच खटपट केली. रावबहादुर सोपानराव जाचक, रावबहादुर गो. ग. शेंबेकर तथा दादासाहेब हे या बाबतीत त्यांचे सहकारी होते. डोळ्याचा धर्मार्थ दवाखाना सुरू झाला व नगरपालिकेकडे आला. त्या संस्थेत प्रथमपासून अनेक वर्षे एक विश्वस्त होते.

नगरपालिकेचे अध्यक्ष असताना श्री. करंदीकर यांनी गटार योजना पुरी करून घेण्यात विशेष धडाडी दाखविली. ही गटार योजना सरकारकडून मंजूर होऊन येण्याला विलंब लागत होता तरी गटाराचे काम चालू करविले आणि सरकारकडून मिळावयाच्या अनुदानाची वाट न पहाता, नगरपालिकेच्या उत्पन्नातून प्रथम खर्च भागविला.

तीन बाजूने बांधलेल्या व वरून उघड्या गटारात पाणी सोडण्याची व्यवस्था करविणे, ही गोष्ट विशेष दूर-दृष्टीची द्योतक होय. गटार साफ करण्यासाठी (फ्लशिंग-साठी) कॅनालचे पाणी घेण्याची सूचना, वीस वर्षांपूर्वी आली होती. ती कल्पना घेतली व स्थानिक विहिरीचे पाणी पंपाने खेचून हे काम सुरू करण्यात उत्तम व्यवहारी-पणा दिसून आला. कॅनाल सुरू झाल्यावेळेपासून त्याचे पाणी देण्याचा विचार सरकारचे आधीन आहे. त्यालाही आता जवळ जवळ ८० वर्षे झाली. त्यानंतर कल्पना घेऊन कार्य साकार करून श्री. करंदीकर यांनी सर्वांकडून वाहवा मिळविली. तालुक्याचे ठिकाणीं खुली गटारे कशी असावीत हे दाखवून देण्यात बारामती नगरपालिकेचे नांव घेतले जाते व याचे बरेच श्रेय श्री. करंदीकर यांनाच आहे.

त्यांनी ३६ वर्षें वकिली केली व इ. स. १९४०

पासून ते निवृत्त झाले. नित्यनेमाने काम करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. संध्याकाळी क्लबमध्ये जाऊन खेळ, गप्पागोष्टी करून ते घरी जात. १३ एप्रिल १९६५ ला निधन पावले.

### कै. एकनाथ गंगाराम पोटे म्यु. कौ.

हे बारामती म्युनिसिपल कमेटीचे सभासद १२ ते १४ वर्षे होते. सन १९१९ व १९४१ सालीं बारामती येथे प्लेगची भयंकर साथ सुरू झाली असताना त्या साथीत अनेक नागरिक प्लेगास बळी पडत होते. अशा परिस्थितीत नागरिकांना गांवाबाहेर रहाणेस जावे लागत असे. तेव्हा कै. एकनाथ गंगाराम पोटे यांनीं रेल्वेस्टेशनजवळील आपली शेतजमीन जवळ जवळ १०० ते १२५ कुटुंबांना रहाणेसाठी दिली. त्यामध्ये सध्याचे म्यु. कौन्सिलर श्री. स. बा. गालींदे व श्री. ह. म. बागवान हे होत. सदर ठिकाणी पाण्याची सोय नव्हती. तेव्हा स्वखर्चाने आड खोदून पाण्याची सोय केली व बारामतीचे नागरिकांवर आलेल्या संकटाचे निवारण करण्याचे कामी हातभार लावला.

ते फार धार्मिक वृत्तीचे होते. दरवर्षी आषाढी वारीकरिता पंढपुरास जाणारी श्री. संततुकाराममहाराज यांच्या पालखीचा मुक्काम बारामती येथे असताना पालखीबरोबर असणारे वारकरी लोकांना ते जेवण देत असत. ही प्रथा अजूनही चालू आहे.

अशी धार्मिक व परोपकार वृत्तीची माणसे दिवसेंदिवस समाजातून कमी होत असून त्याची पोकळी नवीन व्यक्तीकडून भरून निघत नाही ही खेदाची गोष्ट आहे.

दि बारामती सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, या संस्थेची स्थापना १९६२ साली होऊन ती ४ मार्च १९६३ साली रजिस्टर झालेली आहे. या संस्थेस नुकतीच दिनांक ३१–८–६६ रोजी सरकारकडून जळोची हद्दीतील स. नं. १३१ पैकी ३१ एकर २५ गुंठे जागा मिळालेली आहे. सदर जागेत लवकरच औद्योगिक वसाहतीच्या विकासाचे काम सुरू होणार आहे. संस्थेचे एकूण भागधारक १०० असून प्रत्येकी भाग रु. ५०० चा आहे. अशा रीतीने संस्थेचे भाग भांडवल रु. ५०,००० आहे. संस्थेच्या भाग भांडवलाइतकेच भाग भांडवल सरकारकडून मिळणार आहे. संस्थेचे सध्याचे चेअरमन श्री. मा. तु. शाह हे असून श्री. खु. र. छाजेड हे ऑ. सेक्रेटरी आहेत. तसेच संस्थेचे कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे आहे.

१) श्री. मा. तु. शाह चेअरमन
२) श्री. खु. र. छाजेड
३) श्री. मा. स. शाह
४) श्री. भा. भा. तावरे
५) श्री. गु. सा. मुश्रीफ
६) श्री. वि. रं. गुजर
७) श्री. प्र. रा. धुमाळ
८) श्री. रा. म. भोंगळे
९) श्री. रा. बं. होनबोटे
१०) श्री. महंमदहुसेन फिदाअल्ली
११) श्री. एस्. एस्. हिरेमठ

संस्थेचे प्रत्यक्षात कामकाज सुरू झाल्यानंतर औद्योगिक दृष्ट्या बारामती शहराची भरभराट होणार आहे.

# पू. सानेगुरुजी कथामाला, बारामती

## थोडक्यात परामर्ष

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।
पूज्य सानेगुरुजी कथामालेची स्थापना निदान बारामतीत तरी फार मोठ्या ध्येयवादाच्या प्रेरणेतून झाली नाही. लहान मुलांना एकत्र जमविणे, त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास करणे, मनोरंजनाच्या माध्यमातून त्यांच्या भावी आयुष्याला शक्य तितका सुबक आकार देणे अशासारख्या कल्पना घेऊन चार लोक एकत्र आले आणि १ ऑगस्ट १९५८ रोजी कथामालेची स्थापना दाते गुरुजींनी केली. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि बालकांकडून मिळालेला प्रतिसाद यामुळे कथामालेने लवकरच बाळसे धरले. आज सुमारे १५० मुले–मुली या कथामालेचा फायदा उठवीत आहेत. बारामतीसारख्या ठिकाणी हा आकडा निश्चितच बोलका म्हणावा लागेल.

बालांच्या मनाचा तळ गाठण्यासाठी विद्वानांनी योजना केलेली मानसशास्त्रीय बैठक आणि आम्ही यांत शास्त्रीयतेच्या दृष्टीने कदाचित् अंतर असेलहि; परंतु निरनिराळ्या सोयीस्कर व उपलब्ध साधनांच्या मर्यादित साहाय्याने आम्ही तो तळ गांठण्याचा प्रयत्न करीत आहोत. कथानिवेदन हे आमचे प्रमुख शस्त्र. या दृष्टीने महाभारत, शिवलीलामृत, रामायण, वगैरेसारखी अक्षरवाङ्मये आम्हांला उपयोगी पडत आहेत. बालांच्या भावनांच्या शक्यतो जवळ जाऊन पोहोचण्याची कुवत असणारे कथानिवेदक निवडायचे; त्यांच्याकडून मुलांना गोष्टी ऐकवायच्या; मुलांनाहि याबाबतीत कृतिशील बनवायचे, हळूहळू सुसंस्कार व सदाचार यांची आजच्या बिघडलेल्या समाजात असणारी उणीव दूर करण्याचा थोडासा प्रयत्न करावयाचा हा मार्ग आम्ही गेले ९ वर्षे अवलंबीत आहोत. प्रवास खूप दूरचा आहे, वाटचाल चालू आहे, हळूहळू गती येत आहे, वाटचाल चुकली नाही असा विश्वास निर्माण होत आहेच. एका पिढीने झाडे लावायची नि दुसऱ्या पिढीने फळे चाखायची असा हा मामला आहे. या बाबतीत अधिक काय सांगणार ?

कथामाला विनामूल्य आहे. आठवड्यातून एक दिवस सुटीच्या दिवशी कथानिवेदक बोलावून मुलांच्या पुढे चांगल्या कथा मांडायच्या हा उपक्रम दरवर्षी चालू असतो. त्याचप्रमाणे मुलांच्या अंगात धीटपणा बाणण्यासाठी त्यांच्या कथांना पण उत्तेजन द्यावयाचे. त्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून छोट्या ग्रंथालयाची योजना केली आहे. आज जवळ जवळ १९५ पुस्तके ग्रंथालयात आहेत. त्याचप्रमाणे श्लोक, समरगीते, लोकनृत्यें वगैरे सांस्कृतिक विभाग कथामालेत शिकविला जातोच.

दरवर्षी कथामाला सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊन आपले अव्वल स्थान दाखवितेच. कलाविश्व हे कथामालेचे अविभाज्य अंग आहेच. आत्तापर्यंत कथामालेनें बाळ चिलया, शिवोतपोभंग, मीरा स्वप्न, भारताचे थोर सुपुत्र वगैरेसारख्या उत्तम नृत्यसंगीतिका सादर करून पहिल्या नंबरची बक्षिसे मिळविली. त्याचप्रमाणे जिल्हातर्फे मुलांची शिबिरे होतात. त्यावेळेला बारामती कथामाला आपल्या मुलांना पाठवीत असते. शिबिरात पण मुलांनी आपल्या अंगच्या कलागुणांच्या जोरावरच आपले वैशिष्ट्य दाखविले.

दरवर्षी वाढदिवसानिमित्त बालकांसाठी कथामाला निरनिराळ्या स्पर्धा घेते. मुलांमध्ये वसत असलेल्या कलागुणांचा विकास घडवून आणायला अशा स्पर्धांचा उपयोग होतो. चित्रकला, कथा, संगीत, निबंध व स्मरणशक्ती अशा तऱ्हेच्या स्पर्धा घेण्यात येतात. यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे वाटण्यात येतात. बक्षिसे वाटताना सुद्धा दोन गटांची योजना केलेली असते. त्यामुळे जास्तीत

जास्त मुलांना भाग घेता येऊन जास्तीत जास्त स्पर्धकांना बक्षिसे मिळू शकतील.

परंतु ह्या सर्व गोष्टी करीत असताना आर्थिक सहाय्याची जरुरी असते. कारण कथामाला विनामूल्य आहे, आणि उगीच हात पसरायचे हे कथामालेला पटले नाही म्हणून कथामालेच्या संस्थापिका कु. प्रभा दाते यांनी 'दिवस सोनियाचा' व 'प्रेम लाभे प्रेमळाला' ही दोन नाटके लिहून कथामालेच्याच कार्यकर्त्याकडून सादर केली. त्यामुळे कथामालेची आर्थिक बाब भक्कम केली. ह्या नाटकांच्या जोरावरच कथामाला तरू शकली. कथामाला, सानेगुरुजी जयंती व वाढदिवस या निमित्ताने मुलांना खाऊ देते. ह्या सर्वच बाबींचा प्रश्न मिटला. त्याचप्रमाणे हे वाढदिवस साजरे होतात, त्यावेळेला नामवंत मंडळी अध्यक्ष म्हणून बोलावली जातात. आतापर्यंत खालील नामवंत मंडळी अध्यक्षस्थानी येऊन गेली. प्रान्त ऑफिसम आय्. जी. पठाण, श्री बंडोपंत करंदीकर वकीलसाहेब, सर्वश्री ग. दि. माडगूळकर, भालबा केळकर, वि. वि. बोकील, बापूराव माने, मालतीबाई दांडेकर, कवि यशवंत यांनी भेटी देऊन आम्हांला उपकृत केले.

कथामालेने राष्ट्राच्या निकडीच्या गरजेसाठी आपला वाटा इतर कार्यक्रमाबरोबर उचललाच. कथामालेच्या प्रमुख कार्यकर्त्या कु. प्रभा दाते यांनी लिहिलेले 'क्षण भाग्याचा' हे नाटक सादर करून ५०१ रु. ची देणगी संरक्षणनिधीला दिली. याशिवाय कथामालेच्या बालकांनी पण घरोघर जाऊन आपल्या चिमुकल्या हाताने निधी गोळा केला व १५१ रु. ची भर संरक्षणनिधीत घातली.

मध्यवर्ती कथामालेतर्फे निरनिराळ्या ठिकाणी दरवर्षी अधिवेशने आयोजित केलेली असतात. त्या अधिवेशनाला बारामतीतील प्रतिनिधि नेहमी स्वखर्चाने जात असतात. ८ वे वार्षिक अधिवेशनाचा लाभ बारामतीला २१ ते २३ मे १९६५ ला लाभला. त्यावेळी नामदार मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री हे अध्यक्षस्थानी होते व उद्घाटक पद्मश्री पु. ल. देशपांडे होते. शिवाय सर्वश्री ग. दि. माडगुळकर, प्रकाश मोहाडीकर, शिरूभाऊ लिमये, वगैरे नामवंत मंडळी उपस्थित होतीच. त्या अधिवेशनाला महाराष्ट्र, हैद्राबाद, गोवा वगैरे ठिकाणाहून सुमारे १६० प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमात कथामालेच्या कार्यकर्त्यांनी पद्मश्री पु. ल. देशपांडे लिखित 'सुंदर मी होणार' हे नाटक सादर केले. त्याचप्रमाणे बालक व प्रतिनिधी यांनी पण आपली कला दाखविलीच.

कथामालेच्या आवाक्यात आणखी काही गोष्टींचा समावेश करण्याचा प्रयत्न चालू आहेच. बालांच्या सर्वांगीण विकासाच्या कार्यात कथामाला जो हातभार लावीत आहे त्याला आवश्यकता लोकांच्या सहकार्याची, सद्भावनेची.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' असे म्हणूनच कार्यांची सुरुवात केली आहे. पू. सानेगुरुजींची पुण्याई पाठीशी आहे. तुमच्या सदिच्छा हव्यात, वडील माणसांचे आशीर्वाद हवेत, अनुभविकांचे मार्गदर्शन हवे. या सान्यांच्या जोरावर कथामाला आपली कक्षा वाढवू शकेल, याबद्दल संशय वाटत नाही. जे जसजसे घडले तसे आपणापुढे मांडले आहे.

—जयहिंद

-बारामती कथामालेचे कार्यकारी मंडळ-

| | |
|---|---|
| श्री. कृ. ल. कोल्हटकर<br>अध्यक्ष | श्री. धों. आ. सातव<br>उपाध्यक्ष |
| श्री. डॉ. व. मा. कोठारी<br>खजिनदार | कु. कालिंदी दाते, बी. ए.<br>कार्यवाह |

सभासद

| | |
|---|---|
| श्री. जिवराज मा. कोठारी | श्री. रा. म. भोंगळे |
| श्री. मोतीलाल तु. शहा | श्री. भारत दोशी |
| कु. उषा पां. दाते | श्री. शांताराम धों. ललगुणकर |
| श्री. म. शं. कानिटकर | श्री. अब्दुलगनी अत्तार |



ऑस्ट्रेलियन मिशन चर्च



ऑस्ट्रेलियन मिशन फ्रेंडशिप लायब्ररी (सेंटर)



कऱ्हामाईचे कांठावरील [ कसब्यामधील ] मसजीद, वेस व नदीचे पात्र



जुम्मा मसजीद, पेठ बारामती



बारामतीतील सुप्रसिद्ध ताबूत



दिगंबर लोकांच्या रथोत्सवाची मिरवणूक



बोहरी मसजिद



चांदशावली दर्गा, बारामती



स्मशानभूमि, बारामती पेठ



स्मशानभूमि (कसबा), बारामती



**अग्निशामक**

उभे-( १ ) श्री. बा. आ. शेख ( ड्रायव्हर फायर फायटरवरील )



**म्यु. पल बागांचे जोपासक**

डावीकडून ( १ ) श्री. कि. र. बाबर, असिस्टंट माळी
( २ ) श्री. ह्. नि. धनगर, हेड ट्रेन्ड माळी
( ३ ) श्री. सो. जगताप, असिस्टंट माळी



श्री. मा. तु. शाह, उपाध्यक्ष, बारामती नगरपालिका कार्यालयात

**बारामतीच्या समस्त**
**नागरिकांना**
**न ग र पा लि के त र्फे**
**सादर वंदन—**

परिशिष्ट–१

# बारामती नगरपालिकेचे आजपर्यंतचे सभासद

बारामती नगरपालिका १ जानेवारी १९६५ ला स्थापन झाली तेव्हापासून आतापर्यंत जे सभासद झालें, त्यांची नावे पुढे दिली आहेत.

सभासदाचे नाव

१८६५–६६

चार्लस रॉबर्टस फर्स्ट असिस्टंट
विनायक काशीनाथ
सय्यद इमामुद्दीन वल्लद सय्यद सगेशा काझी
गोपाळ रामचंद्र दाते
रामचंद देवचंद गुजर
रघुनाथ रामलाल मारवाडी
जयरामवीन धर्माजी, पोलीसपाटील.
सरदार कृष्णराव गोविंदराव काळे
देवराव बाजीराव देशमूख
नारो माधवराव देशपांडे
सुभाभाई सय्यदअली बोहरी
मोरुवीन काका चिवटे
खान वा राजेखान शेटे
गोविंद जनार्दन, वहिवाटीचे कुलकर्णी
त्रिंबक गोपाळ दाते
कृष्णराव आनंदराव सुमंत
गोपाळ रघुनाथ वैद्य
मोरो पांडुरंग शेंवेकर

१८६६

ताराचंद माधवजी गुजर

१८६९

आर्स्कीन
केशव रामचंद्र, फर्स्ट असिस्टंट मॅजिस्ट्रेट
केशवराव मोरेश्वर, (चीफ कॉन्स्टेबल)
रावजी परशराम संकुंडे

१८७०–७१

रीड, असिस्टंट मॅजिस्ट्रेट
दाजी पांडुरंग कुलकर्णी
रंगराव जयंत नरसिंहपूरकर

१८७५–७६

शिवराम हरि महालकरी
बळवंत रावजी, (चीफ कॉन्स्टेबल)
राघोजी कान्होजी, डॉक्टर

१८७७–७८

रंगो सखाराम, महालकरी
मलुकचंद ताराचंद
केसर, फर्स्ट असिस्टंट कलेक्टर

१८७९–८०

राघो नारायण, महालकरी.

नारायण खंडूजी ( चीफ कॉन्स्टेबल )
विठ्ठलराव भिकाजी डॉक्टर

(१-४-७८ ते ३१-३-७९)

केशव रामकृष्ण, महालकरी
सिमोड, असिस्टंट कलेक्टर
मूर, कलेक्टर
खंडेराव बाळाजी, महालकरी
रामसुख पदमजी मारवाडी

१८८०-८१

भवानीराम साहेबराम मारवाडी
नारायण वामन, ( चीफ कॉन्स्टेबल )

१८८२-८३

पांडुरंग केशव, (चीफ कॉन्स्टेबल)
राजन्ना कोमाजी, डॉक्टर
रामराव कृष्णराव, (महालकरी)
शंकर रामचंद्र, असि. महालकरी.
विनायक नीलकंठ, असि. महालकरी
स्कॉट, डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर
येसूजी महादजी, (चीफ कॉन्स्टेबल)
गणेश सखाराम, डॉक्टर
सिताराम गणेश, महालकरी
विष्णु अनंत पटवर्धन

१८८५

विठ्ठल रघुनाथ देशपांडे
मारुती विठोबा बाळवे
मनोहर बल्लाळ दाते
केशव विश्वनाथ भागवत.
सिताराम नारायण देशपांडे
सिताराम आबाजी लोणकर
अहमदअल्ली मुसाभाई बोहरी
गोपाळ बाबाजी खाडे, ( महालकरी )
ई-सी मॉरिसन, असिस्टंट कलेक्टर

१८८९-९०

नारायण लक्ष्मण दंडवते

बाळाजी मार्तंड केंजळे करंजकर
नारायण आबाजी पारनाईक
भिकाजी आनंदराव देशपांडे
नारायण विश्वनाथ नेने ( महालकरी )

१८९३

गणपतराव अर्जुनराव, डॉक्टर
सरदार गोविंदराव कृष्णराव काळे
महारुद्र विश्वनाथ अय्या.
बाळकृष्ण नरहर दाणी, ( मामलेदार )
केशव गोविंद माळी, ( मामलेदार )
टी डी. फ्राय, कलेक्टर
पीराजी कामाजी, डॉक्टर
विठ्ठल बळवंत फाटक
अबदुल हुसेन बोहरी
गणेश बापूजी साठे ( मामलेदार )
शंकर महादेव मेडदे
विष्णू मोरेश्वर दाभोळकर ( मामलेदार )
व्यंकटेश दामोदर पुणतांबेकर ( मामलेदार )
गोविंद रघुनाथ देशपांडे
रामलाल साहेबराम
दामोदर रघुनाथ दाते
ताजुद्दीन कासीम पीरजादे इनामदार

१९००-१९०१

विष्णू मारुती चिनके
भास्कर बळवंत सहस्त्रबुद्धे ( मामलेदार )
बाळोबा सखाराम
रामचंद मलुकचंद गुजर
केशवराव बेलीफ
बाळू सखाराम
जे. आर. ब्रेंडर, कलेक्टर
रंगो नारायणदास गुजर
किसनलाल भवानीराम मारवाडी
रावसाहेब गोविंद जगन्नाथ पाध्ये
कृष्णाजी बळवंत गणपुले
नारायण गोविंद देशपांडे
आबाजी बाळाजी भागवत
केशवराव मोहनाजीराव देशमुख



रावसाहेब पी. टी. किराणे, मामलेदार

१९०९

( पहिले लोकनियुक्त प्रेसिडेंट ) शेट रामचंद मलुकचंद ( यांना मा. ज. क. ठ नं. १५ ता. २३-३-१९०९ प्रमाणे मे. जे. पीब्रेंडर I. C. S. कलेक्टर यांनीं राजीनामा दिल्याने नेमले.)

१९११

भिवराव आबाजी देशपांडे
अमिरुद्दीन इस्मालशा
पांडुरंग केदारी सातव
शिवराम नारायण पवार
रामचंद्र सदाशिव आठवले, मामलेदार

१९११-१२

सदाशिव वासुदेव करंदीकर
रे. स्ट्रन
रावसो. कमलाकर हरी साठे, मामलेदार

१९१४-१५

पी. व्ही. डोमींगो ( कलेक्टर )
हरी मनोहर दाते
उस्मानभाई बाळाभाई
पांडुरंग नारायण ढवाण
डी. जी. पटवर्धन ( मामलेदार )
शिवनारायण रामलाल मारवाडी
शंकर महादेव पानट ( मामलेदार )

१९१८

रमणिकराय एल् मेहता
गोविंद गणेश बेरी
रे. एच. आर. कॉव्हेन्ट्री
शिवराम धारबा म्हेत्रे

१९२०

महादेव विश्वेश्वर कर्वे
शंकर रामचंद्र वैशंपायन (मामलेदार)

१९२१

साहेबराव तात्याबा ढवाण पाटील

मारुती बहिरु गिरंजे
फत्तेखान अब्दुलखान जमादार
आत्माराम भावा तपकिरे
सदाशिव हरी चिवटे
बाळकृष्ण रामचंद्र इंदुले
गंगाराम लीलाचंद गांधी
मोहनलाल गुलाबचंद मारवाडी

१९२४

तुळाजीराम गणपत ढवाण
लक्ष्मण केशव भागवत
एकनाथ गंगाराम पोटे
सदाशिव संभू बोधे
शंकर तुकाराम शिनगारे
दत्तात्रय महारुद्र अय्या
टाल्कचंद दलूचंद शहा
रामचंद सखाराम लेंगरेकर
शेख अमीरभाई मकतुमभाई बागवान
जानोजीराव लिंबाजीराव म्हसे पाटील
नारायण मनोहर दाते

१९२७

गजानन भिवराव देशपांडे
शांतीनाथ भुजबली वैद्य
रघुनाथ शिवनारायण मारवाडी
भाऊसो बाळोबा नवले
हरी पिराजी घायगुडे
सेवक पिरतामजी सोनवणे
डॉ. गोविंद रंगनाथ दाऊतखाने

१९३०

शंकर महादेव वाडकर
रे. ए. ह्यूजेस
नंदराम रामराव ढवाण
ज्ञानदेव विष्णू चिनके
आर. जे. शहा
डॉ. विष्णु विनायक परांजपे
रावबहादुर सोपानराव तुकाराम जाचक
राजाराम बहिरु शिंदे

१९३३

बी. एम्. गोडबोले, मामलेदार
हरी बाळोबा शिंपी
शंकर गंगाराम भोई

१९३६-३७

शंकरराव ऊर्फ बापूराव पांडुरंग ढवाण
गणेश मनोहर दाते
वासुदेव विनायक ब्रम्हे
केशव नरहर गोखले
नारायण रामचंद्र ढोले
शंकर पांडुरंग पवार
शेख हसनभाई महमदभाई बागवान
रामकृष्ण महादेव शिराळककर, मामलेदार
सावळा पिरा मोरे

१९३९-४०

धर्माजी गणपतराव डेंगळे
केशव रामचंद्र पराडकर
कृष्णमोहन कन्हैय्यालाल शहा
कस्तुरचंद रायचंद गुजर
विश्वनाथ मारुती गालिंदे
ज्ञानोबा तात्याबा शेटे
भगवान मल्लिकार्जुन डोंबे
बाबुराव भाबाजी कल्याणकर
सौ. कमलाबाई केशव गोखले
महादेव सदाशिव भालेराव

१९४२-४३

गुलाबराव पाटलोजी ढवाण
शंकरराव पांडुरंगराव जामदार
छगनलाल फुलचंद ढाकाळकर
दीपचंद धरमचंद गुजर

१८४२-४३

महादू केदारी सोनवले
शिवराम नथूराम खत्री
दत्तात्रय विष्णू कुलकर्णी
शंकर रामचंद्र इंदुले
पुरुषोत्तम भास्कर पानसे

घोंडीराम तुकाराम लाखे
सौ. अनुसयाबाई भ्र. ज्ञानेश्वर चिनके
शेख रमझानभाई इब्राहिमभाई
शेख गफूरभाई माणिकभाई नारळवाले

१९४५-४६

भिकाजी देवबा तांवे
लक्ष्मणशिव बाळप्पा बिराजदार
माणिकलाल तुळजाराम शाह
आनंदराव गोविंदराव काळोखे
उद्धवराव लक्ष्मण इंगुले
व्यंकटराव गणपतराव तावरे
सोपानराव जयराम किंवे
श्रीरंग सटवाजी सोनवणे
दगडोबा घोंडीबा नेवसे
सौ. शेवंताबाई भ्र. कृष्णाजी नेवसे

१९४८-४९

भाऊसो भाबाजी खरात
गुलाबराव साहेबराव ढवाण
वालचंद हिराचंद कोठडिया
हिरालाल तरकचंद शहा
मेहरबानजी सावळाराम मोरे
पांडुरंग तुकाराम वदक
सौ. वसंतमाला भ्र. शिवलाल व्होरा
जिनदत्त चंदूलाल शहा
शेख गुलामअली करीमभाई
राजाराम आबाजी जाधव
वामन राजाराम निंबंधे

१९५२-५३

जयराम पांडुरंग सातव
छगनलाल निहालचंद सुंदेचामुथा
चिंतामण सखाराम दाते
घोंडीबा आबाजी सातव
सौ. लीलावती वालचंद कोठडिया
उमाजी दाजीबा सोनवणे
लक्ष्मण शिवबाळप्पा बिराजदार
नारायणराव केरबा कदम
महादेव पंढरीनाथ टांकसाळे



वामनराव नारायणराव गवारे
शेख इब्राहिमभाई माणिकभाई बागवान

१९५७-५८

भिकाजी बंडोबा खरात
भगवान देवराव सातव
श्रीपाल छगनलाल ओसवाल
अण्णासो. शंकरराव भोकरे
सदाशिव बाबूराव गालिंदे
शेख महमदभाई हुसेनभाई बागवान
डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी
मोतीचंद फुलचंद शहा
पन्नालाल शिवलाल सुंदेचामुथा
सौ. आनंदीबाई अनंतराव माने

१९६३-६४

सौ. लक्ष्मीबाई घोंडीबा सातव
काशिनाथ सिताराम सोनवले
कृष्णा शंकर सोनवले
यशवंत कोंडीबा सोनवणे
रामचंद्र केशव रासकर
विठ्ठल रामचंद्र सोनवणे
आनंदराव रामचंद्र गाडे
भाऊसाहेब अण्णासाहेब काटे
लक्ष्मण नाना इंगुले

टीपः- जे सभासद पुन्हा पुन्हा निवडून आले त्या नावाची द्विरुक्ती केलेली नाही

# वार्षिक पर्जन्यमान दर्शविणारा तक्ता

| वर्ष | इंच |
|---|---|
| १८७८ | २९.३३ |
| १८७९ | २६.१० |
| १८८० | २२.१० |
| १८८१ | १९.२९ |
| १८८२ | २१.१९ |
| १८८३ | २५.८३ |
| १८८४ | २०.३० |
| १८८५ | २०.५२ |
| १८८६ | ३१.८१ |
| १८८७ | २४.६६ |
| १८८८ | १९.५२ |
| १८८९ | २५.२० |
| १८९० | २४.५६ |
| १८९१ | १५.१९ |
| १८९२ | ४१.५७ |
| १८९३ | ३४.३५ |
| १८९४ | २३.४६ |
| १८९५ | ३१.४९ |
| १८९६ | २३.८५ |
| १८९७ | १६.३२ |
| १८९८ | २०.९३ |
| १८९९ | १२.७२ |
| १९०० | १४.४२ |
| १९०१ | १७.३७ |
| १९०२ | १९ ३५ |
| १९०३ | १८.३२ |
| १९०४ | १२.१८ |
| १९०५ | १२.४४ |
| १९०६ | २४.७० |
| १९०७ | १७.०२ |
| १९०८ | १६.५३ |

| वर्ष | इंच |
|---|---|
| १९१२ | १४.३४ |
| १९१३ | १२.६१ |
| १९१४ | १६.३० |
| १९१५ | १८.९० |
| १९१६ | २७.४९ |
| १९१७ | २५.०५ |
| १९१८ | १०.९५ |
| १९१९ | १०.९५ |
| १९२० | १९.४१ |
| १९२१ | १७.०७ |
| १९२२ | १९.५९ |
| १९२३ | ८.८५ |
| १९२४ | १७.८९ |
| १९२५ | १३.२२ |
| १९२६ | १६.१० |
| १९२७ | २२.७९ |
| १९२८ | २१.५६ |
| १९२९ | २२.७९ |
| १९३० | १५.१४ |
| १९३१ | २५.३५ |
| १९३२ | २७.६३ |
| १९३३ | ४.४७ |

| | |
|---|---|
| १९४१ | १३.९५ |
| १९४२ | १३.३२ |
| १९४३ | १८.९० |
| १९४४ | २९ ३२ |
| १९४५ | ११.४२ |
| १९४६ | १७.२६ |
| १९४७ | २६.१० |
| १९४८ | २५.२९ |



| वर्ष | इंच |
|---|---|
| १९०९ | २४.३९ |
| १९१० | २०.४४ |
| १९११ | ११.७१ |

| | |
|---|---|
| १९५२ | ११.१९ |
| १९५३ | १४.४७ |
| १९५४ | २१.१९ |
| १९५५ | २४.४७ |
| १९५६ | ३७.३४ |
| १९५७ | २१.७८ |
| १९५८ | ४४७.७ एम् ई. एस. |
| १९५९ | ४०९.६ ,, |
| १९६० | ६२४.६ ,, |

| वर्ष | इंच |
|---|---|
| १९४९ | २३.९३ |
| १९५० | २१.१४ |
| १९५१ | १७.५७ |

११३४ सालापासून पुढे

| | |
|---|---|
| १९३४ | १६.६३ |
| १९३५ | १९.२८ |
| १९३६ | १६.२१ |
| १९३७ | १७.०३ |
| १९३८ | ४९.७६ |
| १९३९ | १७.२१ |
| १९४० | १३.१५ |

———

# नागरी जीवन : व्यक्ती व संस्था

नगरसंस्था म्हणजेच नगरपालिका. ही नागरी जीवनातून निर्माण झालेली यंत्रणा आहे. नगरपालिका स्थापन झाली तेव्हाचे समाजजीवन प्रथम थोडेसे पाहिले. नगरपालिकेच्या विकासाचा व कारभाराचा आढावा नंतर घेतला. आता या नगरसंस्थेला पायाभूत असलेल्या नागरीजीवनाचा परिचय थोडासा करून घेण्याचे योजिले आहे.

नागरी-जीवनाची अंगे-उपांगे खूप आहेत. त्यांची विषयवारीने नोंद करावयाची तर स्थलकाल फार लागेल. म्हणून सूत्ररूपाने हे कार्य येथे केले आहे. त्यातल्या शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक जीवनाचा प्रथम उल्लेख करून, व्यापार-औद्योगिक विभाग नंतर दिला आहे.

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल

बारामती येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल ही एक अग्रगण्य व ज्येष्ठ संस्था आहे. बारामती नगरपालिकेने जवळजवळ ७०।७५ वर्षांपूर्वी, इंग्रजी शिकविण्याला प्रारंभ केला. त्यातूनच ही शिक्षणसंस्था निर्माण झाली आहे. नगरपालिकेने केलेल्या प्रारंभीच्या कामाचा थोडासा आढावा शिक्षणविषयक सदरात घेतला आहे. आता थोडी अधिक माहिती उपलब्ध झाली आहे. तिची नोंद करून हायस्कूलच्या कामाशी थोडासा परिचय करून घ्यावयाचा आहे. बारामती नगरपालिकेने शिक्षण-प्रसाराच्या चळवळीने केलेल्या कामाचे सम्यक् चित्र म्हणून एम्. ई. एस्. हायस्कूलच्या वाढीकडे अभिमानाने पण नम्रपणे बोट दाखविता येईल.

महाराष्ट्र व्हिलेज एज्युकेशन सोसायटीने बारामतीला इंग्रजी शिकविण्याचे वर्ग प्रथम सुरू केले. शिक्षण-प्रसारक मंडळातील प्रसिद्ध प्राचार्य श्री. विनायकराव आपटे हे नूतन मराठी विद्यालयात जाण्यापूर्वी या वर्गांस शिकवीत असत, अशी नोंद आढळते. या वर्गांचे काम अधिक पद्धतशीर व्हावे, म्हणून बारामती नगरपालिकेने ' English Education classes ' या नावाने हे वर्ग इ. स. १८९५ मध्ये सुरू केले.

श्री. हरि गंगाधर पतकी नावाच्या गृहस्थांची या वर्गांवर मुख्य अध्यापक म्हणून इ. स. १९१०-१९११ च्या सुमारास नेमणूक करण्यात आली. त्यांच्या हाताखाली एक मॅट्रिक उत्तीर्ण व एक व्हर्नॅक्युलर फायनल उत्तीर्ण असे दोन शिक्षक द्यावेत. आणि मग संस्था रजिस्टर करावी, असेही यावेळी ठरविण्यात आले. 'एम्. ई. एस्. हायस्कूल' बारामतीचे सध्याचे शाळाप्रमुख श्री. बा. गो. घारे यांचेकडून श्री. पतकी यांच्याविषयी अशी माहिती मिळाली की,-

"श्री. पतकी हे काही ध्येये व काही स्वप्ने घेऊनच बारामतीला आले होते. पुढच्या लहान पिढीसाठी शिक्षणाची सोय व समाजासाठी वर्तमानपत्र, असे, त्यांच्या कामाचे स्वरूप होते. त्यांचा पिंडच काहीसा साहित्यिक होता. भक्तप्रेमलहरी, मधुवचनमाला, मधुमक्षिका इत्यादि भक्तिपर स्फुट वचने व कविता असलेली पुस्तके त्यांनी लिहिली व एक वर्तमानपत्रही त्यांनी चालविले. हे वर्तमानपत्र तसे अल्पायुषीच ठरले. पण दुसऱ्यांच्या हातून नव्या स्वरूपात 'बारामती समाचार' या नावाखाली ते पुढे बरीच वर्षे चालू होते. श्री. पतकी हे प्रकृतिस्वास्थ्यासाठी पुण्यास गेले व शाळेच्या व्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाला.

त्या वेळेला श्री. कृष्णाजी बळवंत गणपुले वकील

हे नगरपालिकेच्या मॅनेजिंग कमिटीत व स्कूल कमिटी या समित्यांचे अध्यक्ष होते. इ. स. १९०९–१० ते स्वतः पुण्याच्या भावे स्कूलचे विद्यार्थी होते. तेव्हा भावेस्कूल ही शाळा 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन' ही संस्था चालवीत असे. बारामतीचे वर्ग चालविण्यास घेण्याची सूचना सदर संस्थेला केली गेली. श्री. गणपुले यांचा या कामी पुढाकार होता व ते सहाजिक होते. ता. ३ मार्च १९११ पासून ही शाळा सदर संस्थेकडे गेली. व मुख्याध्यापक म्हणून श्री. झांबरे यांची नेमणूक झाली.

कोणत्या अटीवर शाळा चालविण्यास दिली, ते अन्यत्र नमूद केले आहे. प्रथम शाळेसाठी जागा दिली व अनुदान रु. ६० दिले. तेव्हा शाळा तीन इयत्तांची होती व त्याच वेळेला चौथीचा वर्ग उघडला गेला. पुढच्या पाच वर्षांत विद्यार्थ्यांची संख्या १०० झाली. म्हणून नगरपालिकेने दरमहा रु. १५ भाड्याची एक जागा घेऊन दिली व वर्षाचे अनुदान रु. ९०० केले. चौकात श्री. गंगाराम गांधी यांचे शेजारचे वाड्यात ही शाळा भरत असे.

श्री. झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेची प्रगती समाधानकारक झाली. इ. स. १९२० मध्ये सहावीचा वर्ग काढला. आणि मारवाड आळीत शाळेसाठी आणखी जागा घेतली. पालिकेने अनुदानाची रक्कम वाढवून ती रु. १५०० केली. नगरपालिकेच्या कचेरीसमोरील मैदान (सध्याची ग्रेन मार्केटची जागा) क्रीडांगणासाठी वापरली जात असे. श्री. झांबरे यांची बदली पुण्याला झाली, तेव्हा श्री. खासनीस यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. (इ. स. १९१७)

याचवेळी शाळेसाठी जागा व क्रीडांगण अशी सोय एकत्र करावी, अशी खटपट सुरू होती. सध्या जेथे ह्या शाळेची वास्तु आहे तीच जागा मिळविण्याचे हे प्रयत्न होते. दौंड-बारामती रेल्वे कंपनीने ती जागा घेतली होती. रेल्वे सुरू झाल्यावर इतकी मोठी जागा नको, असे आढळून आल्यावर रेल्वेचे एक प्रवर्तक दिवाणबहादुर श्री. का. रा. गोडबोले यांनी ती जागा देण्याचे मान्य केले. नगरपालिकेने एकरी रु. २०० असा भाव देऊन, ही जागा घेतली आणि शाळेला वर्षाला रु. १ अशा नाममात्र भाड्याने ती दिली.

इंग्रजी सातवीचा म्हणजे मॅट्रिकचा वर्ग इ. स. १९२१ मध्ये सुरू झाला. तेव्हा श्री. द. वि. बापट यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. मुंबई विद्यापीठाने 'मॅट्रिक' परीक्षेसाठी शाळेला मान्यता दिली व इ. स. १९२२ मध्ये या शाळेतून मॅट्रिक परीक्षेला पहिली तुकडी (बॅच) गेली. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांत सुप्रसिद्ध लेखक व 'केसरी' चे माजी सह-संपादक श्री. दा. न. शिखरे व श्री. व. वि. कानडे हे होते.

श्री. बापट गुरुजी यांचा शिक्षणकार्याविषयीचा जिव्हाळा अजूनही त्यांच्या विद्यार्थ्यांना आठवतो. ते येथे इ. स. १९३२ पर्यंत होते. त्या अवधीत त्यांनी अनेक विधायक कामे केली. रेल्वेकडून घेतलेल्या जागेत शाळेसाठी इमारत बांधण्याला इ. स. १९२७ मध्ये प्रारंभ झाला. प्रथम ८ खोल्याच बांधल्या होत्या. व्हर्नॅक्युलर फायनल उत्तीर्ण झालेल्यांना एका वर्षात तीन इयत्ता करता याव्यात म्हणून त्यासाठी एक खास वर्गही याच वेळी काढला होता. या शाळेचे कार्य करीत असताना श्री. बापट यांनी सेवासदन सोसायटीच्या शाखेत मुलींसाठी इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था करून दिली. बारामतीची या क्षेत्रातील प्रगती ही श्री. बापट यांच्या परिश्रमाचे फळ आहे, असे कृतज्ञतेने मान्य केले पाहिजे.

श्री. त्रिं. ग. भोपटकर हे इ. स. १९३२ पासून मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागले. विद्यार्थ्यांची संख्या २३० पेक्षा अधिक झाली, म्हणून जादा जागा बांधण्याचे प्रयत्न झाले. हायस्कूलशेजारचे खुले मैदान (३ एकर) भाड्याने घेतले. महाराष्ट्रातले इंग्रजीचे नामवंत शिक्षक श्री. किंकर यांचा दोन वर्षे शाळेला लाभ झाला. आधुनिक म्हणून मानल्या गेलेल्या कित्येक गोष्टी उदाहरणार्थ : विद्यार्थ्यांचे कोर्ट, विद्यार्थ्यांचे पार्लमेंट, स्काउटिंग, म्युझिक सर्कल, सहकारी दुकान, नाट्यप्रयोग, इत्यादि प्रयोगाच्या निकालावर तपासल्या गेल्या. मुलींची संख्याहि ह्या काळात वाढली.

श्री. भोपटकर हे पुण्याला बदलून गेल्यावर (इ. स. १९३८) गुरुवर्य श्री. बापट दोन वर्षे पुनः



मुख्याध्यापक म्हणून आले. त्यांच्यानंतर गुरुवर्य श्री. अण्णासाहेब घारे मुख्याध्यापक झाले. इ. स. १९४० ते इ. स. १९५५ या कालावधीत मुख्याध्यापकाची अधिकारसूत्रे गुरुवर्य श्री. अण्णासाहेब घारे यांचेकडे होती. दुसऱ्या महायुद्धाचा काळ, ४२ ची 'चलेजाव' चळवळ, भारताची फाळणी, स्वातंत्र्यप्राप्ती अशा घटना झाल्या. तेव्हाच्या अडचणींना तोंड देण्याची कामगिरी त्यांनी केली.

मध्यंतरी, नगरपालिकेने अनुदानाची रक्कम रु. ३६००।– केली. बारामती जिमखाना व जनसेवा नाट्यमंडळ या संस्थांची निर्मिती शाळेच्या कक्षेत झाली. त्या वाढल्या व स्वतंत्र झाल्या. विकास योजनेला मदत करावयाची म्हणून मेडद, तांदुळवाडी येथे विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. ज्युनियर एन. सी. सी. चे पथक सुरू झाले. ते शिक्षक श्री. नी. ब. बडवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीपथावर कार्य करीत आहे.

एस्. एस्सी. परीक्षेचे केंद्र बारामतीला मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले. नगरपालिकेने यावेळी सर्व प्रकारे सहाय्य केले व आतापर्यंत ती मदत सुरू आहे.

**सरकारी हवामान खात्याने या हायस्कूलची 'पार्ट-टाइम ऑब्झर्वेटरी' म्हणून निवड केली. (इ. स. १९५४) व ते काम आजपर्यंत सुरू आहे. अशा कामासाठी निवडलेली गेलेली सर्व महाराष्ट्रांत ही एकच संस्था (हायस्कूल) आहे.**

श्री. एस्. बी. गोगटे हे इ. स. १९५६ मध्ये मुख्याध्यापक झाले. तीन वर्षांनी त्यांची बदली झाली व श्री. द. रं. कुलकर्णी हे त्यांच्या जागी आले. श्री. गोगटे यांची एकाच वर्षात या जागी पुनः नेमणूक झाली, पण त्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्यावर श्री. बा. गो. घारे यांची नेमणूक झाली. ते सध्या मुख्याध्यापक आहेत.

या कालावधीत अनेक उल्लेखनीय घटना झाल्या. प्रेक्षागृह बांधण्यासाठी मध्यवर्ती सरकारने रु.३२०००-। चे अनुदान दिले. व बारामती नगरपालिकेने त्यात रु. ४०००।– ची भर घातली. इमारतही वाढविली गेली. क्रीडांगणासाठी वापरात असलेले मैदान रिमांड-होम संस्थेच्या सहकार्याने विकत घेतले. राज्य सरकारने प्रयोगशाळेकरिता रु. २०००।–चे अनुदान गेल्या तीन वर्षात दिले; भारत सरकारने वाचनालयासाठी रु. ३००।– व एक खास प्रयोग योजना म्हणून रु. ६००।– असे अनुदान दिले आहे.

विद्यार्थ्यांची संख्या सध्या १२५६ आहे. जागा पुरत नाही म्हणून दुबक्त शाळा भरविली जाते. एस्. एस्. सी. परीक्षेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली आहेत. व 'नॅशनल मेरिट स्कॉलरशिप्स' ही मिळविल्या आहेत. तांत्रिक शिक्षण विभाग जोडण्याचे प्रयत्न चालू आहेत. सदर शिक्षणसंस्थेला नागरिकांनी बरीच मदत केली आहे; आणि नगरपालिकेने आईच्या वात्सल्याने साहाय्य केले आहे.

## श्री छत्रपती शाहू हायस्कूल

बारामतीच्या परिसरात बागायत, शेती व औद्योगिक वाढ होत गेली, त्या बरोबर शैक्षणिक सोय वाढावी म्हणून साताऱ्या रयत शिक्षण संस्थेने बारामतीच्या नागरिकांच्या इच्छेला मान देऊन, श्री छत्रपती शाहू हायस्कूल इ. स. १९५४ मध्ये सुरू केले. सदर संस्थेचे संस्थापक डॉ. पद्मभूषण कर्मवीर श्री. भाऊराव पाटील हे या हायस्कूलच्या स्थापनेच्या वेळी उपास्थित होते.

संस्था सुरू करावयाची म्हटले की. जागेचा प्रश्न प्रथम उभा रहातो. श्री शाहू बोर्डिंगचे त्या वेळचे अध्यक्ष कै. नानासाहेब बापूजी जगताप ढाकाळकर, श्री. गोविंदराव पवार, श्री. नारायणराव कदम, श्री. बी. डी. तांबे, श्री. दादासाहेब जामदार, श्री. धों. आ. सातव आदि मंडळींनी सध्याच्या श्री. शाहू बोर्डिंगची सुसज्ज इमारत शाळेसाठी भाड्याने देऊन ही गरज भागविली.

त्याचवेळी श्रीमंत नानासाहेब ढाकाळकर यांनी स्वतःचे रोख दहा हजार रुपये व तीन खोल्यांची स्लॅबची सुमार तीस ते बत्तीस हजार रुपयांची इमारत शाळेला बांधून दिली.

हे हायस्कूल सुरू झाल्यापासून नगरपालिकेने दरसाल अडीच हजार रुपयांची भरीव देणगी देऊन,

या शाळेच्या प्रगतीस व शिक्षणकार्यास बहुमोल सहाय्य केले आहे. शाळा सुरू झाल्यापासून वेळोवेळचे सन्माननीय नगराध्यक्ष श्री. धों. आ. सातव, श्री. वि. रा. सोनवले व श्री. जयराम पांडुरंग सातव यांनी व उपाध्यक्ष श्री. गवारे, श्री. गालिंदे व श्री. मा. तु. शहा यांनी तसेच अनेक सदस्यांनी आस्थेवाइकपणाने लक्ष घालून अनेक प्रकारची वेळोवेळी मदत केली व सहानुभूति दाखविली आहे.

शाळेसाठी येथील श्री. बापूराव ढवाण व इतर ढवाण कुटुंबीय यांनी आपल्या मालकीची सात एकर चार गुंठे जमीन बक्षीस देऊन संस्थेच्या येथील कार्यास चालना दिली. त्या जमिनीचा शाळेसाठी शेती विभाग सुरू करण्यास चांगलाच उपयोग झाला आहे.

शैक्षणिक कार्य व त्याचा विकास कसा झाला हे दाखविणारा तक्ता असा :—

इयत्तावार निकाल

| वर्ष | इयत्ता ८ वी | इयत्ता ९ वी | इयत्ता १० वी | इयत्ता ११ वी | एस्.एस्.सी.शे. नि. |
|---|---|---|---|---|---|
| १९५४ | ६६ | २१ | — | — | — |
| १९५५ | ८४ | ४८ | १८ | — | — |
| १९५६ | ६७ | ७४ | ४१ | १६ | — |
| १९५७ | ६४ | ४८ | १८ | १८ | ५८.८ |
| १९५८ | ५० | ४३ | ५७ | ३३ | ५४.८ |
| १९५९ | ३६ | २७ | ३२ | ४८ | ३९.५ |
| १९६० | ४५ | २४ | २२ | ३० | १०.० |
| १९६१ | ५२ | २९ | २१ | २६ | ३१.८ |
| १९६२ | ७९ | ३० | ३० | २० | ५३.० |
| १९६३ | १०९ | ६१ | ३५ | २८ | ५७.० |
| १९६४ | १४२ | ९६ | ४४ | ३९ | ३७.८ |
| १९६५ | २०४ | १२६ | ६९ | ४७ | ३४.० |
| १९६६ | २१३ | १६७ | १०१ | ८१ | ५६.२५ |
| १९६७ | | | | | |

वरील तक्त्यावरून शाळेने गेल्या चौदा वर्षांत कसकशी संख्यात्मक व गुणात्मक प्रगती केली हे सहज आढळून येईल. या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती, शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरा लक्षात घेता या शाळेने बारामती व तिचा परिसर यातील लोकांच्या शैक्षणिक प्रगतीस बराचसा हातभार लावला आहे, असे म्हणता येते.

शाळेत दैनंदिन अभ्यासाखेरीज विद्यार्थ्यांच्या मध्ये नागरिकत्वाचे चांगले गुण निर्माण व्हावे, म्हणून अनेक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणून विद्यार्थ्यांना त्यामध्ये सातत्याने मार्गदर्शन केले जाते. राष्ट्रभाषा हिंदी, ड्रॉइंगच्या परीक्षा, टिळक विद्यापीठाच्या इंग्रजी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची बौद्धिक उंची वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. बौद्धिक तयारीबरोबरच श्रमाचे महत्त्व पटवून देण्यातहि या शाळेस यश आले आहे.

शाळेला ढवाण कुटुंबीयांकडून मिळालेल्या जमिनीत चार एकर द्राक्ष बाग लावण्यात बारामतीचे



लोकप्रिय व कर्तव्यतत्पर मामलेदार श्री. बी. ए. पाटील यांनी फार महत्त्वाची मदत केली. या कार्यासाठी बारामतीचे प्रसिद्ध व दानशूर बागाइतदार श्री. द. ग. शेंबेकर, श्री. भोंगळे बंधु, श्री. पराडकर बंधु, श्री. बाळासाहेब गिते, शिरवलीचे शेठ श्री. राधेश्याम अगरवाल, मळदचे श्री. बापूराव पाटील आदि मंडळींनी पैसे, वस्तू, श्रम व सदिच्छा या मार्गांनी संस्थेस या द्राक्षकामी हरतऱ्हेची उदार अंतःकरणानी मदत केलेली आहे. याशिवाय श्री. पंडितराव रोपळेकर व श्री. सिताराम बगवे यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करून ही द्राक्ष बाग फुलविण्यास फारच चांगली मदत केली. या बागेतून शाळेस सालीना खर्च वजा जाता किमान वीस ते पंचवीस हजार रुपये मिळण्याची शक्यता आहे. या पैशाचा विनियोग नवीन शाळागृह बांधण्यास निश्चितच होईल, अशी आशा आहे. त्या दृष्टीने आतापासूनच पावले टाकली जात आहेत.

बारामती तालुका व त्याचा परिसर यामध्ये तीन साखर कारखाने, एक पालिकेम कारखाना, जीन्स व शहरात लहान लहान लेथ्स्, छापखाने व मोटर गॅरेजेस आहेत.

येथील शेतकरी प्रगत असल्याने तो आता ट्रॅक्टर्स, इलेक्ट्रिक मोटर्स, इंजिन्स, मोटार सायकली, टूरिंग टॅक्सीज, ट्रक्स आदि वहाने व अवजारे यांचा सतत वापर करीत आहे. बारामतीत औद्योगिक वसाहत स्थापन झाली असून त्यामध्ये सुरू होणाऱ्या लघु उद्योगासाठी व वरील विविध गोष्टीसाठी हरहुन्नरी कारागीर व तंत्रज्ञ निर्माण होणे आवश्यक आहे. ही येथील गरज लक्षात घेता येथील लोकांच्या आग्रहास्तव व इच्छेनुसार याच हायस्कूलमध्ये शेती विभागाबरोबर तांत्रिक विभागहि सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी जरूर ती परवानगी महाराष्ट्र राज्य सरकारकडे मागितली आहे. या कार्यासाठी बारामती नगरपालिकेने एक लक्ष रुपये देण्याचा ठरावही केलेला आहे. या कामी बारामती ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमेटीचे माजी चेअरमन श्री. मा. जी. शहा यांनी जागा खरेदी करण्यासाठी दहा हजार रुपये जमा करून दिले. आपली स्वतःची मोक्यावरील जागा श्री. धों. आ. सातव यांनी योग्य मोबदल्यात देऊन या कार्यास चांगलाच आरंभ केला आहे.

या कार्यास निरा कॅनॉल्स सहकारी सोसायट्यांच्या संघाचे चेअरमन श्री. मु. सा. काकडे यांनी संघाचे नफ्यातून पाच हजार रुपये जाहीर केले आहेत. श्री. धों. आ. सातव यांनीहि आपले स्वतःचे पांच हजार रुपये दिले आहेत.

या शाळेची धुरा वाहण्यात व तिचे नेतृत्व करण्यात खालील मुख्याध्यापकांचे श्रम व कौशल्य कारणीभूत झालेले आहे :–

| वर्ष | मुख्याध्यापकाचे नांव |
|---|---|
| १९५४–५५ | श्री. बी. बी. कामिरे |
| १९५५–५६ | श्री. शंकर पाटील |
| १९५५–५६ | श्री. टी. जी. शिंदे |
| १९५७–५९ | श्री. जे. बी. पाटील |
| १९५९ पासून | श्री. एस्. जी. भोसले |

| वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| | ८७ |
| ३ तुकड्या | १५० |
| ४ तुकड्या | १९६ |
| ४ तुकड्या | १८२ |
| ६ तुकड्या | ५६८ |
| १२ तुकड्या | |

## मिशन हायस्कूल, बारामती

बारामती येथे बरीच वर्षे व्यवस्थितपणे सुरू असलेल्या, ऑस्ट्रेलियन मिशनने बारामतीच्या शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीत बरीच भर घातलेली आहे. इ. स. १९५६ पासून सुरू असलेल्या हायस्कूलकडे याचे एक द्योतक म्हणून बोट दाखविता येईल.

मिशनचे प्रमुख अधिकारी गावाच्या प्रश्नात नेहमी लक्ष घालतात. श्री. स्ट्रटन व कॉन्व्हेन्ट्री हे नगरपालिकेचे सभासद होते. चौकातील एक जागा वाचनालयासाठी मिळविण्याचा प्रयत्न श्री. कॉन्व्हेन्ट्री यांनी केला होता.

ऑस्ट्रेलियन ओव्हरसीज मिशनच्या स्थानिक 'कमिटी ऑफ मॅनेजमेंट' ने या शाळेच्या प्रगतीत पुढाकार घेतला. श्री. जॉन वैरागी यांच्या नेतृत्वाखाली हे प्रयत्न झाले व इ. स. १९५६ मध्ये हायस्कूल सुरू करण्यात आले. सुरुवातीस आठवीचा एकच वर्ग, ४० विद्यार्थी व २ शिक्षक होते. आज एकूण ८ वर्ग, ३३७ विद्यार्थी व १३ शिक्षक आहेत.

सन १९६० पासून शाळेचे एस्. एस्. सी. रिझल्टस् चांगले लागले आहेत. १९६६ साली रिझल्ट ६१·५० लागला. त्यात एक विद्यार्थी, प्रकाश इनामदार ७५% टक्के गुण मिळवून बारामती केंद्रात ३ रा आला.

शाळेमध्ये एन्. सी. सी. चे शिक्षण दिले जाते. १०० कॅडेट्स आहेत. २६ जानेवारी प्रजासत्ताक-दिनानिमित्त झालेल्या दिल्ली येथील परेडला महाराष्ट्रा-मधून आमच्या हायस्कूलमधील विद्यार्थी श्री. व्यंकट बहादूरकर यास निवडले होते. शाळेमध्ये शारीरिक क्षमता, कसोट्या केन्द्र, हिन्दी विद्यापीठाचे केन्द्र चालू आहे. तालुका व जिल्हा सामन्यामध्ये विद्यार्थी भाग घेऊन प्राविण्य मिळवितात. राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी रोख रु. २३५२ तसेच जखमी जवानां-साठी मफलर्स, हातमोजे, मिठाई, मासिके, साबण इत्यादि वस्तू पाठविल्या होत्या. सांस्कृतिक कार्यक्रम, सहली पार पाडल्या जातात. लोकनृत्यामध्ये शाळेचे नाव बरेच पुढे गेले आहे. श्री. शरद् खोमणे या विद्यार्थ्याने विहिरीत पडलेल्या एका मुलीस वाचविले आहे. अशा रीतीने ही शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सतत प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक, चांगले समाजकर्ते तयार करणे अशी महत्त्वाची कामगिरी ही संस्था करीत आहे. शाळेचे अधिकारी असे मानतात की, "उत्कृष्ट सोने न घेता ज्ञान घ्या; कारण मोत्यापेक्षा ज्ञान उत्तम आहे."

## श्री शाहू बोर्डिंग

बारामती व त्याच्या आसपासच्या भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय करावयाची, म्हणजे त्यांना राहण्याची जागा हा प्रश्न मुख्य होता. उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना बारामतीलाच यावे लागे. शेतकऱ्यांच्या मुलांची राहण्याचीही सोय करावी म्हणून इ. स. १९१९ मध्ये श्री शाहू बोर्डिंग, बारामती येथे सुरू झाले.

माळेगावचे श्रीमंत श्री. शंभूसिंह जाधवराव, रावबहादुर जाचक, नानासाहेब ढाकाळकर, गोविंद-राव पवार, सरनोबत सत्यवंत रावबा ढवाण, नंदराम ढवाण, बापूराव ढवाण, आटपाडीचे मसु पाटील इत्यादि मंडळींनी हे बोर्डिंग सुरू करण्यात पुढाकार घेतला.

प्रारंभी हे बोर्डिंग राममंदिराशेजारी एका लहानशा जागेत सुरू झाले. विद्यार्थ्यांची संख्या वाढली, तेव्हा सर्व्हे नंबर २६३ मधील जागा घेऊन तेथे इ. स. १९२८ मध्ये १२ खोल्यांची जागा बांधली. ही इमारत तयार करण्याचे कामी काहींनी देणग्या दिल्या, काहींनी श्रम केले. काहींनी मार्ग-दर्शन केले.

या वसतिगृहात प्रारंभापासून २० ते ६० पर्यंत विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय होती. श्री. मसु पाटील, श्री. गुलाबराव शिंदे, श्री. खलाटे, श्री. एस. व्ही. यादव, श्री. गरूड, श्री. निंबाळकर इत्यादि कार्य-कर्त्यांनी वेळोवेळी या वसतिगृहाची व्यवस्था केली आहे.

इ. स. १९५४ मध्ये श्री छत्रपती शाहू हायस्कूल स्थापन झाले. तेव्हा वसतिगृहाची जागा त्या शाळेकडे भाड्याने गेली. आणि वसतिगृहाची दैनंदिन देखरेख शाळेच्या शिक्षकांच्याकडे गेली. इ. स. १९५४ पासून आतापर्यंत जीडकर शिंदे, श्री. व्ही. पी. कदम व मुख्याध्यापक श्री. एस्. जी. भोसले यांनी व्यवस्था पाहिली आहे. श्री. गोविंदराव पवार हे व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष असून श्री. नारायणराव कदम व श्री. एस्. बी. ताकवणे हे चिटणीस आहेत.



# अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे बारामती कॉलेज

बारामती व बारामतीच्या परिसरात चालू शतकाच्या मध्यापर्यंत एकच माध्यमिक शाळा होती. आता येथे तीन प्रशाला व जवळ जवळ तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागात येणारा दौंड, इंदापूर हा भाग बारामतीच्या विशेष जवळचा आहे. या परिसरात जवळ जवळ वीसपेक्षा अधिक प्रशाला शिक्षण प्रसाराचे कार्य करतात. अशा प्रकारे माध्यमिक शिक्षणाची गरज पूर्ण झाली. मात्र उच्च शिक्षणाची सोय नव्हती.

पुणे जिल्ह्यात, पुण्याबाहेर १९६२ पूर्वी एकही महाविद्यालय नव्हते. म्हणून बारामतीस आपले एक कला, विज्ञान, वाणिज्य यांचे उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय असावे असे अनेकान्त एज्युकेशन सोसायटीला वाटले व त्याप्रमाणे प्रयत्नाला सुरुवात झाली. त्या वेळचे (सन १९६२) बारामती नगरपालिका अध्यक्ष श्री. धोंडिबा आबाजी सातव व सभासद वर्ग यांनी सोसायटीस एक लाख रुपयांची देणगी वाचनालय वास्तुकरिता देऊन प्रोत्साहन दिले. इतकेच नव्हे तर पुढील काळात दरवर्षी दहा हजार रुपये अनुदान म्हणून मंजूर केले आहेत. नगर-पालिकेच्या अशा भरीव मदतीने या कार्याला चालना मिळाली.

मुंबई, पुणे, सोलापूर व बारामती या विभागातील कित्येक शिक्षणप्रेमी व दानशूर लोकांच्या सतत परिश्रमाने अनेकान्त एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन झाली आहे. सोसायटीचे पितृत्व कै. श्रीमान् फुलचंद गांधी यांचेकडे आहे. ते भूतपूर्व हैद्राबाद राज्याचे कॉंग्रेस मंत्रिमंडळाचे शिक्षणमंत्री होते. बारामतीस महाविद्यालय काढण्याचे कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यात त्यांचा मोठा भाग आहे.

या संस्थेच्या बारामती महाविद्यालयाचा उद्घाटन-समारंभ दिनांक २३ जून १९६२ रोजी महाराष्ट्र राज्याचे त्या वेळचे मुख्य मंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. नामदार श्री. चव्हाण यावेळी म्हणाले, "महाराष्ट्रात व तेही विशेषतः ग्रामीण भागात अशा उच्च शैक्षणिक संस्थांचे उद्घाटन करताना मला अति-शय आनंद वाटतो. पुण्याचे बाहेर उच्च विद्येची पूजा फारशी दिसत नव्हती. ती आता जागोजाग पसरावी ही प्रामाणिक इच्छा आहे. देशाची ताकद त्यातील नद्या, डोंगर किंवा लोकसंख्या यांनी मोजा-वयाची नसते. माणसाची बुद्धि, शक्ति व कर्तृत्व यांनी ती मोजावी लागते. तो देश मोठा असतो की ज्याचे बौद्धिक तेज व कर्तृत्व मोठे असते. हे बुद्धीचे तेज केवळ शिक्षणानेच वाढते म्हणून देशाला त्याची आज प्रथम आवश्यकता आहे. म्हणून विद्येची उपासना व आराधना निरंतर होत राहिली पाहिजे.

महाविद्यालयाचे यंदाचे पाचवे वर्ष आहे. या पाच वर्षात बारामतीचा शैक्षणिक विकास होऊ लागला. बारामती महाविद्यालयातील विद्यार्थी मेडि-कल, इंजिनिअर इत्यादि शिक्षणाकडे जाऊ लागले. पहिली पदवीधरांची तुकडी बाहेर पडली. पहिल्या बी. ए. तुकडीचा निकाल १०० टक्के लागला. पदवी-धर मुले व मुली बारामतीचे भूषण झाले. बारामतीच्या घराघरातून लक्ष्मीबरोबर सरस्वती नांदू लागली.

बारामती महाविद्यालयास आर्थिक सहाय्य देणा-ऱ्यात पुढील संस्थांचा व व्यक्तींचा प्रामुख्याने उल्लेख करावयाला हवा:—

(१) बारामती नगरपालिका, एक लाख रुपये देणगी व पुढे प्रत्येक वर्षी दहा हजार रुपये अनुदान.

(२) पुणे जिल्हा परिषद पुणे–रुपये पंचवीस हजार.

(३) दि माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. माळेगाव, सभासदाकडून रुपये सदतीस हजार पाचशे.

(४) व्यापारी असोसिएशन, रुपये तीन हजार.

(५) श्रीमती कस्तुरबाई वालचंद ट्रस्ट, रुपये दहा हजार.

(६) श्री. विमलचंद माणिकचंद गांधी यांचे-कडून रुपये बावीस हजार.

(७) मे. ज्योतीचंद भाईचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(८) मे. तुळजाराम चतुरचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(९) मे. शिवलाल प्रेमचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(१०) मे. कोठारी ब्रदर्स, रुपये पाच हजार एकशे एक.

(११) श्री. राधेश्याम अग्रवाल, रुपये पाच हजार एकशे एक्कावन्न.

या कॉलेजच्या प्राचार्यांची परंपरा ही कॉलेजच्या भरभराटीस कारणीभूत आहे. पाच वर्षांत कॉलेजने पुणे विद्यापीठात नावलौकिक मिळविलेला आहे.

कॉलेजचे पहिले प्राचार्य श्री. शा. दा. वणकुद्रे येथे येण्यापूर्वी राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे ३० वर्षे अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते. ते एक थोर शिक्षणतज्ज्ञ आहेत. आपल्या सौजन्यशील व सौहार्दपूर्ण नेतृत्वामुळे व कर्तृत्वामुळे त्यांनी कॉलेजच्या पहिल्या वर्षीच व्यवस्थित घडी बसविली. विशेषत: ग्रंथालयाची सुसज्जता व शिक्षणाची उच्च पातळी यावर त्यांचा अधिक भर असे.

नंतर डॉ. श्री. अ. आ. पाटील यांच्याकडे मे १९६३ पासून बारामती महाविद्यालयाची जबाबदारी सोपविली. सातारा येथील रयत संस्थेचे ते आजीव सदस्य होते. 'मनात जिद्द असेल तर आपण माळरानाचे नंदनवन बनवू' असे ते म्हणत. बारामती कॉलेजचे नंदनवनात रूपांतर करण्यासाठी अनेक चांगल्या योजना त्यांनी हाती घेतल्या होत्या.

प्राचार्य श्री. अ. आ. पाटील यांच्याकडून डॉ. रा. नि. अक्कोळे यांनी दिनांक १७ जून १९६५ ला आपल्या हाती सूत्रे घेतली आहेत. माळरानाचे नंदनवन करण्याची अपूर्ण असलेली योजना पूर्ण करण्यासाठी ते झटत आहेत.

श्री. अक्कोळे यांनी 'मध्ययुगीन मराठीचे जैन साहित्य' या विषयावर ह्या कॉलेजात कार्य करीत असताच प्रबंध लिहिला. तो पुणे विद्यापीठाने पी. एच. डी. साठी मान्य करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांचे 'श्रेणीक चरित्र' हे पुस्तक पुणे विद्यापीठाने एम्. ए. (मराठी) साठी क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर केले आहे.

बारामती महाविद्यालयाने २३ जून १९६६ रोजी पांचव्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत आणि पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कॉलेजने एक वैशिष्ट्यपूर्ण कॉलेज म्हणून नांव कमाविले आहे.

कॉलेजमध्ये बी. ए., बी कॉम्., बी. एस्सी. व डिप्लोमा इन एज्युकेशन असे चार अभ्यासक्रम पूर्णपणे शिकविले जातात.

कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा आढावा घेतला तर पुढीलप्रमाणे प्रगति दिसून येते :—

| | |
|---|---|
| १९६२–६३ | १२० विद्यार्थी |
| १९६३–६४ | २१२ विद्यार्थी |
| १९६४–६५ | ३२७ विद्यार्थी |
| १९६५–६६ | ३६८ विद्यार्थी |
| १९६६–६७ | ४८० विद्यार्थी |

चालू वर्षी ४८० पैकी ७७ विद्यार्थिनी आहेत. जून १९६७ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ६५० होईल अशी अपेक्षा आहे. कॉलेजचे परीक्षांचे निकाल चांगले लागत आहेत, हे पुढील पानावरून दिसून येईल.



## बारामती कॉलेजचे परीक्षांचे निकाल

| अ. नं. | वर्ग | पासाचे शेकडा प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९६२/१९६३ | १९६३/१९६४ | १९६४/१९६५ | १९६५/१९६६ |
| (१) | पी. डी. आर्टस् | ६४·७ | ७५. | ६५·७८ | ६५·२ |
| (२) | पी. डी. सायन्स | ७८·५ | ६१.८ | ४३·४७ | ६२·५ |
| (३) | पी. डी. कॉमर्स | ८३·३ | ७९·५ | ६९·४४ | ७४· |
| (४) | एफ्. वाय्. बी. ए. | — | ८३·३३ | ३१·४ | १००· |
| (५) | एफ्. वाय्. बी. एस्सी. | — | ६०· | ४४·४ | ६०· |
| (६) | एफ्. वाय्. बी. कॉम्. | — | ८८·८८ | ७०·६ | ६२·५ |
| (७) | टी. वाय्. बी. कॉम्. | — | — | — | ४६·२ |
| (८) | डिप्. एड्. | — | — | १००· | १००· |

टीप : एस्. वाय्. बी. ए., एस्. वाय्. बी. कॉम्., एस्. वाय्. बी. एस्सी. परीक्षेचे निकाल जाहीर होत नाहीत. टी. वाय्. बी. एससी. पहिल्या बॅचची परीक्षा मार्च एप्रिल १९६७ मध्ये आहे. १९६५–६६ ला टी. वाय्. बी. ए., एफ्. वाय्. बी. ए., व डिप्. एड्. परीक्षेचे निकाल १०० टक्के लागले आहेत. त्याचप्रमाणे सन १९६४–६५ मध्ये देखील डिप्. एड्. परीक्षेचा निकाल १०० टक्के आहे.

पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. पुणे विद्यापीठाच्या १९६५ मधील पदवीपूर्व विज्ञान परीक्षेत श्री. वीरेंद्र कुमार गुजराथी हे विद्यापीठात पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांना कॉलेजने एकशेएक रुपयांचे खास पारितोषिक दिले. सदर महाविद्यालयातून एफ्. वाय्. बी. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन एम्. बी. बी. एस्. अभ्यासक्रमाकडे ४, व इंजीनियरिंगचे अभ्यासाकडे ४ विद्यार्थी गेले आहेत.

देशी व विदेशी खेळांची सोय महाविद्यालयामध्ये करण्यात आलेली आहे. ग्वाल्हेर येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशनमध्ये शिक्षण घेतलेले श्री. एल. व्ही. लेकावळे (बी. पी. एड्.) हे शारीरिक शिक्षणाचे डायरेक्टर म्हणून नियुक्त केले गेले



आहेत, हुतुतूमध्ये चालू वर्षी कॉलेजचा संघ कोपरगाव,
नाशिक या कॉलेजचा पराभव करून उपविजेता
झाला. क्रिकेट, खो खो, ॲथलेटिक्स यात देखील
प्राविण्य मिळविले आहे. १९६२ ते १९६६ प्रत्येक
आंतरमहाविद्यालयीन सामन्यात बारामती महाविद्या-
लयाने भाग घेतला व त्यात वरच्या दर्जाचे यश मिळ-
विले. आंतरमहाविद्यालयीन सामन्याखेरीज कॉलेजच्या
विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी तालुका क्रीडा–महो-
त्सव व जिल्हा क्रीडामहोत्सव यात भाग घेतला.
आणि विविध प्रकारचे यश मिळवून महाविद्यालयाचा
लौकिक वाढविला आहे.

बारामती कॉलेज, बारामती येथील विद्यार्थ्यांच्या
कल्याणाच्या दृष्टीने विविध योजना पूर्ण करीत आहे.
वसतिगृह पूर्ण करण्यात आले आहे. एन्. सी. सी.
शिक्षणाची सोय येथे उपलब्ध आहे. ग्रंथालय व प्रयोग-
शाळांचा विस्तार वाढविला आहे. श्रम करून शिक्षण
योजना सुरू केली असून, पुस्तक पतपेढी योजना सुरू
झाली आहे. वसतिगृह बांधण्यासाठी कस्तुरबाई ट्रस्ट-
मुंबई यांनी कर्जरूपाने मदत केली आहे. इमारतीची
जागा श्री. गालिंदे बंधु यांनी बक्षीस दिली आहे.

वालचंद ग्रुपचे प्रमुख श्रीमान् लालचंद हिराचंद
हे सोसायटीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. यातच

(७) मे. ज्योतीचंद भाईचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(८) मे. तुळजाराम चतुरचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(९) मे. शिवलाल प्रेमचंद, रुपये पाच हजार एकशे एक.

(१०) मे. कोठारी ब्रदर्स, रुपये पाच हजार एकशे एक.

(११) श्री. राधेश्याम अग्रवाल, रुपये पाच हजार एकशे एक्कावन्न.

या कॉलेजच्या प्राचार्यांची परंपरा ही कॉलेजच्या भरभराटीस कारणीभूत आहे. पाच वर्षात कॉलेजने पुणे विद्यापीठात नावलौकिक मिळविलेला आहे.

कॉलेजचे पहिले प्राचार्य श्री. शा. दा. वणकुद्रे येथे येण्यापूर्वी राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे ३० वर्षे अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होते. ते एक थोर शिक्षणतज्ज्ञ आहेत. आपल्या सौजन्यशील व सौहार्दपूर्ण नेतृत्वामुळे व कर्तृत्वामुळे त्यांनी कॉलेजच्या पहिल्या वर्षीच व्यवस्थित घडी बसविली. विशेषतः ग्रंथालयाची सुसज्जता व शिक्षणाची उच्च पातळी यावर त्यांचा अधिक भर असे.

नंतर डॉ. श्री. अ. आ. पाटील यांच्याकडे मे १९६३ पासून बारामती महाविद्यालयाची जबाबदारी सोपविली. सातारा येथील रयत संस्थेचे ते आजीव सदस्य होते. 'मनात जिद्द असेल तर आपण माळरानाचे नंदनवन बनवू' असे ते म्हणत. बारामती कॉलेजचे नंदनवनात रूपांतर करण्यासाठी अनेक चांगल्या योजना त्यांनी हाती घेतल्या होत्या.

प्राचार्य श्री. अ. आ. पाटील यांच्याकडून डॉ. रा. नि. अक्कोळे यांनी दिनांक १७ जून १९६५ ला आपल्या हाती सूत्रे घेतली आहेत. माळरानाचे नंदनवन करण्याची अपूर्ण असलेली योजना पूर्ण करण्यासाठी ते झटत आहेत.

श्री. अक्कोळे यांनी 'मध्ययुगीन मराठीचे जैन साहित्य' या विषयावर ह्या कॉलेजात कार्य करीत असताच प्रबंध लिहिला. तो पुणे विद्यापीठाने पी. एच. डी. साठी मान्य करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांचे 'श्रेणीक चरित्र' हे पुस्तक पुणे विद्यापीठाने एम्. ए. (मराठी) साठी क्रमिक पुस्तक म्हणून मंजूर केले आहे.

बारामती महाविद्यालयाने २३ जून १९६६ रोजी पांचव्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत आणि पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कॉलेजने एक वैशिष्ट्यपूर्ण कॉलेज म्हणून नांव कमाविले आहे.

कॉलेजमध्ये बी. ए., बी कॉम्., बी. एस्सी. व डिप्लोमा इन एज्युकशेन असे चार अभ्यासक्रम पूर्णपणे शिकविले जातात.

कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा आढावा घेतला तर पुढीलप्रमाणे प्रगति दिसून येते :—

| | |
|---|---|
| १९६२–६३ | १२० विद्यार्थी |
| १९६३–६४ | २१२ विद्यार्थी |
| १९६४–६५ | ३२७ विद्यार्थी |
| १९६५–६६ | ३६८ विद्यार्थी |
| १९६६–६७ | ४८० विद्यार्थी |

चालू वर्षी ४८० पैकी ७७ विद्यार्थिनी आहेत. जून १९६७ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ६५० होईल अशी अपेक्षा आहे. कॉलेजचे परीक्षांचे निकाल चांगले लागत आहेत, हे पुढील पानावरून दिसून येईल.



## बारामती कॉलेजचे परीक्षांचे निकाल

| अ. नं. | वर्ग | पासाचे शेकडा प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १९६२/१९६३ | १९६३/१९६४ | १९६४/१९६५ | १९६५/१९६६ |
| (१) | पी. डी. आर्टस् | ६४.७ | ७५. | ६५.७८ | ६५.२ |
| (२) | पी. डी. सायन्स | ७८.५ | ६१.८ | ४३.४७ | ६२.५ |
| (३) | पी. डी. कॉमर्स | ८३.३ | ७९.५ | ६९.४४ | ७४. |
| (४) | एफ्. वाय्. बी. ए. | — | ८३.३३ | ३१.४ | १००. |
| (५) | एफ्. वाय्. बी. एस्सी. | — | ६०. | ४४.४ | ६०. |
| (६) | एफ्. वाय्. बी. कॉम्. | — | ८८.८८ | ७०.६ | ६२.५ |
| (७) | टी. वाय्. बी. कॉम्. | — | — | -- | ४६.२ |
| (८) | डिप्. एड्. | — | — | १००. | १००. |

टीप : एस्. वाय्. बी. ए., एस्. वाय्. बी. कॉम्., एस्. वाय्. बी. एस्सी. परीक्षेचे निकाल जाहीर होत नाहीत. टी. वाय्. बी. एससी. पहिल्या बॅचची परीक्षा मार्च एप्रिल १९६७ मध्ये आहे. १९६५–६६ ला टी. वाय्. बी. ए., एफ्. वाय्. बी. ए., व डिप्. एड्. परीक्षेचे निकाल १०० टक्के लागले आहेत. त्याचप्रमाणे सन १९६४–६५ मध्ये देखील डिप्. एड्. परीक्षेचा निकाल १०० टक्के आहे.

पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. पुणे विद्यापीठाच्या १९६५ मधील पदवीपूर्व विज्ञान परीक्षेत श्री. वीरेंद्र कुमार गुजराथी हे विद्यापीठात पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांना कॉलेजने एकशेएक रुपयांचे खास पारितोषिक दिले. सदर महाविद्यालयातून एफ्. वाय्. बी. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन एम्. बी. बी. एस्. अभ्यासक्रमाकडे ४, व इंजीनियरिंगचे अभ्यासाकडे ४ विद्यार्थी गेले आहेत.

देशी व विदेशी खेळांची सोय महाविद्यालयामध्ये करण्यात आलेली आहे. ग्वाल्हेर येथील सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल एज्युकेशनमध्ये शिक्षण घेतलेले श्री. एल. व्ही. लेकावळे (बी. पी. एड्.) हे शारीरिक शिक्षणाचे डायरेक्टर म्हणून नियुक्त केले गेले

आहेत, हुतुतूमध्ये चालू वर्षी कॉलेजचा संघ कोपरगाव, नाशिक या कॉलेजचा पराभव करून उपाविजेता झाला. क्रिकेट, खो खो, ॲथलेटिक्स यात देखील प्राविण्य मिळविले आहे. १९६२ ते १९६६ प्रत्येक आंतरमहाविद्यालयीन सामन्यात बारामती महाविद्या-लयाने भाग घेतला व त्यात वरच्या दर्जाचे यश मिळ-विले. आंतरमहाविद्यालयीन सामन्याखेरीज कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी तालुका क्रीडा–महो-त्सव व जिल्हा क्रीडामहोत्सव यात भाग घेतला. आणि विविध प्रकारचे यश मिळवून महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे.

बारामती कॉलेज, बारामती येथील विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने विविध योजना पूर्ण करीत आहे. वसतिगृह पूर्ण करण्यात आले आहे. एन्. सी. सी. शिक्षणाची सोय येथे उपलब्ध आहे. ग्रंथालय व प्रयोग-शाळांचा विस्तार वाढविला आहे. श्रम करून शिक्षण योजना सुरू केली असून, पुस्तक पतपेढी योजना सुरू झाली आहे. वसतिगृह बांधण्यासाठी कस्तुरबाई ट्रस्ट-मुंबई यांनी कर्जरूपाने मदत केली आहे. इमारतीची जागा श्री. गालिंदे बंधु यांनी बक्षीस दिली आहे.

वालचंद ग्रुपचे प्रमुख श्रीमान् लालचंद हिराचंद हे सोसायटीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. यातच

या संस्थेचा गौरव आहे; नामदार शंकरराव पाटील उप-महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, सौ. मालतीबाई शिरोळे, पुणे, श्री. शंकरराव उरसळ, अध्यक्ष जिल्हा परिषद, पुणे श्री. धों. आ. सातव, माजी नगराध्यक्ष, बारामती नगरपालिका, श्री. शरच्चंद्र पवार, आमदार चिटणीस महाराष्ट्रराज्य युवक कॉंग्रेस, श्री. द. ग. शेंबेकर, श्री. शंकरराव गणेश दाते, श्री. भालचंद्र तावरे, श्री. मुगुटराव काकडे, श्री. मा. सो. जाचक, श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधव, श्री. एस. एस. हिरेमठ वकील, श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा, डॉ. व. मा. कोठारी, मोतीचंद फुलचंद शहा, श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, श्री. शशिकांत शहा, श्री. खुशालचंद छाजेड, आदींचा कॉलेजच्या कामात पुढाकार आहे.

बारामती कॉलेज हे बारामतीचे एक भूषण ठरले आहे. कोणत्याही क्षेत्रातील उच्च शिक्षणावरच राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. भारताच्या ग्रामीण भागाचा विकास या शिक्षणावरच अवलंबून आहे. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे बारामती कॉलेज अल्प अवधीत या भागातील एक दर्जेदार व नामवंत संस्था बनली आहे, हे येथे नमूद करण्यास आनंद होतो.

## म. गांधी बालक मंदिर

म. गांधी बालक मंदिराची स्थापना १ सप्टेंबर १९६६ ला झाली आहे. अडीच वर्षांपासून दहा वर्षांपर्यंतच्या बालकांना मॉंटेसरी पद्धतीचे व प्राथमिक शिक्षणाची तरतूद करणे असे मुख्य उद्दिष्ट ठरविले आहे. मुलांच्या मनावर चांगले संस्कार घडविणे, त्यांचे आचार, उच्चार व विचार सुधारून त्यांना आदर्श नागारिक बनण्यास मदत देणे, असे या कामाचे स्वरूप आहे.

सर्वसाधारण लोकांना परवडेल अशीच माफक फी प्रत्येक मुलाला प्रथम रु. १ ठेवली आहे. या उपक्रमाचे स्वागत चांगले झाले व खालच्या थरातील मुलात शिक्षणाची गोडी उत्पन्न करण्याचे उद्दिष्ट सफल होत आहे, असे कार्यकर्त्यांनी अहवालात नमूद केले आहे.

भगिनी मंडळाची एक शाखा म्हणून या कामाला दहा वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. काम वाढत चालले, म्हणून निराळी संस्था निर्माण केली व ती नोंदविली गेली आहे. या संस्थेचे प्रमुख पदाधिकारी असेः– अध्यक्ष :–श्री. द. ग. ऊर्फ अण्णासाहेब शेंबेकर; उपाध्यक्षः– डॉ. कृ. रा. कुंचूर; कार्याध्यक्षः– सौ. कुसुमताई कृष्णराव कुंचूर; चिटणीसः– सौ. सुशीलाबाई शंकरराव दाते; खजिनदारः– श्री. शंकरराव गणेश दाते; सन्माननीय सभासदः– श्री. एस्. एस्. हिरेमठ व श्री. धों. आ. सातव.

प्रत्येक २५ विद्यार्थ्यांमागे एक नादार व एक अर्धनादार असा नियम केला आहे. खर्च वाढला म्हणून वर्ग फी प्रत्येकी रु. २–०० केली आहे. प्रवेश फी रु. २ आहे. या संस्थेच्या शिक्षणाला राज्य सरकारच्या शिक्षण खात्याने मान्यता दिली आहे. नगरपालिकेने आपल्या वाचनालयाचे मागील जागा मंदिरासाठी दिली आहे. मुलांचे खेळण्याचे साहित्य घेण्याकरिता रु. २५०१।–म. गांधी स्मारक निधीतून मिळवून देण्याच्या कामी बारामती नगरपालिकेने मदत केली आहे.

मंदिराच्या कार्यात सौ. गायकवाडबाई व श्री. सोनवणे गुरुजी आपुलकीने मदत करतात. संस्थेच्या शाळेत प्रारंभी विद्यार्थ्यांची संख्या अवघी ५० होती. सेन्ट्रल सोशल वेल्फेअर बोर्डाच्या पूर्वीच्या अध्यक्ष सौ. दुर्गाबाई देशमुख यांनी इ. स. १९५८ मध्ये सदर संस्थेला भेट देऊन कामाबद्दल समाधान व्यक्त केले. बोर्डाकडून प्रथम वर्षाला रु. ७५०।– अनुदान मिळाले. आता ते रु. १०००।– झाले आहे.

संस्थेजवळ इमारत निधीत रु. १९००० आहेत. राज्य सरकारने सिनेमा रोडवर सर्वे नंबर ९१८ मधील ७१३८ चौरस फूट क्षेत्रफळाचा प्लॉट इमारतीसाठी विनामूल्य दिला आहे. या जागेत सुमारे एक लक्ष रुपये खर्च करून इमारत बांधण्याचा संकल्प संस्थेच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.



## श्री मुनि सुव्रत दिगंबर जैन मंदिर

हे दिगंबर जैन मंदिर जैनांच्या चोवीस तीर्थंकरांचे पैकी विसावे तिर्थंकर म्हणजे या मंदिराची मूळ मूर्ति मुनि सुव्रत तीर्थकरांची आहे. ते अंदाजे २०० वर्षांपूर्वीचे असून त्याचा जीर्णोद्धार येथील श्रीमान् शेठ रामचंद मलुकचंद यांचे वडील मलुकचंद ताराचंद मेहता यांनी येथील दिगंबर जैन समाजाचे वतीने केलेला आहे. तो सवंत् १९३२ मध्ये केला. या देवस्थानचे मदतीकरिता कै. रामचंद मलुकचंद यांनी बारामती येथे चाळी व मोठी घरे बांधली आहेत. त्याचे उत्पन्नातून देवस्थानचा खर्च चालतो.

जैन समाजाची येथे वरील मंदिरास लागून एक जैन पाठशाळा आहे. येथे धार्मिक पुस्तकांचे भांडार आहे. येथे धार्मिक शिक्षण दिले जाते. या ऐलक दिगंबर जैन पाठशाळेची स्थापना सन १९२५ चे दरम्यान झाली. या पाठशाळेस लागूनच एक धर्मशाळा आहे. या जागेमध्ये दरसाल भाद्रपद महिन्यात पर्यूषण पर्वाचे समाप्तिप्रीत्यर्थ पाकी (भंडारी) व मार्गशीर्ष व.॥ १० ला रथोत्सवानिमित्त भोजन दिले जाते. एरवी या धर्मशाळेचा उपयोग मंगल कार्यालय म्हणून केला जात आहे. रथोत्सव हाही सन १९२७ चे पासून सुरू झाला आहे.

कै. रामचंद मलुकचंद शेठ यांनी बारामती येथे भिगवण रोडला दिगंबर जैन बोर्डिंग नावाची संस्था १९२७ मध्ये आपले पिताजी कै. मलुकचंद ताराचंद मेहता यांचे नावाने सुरू केली. या बोर्डिंगमध्ये दिगंबर जैन पंथीय मुले हजारोंनी शिकून जाऊन सर्वच कार्यक्षेत्रात अग्रेसर म्हणून आजतागायत वावरत आहेत.

कै. अमीचंद दलुचंद शहा यांनी आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ बारामती येथे जैन समाजाच्या समाजसेविका सौ. नवलबाई अमीचंद जैन दवाखाना तारीख १३।२।१९१९ रोजी सुरू केला असून, बारामती व परिसरातील लोक या जैन दवाखान्याचा फायदा घेत आहेत. या संस्थेचे चालक म्हणून वैद्यराज शांतिनाथ भुजबली वैद्य हे फार पूर्वीपासून काम चालवीत आहेत.

## चांदशावलीचा उरूस

"चांदखानबुवाचा उरूस" या नांवाने सामान्य समाजात ओळखला जाणारा हा उरूस आज जवळ जवळ तीनशे वर्षे सुरू आहे. ज्या बुवांच्या नांवाने ही जत्रा भरते, त्या बुवांचे नांव हजरत पीर अबुल इस्माईल ऊर्फ चांदशावली असे होते.

ते मूळचे बसऱ्याचे रहाणारे. त्यांच्या वडिलांचे नाव अबदुल लतीफ व आईचे नांव जमीलाबी असे होते. घराणे व्यापार उद्योग करणारे होते. पण चांदशा यांना लहानपणापासून देवाधर्माची आस्था विशेष होती. ते दिल्लीत आले व तेथून मद्रासकडे जात असता बारामतीला त्यांचा मुक्काम झाला. कऱ्हा नदीचा किनारा पसंत पडून त्यांनी बारामतीलाच कायमचे वास्तव्य केले.

ते येथे असताना, सय्यद घराण्यातील मूळ पुरुष सय्यद माणिक सय्यद खाजा इनामदार यांनी त्यांची इमानेइतबारे चाकरी व सेवा केली. म्हणून विजापूर दरबारने सदर दर्ग्याची व मशिदीची व्यवस्था नीट करण्याकरितां सर्व्हे नंबर ३६ मधील जागा इनाम दिली.

चांदशावली हे बारामतीला जवळ जवळ ४० वर्षे होते. ते परधर्मसहिष्णु होते. दीनदुबळ्यांना मदत देण्यासाठी ते तळमळत असत. माणुसकीने व नीतीने वागा, अशी त्यांची शिकवण असल्यामुळे मुसलमान, हिंदू इत्यादि धर्मीयांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा बसली. दैवी सामर्थ्याने ते क्लेश व दुःख दूर करतात, असा भाविक लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता. अशा रीतीने जीवनक्रम घालवीत असता ते सव्वाल तारीख २८ हिजरी सन ७८५ या दिवशी पैगंबरवासी झाले. म्हणजे इसवी सन सुमारे १३८३–८४ असा येतो.

[ चांदशावली यांच्याबद्दलची ही माहिती, सध्या पुण्यात रहाणारे बारामतीचे एक नागरिक श्री. सय्यद इमामुद्दीन यांचेकडून मिळाली. ]

दरवर्षी चांदशावलीचा उरूस भरतो. त्याचे हे

वैशिष्ट्य आहे. चैत्री पौर्णिमेनंतरच्या गुरुवार, शुक्रवार व शनिवार, ह्या तीन दिवशी हा उरूस भरतो.

दरवर्षीच्या उरुसात कोणते काम कोणी करावयाचे हे ठरलेले आहे. त्यात हिंदु,मुसलमान असा भेद नाही. बहुसंख्य मानकरी हिंदु आहेत. रात्रीच्या वेळी प्रकाश पाहिजे. त्यासाठी पलिते वापरीत. ती पद्धती अजूनही सुरू आहे. पलित्यासाठी चिंध्या देणारा शिंपी ठरलेला आहे. तेल कोणी द्यावयाचे तेही ठरलेले आहे. दर्गा कोणी धुवावयाचा तो कोळी ठरलेला आहे. अत्तर, गुलाबपाणी इत्यादि देणारे ठरलेले आहेत. या निमित्ताने सर्व जमातीचे व व्यवसायाचे लोक एकत्र येतात.

पहिल्या रात्री ( गुरुवारी ) संदलची मिरवणूक निघते. दुसरे दिवशी भक्तगणांची दर्शनासाठी रीघ लागते. आम महाराष्ट्रातून भाविक लोक येतात. नवसाला चांदखानबुवा पावतात, अशी काही भाविकांची श्रद्धा आहे. तिसरे दिवशी दर्ग्यापुढे भेदिक लावण्यांच्या स्पर्धा होतात. त्यात कलगीवाले व तुरेवाले असे गट असतात. तमाशात काम करणारे लोक आता या फडात येईनासे झाले आहेत. असे श्री. गुलाबसिंग रामसिंग परदेशी यांनी नुकतेच सांगितले. त्या दिवशी दुपारपासून नदीच्या वाळवंटात कुस्त्या होतात. उत्तर हिंदुस्थानपासून मल्ल येतात. रात्री झेंडा निघतो. प्रेक्षणीय दारूकाम होते व मिरवून झेंडा दर्ग्यात जातो.

हिंदु-मुस्लिम ऐक्य, भेदिक लावण्यांच्या स्पर्धा आणि कुस्त्यांची दंगल ही या उरसाची वैशिष्ट्ये वर्षानुवर्षे चालू आहेत. एकात्मतेचा पाठ देणारी संस्था म्हणून बारामतीत हे स्थान विलोभनीय आहे.

## रिमांड होम

रीजनल प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशनच्या विद्यमाने, रिमांड होम, बारामतीला इ. स. १९५० पासून चालविले जाते. रावबहादूर, श्री. गो. ग. शेंबेकर ऊर्फ दादासाहेब, हे पहिले अध्यक्ष होते. इ. स. १९५१ पासून श्री. द. स. करंदीकर अध्यक्ष; श्री. चिं. स. दाते चिटणीस, आणि श्री. मा. तु. शहा व श्री. गु. सा. ढवाण खजिनदार असे पदाधिकारी आहेत.

व्यवस्थापक मंडळावर नगरपालिकेचे प्रतिनिधी श्री. रा. के. रासकर हे आहेत आणि जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी म्हणून श्री. ह. रे. भंडारी ( सुपे ) हे आहेत.

बारामती, इंदापूर व दौंड या तीन तालुक्याचे क्षेत्र हे ह्या संस्थेचे कार्यक्षेत्र आहे. संस्थेचे उद्देश असे: ( १ ) अनाथ व बाल गुन्हेगार अशा १६ वर्षांचे आतील मुलांच्या विकासासाठी कार्य करणे; ( २ ) बॉम्बे चिल्ड्रेन्स ॲक्ट अन्वये लहान मुलावर देखरेख ठेवणे व त्यांच्या अडीअडचणींचा विचार करून त्यांना मार्गदर्शन करणे, ( ३ ) अल्पवयी मुले व बाल गुन्हेगार यांच्याकरिता कायद्यात तरतूद केल्याप्रमाणे जनमत तयार करणे, इत्यादि.

१ जुलै १९५२ पासून येथे बाल गुन्हेगारावरील खटल्यांच्या सुनावणीसाठी खास न्यायालय ( ज्युव्हेनाईल कोर्ट ) स्थापण्यात आले. न्याय खात्यातील न्यायाधिकारी यांच्या जोडीला सौ. पद्मा करंदीकर ह्या जोडीदार मॅजिस्ट्रेट म्हणून काम करीत असतात.

रिमांड होममध्ये येणाऱ्या मुलांमध्ये बाल गुन्हेगार व निराश्रित असे दोन वर्ग प्रामुख्याने असतात. अशा बालकांचे संगोपन आस्थेने व निष्ठापूर्वक केले जाते; त्यांना शिक्षण दिले जाते; व बुरुडकाम, सुतारकाम, शिवणकाम वगैरे धंदेशिक्षण दिले जाते.

या रिमांड होमचे वैशिष्ट्य म्हणजे, महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी इतक्या सोयींनी युक्त व प्रशस्त अशी इमारत नाही. साधारणपणे १५० मुलांची सोय होईल, अशी आखणी आहे. नेहमी ८० ते १०५ मुले असतात.

पहाटे ५ ते रात्री ९ पर्यंत मुलांच्या दैनंदिन कार्यक्रमाची आखणी केली आहे. त्यात प्रार्थना, साक्षरता, धंदेशिक्षण, बागकाम, करमणूक व खेळ इत्यादींचा समावेश आहे. दर रविवारी मुलासाठी ज्ञानेश्वरीवर प्रवचनाचा कार्यक्रम गेले काही दिवस आयोजित केला आहे.

रिमांड होमच्या तीन वर्षांपूर्वी बांधलेल्या इमारतीसाठी रु. १ लक्ष ३५ हजार खर्च झाला. त्यात सरकारचे अनुदान रु. ५०,०००।-, बारामती



नगरपालिकेचे अनुदान रु. ५०००, काही देणग्या व बाकीची रक्कम व्यवस्थापक मंडळाने नाटकांचे कार्यक्रम करून मिळविली. व्यवस्थापक मंडळाचे सभासद स्वतः भूमिका करून नाटके बसवितात; व इतर नागरिकांच्या सहकार्याने हे काम पुढे चालवितात.

रिमांड होमचा वार्षिक खर्च सुमारे ५२,००० रु. आहे. रिमांड व कॅपिटल चार्जेस, स्टाफग्रँट मिळून सुमारे ४० हजार रु. सरकारकडून अनुदान मिळते. बारामती नगरपालिका रु. ४०० व पुणे जिल्हा परिषद ५०१ असेही अनुदान मिळते.

सौ. शांता निसळ रीसर्च इन्व्हेस्टिगेटर पुणे, यांनी १५-९-१९६५ ला, संस्थेला भेट देऊन असा अभिप्राय व्यक्त केला की, " संस्थेची इमारत भव्य व प्रशस्त आहे. सगळीकडे स्वच्छता व टापटीप आढळली. मुले संस्थेशी समरस झाल्यासारखी दिसली. २ दिवसात मुलांचा दंगाधोपा अथवा बेशिस्त आढळली नाही. संस्थेतील बहुसंख्य मुले बाहेर शिक्षणाकरिता जातात व सायंकाळी परत येतात. यावरून त्याना संस्थेविषयी प्रेम असल्याचे दिसून येते. संस्थेच्या मॅनेजिंग कमेटीचे लोक अतिशय हौशी व ते संस्थेच्या कामात रस घेतात असे आढळून आले. "

श्री. मधुकर पु. मराठे, ऑडिटर पुणे यांनी संस्थेला दि. ६-७-१९६५ ला भेट देऊन असे म्हटले की, " दरवर्षी जमाखर्च तपासताना वेळोवेळी झालेली प्रगती निश्चित दिसून येते. आज प्रत्यक्षात कार्य पाहाण्याचा आनंद घेता आला."

## साने गुरुजी कथामाला

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ॥

केवळ लहान मुलांना एकत्र जमविणे, त्यांच्यातील सुप्त शक्तीचा विकास करणे, मनोरंजनाच्या माध्यमातून त्यांच्या मातीसारख्या आयुष्याला शक्य तितका सुबक आकार देणे. अशासारख्या कल्पना घेऊन चार लोक एकत्र आले आणि साने गुरुजी कथामालेची स्थापना १ ऑगस्ट १९५८ रोजी दाते भगिनींनी केली. आज सुमारे १५० मुलेमुली या कथामालेचा फायदा घेत आहेत.

कथामाला विनामूल्य आहे. आठवड्यातून एक दिवस सुट्टीच्या दिवशी कथा-निवेदक बोलावून मुलांच्या पुढे चांगल्या कथा मांडायचा हा उपक्रम दरवर्षी चालू असतो. त्याचप्रमाणे मुलांच्या अंगात धीटपणा बाणण्यासाठी त्यांच्या कथांना पण उत्तेजन द्यावयाचे असते. त्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, म्हणून छोट्या ग्रंथालयाची योजनाही केली आहे. जवळजवळ १२५ पुस्तके या ग्रंथालयात सध्या आहेत. त्याचप्रमाणे श्लोक, समरगीते, लोकनृत्ये वगैरे सांस्कृतिक विभाग कथामालेत शिकविला जातोच.

दरवर्षी कथामाला सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊन आपले अव्वल स्थान दाखवितेच. कलाविश्व हे कथामालेचे अविभाज्य अंग आहेच. आतापर्यंत कथामालेने 'बाल चिल्या', 'शिव तपोभंग', 'मीरा स्वप्न', 'भारताचे थोर सुपुत्र' वगैरेसारख्या उत्तम नृत्य-संगीतिका सादर करून पहिल्या नंबरची बक्षिसे मिळविली. त्याचप्रमाणे जिल्हा-जिल्ह्यातर्फे मुलांची शिबिरे होतात. त्यावेळेला बारामती कथामाला आपल्या मुलांना पाठवीत असते. मुलांनी आपल्या अंगच्या कला-गुणांच्या जोरावरच आपले वैशिष्ट्य शिबिरात दाखवावयाचे असते.

दरवर्षी वाढदिवसानिमित्त बालकासाठी कथामाला निरनिराळ्या स्पर्धा घेते. चित्रकला, कथा, संगीत, निबंध व स्मरणशक्ति अशा तऱ्हेच्या स्पर्धा घेण्यात येतात. यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे वाटताना सुद्धा दोन गटांची योजना केलेली असते. त्यामुळे जास्तीत जास्त मुलांना भाग घेता येऊन, जास्तीत जास्त स्पर्धकांना बक्षिसे मिळू शकतात.

परंतु ह्या सर्व गोष्टी करीत असताना, आर्थिक सहाय्याची जरूरी असते. कारण कथामाला विनामूल्य आहे. उगीच हात पसरावयाचे हे कथामालेला पसंत नाही. म्हणून कथामालेच्या संस्थापिका कु. प्रभा दाते यांनी " दिवस सोनियाचा " व " प्रेम लाभे प्रेमळाला" ही दोन नाटके लिहून कथामालेच्याच कार्यकर्त्याकडून सादर केली. त्यांमुळेच कथामालेची आर्थिक बाब भक्कम केली. ह्या नाटकांच्या जोरावरच कथामाला तरू शकली. कथामाला साने गुरुजी जयंती व वाढदिवस या निमित्ताने मुलांना खाऊ देते. ह्या सर्वच

बाबींचा प्रश्न मिटला. त्याचप्रमाणे हे वादादिवस साजरे होतात, त्यावेळेला नामवंत मंडळी अध्यक्ष म्हणून बोलावली जातात.

मध्यवर्ती कथामालेचे ८ वे वार्षिक अधिवेशन बारामतीला ता. २१ ते २३ मे १९६५ ला भरविण्याचे भाग्य मिळाले. तेव्हा शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी हे अध्यक्षस्थानी होते व उद्घाटक पद्मश्री श्री. पु. ल. देशपांडे होते. शिवाय नामवंत मंडळी उपस्थित होतीच. त्या अधिवेशनाला महाराष्ट्र, हैद्राबाद, गोवा वगैरे ठिकाणाहून सुमारे १६० प्रतिनिधी उपस्थित होते. त्या वेळी सांस्कृतिक कार्यक्रमात कथामालेच्या कार्यकर्त्यांनी पद्मश्री श्री. पु. ल. देशपांडेलिखित "सुंदर मी होणार" हे नाटक सादर केले. त्याचप्रमाणे बालक व प्रतिनिधी यानी पण आपली कला दाखविलीच.

बारामती कथामालेचे कार्यकारी मंडळ :—

श्री. कृ. ल. कोल्हटकर अध्यक्ष; श्री. धों. आ. सातव उपाध्यक्ष; श्री. व. मा. कोठारी खजिनदार; कु. कालिंदी दाते कार्यवाह; आणि सभासद; श्री. जिवराज मा. कोठारी; श्री. मोतीलाल तु. शहा; कु. उषा पां. दाते; श्री. य. शं. कानिटकर; श्री. रा. म. भोंगळे; श्री. भारत दोशी; श्री. शांताराम धोंडिबा ललगुणकर व श्री. अब्दुल गनी अत्तार.

## लायन्स क्लब, बारामती

लायन्स इंटर नॅशनलच्या भारतातील विभाग ३०४ पश्चिम १ यामधील एक पोट विभाग म्हणून बारामतीला लायन्स क्लबची स्थापना फेब्रुवारी १९६५ मध्ये झाली आहे. अध्यक्ष श्री. द. स. करंदीकर; सेक्रेटरी डॉ. मो. रा. शहा असे प्रारंभीचे पदाधिकारी आहेत. क्लबची सभासद संख्या ३० आहे.

क्लबची पाक्षिक सभा दर महिन्याचे पहिले व तिसरे मंगळवारी भरते.

गेल्या पावणे दोन वर्षातील क्लबचे प्रमुख असे काम म्हणजेः–१ ) गावातील सुमारे ६००० मुलाना पोलिओ प्रतिबंधक लस टोचण्यात आली; २ ) गतवर्षी दुष्काळाचे वेळी १३ कोरडवाहु गावात सहा महिने फुकट धान्य वाटले व त्याचवेळी ५० ठिकाणी मोफत दूध केंद्रे सुरू केली. ती आजतागायत सुरू आहेत. बारामती नगरपालिका, श्री छत्रपती शिवाजी सहकारी साखर कारखाना; माळेगाव सहकारी साखर कारखाना; तसेच माळेगाव, शिरवली, आंधुरणे वगैरे गावच्या ग्रामपंचायती दूध वाटण्याचे कामी क्लबला मदत करतात. ३ ) क्षयरोगनिवारण मोहिमेचे काम हाती घेतले असून, चिकित्सा करून देण्यासाठी 'क्ष' किरणाने फोटो घेण्याचे काम सुरू आहे. जानेवारीच्या प्रारंभापर्यंत सुमारे ३३०० लोकांची तपासणी झाली आहे.

## होमगार्ड्स्, बारामती

महाराष्ट्र राज्य होमगार्ड्सचे, म्हणजे गृहरक्षक दलाचे एक केंद्र बारामती येथें इ. स. १९४८ पासून आहे. कायदा व सुव्यवस्था टिकविण्याला मदत करणे, जनतेच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे, दंगलीसारखे प्रक्षोभक प्रकार झाले म्हणजे शांतताप्रस्थापनेच्या कामात मदत करणे, इत्यादि प्रकारे पोलिस दलाला, विशेष प्रसंगी, सहाय्य करण्याच्या उद्देशाने, होमगार्डस् दल, त्या वेळच्या मुंबई राज्याचे गृहमंत्री श्री. मुरारजी देसाई यांनी सुरू केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात नागरिकांना या दलाची कल्पना आकर्षक वाटली तर नवल नव्हे. बारामतीला हे केंद्र सुरू करण्याचे ठरले, तेव्हा १५० लोकांनी नावे नोंदविली. प्रत्यक्ष दाखल झाले फक्त ४० एकट्या बारामतीलाच हा अनुभव आला असे नाही.

होमगार्ड्सचे केंद्र बारामतीला सुरू झाले. तेव्हा श्री. एस्. व्ही. यादव हे प्रमुख, श्री. द. स. करंदीकर हे उपप्रमुख; आणि डॉ. नरवणे हे केंद्राचे मेडिकल ऑफिसर होते.

होमगार्डस् सैनिकांना कवायत, शस्त्र कवायत, मोटार ड्रायव्हिंग, आग विझविणे, प्रथमोपचार, इत्यादि प्रकारचे शिक्षण दिले जाते. होमगार्ड्सच्या कामाबाबत बदलत्या परिस्थितीनुसार कल्पना बदलत आहेत. चिनी आक्रमणाचे वेळी संरक्षणाची दुसरी



आघाडी असे या दलाचे स्वरूप झाले. तसेच विकासाची कामेही दल सैनिकांना सांगण्याच्या सूचना त्यावेळी केल्या होत्या. या कल्पनाही बारामतीने आत्मसात् केल्या आहेत. रेल्वे व पोस्ट खात्यातील कर्मचाऱ्यांच्या संपाचे वेळी, बारामती होमगार्ड्सनी नागरिकांची शक्य तितकी कमी गैरसोय होईल. यासाठी प्रयत्न केले. पानशेत धरण फुटले तेव्हा पुण्याच्या पोलिसांना बारामतीच्या होमगार्ड्सनी ८ दिवस मदत केली. पुण्यातील दंगलीचे वेळी पुण्यातल्या होमगार्डस्ना बारामतीच्या होमगार्ड्स्नी सहाय्य केले.

काही होमगार्डस्ना मुंबई येथील मध्यवर्ती होमगार्डस् केंद्रांत शिक्षण घेण्याची संधि मिळाली आहे. बारामती शहराबाहेर खेड्यातही उपकेंद्रे उघडली आहेत. ५०० लोकानी या दलात नावे नोंदविली. आहेत. बारामती शहराला नागरी संरक्षण योजना लागू झाली आहे. ७५० सैनिक संपूर्ण शिक्षण देऊन तयार करण्याचा संकल्प आहे. पुणे जिल्ह्यांत उत्तम होमगार्ड्स् केंद्र म्हणून बारामतीचा लौकिक झालेला आहे. इ. स. १९६६ मध्ये पुण्याला जिल्हा शिबिर झाले. तेव्हा माननीय मंत्री श्री. राजाराम बापू पाटील यांचे हस्ते बारामती होमगार्ड केंद्राला 'सर्व जिल्ह्यात उत्तम केंद्र' म्हणून रौप्य–करंडक मिळाला आहे.

बारामती होमगार्ड सैनिकांच्या सहली वेळोवेळी निघाल्या आहेत. म्हैसूर, कोयनानगर, गोवे, महाबळेश्वर इत्यादि ठिकाणी त्यांची सहल गेली आहे. श्री. जिवराज माणिकचंद कोठारी हे इ. स. १९५७ पासून बारामती केंद्राचे प्रमुख आहेत. श्री. एम्. टी. शहा यांची सीनियर प्लॅटून ऑफिसर म्हणून आणि डॉ. एच्. जी. जोशी. व डॉ. व्ही. एम्. कोठारी यांची मेडिकल ऑफिसर म्हणून मदत होते. श्री. जि. मा. कोठारी हे लहानपणापासून स्वयंसेवक वृत्तीने वागत आले आहेत. स्वातंत्र्य आंदोलनात ते एक सैनिक होते.

या संस्कारामुळे श्री. कोठारी यांनी बारामती होमगार्ड केंद्रप्रमुख–पदाविषयी लोकमानसात विशेष आदराचे स्थान निर्माण केले आहे. पुणे जिल्हा होमगार्डप्रमुख श्री. एम्. एन. संगमनेरकर यांचे बारामती केंद्राला वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळत असते.

# शेती, व्यापार व उद्योगधंदे : काल, आज व उद्या

## दि ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमेटी

बारामती गाव गूळ व कापूस या शेतीमालाचे व्यापाराबाबत बऱ्याच वर्षांपासून प्रसिद्ध आहे. सन १९२४ चे सुमारास या बाजारपेठेत कापूस विक्रीस येण्यास प्रारंभ झाला. वस्तुतः कापसाची लागवड पूर्वी नीरा लेफ्ट बँक कॅनॉलवर व विहिरीवर होत असे. कापसाचे पीक जसजसे या भागात वाढू लागले, तसतसे इतर ठिकाणचे व्यापारी इकडे येऊन जीन प्रेस घालू लागले. ही सोय झाल्यामुळे इतर ठिकाणचे व्यापारी व कंपन्या कापूस खरेदी करण्यास येऊ लागल्या. खरेदीदार वाढल्यामुळे कापूस मालधन्यास त्यांचे कापसास चांगला भाव मिळू लागला. परंतु त्याचा व्हावा असा फायदा उत्पादकाला झाला नाही. शेतकऱ्यांच्या मालावर आकारण्यात येत असणारी धर्मादाय, पांजरपोळ, बाजार कसर, असोसिएशन फंडाबद्दल रोख रक्कम सूट अगर कडता यासारखे खर्च हिशेबातून कापून घेतले जात असत. मालाच्या वजनाचीही हमी मिळत नव्हती. त्या दृष्टीने शेतकऱ्यास योग्य भाव व योग्य माप मिळावे म्हणून सन १९२७ च्या दि बाँबे. कॉटन मार्केटस् ॲक्टअन्वये "कॉटन मार्केट कमिटी, बारामती" या संस्थेची स्थापना सन १९३५ साली झाली. या कमिटीची अंमलबजावणी १ सप्टेंबर १९३६ पासून सुरू झाली.

सदर संस्था स्थापन करण्यामध्ये कै. रा. ब. सोपानराव तुकाराम जाचक आणि कै. स. बा. करंदीकर, वकील या दोघांचा सिंहाचा वाटा होता हे येथे नमूद करणे अत्यंत जरूरीचे आहे. सध्या अस्तित्वात असलेली दि ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटी, बारामती ही संस्था त्यांच्या आत्यंतिक परिश्रमांचे द्योतकच समजले पाहिजे. अशा प्रकारे प्रथमतःच सरकारी कायद्याखाली स्थापन झालेल्या कॉटन मार्केट कमिटीचे चेअरमन कै. सदाशिव वासुदेव करंदीकर हे होते. त्या कायद्यान्वये कमिटीमध्ये शेतकरी प्रतिनिधी सहा, व्यापारी प्रतिनिधी तीन, स्थानिक संस्थांतर्फे प्रतिनिधी दोन व सरकारतर्फे प्रतिनिधी एक, याप्रमाणे बारा सदस्यांची नियुक्ती केली जात असे. याव्यतिरिक्त मे. मामलेदारसाहेब भिमथडी (बारामती) हे सुपरवायाझिंग ऑफिसर म्हणून कमिटीस मार्गदर्शन करीत असत. कमिटीचे सुपरिंटेंडेंट म्हणून कै. गजानन भिमराव देशपांडे यांनी सन १९४५ पर्यंत काम पाहिले.

यानंतर सन १९३९ चा दि बॉम्बे ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केटस ॲक्ट हा कायदा प्रस्थापित झाला. त्यानुसार सन १९४२ साली पूर्वीच्या कॉटन मार्केट कमिटीचे "दि बारामती ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटी" असे रूपांतर झाले. प्रथमतः या कायद्याखाली फक्त कापूस नियमनाखाली आणला गेला. परंतु युद्धजन्य परिस्थितीमुळे आणि सरकारच्या 'अधिक धान्य पिकवा' या मोहिमेमुळे कापसाची आवक अगदीच खालावली आणि सन १९४५ पासून मार्केट कमिटीचे कामकाज स्थगित करण्यात आले. तदनंतर तारीख २३-३-१९४८ रोजी सरकारी गॅझेटद्वारा, बारामती तालुक्यातील नीरेजवळील १६ गावे वगळून बाकी तालुक्यास गुळास मार्केट ॲक्ट लागू करण्यात आला. मार्केट कमेटीचे प्रत्यक्ष कामकाज १ डिसेंबर १९५१ रोजी पुनश्च सुरू झाले. त्यावेळी जुनी कमिटी नॉमिनेट करून कामकाजास प्रारंभ झाला. त्या कमिटीने सप्टेंबर १९५२ पर्यंत मार्केटचे कामकाज पाहिले. त्या कमेटीचे चेअरमन कै. व्यंकटराव गणपतराव तावरे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामकाजाची नोंद येथे करणे उचित होय.





सप्टेंबर १९५२ मध्ये मार्केट कमिटीची निवडणूक होऊन नवीन मार्केट कमिटीने कामकाज पहाण्यास सुरुवात केली.

पुढे ता. २४-३-१९५५ पासून ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा, तूर, करडी, कांदे व भुईमूग शेंगा या वस्तु मार्केट कायद्यान्वये नियमनाखाली आणल्या गेल्या. तारीख १-९-१९५६ पासून जनावरे, शेळ्या; मेंढ्या, मोसंबी, वैरण, तांदूळ, साळ व एरंडी या वस्तूंचे प्रत्यक्ष नियमन सुरू झाले.

सुरुवातीस कमिटीचे कार्यालय कामकाजाकरिता येथील प्रसिद्ध व्यापारी कै. रंगो नारायणदास गुजर यांचे खाजगी इमारतीत होते. कामकाजाचा व्याप व व्याप्ती लक्षात घेऊन कॉटन मार्केट कमिटीने बारामती नगरपालिकेकडून बारामती येथील स. नं. ३५१ मधील साडेचार एकर जागा भाड्याने घेतली व त्यावर स्वतःचे मालकीचे कार्यालय बांधले. याच जागेत सध्या मार्केट कमिटीने नियमन केलेल्या वस्तूंचा व्यवहार होत आहे. याव्यतिरिक्त सरकारकडून मार्केट कमिटीस बारामती येथील स. नं. १५ मधील सुमारे वीस एकर जागा मार्केट यार्डाकरिता मोफत मिळाली आहे. या जागेत नवीन मार्केट यार्ड प्रस्थापित करण्याचे दृष्टीने हालचाल सुरू करण्यात आली आहे. या मार्केट यार्डचे हाती घ्यावयात येणाऱ्या विकासाच्या कामात ऑफिस इमारत, शेतकरी निवास, सेल्स हॉल, पाण्याची व्यवस्था, दिवे, जनावरांचे निवाऱ्याची जागा वगैरे बाबींचा प्रामुख्याने समावेश राहील.

मार्केट कायद्यान्वये कमिटीची निवडणूक दर तीन वर्षांनी होत असते. कमिटीचे चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची निवड प्रतिवर्षी होत असते. सध्या अस्तित्वात असलेल्या कमिटीची निवडणूक २७ जून १९६० रोजी होऊन ता. १४-१२-१९६० पासून ही कमिटी कामकाज पहात आहे. सध्याचे चेअरमन श्री. माणिकलाल रूपचंद शाह, व्यापारी प्रतिनिधी व व्हाईस चेअरमन श्री. धोंडिराम गेनबा गायकवाड शेतकरी प्रतिनिधी, हे या कमिटीचे काम पहात आहेत. याव्यतिरिक्त बांधा सब-कमिटीची नियुक्ती करण्यात आली असून तिचे चेअरमन श्री. जे. एन्. ढोले हे आहेत. तसेच ग्रेडिंग स्कीमबाबतही मार्केट कमिटीचे सदस्य व संबंधित बाहेरील व्यापारी यांची संयुक्त समिती स्थापन केलेली आहे.

या मार्केटमध्ये नियमन केलेल्या वस्तूंची अंदाजी आवक खालीलप्रमाणे होत असते :

| माल | वर्षाला |
|---|---|
| (१) गूळ— | ५,००,००० भेली |
| (२) कापूस— | २,००,००० पोती |
| (३) बाजरी— | १०,००० पोती |
| (४) गहू— | १०,००० पोती |
| (५) हरभरा— | ५,००० पोती |
| (६) तूर— | ४,००० पोती |
| (७) करडी— | ४,००० पोती |
| (८) कांदे— | १२,००० पोती |
| (९) भुईमूग शेंग— | ४,००० पोती |

याव्यतिरिक्त जनावरांचे दर बाजारी ६०० ते १००० मोठी जनावरे विक्रीस येतात; मात्र विक्री ४० टक्क्यापर्यंत होते. तसेच शेळ्या-मेंढ्यांची दर बाजारी आवक ५०० ते ६०० होत असून विक्री ९० टक्क्यापर्यंत होते. सरकारने एकाधिकार पद्धतीने ज्वारी खरेदी करण्याच्यापूर्वी या मार्केटमध्ये प्रतिवर्षी ३५,००० पोत्यापर्यंत ज्वारीची आवक होत असे. मात्र हाती आलेल्या माहितीनुसार या योजनेनंतर सन १९६४-६५ साली ज्वारी पोती १५४२ व सन १९६५-६६ साली ज्वारी ४७९१ अशी आवक राहिल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. इकडील परिसरात सणसर, माळेगाव व सोमेश्वर या तीन ठिकाणी सहकारी साखर कारखाने निघाल्याने गूळ आवकेवर त्याचा बराच परिणाम झाला. यापूर्वी गूळ दरवर्षी अंदाजे १५,००,००० भेलींची आवक होत असे. अशा प्रकारे या मार्केटमध्ये दरवर्षी २ ते २॥ कोटी रुपयांची उलाढाल होत असते.

सध्या मार्केट यार्डवर दर सोमवार व गुरुवार हे दोन दिवस सर्व भुसार, बी-बियाणे, कांदे, भुईमूग शेंग या मालाचा बाजार भरत असतो. तसेच गुरुवार हा बाजारचा दिवस असल्याने या दिवशी मार्केट

यार्डावर जनावरे व शेळ्यामेंढ्यांचाही बाजार भरतो. सध्याचे यार्ड अपुरे असल्याने व तितकीशी सोय नसल्याने फक्त गुळाचे लिलाव जनरल कामिशन्स एजंटस् व व्यापारी यांचे गावातील खाजगी कोठ्यात केले जातात. फक्त मंगळवारी गुळाचा लिलाव यार्डावर होतो. कापसाचा लिलाव हंगामात यार्डावरच केला जातो. जनावरे व शेळ्यामेंढ्या या वस्तु सोडून बाकी नियमन केलेल्या वस्तूंचा खरेदी–विक्रीचा व्यवहार उघड लिलावाने होतो. नियमाप्रमाणे ज्या त्या सौद्याची कबुलायत होऊन मार्केट कमिटीचे लायसेन्सदार मापाड्याकडून मालाचा तोल होतो. लायसेन्सदार मापाडी हे टर्नस् पद्धतीने काम करीत असल्याने कोणत्याही जनरल कामिशन एजंटाकडे त्याची मक्तेदारी ठेवली जात नाही. अशा प्रकारे तोल झाल्यावर तोल–पट्टीची एक प्रत शेतकऱ्यास मिळून त्यास आपल्या मालाचे वजन समजते. नंतर त्यास जनरल कमिशन एजंटाकडून हिशेब पट्टी मिळते व त्यात मार्केट कमिटीने ठरवून दिलेल्या खर्चांच्या दरांचा समावेश असतो. मार्केट कायद्यामुळे इतर खर्चांच्या बाबींना अशा प्रकारे फाटा मिळाला आहे. यामुळे चोख वजन व योग्य भावाने बरोबर हिशेबपट्टी ही शेतकऱ्यांना मिळून त्याचा फारच मोठा फायदा या वर्गास मिळाला आहे. मालामध्ये हलक्या प्रतीचा माल भेसळ झाल्याने अगर अशाच कारणास्तव काही वांधे निर्माण झाल्यास ते मार्केट कमिटीचे सेक्रेटरी-कडून योग्य दरात मिटविले जातात. मात्र असे वांधे मालाचे वजन कमी करून मिळविले जात नाहीत. सेक्रेटरी यांचा निर्णय मान्य न झाल्यास प्रसंगोचित वांधे, वांधा सब-कमिटीकडे सोपविले जातात. कोणत्याही प्रकारची व्यापारी सूट देण्याची प्रथा बंद झालेली आहे, ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

बाजारातील संक्षिप्त समालोचनाचे साप्ताहिक माहिती तक्ते इकॉनॉमिक व स्टॅटिस्टिकल अॅडव्हायजर मध्यवर्ती सरकार, नवी दिल्ली व मार्केटिंग रिसर्च ऑफिसरसाहेब, मुंबई यांना तसेच माहिती पत्रके वरिष्ठ खात्याकडे पाठविली जात असतात. तसेच गूळ, कापूस, बाजरी, गहू, हरभरा, तूर, करडी, कांदे, भुईमूग शेंगा, जनावरे व शेळ्यामेंढ्या यांचे बाजारभाव रोज सकाळी ११ वाजता तारेने मुंबईस मार्केटिंग रिसर्च ऑफिसरसाहेब यांना पाठविले जातात. मग ते आकाशवाणीचे मुंबई केंद्रावरून दररोज ध्वनिक्षेपित केले जातात. तसेच मुंबई केंद्रावरून प्रसारित होणारे मुंबई येथील व परपेठातील बाजारभाव यांची नोंद दररोज मार्केट रजिस्टरला होऊन ते मार्केट कमिटीचे भाव फलकावर प्रसिद्ध केले जातात. तसेच यासंबंधाने अगर विशेष उपलब्ध माहिती मार्केट कमिटीचे स्वतःचे मालकीचे लाउड स्पीकरवरून प्रसारित करण्यात येते. केवळ या मार्केट कमिटी-सारख्या माध्यमामुळे सरकारला, शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांनाही उपयुक्त माहिती मिळून त्यांचा फायदा होतो.

या मार्केट कमिटीची मुख्यत्वेकरून ज्वारी, हरभरा व तूर या वस्तूकरिता ग्रेडिंग सेंटर म्हणून नियुक्ती झाली आहे. प्रतवारीचे कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात ता. २३–३–१९६४ पासून झाली. प्रतवारीचे कामी लागणारी सर्व उपकरणे व साहित्य खात्याकडून या कमिटीस मोफत मिळाली आहेत. सरकारने या कामी एका सुविद्य ग्रेडरची नेमणूक केलेली आहे. तसेच निर्माण होणाऱ्या अडीअडचणी निवारण करण्या-करिता एक कमिटी नियुक्त केल्याचे वर नमूद केले आहेच. प्रतवारी पद्धतीमुळे लिलावातील वेळेची बचत होते. शिवाय आपला माल प्रतवार विकल्याने त्यांचा शेतकऱ्यांना फायदा मिळत असल्याचे दृष्टो-त्पत्तीस आले आहे.

सध्या ७६ व्यापारी, ५७ जनरल कमिशन एजं-टस, १५ मापाडी व जनावरांच्या बाजारातील २३ दलाल लायसेन्स घेऊन धंदा करतात. अशा रीतीने सन १९६५–६६ साली मार्केट कमिटीस लायसेन्स फी रु. १४,३७०।–, मार्केट फी रु. ३९,१७३।– व इतर उत्पन्न रु. ११,२२०।– याप्रमाणे रु.६४,७६३ चे एकूण उत्पन्न झाले. त्याच साली एकूण खर्च रु. ५८,८१८।– होऊन वाढावा रु. ५,९४५।– असा राहिला. या कमिटीचा कायम निधी केंटचे १–८–६६ अखेर रु. २,२५,१७७।– असा आहे.

या कमिटीने नवीन मार्केट यार्डवरील विकासाचे कामी रु. १,५०,०००।– चे कर्ज सन १९५८ मध्ये सरकारकडून मिळविले. मार्केट यार्डच्या जागेचा प्रश्न लवकर न सुटल्याने या कर्जापैकी रु. ८०,०००।– ची रक्कम सरकारकडे सव्याज परत करण्यात आली आहे. आता लवकरच बारामती येथील इंदापूर टोल नाक्याच्या पलीकडे असलेल्या स. नं. १५ मधील जागेत मार्केट यार्ड न्यावयाचे असल्याने त्यावरील विकासाचे कामी सरकारचे उर्वरित रकमेचा उपयोग केला जाणार आहे.

मार्केट कमिटीचा आजपर्यंतचा एकूण आढावा पहाता ही कमिटी कामकाजाच्या दृष्टीने बरीच प्रगत-शील असल्याचे दिसून येते. ज्या हेतूने सरकारने मार्केट कायदा प्रस्थापित केला ते उद्दिष्ट या कमिटीने संपूर्ण-तया सफल केले असून शेतकरी व व्यापारी यांना सम-तोल न्यायाने वागणूक दिली जाते. या कामी माजी चिटणीस श्री. सी. बी. इंदुले व सध्याचे सेक्रेटरी श्री. पुष्पसेन विठ्ठल गोरे यांचे जे बहुमोल मार्गदर्शन होते त्याबद्दल या भागातील व्यापारी व शेतकरी बंधु वाखाणणी करतात.

## नीरा कॅनॉल्स सोसायटच्या खरेदी–विक्री संघ

नीरा कॅनाल्स सोसायट्यांचा सहकारी खरेदी-विक्री-संघ लि. ही संस्था ४० वर्षांपूर्वी सुरू झाली. सहकारी क्षेत्रातील ती एक अग्रेसर संस्था मानली जाते. सहकारी क्षेत्रात बारामतीचे नाव सर्वतोमुखी होण्यास या संस्थेचा कारभार हे एक मुख्य कारण आहे.

मुंबईतील एक थोर व्यापारी व प्रागतिक बँकर सर लल्लूभाई सामळदास यांच्या नेतृत्वाखाली मुंबईला बॉम्बे स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि. ही संस्था सुरू झाली; आणि त्या बँकेने पुढाकार घेतल्यामुळेच बारामतीला सहकारी कामाचे लोण आले असे म्हणावयाला हरकत नाही. सर लल्लूभाई यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. वैकुंठलाल मेहता यांनी सदर बँकेचे नेतृत्व एक तपापेक्षा जास्त काळ केले. सदर बँकेची बारामती शाखा ही ३०।३५ शाखात सर्वश्रेष्ठ अशी होती, हे सर्वमान्य आहे.

सर लल्लूभाई यांनी श्री. काशीनाथ गोविंद नवरे शिव मुंबई आदि व्यापाऱ्यांच्या सहकाऱ्याने नीरा व्हॅली शुगर कंपनी लि. स्थापून माळेगावनजीक साखरेचा कारखाना काढला होता. हेही बारामतीचा बागायतदार कधीही विसरू शकणार नाही. ह्या साखरेच्या कारखान्याला बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेने सर्व प्रकारची मदत केली होती.

बॉंबे को-ऑपरेटिव्ह बँकेने सहकारी क्षेत्रात मशागतीचे काम या भागात केले आहे. कॅनालच्या पाण्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे दैन्य आस्ते आस्ते दूर होऊ लागले होते. त्याला सहकारी चळवळीची मदत देण्याचे प्रयत्न त्या बँकेने केले. त्यासाठी शेती मालाच्या विक्रीचे एक अडत दुकानही बँक चालवीत असे. खरेदी–विक्रीचे काम हे काही बँकेचे कायमचे व नित्याचे काम नव्हे. ते काम सहकारी पायावर भर-भक्कम उभे राहिले पाहिजे, म्हणून सदर बँकेचे संचालक श्री. वैकुंठलाल मेहता यांनी हा खरेदी–विक्रीसंघ काढण्याच्या कल्पनेला प्रोत्साहन दिले. माळेगावचे प्रगतिशील जहागिरदार राजे शंभूसिंग अमरसिंह जाधव, निंबुतचे श्री. सोपानराव बगाराम काकडे देशमुख, सणसरचे रावबहादुर सोपानराव तुकाराम जाचक इत्यादि व्यक्तींच्या मनात ही कल्पना आली आणि सर्वांनी मिळून ता. २७।१०।१९२६ ला नीरा कॅनाल्स् सोसायट्यांचा सहकारी खरेदी–विक्री संघ स्थापन केला.

उपरिनिर्दिष्ट थोर कार्यकर्त्यांच्या जोडीला पुढील व्यक्ती ही ह्या संस्थेच्या प्रवर्तक होत्याः–श्री. दिनकरराव चिमणाजीराव निंबाळकर सणसर, श्री. कृष्णराव खाशेराव काकडे इनामदार, श्री. तात्याबा कृष्णा झारगड इत्यादि एकूण प्रवर्तक १९ होते. हा संघ जन्मास आल्यावर बॉंबे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेने आपले अडत दुकान बंद करून सर्व चालू गाडा ह्या संघाचे स्वाधीन केला. तेव्हा बँकेचे चालक श्री. वैकुंठलाल मेहता यांना अत्यंत आपुलकीने अपत्यवत् प्रेमाने, संघाचा व बँकेचा व्यवहार पुरा केला.

खरेदी-विक्री संघ स्थापन झाला तेव्हा २६ सोसायट्या संघाच्या सभासद झाल्या व त्यांनी रु. ३३५९०।– इतके भाग भांडवल जमविले होते.

इ. स. १९३० पर्यंत ते रु. ९३७०० झाले होते. संघाचे सभासदत्व फक्त सोसायट्यांपुरते मर्यादित आहे. म्हणजेच व्यक्ति संघाची सभासद होऊ शकत नाही. मात्र खरेदी–विक्रीच्या व्यवहाराकरिता व्यक्तीला 'ब' वर्गाचा सभासद करून घेण्याची तरतूद घटनेत आहे. ता. ३०–६–१९६६ अखेर सभासद सोसायट्यांची संख्या १०९ आहे; 'ब' वर्ग सभासद संख्या ५२५८ आहे; आणि राज्य सरकारही एक भागीदार सभासद आहे. याच मुदतीचे अखेरीस संघाचे अधिकृत भाग भांडवल रु. १०,००,००० चे असून वसूल झालेले सोसायट्यांचे भांडवल रु. २, ५१, ७०० आणि सरकारचे रु. ४, ५०,००० आहे.

संघात सामील झालेल्या सोसायट्यांच्या सभासदांना शेतीकरिता लागणारे खत, पेंड, सल्फेट मिश्रण इत्यादि सुधारलेली खते, उत्तम बी–बियाणे पुरविणे, तसेच आधुनिक पद्धतीची यंत्रे विकत अगर भाड्याने देणे आणि त्या सभासदांचे शेतीत तयार होणाऱ्या सर्व शेत मालाची विक्री किफायतशीर बाजार भावाने करून देणे असा उद्देश संघाचा आहे. स्थूलमानाने सभासदांच्या गरजेप्रमाणे संघ विविध कामे हाती घेत आहे.

संघाचे कार्यक्षेत्रही बरेच विस्तृत आहे. नावातील 'नीरा कॅनाल' ही पहिली दोन अक्षरे त्याची द्योतक आहेत. म्हणजे बारामती तालुक्यातील सर्व सोसायट्या यात येऊ शकतात. त्याच बरोबर नीरा कॅनालचे पाण्याखाली भिजणाऱ्या इतर तालुक्यातल्या गावातील सोसायट्याही यात समाविष्ट आहेत. इतर महसुली तालुके म्हणजे इंदापूर, फलटण व माळशिरस हे होत.

इ. स. १९६४–६५ चे वर्षअखेरीस या संघास निव्वळ नफा रु. ३,१४,५८१ झाला. संघाच्या इ. स. १९६४–६५ च्या अहवालात म्हटले आहे की, संघाने शेतकऱ्याचे शेतीत तयार होणारा माल गूळ, कापूस, भुसार, कांदा, पेंड, मिश्र खते, रासायनिक खते बी–बियाणे, सरकी, बी, औषधे, आईल एंजिन्स, पंपिंग सेटस् इत्यादि मालाचा पुरवठा केला. जनतेच्या सोयी साठी स्वस्त धान्याची दुकाने बारामती येथे २, नीरा येथे २ व सोमेश्वर साखर कारखाना येथे १ अशी चालविली आहेत. सरकारच्या आदेशानुसार 'राज्य मार्केटिंग सोसायटी, मुंबई यांच्या वतीने ज्वारी खरेदीचे काम संघ करीत आहे. मध्यंतरी पाऊस नसल्यामुळे जनावरांना चारा मिळणार नाही, अशी चिन्हे दिसताच संघाने चारा आणून ठेवला होता. मग पाऊस आल्याने चाऱ्याचा उपयोग करावा लागला नाही. लिफ्ट इरिगेशनच्या योजनांनाही संघ मदत करीत आहे. बारामती तालुक्यात साखर वाटपाचे कामही सरकारने संघाकडे दिलेले आहे.

या भागात कापसाचे उत्पादन वाढत आहे, हे लक्षात घेऊन जिनिंग प्रेस उभारण्याचे काम संघाने हाती घेतले आहे. त्यासही राज्य सरकारने जागा दिली आहे. ती 'बिन शेती' वापराची करण्याचे काम सुरू आहे. यंत्र खरेदीचा करार झाला असून इ. स. १९६७ च्या मध्यापर्यंत यंत्र उभारणी होईल, अशी कार्यकर्त्यांना उमेद वाटते.

शेतमालाचा साठा करता यावा, म्हणून संघाने २५०×८० फूट या आकाराची एक मोठी वखार (गोडाऊन) बांधली आहे. तीत सुमारे २ लक्ष पोती राहतील अशी सोय आहे, तीन लक्ष रुपये यासाठी खर्च झाले. राज्य सरकारने या कामी आर्थिक मदत केलेली आहे. ही वखार सर्व राज्यातली एक मोठी वखार असे म्हणता येईल.

सरकारी तपासणीत संघाला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे.

या संस्थेचे सुमारे १०–११ लक्ष रुपये भांडवल शेतकऱ्यांच्याकडे एकेकाळी गुंतून पडले होते. हा पैसा कसा वसूल करावा असा बिकट प्रश्न संस्थेपुढे होता. संघाने काही शेतकऱ्यांच्या जामिनी लागवडीसाठी स्वतः घेऊन, पीक उत्पादनातून २–३ वर्षांत त्या शेतकऱ्याना कर्जमुक्त केले व जामिनी त्यांच्या त्यांना परत दिल्या. कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांची मालमत्ता विक्रीस काढण्याचे संघाने आतापर्यंत टाळलेले आहे.

किर्लोस्करांची इंजिने व पंप विक्रीची एजन्सीही तालुक्यापुरती संघाला मिळाली आहे.

चालू वर्षी श्री. मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख हे संघाचे चेअरमन असून श्री. साहेबराव खंडेराव हंडे



देशमुख हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. गुलाबराव मारुतराव रणवरे हे सेक्रेटरी आहेत.

## दि बारामती सहकारी औद्योगिक वसाहत

दि बारामती सहकारी औद्योगिक वसाहत (मर्यादित) बारामती या संस्थेची स्थापना १९६२ साली होऊन ती ४ मार्च १९६३ साली रजिस्टर झालेली आहे. या संस्थेस नुकतीच दिनांक ३१।८।६६ रोजी सरकारकडून जळोची हद्दीतील स. नं. १३१ पैकी ३१ एकर २५ गुंठे जागा मिळालेली आहे. सदर जागेत लवकरच औद्योगिक वसाहतीच्या विकासाचे काम सुरू होणार आहे.

संस्थेचे एकूण भागधारक १०० असून प्रत्येकी भाग ५००|– चा आहे. अशा रीतीने संस्थेचे भाग भांडवल रु. ५०, ००० आहे. संस्थेच्या भाग भांडवला-इतकेच भाग–भांडवल सरकारकडून मिळणार आहे. संस्थेचे सध्याचे चेअरमन श्री. मा. तु. शाह हे असून श्री. खु. र. छाजेड हे ऑफिस सेक्रेटरी आहेत.

संस्थेचे प्रत्यक्षात काम सुरू झाले म्हणजे बारामती शहराची औद्योगिक दृष्ट्या भरभराट होण्याला अधिक चालना मिळेल, यात शंका नाही.

## बारामती मर्चंटस् असोसिएशन

बारामती भागात नीरा कॅनालचा डावा फाटा आल्यापासून येथील व्यापारी पेठेचे महत्त्व वाढले. प्रामुख्याने गूळ, भुसार व कापूस यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात सुरू झाला. व्यापार वाढल्यामुळे बाहेरगावाहूनही बऱ्याच व्यापारी पेढ्या येऊन स्थायिक व बाहेर गावच्या मिळून सुमारे शंभर व्यापारी पेढ्या चालू झाल्या. व्यापाऱ्यामध्ये संघटना असावी असा विचार व्यापारी लोकात घोळू लागल्या-पासून व्यापारी लोकातील आपसातील वाद मिटविण्याकरिता तात्कालिक कारणानुसार सभा होऊ लागल्या; व त्यास कायम स्वरूप देण्याचे दृष्टीने सन १९४२ चे सुमारास दि बारामती मर्चंट्स् असोसिएशन संस्थेची स्थापना झाली.

व्यापारी वर्गातील आपसातलि तंट्यांचे निकाल करणे, रेल्वे स्टेशनवरून माल रवाना करण्याच्या बाबतीत रेल्वे अधिकाऱ्यांशी वाटाघाटी करून माल रवानगीचे बाबतीत जास्तीत जास्त सवलती मिळविणे, विक्रीकर, अन्नधान्य नियंत्रणे, सावकारी नियंत्रण, किमान वेतन कायदा नियंत्रण, भेसळ-प्रतिबंधक कायदा, याबाबत सरकारी अधिकारी व व्यापारी वर्ग यामध्ये दुवा निर्माण करणे म्हणजेच कायदा व व्यवहार यांची सांगड घालणे. अशा प्रकारची कामे या संस्थेने यशस्वीरीत्या केलेली आहेत.

त्याचप्रमाणे व्यापारात पूर्वापार चालत आलेल्या रूढीप्रमाणे शेतकऱ्यास माल विक्रीच्या पट्ट्या देताना बाजारकर, धर्मादाय, बटाव, कढता वगैरे नावाखाली जे खर्च कापले जात असत, ते दि ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट ॲक्ट अस्तित्वात येण्यापूर्वीच असोसिएशनने बारामती पेठेत बंद केले.

अन्नदुर्भिक्ष्याचे वेळी विशेषतः या तालुक्यात जे दोनतीन मोठे दुष्काळ पडले, त्यावेळी सरकारच्या पाठीशी उभे राहून, प्रसंगी भरपूर नुकसान सोसूनही, जनतेला स्वस्त धान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणात केला.

अखिल महाराष्ट्रातील व्यापारात एकोपा निर्माण करण्याकरिता इ. स. १९५६ मध्ये महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांची एक परिषद असोसिएशनमार्फत बारामती येथे भरविण्यात आली होती.

## मेघ स्लेट फॅक्टरी

मेघ स्लेट फॅक्टरी प्रा. लि. ही संस्था सन १९२४ साली स्थापन झाली. संस्थापक कै. शंकर लालजी यांचे वाडिलांचा धंदा व्यापार, परंतु लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या स्वदेशी चळवळीत भाग घेऊन "आधि केले व मग सांगितले" या उक्तीप्रमाणे

मूळचा धंदा सोडून कारखाना उघडावा व परदेशातील आयात थांबवावी, म्हणून प्रत्येक घरात कोणती वस्तू लागते हा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्याप्रमाणे "शंकर सोप" या नावाने साबण कारखाना सन १९२२ मध्ये त्यांनी काढला. त्यावेळी साबणाचा वापर आताच्या मानाने खूपच कमी असल्याने तो बंद करून 'अभंग' पाटी तयार करण्यास त्यांनी इ. स. १९२४ साली सुरुवात केली.

सदरचा पाटी कारखाना जेमतेम तीन वर्षे चालू होता. सरकार परकीय असल्याने प्रोत्साहन तर राहू द्याच, पण चालू असलेला कारखाना बंद कसा होईल, ह्याचीच परकीयांना चिंता असावयाची. त्याचवेळी जागतिक मंदी आल्याने हाही कारखाना बंद करावा लागला. त्यांच्या मालाच्या बाबतीत जागतिक कीर्तीचे सर विश्वेश्वर अय्या, श्री. न. चिं. केळकर वगैरे लोकांनी प्रशंसोद्गार काढलेले होते. सरकारी धोरण व जागतिक मंदी यामुळे तो कारखाना बंद ठेवावा लागला.

स्वस्थ बसता येत नसल्याने गावातील ४ मित्रमंडळी जमवून, बारामतीसारख्या तालुक्याच्या गावी, त्यावेळी म्हणजे सन १९२७ ते सन १९२९ सालात त्यांनी 'सिनेमा कंपनी' काढली, आणि एक चलत् चित्रपटही तयार केला. चित्रपट सेन्सॉर झाल्यानंतर ४–८ दिवसातच बोलपट–चित्र निघाले; व सिनेमा कंपनी नुकसानीमुळे बंद ठेवावी लागली.

पदरचे पैसे खर्च केले व दोन चार धंद्यातले अपयश पदरी पडले. मूळचा धंदा सोडून नवीन कारखानीपेशा पत्करल्यामुळे समाजात, गावात, नातलगात एवढेच नव्हे तर घरातही कै. शंकर लालजीबद्दल कुजबुज सुरू झाली!! सन १९३० मध्ये पत्र्याच्या पाट्यावरील रंग, कापडी फळ्यावर बसविण्याचा प्रयत्न त्यांनी केला व ते यशस्वी झाले. तेथूनच मग त्यांच्या प्रदीर्घ यत्नाला स्थान मिळण्यास सुरुवात झाली. इ. स. १९३० मध्ये कापडी फळे, इ. स. १९३४ मध्ये आलेख व किंत्ते फळे, इ. स. १९३५ मध्ये भौगोलिक आराखडे फळे, इ. स. १९३६ मध्ये लाकडी भिंतीवर अडकविण्याचे तसेच स्टँडचे फळे, इ. स. १९४० मध्ये फळ्यावर लावण्याचा रंग, इ. स. १९४२ मध्ये काचेचे फळे व इ. स. १९५० मध्ये डस्टर्स असे अधिक अधिक वस्तूंचे उत्पादन या कारखान्यात सुरू झाले.

सुरुवातीला सर्वांकडून विरोध झाला, एवढेच नव्हे तर गिऱ्हाईक लाकडी फळ्याऐवजी कापडी गुंडाळणारा फळा घेण्यास कचरत असे. चिकाटीने त्यांनी आपल्या मालाला एक ग्राहकवर्ग निर्माण करून वाढती गरज निर्माण केली. इ. स. १९३६ साली शिक्षण खाते मुंबईराज्य यांनी मालास मंजुरी दिली. आणि आता भारतातील सर्व राज्य सरकारनी त्यांच्या ह्या मालास मान्यता दिलेली आहे. सुरुवातीस फक्त पुणे येथील शाळेत माल खपविला जात होता. आज देशातील प्रत्येक कोपऱ्यातून माल मागविला जात आहे. एवढेच नव्हे तर 'निर्यात' केला जात आहे. एवढ्यावरच कारखाना पूर्णत्वाला पोचला असे नाही. अजून ही कारखान्याची वाढ करण्याची चालकांची इच्छा आहे. निरनिराळी नियंत्रणे व इतर अन्य कारणाने चालकांची अन्तिम इच्छा अद्याप पूर्ण झालेली नाही. कारखान्याची वाढ व भवितव्य सर्वस्वी लोकाश्रयावर अवलंबून आहे. कै. शंकर लालजी यांचे चिरंजीव रामविलास हे आता हा कारखाना चालवितात. अजूनही कारखाना वाढविण्याची चालकांची इच्छा आहे. असा आहे आमच्या छोट्या गावातील छोटा संपूर्ण स्वदेशी बनावटीचा कारखाना!

## महाराष्ट्र स्टील वर्क्स बारामती

वरील नावाचा छोटा लघु उद्योगधंद्याचा कारखाना बारामती सन १९३८ सालापासून अस्तित्वात आहे. त्याचे मालक श्री. कृष्णाजी पिराजी बनकर यांची मुलाखत घेता त्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

सन १९२९ च्या सुमारास ते कराचीस टिन मेकरचा कारखाना चालवीत होते. कामाची फारशी माहिती नसल्याने कारखाना बंद करावा लागला. पुढील शिक्षणासाठी ते मुंबईस आले, व ट्रंका,



कपाटे बादल्या तयार करण्याच्या कारखान्यात नोकरीस लागले.

स्वतंत्र व्यवसाय करण्याची अन्तरींची तळमळ त्यांना नोकरीत स्वास्थ्य लाभू देईना. बारामतीजवळील अंजनगाव हे त्यांचे वतनदारीचे व शेतीचे गाव होते. नोकरी सोडून आपल्या गावी आले व बाजारानिमित्त त्यांचे येणे जाणे बारामतीस होऊ लागले.

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी इ. स. १९३८ मध्ये बारामती गूळ उत्पादनात अग्रेसर होती. गुळाचे रवे बांधण्यासाठी पत्र्याच्या बादल्या गुऱ्हाळात लागत असत. आपल्या धंद्याचे क्षेत्र श्री. बनकर यांना ह्या ठिकाणी आढळले व त्यांनी 'महाराष्ट्र स्टील वर्क्स' ह्या नावाचा कारखाना सूरू केला. बादल्याचे उत्पादन ते हातकारागिरीने करीत असत. कामाने काम शिकविले जाते. या नियमाला अनुसरून इ. स. १९४८ च्या सुमारास ग्रामपंचायतीचे रस्त्यावरील कंदिलाचे त्यांनी उत्पादन सूरू केले. कंदिलाचा खप फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानात होऊ लागला. खेड्यापर्यंत विजेचा जसजसा प्रवेश होऊ लागला, तसतशी कंदिलाची मागणी कमी पडू लागली व त्यांना अडचण निर्माण झाली.

जातीच्या कल्पक कारागिरास नवनव्या वस्तूंचे उत्पादन करण्यास कधीच अडचणी येत नसतात. कंदिलाची मागणी जशी कमी होऊ लागली, तसे ट्रंका, कपाटे, कॉटस्, लोखंडी खुर्च्या इत्यादि वस्तूंचे उत्पादन हात–कसबीने व यंत्राचे सहाय्याने त्यांनी सुरू केले आहे. त्यांनी मोठ्या कल्पकतेने अंडी उबविण्याचे एक यंत्र "इन्क्यूबेटर" तयार केले आहे. ते मुंबईच्या प्रदर्शनांत ठेवले होते. त्यास महाराष्ट्र राज्याने मान्यता दिली व चांदीचे पदक बक्षीस म्हणून दिले. ह्या यंत्राची तज्ज्ञांनी कसून पहाणी केल्यानंतरच सरकारकडून प्रशस्तीपत्रे मिळाली आहेत. ह्या 'इन्क्यूबेटरला' परदेशातून ही मागणी येत असते, असा आहे बारामतीचा "महाराष्ट्र स्टील वर्क्स" चा छोटा कारखाना, परदेशात वस्तु पाठविणारा.

—

## पूर्णविरामापूर्वीचे चार शब्द

बारामती नगरपालिकेच्या 'शताब्दिपूर्ती समाचार' लिहिण्याच्या कामाला आता पूर्णविराम देण्याची वेळ आली आहे. लिहिण्याजोगे सर्व संपले म्हणून नाही, तर वेळ संपली म्हणून.
'रात्र थोडी व सोंगे फार' अशी एक म्हण आहे, तिची आठवण यावेळी सहज होते.

काळपुरुष कोणासाठी थांबत नाही व मानव वेळ साधण्यासाठी जिवापाड धडपडतो. नगरपालिका स्थापन झाल्याला १०० वर्षे पूर्ण झाली. आता दोन वर्षांनी शताब्दिपूर्ती साजरी होत आहे. विलंब, दिरंगाई, बेपर्वाई अशी दूषणे लोकशाही यंत्रणेला नेहमीच लावली जातात. परिणामाचे बाबतीत लेखकही त्याच वर्गात बसतो, पण त्याची कारणे मात्र निराळी असतात.

साधन-सामुग्री गोळा व्हावयाला वेळ लागतो. नगरपालिकेच्या यंत्रणेने याबाबतीत विशेष विलंब लावला. असे मला म्हणावयाचे नाही. "अति झाले आणि हसू आले" असा प्रकार होण्याचे आत हे काम यथाशक्ति व यथामति उरकले गेले. त्यानंतर लेखकाची वेळ सुरू होते. समाचाराचे आलेखन म्हणजे काही एकादी ललित साहित्य कृतीची निर्मिती नाही हे खरे; पण एक प्रकारच्या ह्या निबंध-लेखनाला मुहूर्त मिळणे ही मोठी बिकट गोष्ट असते यात शंका नाही. वाल्मीकीला "ब्रूहि-रामचरितम्" अशी प्रेरणा झाली, तरी लिहिण्या-साठी कळ यावी लागते. त्याचबरोबर ताक किंवा आंबट पदार्थ दूध नासवितो, त्याप्रमाणे आळस हा प्राणीही मनांतले संकल्प बिघडवीत असतो. हे समर्थन न पटणारे, नाचता येईना अंगण वाकडे, या म्हणीने माझ्यावर वार करतील, याची मला जाणीव आहे.

बारामतीशी माझा जवळ जवळ ५६ वर्षांचा संबंध आहे. म्हणूनच हे काम स्वीकारण्याला झेप



घेतली. वर्ष सव्वा वर्षाचा असताना मला आई-वडिलांनी बारामतीला आणले. डिकसळला ( आताचे भिगवण ) उतरून टांग्याने बारामतीला आलो, पाऊस पडत होता, असे मातोश्रीनी मला परवा सांगितले. तेव्हा दौंड-बारामती रेल्वे नव्हती, ती तीन वर्षांनी सुरू झाली. तेव्हापासून आतापर्यंत माझा बारामतीशी कमी अधिक प्रमाणात संबंध आहे. हे काम करण्याचे निमितानें मी बारामतीला राहिलो व तुम्ही कधीच राहात नाही, अशी तक्रार करणारांना निरुत्तर केले आहे. त्यांना आतां कंटाळा आला असेल.

बारामतीच्या समाज जीवनात, माझ्याशी समवयस्क अशा व्यक्ती व नंतरची तरुण पिढी भाग घेत आहे. सर्वांचा माझा परिचय नाही. पण याचे उलट बरेच लोक या ना त्या निमित्ताने मला ओळखतात, हे पाहून मला फार समाधान होते. त्यांनीच मला या कामी बरेच सहाय्य केले आहे. माझ्या हातून हे काम उत्कृष्ट झाले आहे असा माझा दावा नाही. बारामती नगरपालिकेचा पहिल्या ७५ वर्षांचा इतिहास त्या वेळचे नगरपालिकेचे 'सेक्रेटरी' माझे वडील कै. म. ना. सहस्रबुद्धे यांनी लिहिला. त्यांनी अवलंबिलेल्या पद्धतीचे अनुकरण करण्याचा माझा अधिकार नाही. त्यांनी कायद्यातील सूक्ष्म तरतूदी व नगर-पालिकेच्या कारभाराची चिकित्सा केली आहे. त्या पद्धतीचा अवलंब न करता, जे झाले व होत आहे. त्याचा स्थूल आलेख शब्दरूपाने तयार करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

बारामती नगरपालिकेचे रेकॉर्ड बरेच चांगल्या स्थितीत आहे. इतर एक दोन ठिकाणच्या मानाने मी हे बोलत आहे. पण आहे त्या परिस्थितीत बरीच सुधारणा होणे अवश्य आहे. रेकॉर्डचे काम चांगल्या जाणकाराकडून झाले तर जरूर ती माहिती चटकन व सुसूत्र मिळू शकेल. शंभर वर्षांपूर्वीचे कागद आज उपलब्ध आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. ते टिकविणे हे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

नीरा कॅनॉल आल्याने बारामतीच्या परिसराला सुगीचे दिवस आले. त्याचे अगोदर हा भाग दुष्काळाचा व वैराण होता. शेती वाढू लागली, की तदनुषंगिक घडामोडी सुरू होतात. रस्ते होतात, दळणवळणाची साधने वाढतात. माळेगावला प्रथम साखरेचा कारखाना इ. स. १९१९-२० मध्ये काढण्याचे प्रयत्न झाले. तेव्हा सर्व वहातुक रेल्वेमार्गे करावी लागली. रेल्वे वाढविण्याला परवानगी मिळाली नाही किंवा सध्या कऱ्हा नदीवर पूल आहे. तसा पूलही त्यावेळी नव्हता. यामुळे तेव्हां यंत्र सामुग्रीची व साखर उत्पादनाची वहातूक होण्याला किती त्रास झाला असेल याची आज कल्पनाच करता येईल. आज बारामतीच्या परिसरात तीन साखरेचे कारखाने आहेत. पण ट्रक्सनी वहातूक केव्हा होते ते कोणाला समजत सुद्धा नाही.

बारामती नगरपालिकेच्या लोकशाहीने व कार्यालयानें मला मोठ्या आपुलकीने वागविले. व्यक्तिगत उल्लेख केल्याने खरे समाधान व्यक्त होणार नाही; आणि उगीचच कोणावर अन्याय केल्यासारखे होईल. एवढ्याचसाठी मी नावांचा उल्लेख टाळला आहे.

शताब्दिपूर्ती समाचार तयार करण्याची संधी मला मिळाली. यामुळे मन तृप्त झाले आहे. याच हवापाण्यांत वाढलेला मी पुनः केव्हाही अन्य सेवा करावयाला तयार आहे. बारामतीचे नाव उत्तरोत्तर अधिक कीर्तिशाली होवो व नागरिकांच्या ह्या नगर-संस्थेचे म्हणजे नगरपालिकेचे काम अधिक अधिक संतोषदायक होवो, अशी सदिच्छा व्यक्त करून, मी लेखणीला तूर्त विराम देत आहे.

श्री. म. सहस्रबुद्धे.


खर्च
११२४८९
१२२६८८
१४४२८५
१४६४०१
१५४२२८
१५७४९८
१६८७११
१६४२११
१७०३४८
१७२७८०
१८५६५७
१९४८६१
२०११२२
२१६७२१
२४६११२१
३११७६६
वर्ष
१९५०-५१
१९५१-५२
१९५२-५३
१९५३-५४
१९५४-५५
१९५५-५६
१९५६-५७
१९५७-५८
१९५८-५९
१९५९-६०
१९६०-६१
१९६१-६२
१९६२-६३
१९६३-६४
१९६४-६५
१९६५-६६
नोकरवर्ग
१५०
१५५
१६०
१६५
१७२
१७२
१७२
१७२
१७२
१७२
१७७
१८४
१८४
१८४
१९१
२१३

# बारामती म्यु.कडील जमा – जमेची सदरे

| जमेची सदरे | १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. म्युनिसिपल कर** | | | | | | | | | | | |
| १ जकात | २००८–१५–९ | ३५७५–०–० | ४८४६–४–८ | ५७९१–१५–६ | १३२१०–१०–११ | ४७३४–०–० | ११९७५–१३–६ | ११९७८–५–३ | २१२००–६–६ | १४४४२८–१५–६ | २६६१३८–८६ |
| २ घरपट्टी | — | — | — | ६६५–१०–० | ९३२–४–० | २९७३–०–० | ५२१४–१३–६ | ६१५४–३–३ | १४६७१–०–० | ७३७४८–८–३ | ९६१९१–२१ |
| ३ सफाईपट्टी | — | — | — | — | — | — | १६५१–०–० | १९०४–१०–६ | ५००१–२–० | — | — |
| ४ भंगीपट्टी | — | — | — | — | २०६५–४–० | २१९६–०–० | ११५५–०–० | १२७५–८–० | २८१८–१३–६ | ८२७८–८–० | ८२०८–०२ |
| ५ टोल | — | — | — | — | ३०६१–०–० | २८६२–०–० | ४५६२–१४–९ | ६२९०–१–६ | ५५८४–१–३ | २३१५९–४–६ | ११७९२–२२ |
| ६ गाडीपट्टी | — | — | — | १०६–०–० | २६२–०–० | ४१४–०–० | ९०७–१२–० | १५८८–१२–० | १४०९–०–० | ४०७०–८–० | ७५९३–२५ |
| ७ गाडीपट्टी पत्रा | — | — | — | — | — | — | — | — | ६१–११–० | ५८०–९–६ | ९८२–७७ |
| ८ नोटीस फी | — | — | — | — | — | — | — | — | — | ४–४–६ | ३४–०५ |
| ९ करमणूक कर | — | — | — | — | — | — | — | — | — | २२५०–०–० | ३४६३–०० |
| १० हॉटेल टॅक्स | — | — | — | — | — | — | — | — | — | १५८४–३–० | १५१२–०० |
| ११ धोक्याचे व दुर्गंधीयुक्त | — | — | — | — | — | — | — | — | — | ३२८८–८–० | २९६०–५० |
| धंद्यावरील कर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७–९५ |
| १२ धंदे टॅक्स नोटीस फी | — | — | — | — | — | — | — | — | — | १–१–६ | — |
| १३ हॉटेल टॅक्स नोटीस फी | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| गाडीपट्टी वॉरंट फी | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १२५९७–०० |
| १४ ,, डिपॉझिट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १५ जकात जप्त डिपॉझिट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १६ ट्रॅन्झिट टॅक्स | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७२६–१६ |
| शिक्षण कर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १२६८७–४२ |
| **ब. विशेष कायद्यान्वये उत्पन्न** | — | २४–३–० | ९०–७–६ | १९७–९–० | ७१–५–० | १०५–०–० | ७८०–३–३ | ७७६–१–६ | १३१३–०–० | २३९५–४–० | १८५६–०० |
| १ कोंडवाडा दंड | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १०६९–५७ |
| २ ,, खावटी | — | — | — | — | — | — | — | — | ४६–१५–१० | — | २५२–०० |
| ३ व्हेन्डर्स ॲक्ट | — | — | — | — | — | — | — | — | — | १५१–१४–० | १२८७–२५ |
| ४ शॉप नोंदणी | — | — | — | — | — | — | — | — | — | ३–०–६ | — |
| ऐ. डी. फॉर्म | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १२–७५ |
| **क. म्यु. चे मालमत्तेपासून उत्पन्न** | | | | | | | | | | | |
| १ जमिनीच्या इमारतीचे भाडे | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १६–५० |
| २ सिल्व्हर ज्युबिली हॉ. फी | — | — | — | — | २४९–९–० | ३८–०–० | ९४–३–६ | २८७–१३–० | २६३२–१–६ | ३५२१–१–० | ७२८८–०३ |
| ३ ,, ,, इतर उत्पन्न | — | — | — | — | — | — | १२००–०–० | — | ४१–९–० | ७१–८–० | ७७–५० |
| ४ गुरांचा दवाखाना फी | — | — | — | — | — | — | ३१०–१०–० | ६१९–१५–० | १७१–१२–० | १९५४–८–० | २७९८–४६ |
| ५ ,, ,, इतर उत्पन्न | — | — | — | — | — | — | ३४–८–० | — | २३–०–० | १–८–० | — |
| ६ जागाभाडे उत्पन्न | — | — | ७५–९–४ | — | — | — | — | — | — | ३७९८–०–६ | ४१६४–५३ |
| ७ म्युनिसिपल प्लॉट विक्री | — | — | — | — | — | — | — | — | १२११५०–०–० | — | — |

[library stamp]

# बारामती म्यु.कडील जमा - जमेची सद्रे

| जमेची सदरे | १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १८२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ कटई | — | — | — | — | — | — | — | २९४-११-० | १९८-१२-० | ७६७-१४-० | ४६६-३४ |
| ९ मटन मार्केट लायसेन्स फी | — | — | — | — | — | — | — | — | ३०३-०-० | ११६७-०-० | ३७८-०० |
| १० नोटीस फी } (घरपट्टी) | — | — | — | — | — | — | २२-६-० | ५१-२-६ | १५५-११-० | १०३९-२-३ | ११९०-३१ |
| ११ वॉरंट फी | | | | | | | | | | २४९-८-३ | २६५-५० |
| वॉरंट बजावणी फी | | | | | | | | | | — | २८०-२१ |
| १२ दंड | — | — | — | २०-६-० | ८४-१२-० | — | ९९-१३-९ | ३५०-७-० | १२५-१२-१० | ५२३-४-० | ४४-८० |
| १३ मॅजिस्ट्रेटकडून दंड | — | — | ५-१३-० | — | — | १८०-०-० | — | — | ७८-४-० | — | ११६३-४० |
| **ड. ग्रॅण्टस् व मदत सरकारकडून (लोकल फंडासुद्धां)** | | | | | | | | | | | |
| १ गुरांच्या दवाखान्यास स्टाफवर ग्रँट | — | ६०८-०-० | — | — | — | — | ३००-०-० | २००-०-० | ४५०-०-० | ४१८२-०-० | ४३०२-०० |
| २ गुरांचा दवाखाना | — | — | — | — | — | — | — | — | २७०-११-० | ४५०-०-० | — |
| ३ सॅनिटरी इन्स्पेक्टरचे पगारावर | — | — | — | — | — | — | — | — | — | ४९०-८-० | ७९२-८३ |
| ४ महागाई भत्ता ग्रँट महाराष्ट्र स.स६ | — | — | — | — | — | — | — | — | — | २६९४७-२-० | १३७७८८-६६ |
| ५ कोंडवाडा (दंड) | — | — | — | — | — | — | — | — | — | २०३३-०-० | १६६१-५० |
| ६ जामिनीबद्दल शेकडा ७५ व १५ प्र. सारा परत | — | — | — | — | — | — | — | — | ३३५-०-० | २०५५-१-६ | ३०२५-५२ |
| ७ मोटार-वाहनावर ग्रॅन्ट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७७९-०० |
| ८ शॉप ॲक्ट | — | — | — | — | — | — | — | — | — | १४१८-४-६ | ३८२५-०० |
| ९ मेडिकल ऑ. यांचे पगारावर | — | — | — | — | — | — | — | — | — | १५६६-०-० | २३९५-०० |
| ९अ दवाखाना | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १० एक्साइज ग्रँट | — | — | — | — | ३००-०-० | ९००-०-० | — | — | — | — | — |
| ११ साथीचे रोगशमनार्थ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १२ शिक्षणाकरिता | — | — | — | — | १३६-०-० | १९२४-०-० | ७४००-०-० | — | — | — | ६२६-५६ |
| **लोकलबोर्डाकडून मदत** | | | | | | | | | | | |
| १ सिल्व्हर ज्यु. हॉ. | १००-०-० | — | — | — | २००-०-० | ५५०-०-० } | ३७५-०-० | १५०-०-० | २६२-०-० | ३००-०-० | — |
| २ गुरांचा दवाखाना | — | — | — | — | — | १००-०-० } | — | ५५२-०-० | — | २६०-१३-० | — |
| ३ लोकल फंड सेस् | — | — | — | — | — | — | — | १०१-२-४ | — | — | — |
| ४ साथीचे रोगावरील खर्चापैकी | — | — | — | — | — | — | — | — | — | १६४६-०-० | — |
| ५ शाळा | — | — | — | — | — | — | २००-०-० | — | ३८५०-०-० | — | — |
| **इतर मदत** | | — | — | — | २०७-८-७ | २००-०-० | — | — | — | — | — |
| १ हेल्थ व्हिजिटरचे पगारावर | — | — | — | — | — | — | — | — | १९१५-१-४ | ५१३-१३-० | — |

# बारामती म्यु.कडील जमा – जमेची सदरे

| जमेची सदरे | १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| किरकोळ जमा | | | | | | | | | ३०–६–० | १५–५–० | –– |
| | | | | | | | | | | ३८७–१४–० | ५६४–३२ |
| १ इतर जमा | ४–८–३ | –– | –– | — | १४६–०–७ | ३९१–०–० | १७०८–११–६ | ५३५–०–० | –– | ३१९–१०–६ | ५२४७२–७७ |
| २ व्याजाचे उत्पन्न | २७–१४–० | ११–८–११ | –– | ६९–३–३ | २००–०–० | २०–०–० | ३६२–११–९ | ८१–११–० | १६–८–९ | –– | १०९८६–०० |
| ३ खताचे उत्पन्न | ९–१५–० | २७–१२–० | १८२–४–० | १७७१–८–० | — | ३२७–०–० | १६०५–०–० | ७९१–०–० | २४४३–०–० | ९५९०–०–० | –– |
| ४ नक्कल फी | –– | — | — | — | — | २–०–० | ५–०–६ | ३६–०–६ | ८९–५–६ | २३५–१–० | ४१०–१८ |
| ५ प्रोजेक्शन फी | –– | — | — | — | — | –– | — | — | –– | १३०–१२–० | ४१७–९२ |
| ६ डेडस्टॉक सामान विक्री | –– | — | — | — | — | — | –– | — | –– | ३४३–०–० | २१५–०० |
| ७ साक्षी भत्ता | –– | — | — | — | — | –– | — | — | –– | १०–०–० | ७९–९० |
| ८ फिर्याद खर्च | –– | — | — | — | — | –– | — | — | ४९–१३–० | १५४९–५–० | ६९०–१५ |
| ९ टेंडर फी बयाणा | –– | — | — | — | –– | –– | –– | — | १३–०–० | ३०–०–० | ७–०० |
| १० नियम बुके विक्री | –– | — | — | — | –– | –– | –– | — | –– | –– | ५–५० |
| ११ वाळू फी | –– | — | — | –– | –– | –– | –– | –– | १६९–१२–० | १५९–२–० | –– |
| १२ ऑडिट वसुली | –– | — | –– | –– | –– | –– | –– | –– | –– | ११३–९–६ | १–३७ |
| १३ टेलिफोन चार्ज | –– | — | –– | –– | — | –– | –– | –– | –– | –– | २३७–५५ |
| १४ मतदार याद्या विक्री | — | — | –– | — | –– | –– | –– | –– | १०७–३–६ | –– | ५–९९ |
| १५ कुटुंब-नियोजन | — | — | –– | –– | –– | –– | –– | –– | –– | –– | ७३–४६ |
| १६ बैल खरेदी विक्री | — | — | –– | — | –– | –– | –– | –– | ११०–०–० | –– | –– |
| १७ शिशुसंगोपन केंद्राकडून इतर जमा | — | — | –– | –– | –– | –– | –– | –– | –– | ९२–१३–६ | ४९१–०० |
| १८ अनामत | — | — | २२–१३–२ | –– | –– | –– | ३३–१५–३ | –– | ६१–१४–९ | ११६–१५–६ | २०३५–८० |
| १९ सर्व्हिस बुक विक्री | — | — | — | –– | — | –– | — | –– | | ०–१५–० | ४४२–५९ |
| २० सस्पेन्स खाते | –– | — | — | –– | — | –– | –– | –– | — | –– | ७–४४ |
| २१ ड्रेनेज रिफंड | –– | — | –– | — | –– | — | –– | –– | –– | १९९९–२–६ | ३३५–७३ |
| २२ घरे धुणे | –– | — | –– | — | –– | –– | –– | –– | –– | –– | –– |
| २३ पाणीपट्टी | –– | — | –– | — | — | — | –– | –– | –– | ४२–४–० | –– |
| २४ बैल विक्री-खरेदी पावती फी व कर | –– | –– | १४१२–१–१० | — | –– | — | –– | ५९–०–० | –– | ४७५४–४–० | ४८–०० |
| २५ सर्व्हे जमिनीचे उत्पन्न | –– | –– | ६४८–१४–६ | — | १५३३–१२–७ | १६–०–० | ३३१–१०–० | –– | ३६७२–०–० | ४८–०–० | –– |
| जमीन व घर विक्री | | | | | | | | | जमीन सारा परत जमा. | ४४५०–१२–० | |
| डोळ्यांचा दवाखाना | | | | | | | | | | | |
| डोळ्यांचा दवाखाना फी | — | — | –– | — | –– | — | –– | — | –– | ५४–६–० | १०८३–६० |
| डोळ्यांचा दवाखाना इतर | — | –– | –– | — | –– | — | –– | –– | –– | –– | –– |

## बारामती म्यु.कडील जमा – जमेची सदरे

| जमेची सदरे | १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **म्युनिसिपल लायब्ररी** | | | | | | | | | | | |
| १ म्युनिसिपल लायब्ररी फी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३७२-०-० | १२४-२५ |
| २ म्युनिसिपल लायब्ररी इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ४५-१५-० | ११-५० |
| ३ सरकारी ग्रँट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५१५-०-० | १०००-०० |
| **असाधारण जमा ॲडव्हान्स व डिपॉझिट** | | | | | | | | | | | |
| १ ॲडव्हान्स | -- | -- | -- | -- | -- | ३५३-०-० | १५२०-०-० | ३६००-०-० | ७०-०-० | ४५१८६-१३-० | ३११८३-३२ |
| २ डिपॉझिट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १६२६-०-० | २३०-०-० | ८५०४-१५-६ | ४९१७-४६ |
| ३ डिपॉझिट ( फिक्स्ड ) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | | ३९२७-६-० | -- | -- |
| **सरकारी कर्जफेड** | | | | | | | | ११८६५-०-९ | | | २१४८७८१-५९<br>५०२६७-४९ |
| १ चेकात कमिशन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०-३-० | -- | ०-५० |
| २ जागाभाडे<br>३ जागा भाडे ( बाजारचे उत्पन्न ) | -- | ०-१२-० | -- | ११७८-५-० | ४३८९-११-९ | ७४३५-०-० | १४२८१-४-० | १३६२१-७-३ | १६१०८-१३-० | १०११५-३-० | २७२४-०९ |
| ४ जकात शिडयूल विक्री | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २६३६१-३-९ | २९३३३-०६ |
| ५ ( खत ) तळाचे लिलावाचे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १२-१३-० | -- |
| ६ प. वर्क्स झाडाचे लिलावाचे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ७६५-०-० | ७३०-०० |
| ७ प. वर्क्स लाइटचे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १५-०-० | ७०-०० |
| ८ मैला डेपोवरील गवत लिलाव ( वनचराई ) | -- | ५-०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | ७५-०-० | ६५-०-० | १०-०० |
| ९ सॅनिटरीकडील पेट्रोल ऑईल वहातूक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३१-१४-० | ७६-०० |
| १० सॅनिटरीकडील सांडपाणी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ७५-०० |
| ११ धर्मशाळा लाइट चार्ज | ११९-४-० | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ९५-०० |
| १२ धर्मशाळा किरकोळ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३५-०० |
| १३ पाणी-पुरवठा योजना | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६९४६५०-०० |
| १४ झाडांचा लिलाव | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | | | | | | | -- | | | |
| **दुबेरजी रक्कम** | ७२२-०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | १३५६-०-० | -- | -- | -- |
| शाळांकडील उत्पन्न, ग्रँट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ८१६१-०-० | -- | -- | -- |
| शाळा फी | -- | -- | -- | -- | ३४४-२-५ | ३७०-०-० | १११९-११-६ | -- | -- | -- | -- |
| ,, इतर ( भाडे वगैरे ) | -- | -- | -- | -- | -- | -- | १०९९-१४-० | ११३७-०-० | -- | -- | -- |
| मागील सर्व पानांतील एकूण बेरीज | २९९२-९-० | ४९६९-६-२ | ७२८४-४-० | ९८००-८-९ | २८२०४-०-१० | २६२८०-०-० | ६५६२४-०-९ | ८३४४४-०-० | २२८८४३-०-० | ४३५३३५-२-० | ३६४६९९७-८६ |
| सुरवातीची शिलक | ३५-११-१० | | | | ९३७४-१२-९ | १६८२१-०-० | | ४२७७-०-० | ९३७८-०-० | २३२६८-१५-९ | ८२१४९-६९ |
| एकूण एकंदर | ३०२८-४-१० | | | | ३७५७८-१३-७ | ४३१०१-०-० | | ८७७२१-०-० | २३८२२१-०-० | ४५८६०४-१-९ | ३७२९१४७-५५ |

## बारामती नगरपालिका

### सन १८६५ माहे फेब्रुवारी व मार्च १८६५ ची खर्चाची खतावणी.

| खर्च तारीख | ऑफिस पगार | सा | शिलकी सामान | ठेव | किरकोळ | नाका शिलकी सामान | धर्मशाळा नवीन | धर्मशाळा सादिल | पाणी पुरवठा | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५-२-१८६५ | ११-९-९ | — | — | | | | | | | |
| ७-२-१८६५ | २०-१०-३ | — | — | — | | | | | | |
| ८-२-१८६५ | २४-५-४ | २-०- | ०-१-० | — | | | | | | |
| | | ०-६- | बुधली | | | | | | | |
| — | — | ०-४- | ९-०-० | — | | | | | | |
| | | | गोणपाट | | | | | | | |
| — | — | — | १-१३-० | — | | | | | | |
| | | | सुतळी वगैरे | | | | | | | |
| १७-२-१८६५ | — | — | — | २००-०-० | | | | | | |
| १८-२-१८६५ | — | — | ५-८-६ शिक्का | — | | | | | | |
| | ५६-९-४ | २-११-० | १६-६-६ | २००-०-० | — | — | — | — | — | २७५-१०-१० |
| २-३-१८६५ | — | — | — | — | ३-४-६ बट्टा | — | — | — | — | — |
| ३-३-१८६५ | ६४-४-७ | ५-०-० | — | — | — | — | — | — | — | — |
| ६-३-१८६५ | ३-३-५ | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १०-३-१८६५ | — | — | — | — | ०-१२-६ | — | — | — | १५-२-० | नदींत हेळ |
| २५-३-१८६५ | — | — | — | — | — | *२-०-० | २६-१५-८ | १२-१३-९ | — | करणेबद्दल * कंदील घेतले |
| २५-३-१८६५ | — | १-७-९ | — | — | ०-८-९ | — | — | — | — | — |
| २६-३-१८६५ | — | — | — | १५०-०-० | — | | | | | |
| | ६७-८-० | ६-७-९ | — | १५०-०-० | ४-९-९ | २-०-० | २६-१५-८ | १२-१३-९ | १५-२-० | २५८-८-११ |
| एकूण | १२४-१-४ | ९-२-९ | १६-६-६ | ३५०-०-० | ४-९-९ | २-०-० | २६-१५-८ | १२-१३-९ | १५-२-० | ५३४-३-९ |

## ता. १ मे १८६५ ते माहे एप्रिल १८६६ अखेर खर्चाचा ऐटमवार खतावणी सदर कीर्दीवरून केली ती

## बारामती नगरपालिका १८६५–६६

| | खर्च | ऑफिस पगार | शिपायाचा पगार | भंगी झाडू पगार | टपाल खर्च | नवीन धर्मशाळा बांधणे | शहर सुधारणा, रस्ते वगैरे | सादिल (स्टेशनरी) | मु. ठेव ठेविली | शिलकी सामान (गादी, तक्या वगैरे) | पाणी पुरवठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑफिस पगार<br>शिपाई पगार | २३०–०–० }<br>७०–०–० } | २५–०–० | १०–०–० | १५–०–० | ०–१–० | १८–१३–६ | ( मुरुम टाकणे, खड्डे बुजविणे ) | ५–०–० | २४७–०–० | २०–११–३ | ११–४–६ |
| भंगी झाडू पगार | १९८–१२–० | २५–०–० | १०–०–० | १५–०–० | ०–१–० | ६३–१–९ | १–०–० | ५–०–० | ५०–०–० | १–६–३ | २७–७–३ |
| टपाल खर्च | ०–११–३ | २५–०–० | १०–०–० | १५–०–० | ०–१–० | ६८–२–० | ०–१२–६ | ५–०–० | ५०–०–० | ४–४–३ | |
| नवीन धर्मशाळा | १७६५–०–२ | २५–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | ३१४–३–९ | १४–५–९ | ८–०–० | | १७–१२–० | |
| शहर सुधारणा रस्ते रिपेअर वगैरे | १०२–३–९ | २५–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | २९–८–८ | ४५–३–३ | ५–०–० | | | |
| ऑ. सादिल | ५८–०–० | १२–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | ०–८–६ | १–१३–० | ५–०–० | | | |
| तसलमात ठेव | ३४७–०–० | १२–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | ६५०–०–० | ९–१२–६ | ५–०–० | | | |
| शिलकी सामान | ४४–१–९ | १२–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | २३८–१३–६ | १६–९–९ | ५–०–० | | | |
| पाणी पुरवठा | ३८–११–९ | १२–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | १९४–७–३ | | ५–०–० | | | |
| | | १२–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–३ | ४२–५–३ | | ५–०–० | | | |
| | | १५–०–० | ५–०–० | १५–०–० | ०–१–० | १००–०–० | | ५–०–० | | | |
| | | १५–०–० | | ७–८–० | | ४५–०–० | | | | | |
| | | १५–०–० | | २६–४–० | | | | | | | |
| एकूण खर्च | २८५४–८–८ | २३०–०–० | ७०–०–० | १९८–१२–० | ०–११–३ | १७६५–०–२ | १०२–३–९ | ५८–०–० | ३४७–०–० | ४४–१–९ | ३८–११–९ |

# बारामती म्यु. कडील खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १-२-६५ ३०-४-६५ | १-४-६५ ३०-४-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. सामान्य देखरेख व वसूली खाते** | | | | | | | | | | | | |
| १ ऑफिस एस्टॅब्लिशमेंट | १२४-१-४ | ३००-०-० | ८६६-०-० | ३००-०-० | ५३८-०-० | ६७५-९-१० | १०५१-०-० | १५४२-६-० | २२८३-०-० | ३५१७-१४-० | ९७०२-१०-० | १०३४८-४६ |
| २ ऑफिस सादिल | ९-३-९ | ५८-०-० | २६-०-० | -- | -- | ३९-१२-३ | -- | ११०-४-९ | १०१-०-० | ९९९-११-० | १५१०-१२-० | ४०१-१४ |
| ३ ,, छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २११-०-० | — | ३५३-२-० | ४८०-२५ |
| ४ ,, टपाल खर्च | -- | ०-११-३ | २८-१५-६ | -- | -- | -- | -- | ५३-०-० | ६०-०-० | १४०-१-० | ४०८-२-० | ६३४-०५ |
| ५ ,, शिलकी सामान | १६-६-६ | ४४-१-९ | -- | -- | -- | -- | -- | -- | १७१-०-० | ८१-१-० | ५४७-२-३ | ५४४-३० |
| ६ ,, जागा भाडे | -- | -- | ३६-०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | — | ८६८-०-० | १५९७-९८ |
| ७ ,, लाईट | -- | -- | — | -- | -- | -- | -- | -- | -- | — | -- | १०४४-४५ |
| ८ ,, रंग रिपेअर | -- | -- | ५-०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | — | -- | — |
| ९ टेलिफोन चार्जेस | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | -- | — |
| **ब. कर वसूल खाते** | | | | | | | | | | | | |
| १ जकात एस्टॅब्लिशमेन्ट | -- | -- | -- | ९२०-३-९ | ८४२-८-७ | ९६४-१०-५ | १००२-०-० | ११९१-१५-६ | २०२५-०-० | ४१७०-४-६ | १६६६६-०-६ | ५३००३-६१ |
| २ ,, सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३३५-१५-० | २८६-०-० | ९१८-७-६ | ५३२-७-० | ७५१-९२ |
| ३ ,, छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | २७३२-१२-६ | ७९९३-२५ |
| ४ ,, नवी नाकी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | १९३१-१५-३ | -- |
| ५ नाका दुरुस्ती | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ८२-१४-६ | ३७-०-० | ८०-०-० | २५-१५-० | ७५-३० |
| ६ शिलकी सामान | २-०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | ९४-८-० | ३३-०-० | — | | ६१२-९५ |
| ७ नाका लाईट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | ७१८-२-९ | ७५०-६५ |
| ८ नाका भाडे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | --. | -- | — | -- | २११-०० |
| **क. टोल खाते** | | | | | | | | | | | | |
| १ टोल पगार खाते | -- | -- | -- | -- | -- | ९२४-०-४ | ७७२-०-० | ११९१-१५-३ | ५३३-०-० | १००८-१०-३ | ४७४३-११-३ | १३९४५-१२ |
| २ ,, सादील | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २४२-१०-३ | ६१-०-० | ४००-०-० | -- | — |
| ३ ,, छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | — | -- | — |
| ४ ,, इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | -- | -- |
| **ड. वाहनावरील कर** | | | | | | | | | | | | |
| १ पगार खाते | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १०९-०-० | २०२-७-५ | ९४८-५-३ | ३०-०० |
| २ सादील | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ९९-०-० | ९८-८-० | ४३८-१५-६ | ४०७२-०० |
| ३ छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | ३६-०-० | ५४६-६५ |
| ४ इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | — | -- | ४७-०० |
| ५ खानेसुमारी खाते | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | — | -- | -- |
| ६ गाडीपट्टी डिमांड | -- | -- | -- | -- | - | -- | -- | -- | -- | -- | — | — |

## बारामती म्यु. कडील खर्च–खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ. घरपट्टी वगैरे कर | | | | | | | | | | | |
| १ पगार खाते | -- | -- | -- | -- | -- | -- | २४०–०–० | ६१३–०–० | ११२१–१५–६ | २९५३–०–० | ३९२८–०० |
| २ सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | ७४–३–० | ५६–०–० | ८६–१०–० | ८७–३–० | २५५–९५ |
| ३ छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १२३–८–० | ५००–०० |
| ४ घरांना फेर नंबरिंग करणे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ घरपट्टी आकारणी वगैरेबद्दल रिव्हिजन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २४०८–२२ |
| ६ घरपट्टी रिफंड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ७१६–४–० | ९८–४४ |
| फ. रिफंड खाते | | | | | | | | | | | |
| १ जकात रिफंड | -- | -- | -- | -- | ४७१५–७–० | -- | ११–१३–० | ३४–०–० | ४०–०–० | २५६–१३–३ | २३८९–७२ |
| २ इतर फंड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १०१९–०–० | ७–०–० | २१८–०–० | ३–१५ |
| ग्रॅच्युइटी वगैरे | | | | | | | | | | | |
| १ ग्रॅच्युइटी | -- | -- | -- | -- | १०–०–० | -- | -- | -- | -- | १४४–८–० | -- |
| २ प्रॉव्हिडंट फंड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५९०१–३–० | ६२३८–२८ |
| ३ जमीन मोजणी व खरेदी फी वगैरे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २९१–०–० | -- | २९७६–८–० | -- |
| ४ प्रा. फंड पगार | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ज. सार्वजनिक सुरक्षितता | | | | | | | | | | | |
| १ गॅरेज स्टोअर रूम | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २५९–८–० | -- |
| २ हिंस्र जनावरे मारणे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| आग खाते | | | | | | | | | | | |
| १ आग खाते पगार | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ ,, सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ ,, बक्षीसादाखल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ ,, मोटार गॅरेज लाइट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ४६–२० |
| ५ शिलकी सामान | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १००४–७० |
| दिवाबत्ती खाते वगैरे | | | | | | | | | | | |
| १ पगार | -- | -- | ५४७–१२–६ | ३१४–३–९ | -- | १६२३–०–० | ४९२–१४–३ | -- | -- | -- | -- |
| २ रस्त्यावरील दिवे लावणे | -- | २३६–१२–६ | -- | -- | ७३९–७–० | -- | १५०१–१४–३ | ३५५८–०–० | २८९४–४–९ | २४०३०–८–० | २१३५७–५० |
| ३ इतर लाईट अलौउन्स | -- | -- | ८–२–० | -- | -- | -- | -- | -- | -- | ६०–––० | ४०–०० |
| ४ हिंस्र जनावरे मारणे पिसाळलेली कुत्री वगैरे | -- | -- | -- | १३–१२–११ | -- | -- | २–१–१ | ४१–०–० | -- | -- | -- |

## बारामती म्यु. कडील खर्च-खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सार्वजनिक आरोग्य व सुखसोई** | | | | | | | | | | | |
| १ पाणी पुरवठा स. नं. २ | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| २ ,, जनरल पाणी पुरवठा | — | — | — | — | — | — | — | — | — | १८५४९-२-० | — |
| ३ ,, पाणी पुरवठा पगार | — | — | — | — | — | — | — | — | २६३-१५-३ | — | ११०५५-२५ |
| ४ नदीमध्ये विहिर बांधणेचा खर्च | १५-२-० | २५०-५-९ | — | १०१-१३-० | ९४-६-० | १८६-०-० | — | — | — | — | ३३६८-३० |
| ५ सार्वजनिक विहिरी उपसणे वगैरे | — | २६-१४-६ | ९९-४-३ | — | — | — | — | ९९-०-० | २५०-०-० | ५-१२-० | — |
| ६ इलेक्ट्रिक मोटर्स | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ कसबा वॉटर सप्लाय | — | — | — | — | — | — | — | — | — | १७-१२-० | ५०९९-७६ |
| ८ इंजिन शेड लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ९ कसबा नदीतील पायऱ्या बांधणे | ३८-११-९ | २१९-१४-० | — | — | — | — | — | — | — | — | — |
| **ड्रेनेज खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | ४२-०-० | ४४०-५-४ | ४०१-०-० | ९११-०-९ | १६८२-०-० | ३५५८-६-३ | ९७८४-१-० | १७३७०-६९ |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | ५६-१५-६ | २८-००- | १४६२-१०-० | ५७१-८-० | २३३-२५ |
| ३ दुरुस्ती | — | — | — | — | — | — | — | १५८-०-० | ७५१-१३-९ | २४६-११-० | ४१३-४३ |
| ४ इतर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| **सार्वजनिक आरोग्य व देखरेख खाते** | | | | | | | | | | | |
| १ सॅनिटरी इन्स्पेक्टर व मुकादम पगार | — | — | — | — | — | — | — | — | — | ६८८५-११-० | ७७५४-३४ |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | ६१-१४-९ | ४७४-४२ |
| ३ इतर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| **सर्व साधारण सफाई खाते** | | | | | | | | | | | |
| १ झाडूवाले पगार | १९८-१२-० | ३१-४-० | ११६०-३-० | १०२२-३-३ | २९५६-१२-९ | ५२१७-०-० | १६४३-७-६ | १७६१-०-० | ४९५०-१५-९ | २३६५१-२-० | ३४८८०-९४ |
| २ ,, सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | २५४-८-० | १३४-०० |
| ३ ,, कचरा मोटार टायरट्यूब | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ६४०-३४ |
| ४ कचरा मोटार दुरुस्ती | — | — | — | — | — | — | — | — | — | ७१४०-४-० | १९२-२५ |
| ५ ,, पेट्रोल वगैरे | — | — | — | — | — | — | — | २६५-०-० | — | २७७७-११-० | — |
| ५अ बैलखरेदी | — | — | — | — | — | — | — | २६८-०-० | ११३७-१२-० | ६२८-११-३ | ५९८-३३ |
| ६ जनावरांची खिलाई | — | — | — | — | — | — | १०६६-८-९ | ९१-०-० | ११८२-७-३ | ७०-७-६ | — |
| ७ बैलगाडी दुरुस्ती | — | — | — | — | — | — | — | — | ६४९-६-० | — | — |
| ८ कचरा मोटार एस्टॅ | — | — | — | — | — | — | ५६८-१५-६ | ८४२-०-० | १२९४-१४-६ | ११९८-१-० | ९३८८-२३ |
| ९ ,, सादिल | — | — | — | — | — | — | १२४-२-० | ७९९-०-० | ४६१५-८-० | ६३७-४-६ | — |
| १० कचरा कुंड्या | — | — | — | — | — | — | १७-११-० | — | २११-१५-९ | ४३६-१-० | ५७८३-१२ |
| ११ गाडी दुरुस्ती | — | — | — | — | — | — | १९-६-० | — | — | — | — |

## बारामती म्यु. कडील खर्च – खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **खास सफाई खाते** | | | | | | | | | | | |
| १ भंगी पगार खाते | — | — | ४९९–९–७ | ६८६–१–६ | — | — | २२४७–१२–९ | २४७७–०–० | ५८८३–१५–६ | १२२७३–६–० | १८३७३–९० |
| २ सादील | — | — | — | — | — | — | — | २४५–०–० | ४२८–१४–९ | २९२–६–६ | १४१–०० |
| ३ मैला मोटार पगार खाते | — | — | — | — | — | — | — | — | — | ७३७९–१०–० | १०९३०–०३ |
| ४ ,, सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | २४०–१४–३ | — |
| ५ ,, दुरुस्ती | — | — | — | — | — | — | — | — | — | ५०३८–२–६ | ३४१–०६ |
| ६ ,, सामान वगैरे | — | — | — | — | — | — | — | — | — | ३९३–९–९ | १–०० |
| ७ ,, पेट्रोल तेल वगैरे | — | — | — | — | — | — | — | — | — | २०६४–५–० | १२६०–८० |
| ८ ,, फिनाभिल पावडर | — | — | — | — | — | — | — | — | — | १५००–०–० | ५६०–०० |
| ९ नवीन संडास | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १० संडास दुरुस्ती | — | — | — | — | — | — | १०८–१३–० | ३५–०–० | २४१–१४–० | ३१७–२–० | ९९–६४ |
| ११ कुंड्या दुरुस्ती | — | — | — | — | — | — | १२–२–० | — | ३५–१२–० | — | — |
| १२ सार्वजानिक मुताऱ्या | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ११–७९ |
| १३ मैला मोटार टायर ट्यूब | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १०५४–६१ |
| १४ मैला हातगाडया | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७७७–९० |
| १५ ,, ट्रॅक्टर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ३२२५–७५ |
| १६ ,, पगार | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १११४–२५ |
| **कंपोस्ट खाते** | | | | | | | | | | | |
| १ अॅस्टॅब्लिशमेंट | — | — | — | — | — | — | — | — | — | ५५२०–१४–० | — |
| २ सादिलं | — | — | — | — | — | — | — | — | — | ९००–०–० | — |
| ३ नवीन खड्डे करणे | — | — | — | — | — | — | ५५–३–६ | — | — | — | — |
| **सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | ८४३–२–८ | ३३५–०–० | ५१८–१–५ | ९९८–०–० | २३९०–०–० | १५१२–०–० | २३४०–०–० | ५००९–१२–० | १८३११–१४–० | २११७२–४९ |
| २ सादिल | — | — | — | — | १६८–११–२ | — | २१०–७–९ | २४५–०–० | ९७०–११–९ | १०१६–१–९ | १९१५–९४ |
| ३ औंषधे व हत्यारे | — | — | — | — | ४५७–८–३ | — | १८९०–१५–६ | १०७०–०–० | १४३३–१४–० | १०१२–१५–० | ४७६८–३३ |
| ४ रोग्यासाठी अन्न | — | — | — | — | — | — | — | — | — | ५१–१४–० | १६–२४ |
| ५ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ४९–०० |
| ६ दुरुस्ती, रंगरिपेअरी | — | — | — | — | ३४–५–५ | — | ४१–१–० | ९२–०–० | २२६–५–० | ८६०–२–३ | ४६२–५२ |
| ७ शिलकी सामान | — | — | — | — | ४–९–६ | — | १९–१४–६ | — | — | ३७–२–० | १३३६–४६ |
| ८ डॉक्टर पगार ग्रॅन्ट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ५१७२–०० |
| ८अ कुत्र्याच्या लसीचा खर्च | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ४५२–४१ |
| ९ नवीन संडास | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १० नर्सचा पगार ( सेवासदन ) | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

# बारामती म्यु.कडील खर्च – खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | २५०-०-० | | | | |
| ११ रेफ्रिजेरेटर | — | — | — | — | — | — | — | — | — | १६५९-१४-६ | १९५६-०० |
| १२ लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ३५३-९० |
| १३ टेलिफोन चार्जेस | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १४ टी. बी. वर्गणी | — | — | — | — | — | — | — | १६०७१-०-० | — | — | — |
| १५ नवीन इमारत | — | — | — | — | — | — | — | ११-०-० | २५-२-० | — | — |
| १६ किरकोळ | — | — | — | — | २०-२-० | — | २३-९-० | — | — | — | — |
| **गुरांचा दवाखाना** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | — | ८४०-०-० | ६८२-०-० | ९०६-०-० | १७९२-१३-० | ७७१७-०-० | ४८६६-०० |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | १११-७-६ | १८६-०-० | ३९४-६-० | ८६३-७-० | ८२७-०६ |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | ५९-८-० | — |
| ४ औषधे | — | — | — | — | — | — | २८९-५-० | २०३-०-० | २३३-०-० | १५४५-१४-६ | ५०१९-२२ |
| ५ जादा नवीन खोल्या | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ६ दुरुस्ती | — | — | — | — | — | — | ५१-१४-० | १९१-०-० | १२५-१०-० | ४८०-१३-९ | १६४-१६ |
| ७ शिलकी सामान | — | — | — | — | — | — | २३-९-० | — | — | — | २०३-३२ |
| ८ इतर | — | — | — | — | — | — | — | — | — | ९-२-० | — |
| ९ लाइट खाते | — | — | — | — | — | — | — | — | — | १४४-१-० | १७२-६२ |
| १० ज. स्टाफवर पगार ग्रँट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ४३०२-०० |
| ११ गुरांचा दवाखाना ड्रेनेज | — | — | — | — | — | — | २६३-४-० | — | — | — | — |
| **डोळ्यांचा दवाखाना** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | — | — | — | — | — | ७३३-११-० | ३२३२-४२ |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | ४-१३-० | ६-०० |
| ३ औषधे | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २७-४० |
| ४ दुरुस्ती | — | — | — | — | — | — | — | — | — | १०३-८-० | — |
| ५ शिलकी सामान | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २०९-०० |
| ६ लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ मेडिकल ऑफिसर अलाउन्स | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २४७५-०० |
| ८ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७-५० |
| **जन्म मृत्यू खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | ९६-०-० | ३६-०-० | ६६-३-१ | ६५-०-० | १५३-१४-६ | २०३-०-० | ३८५-१३-९ | ८७१-३-० | १२९५-६४ |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | — | २-८-० | १-१२-० | — |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २१-०० |
| ४ फिर्याद खर्च | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

## बारामती म्यु.कडील खर्च – खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **देवी खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | ६२–०–० | ६९–१४–६ | ६०–०–० | १०२–३–० | १७४–०–० | १४८–०–० | — | ३१६–०० |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | १–०–० | ५९–१०–६ | ८–०–० | ८५–३५ |
| ३ लसीचा खर्च | — | — | — | — | — | — | — | — | — | ७१–३–० | — |
| ४ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २६–०० |
| ५ व्हॅक्सिलेटर | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ५०–०० |
| **साथीचे रोग शमविणे** | | | | | प्लेग | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | ३०८–७–१ | ६५५–०–० | — | ३५३–०–० | १०१२३–५–६ | ७९५–१५–० | २४३५–५६ |
| २ लसीचा खर्च | — | — | — | — | — | — | — | — | — | ६६–१५–० | ३००९–१७ |
| ३ फिनाईल पावडर डी. डी. टी. | — | १४–६–० | — | — | — | — | — | — | — | ९७९–९–६ | — |
| ४ सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | ५०५–१०–० | ४४८–९७ |
| ५ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७९–५० |
| ६ कॅम्प हॉस्पिटल लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | ४८–०–० | ५१–५० |
| ७ डी. डी. टी. ऑपरेशन | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ८ मलेरिया प्रतिबंधक उपाय | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ३५९–२८ |
| **स्मशानभूमी नवीन** | | | | | | | | | | | |
| १ स्मशानभूमी दुरुस्ती | — | — | | | | | — | — | — | — | ४३–७४ |
| २ धर्मशाळा दुरुस्त | — | — | — | — | — | — | — | — | — | २५०७–११–० | ८–७५ |
| **मटन मार्केट व कत्तलखाने** | | | | | | | | | | | |
| १ पगार खाते | — | — | — | — | — | — | — | — | — | १७१२–५–० | २५६७–९२ |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | ११–७–० | ५–०० |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | १३५–०–० | ११–०० |
| ४ रिपेअर | — | — | — | — | — | — | — | — | — | २५२–१३–९ | १६२–५९ |
| ५ लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | ६०–०–० | ९४–९० |
| ६ रिफंड | — | — | — | — | — | — | ८८–७–० | — | — | — | — |
| ७ मार्केटमध्ये पाणी भरणे | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| **जागा भाडे खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | ५०६१–११–६ | ३८९–०–० | ६१२–८–० } | ८८२–०–० | १७५८–१४–६ | १७१४–१४–० | २५५८–०० |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | ९५–८–० } | ६२–०–० | ३००–०–३ | १९–६–० | ३७–५२ |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | २३४–०–० | — | — | २८०–८–० | ५६–५० |

## बारामती म्यु.कडील खर्च – खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ रिपेअर | — | — | — | — | — | — | — | ३८१–०–० | १०९–२–० | १३०–९–६ | ४१५–२७ |
| ५ रिफंड | — | — | — | — | — | — | — | — | २०–०–० | ३–६–० | ३६–०० |
| ६ बाजार | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ भाजी मार्केट लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | ६०७–०–० | १००–३६ |
| ८ गुरे बाजार खरेदी सादिल | — | — | — | — | — | — | — | — | — | ५१५–०–० | — |
| **कोंडवाडा खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | २५–१०–० | ५०–०–० | १६६–७–३ | १५५–०–० | २७३–५–९ | ८४०–११–० | २२७८–७१ |
| २ सादिल | — | ०–१०–० | — | — | — | — | १८–८–० | ८–०–० | १५–१४–९ | — | १–२५ |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ३१–०० |
| ४ खिलाई | — | — | — | — | — | — | ३३–६–० | २९–०–० | ८२–११–० | ४०–०–० | ५९९–०० |
| ५ दुरुस्ती | — | — | — | — | — | — | ३८–६–६ | ११–०–० | — | — | — |
| ६ रिफंड दंड | — | — | — | — | — | — | — | — | — | २२०९–०–० | १९८८–५० |
| **सार्वजनिक धर्मशाळा** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | ४२–११–३ | ६७–०–० | १०८–०–० | ८४–०–० | २५२–०–० | ६७–०–० | — |
| २ सादिल | १२–१३–९ | — | — | — | — | — | ०–४–० | ४५–०–० | ५–१३–० | ३–१२–० | — |
| ३ दुरुस्ती (नवीन) | २६-१५-८ १७६५-०-२ | ४–४–९ | — | — | — | — | — | ७४१–०–० | ४–१–० | — | २५३३–५४ |
| ४ लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | १९०–२–० | ४९७–१० |
| **बाग खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार झाडास पाणी घालणे वगैरे | — | १८–६–६ | ११०–१–९ | ६३–१४–६ | १०७–१३–१० | ३०८–०–० | — | १४४–०–० | २६७–१०–० | २१३३–६–० | ३९८१–०० |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | ३३–०–० | ५११–१०–९ | १९५–१२–० | २४४६–५७ |
| ३ खेळण्याचे सामान | — | — | — | — | — | — | — | — | — | ३३५०–०–० | — |
| ४ नवी फुलझाडे | — | — | — | — | — | — | — | — | — | ५७–१–० | ६१–७० |
| ५ इतर ( कसबा बाग ) | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ६ कसबा बाग लाइट | — | — | — | — | — | — | — | — | — | २११०–१५–० | ५२–८७ |
| ७ बाग कंपौंड रिपेअर | — | — | — | — | — | — | — | — | — | २६–०–० | — |
| **पब्लिक वर्क्स खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | २९–१–६ | ६७–८–९ | ६२–१४–१ | २९०–०–० | ८२१–०–० | ८३३–०–० | ५७७–१०–३ | १८६३–१५–० | २४८५–०० |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | ४५–११–६ | ३५–०–० | १२५–१३–० | ७५–२–० | ३३–०० |
| ३ छपाई | — | — | — | — | — | — | — | — | — | — | २००–०० |
| ४ हत्यार | — | — | — | — | — | — | — | २८–०–० | ६–१२–० | ४४–७५ | ३९–४४ |
| ५ इमारत दुरुस्ती व शेड | — | १७–०–३ | — | २३–४–०६ | ८७–१३–६ | ४१–०–० | १९५५–१४–६ | २८८–०–० | २०१–०–० | ११३–६–६ | ४–५७ |

## बारामती म्यु.कडील खर्च – खर्चांची सदरे

| खर्चांची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ नवीन रस्ते व रस्ते रिपेअर | १०२–३–९ | १४९–८–६ | १३०–९–३ | ३१२–३–० | २१४०–४–० | २७४२–०–० | ५८४५–४–५ | २०७७–०–० | १९६३–०–६ | १०६२३–२–९ | १०१३–१७ |
| ७ हरिजन क्वार्टर्स | — | — | — | — | — | — | — | — | — | ६३६–९–३ | — |
| ८ मटेरिअल खरेदी | — | — | — | — | — | — | — | — | — | ५०९५–२–६ | २९३६–३० |
| ९ नवीन ड्रेनेज | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १० बाजार डेव्हलपमेंट | — | — | — | — | — | — | १०५१८–११–५ | ४५८–०–० | — | — | ११२८–८६ |
| ११ टेंडर बयाणा परत | — | — | — | — | — | — | — | — | ११५७–६–० | ३७७–३–६ | ११४०–४९ |
| १२ बाजारातील मोरी बांधण्याबद्दल | — | २४३–१०–९ | — | — | — | — | ६६१–८–० | — | — | — | — |
| १३ म्युनिसिपल नवीन इमारत | — | — | — | — | — | — | ३७७–०–० | २८१–०–० | ७५२–१४–० | २७५६–९–३ | — |
| रस्त्यावर पाणी टाकणें | | | | | | | | | | | |
| १ पगार | — | — | — | — | — | — | — | — | — | २११८–१४–० | १६८०–०० |
| २ पाणी मोटार रिपेअर | — | — | १४३–७–३ | २६–५–६ | — | — | — | — | — | ३४१–६–० | १५८७–७७ |
| ३ सामान | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १८३–९० |
| ४ पेट्रोल | — | — | — | — | — | — | — | — | — | १३३६–३–० | २५५३–७० |
| ५ टायर ट्यूब | — | — | — | — | — | — | — | — | — | — | ७२१–३७ |
| फ्लशिंग खाते | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १ पगार | — | — | — | — | — | — | — | ३२३–०–० | — | — | — |
| २ सादिल | — | — | — | — | — | — | — | १०७०–०–० | ३४८–०–० | ३१४३–१३–० | २५१८–७३ |
| ३ इंजिन सामान रिपेअर | — | — | — | — | — | — | — | — | ७०७–४–० | २३३७–६–० | ४८४७–०८ |
| ४ पाईप कनेक्शन | — | — | — | — | — | — | — | — | — | ५२१–५–३ | ८६०–१७ |
| ५ लाईट | — | — | — | — | — | — | — | — | — | ३६३–१–३ | — |
| प्राथमिक शाळा मदत | | — | — | — | — | — | — | — | — | ८९–१२–० | ९५–३० |
| शिक्षण कर रिफंड | | — | १०१९–१३–७ | ६००–०–० | ३४६६–१४–४ | ५२३६–०–० | १८७२–१५–९ | — | ११६१७–०–० | ३५००–०–० | — |
| मदत व देणग्या | — | — | — | — | — | — | — | — | ३८५०–०–० | — | १५३२७–१६ |
| १ रिमांड होम | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| २ इंग्रजी शाळा एम. ई. एस्. हायस्कूल | — | — | — | — | — | ३००–०–० | — | — | — | ४००–०–० | ४००–०० |
| ३ बारामती जिमखाना | — | — | — | — | — | — | २०००–०–० | २१००–०–० | २१००–०–० | ३६००–०–० | ३६००–०० |
| ४ लोकसेवा मंडळ | — | — | — | — | — | — | — | — | — | २००–०–० | २००–०० |
| ५ गांधर्व संगीत विद्यालय | — | — | — | — | — | — | — | — | १००–०–० | २००–०–० | २००–०० |
| ६ धर्मशाळा इमारतीस मदत | — | १५०–०–० | — | — | — | — | — | — | — | २००–०–० | २००–०० |
| ७ जैन धर्मार्थ दवाखाना | — | — | — | — | — | — | — | ३५०–०–० | ४००–०–० | २५००–०–० | २५००–०० |
| ८ श्री शाहू मराठा बोर्डिंग | — | — | — | — | — | — | — | — | — | ५००–०–० | ५००–०० |
| ९ शिमगा स्पोर्टस | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

## बारामती म्यु. कडील खर्च-खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० डॉ. आंबेडकर बोर्डींग | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १५०-०-० | ५००-०० |
| ११ छत्रपति शाहू हायस्कूल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २५००-०-० | २५००-०० |
| १२ महिला मंडळ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १०००-०० |
| १३ महात्मा गांधी बालक मंदिर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६००-०० |
| १४ बारामती कॉलेज अनुदान | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १५ ने. ज. लायब्ररी मदत | -- | -- | -- | -- | -- | -- | ९२-०-० | ९२-०-० | ९२-०-० | -- | २५००-०० |
| **शॉप ॲक्ट खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २८१९-०-० | ३३८३-०० |
| २ सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६-४-० | ३-०० |
| ३ छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ७-८-० | २८-५० |
| ४ इतर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०-१५-० | -- |
| ५ सायकल अलौंन्स | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **म्युनिसिपल लायब्ररी खाते** | | | | | | | | | | | |
| १ पगार | -- | -- | -- | -- | ४०-[illegible]-० | १२०-०-० | -- | -- | -- | ७८०-०-० | १०५७-५७ |
| २ वर्तमानपत्रे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३५२-५-० | ५३८-८१ |
| ३ सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २६-१२-६ | १४-०० |
| ४ छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ फर्निचर सामान वगैरे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ लाईट खर्च | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १७४-७-६ | १७४-४० |
| ७ रंग रिपेअर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १९९-८-० | -- |
| ८ शिलकी सामान | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ९४-३-० | ४०६-७२ |
| ९ लायब्ररी पुस्तके | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६७४-९-९ | ४१-५२ |
| १० लायब्ररी मासिके | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १९९-१-० | ३४८-५५ |
| **शिशुसंगोपन केंद्र** | | | | | | | | | | | |
| १ हेल्थ व्हिजिटर पगार व दाई पगार | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २४०५-०-० | -- | -- |
| २ दूध केंद्र | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २१६७-२-० | ३५९१-९८ |
| ३ दूध | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २९८३-३-६ | ३४८६-०० |
| ४ फळभाजी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ६०-०-० | ५२-०० |
| ५ साखर, तांदूळ वगैरे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १५९-६-० | १५९-८१ |
| ६ औषधे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १३७-७-६ | १७४-२६ |
| ७ जळण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ७१-१-० | १४४-२९ |
| ८ रिपेअर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १८-१२-० | ११-५० |

# बारामती म्यु. कडील खर्च-खर्चाची सदरे

| खर्चाची सदरे | बजेट अंदाज १८६५-६६ | १८७५-७६ | १८८५-८६ | १८९५-९६ | १९०५-०६ | १९१६-१७ | १९२५-२६ | १९३५-३६ | १९४५-४६ | १९५५-५६ | १९६४-६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ सादिल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५०-१४-३ | २४-१५ |
| १० शिलकी सामान | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १६-१२-० | १३०-८० |
| ११ छपाई | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १२ कुटुंब-नियोजन केंद्र | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १४-०० |
| १३ कुटुंब-नियोजन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १४ शि. स. लाईट | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २२-८-० | -- |
| किरकोळ | ४-९-९ | -- | १६९-६-९ | १३७-५-११ | १०६-९-० | ८७६-०-० | -- | -- | -- | -- | -- |
| | | -- | १४०-१५-९ | २३५४-१०-९: | | २००-०-० | -- | ६-०-० | -- | -- | -- |
| १ छापणावळ, कागद वगैरे | -- | -- | -- | -- | -- | -- | ४३-१०-० | -- | ५०६-८-० | -- | ४१२-५० |
| अ १ ज. छपाई | -- | -- | -- | -- | -- | ५१-०-० | -- | -- | -- | -- | ६३७८-३६ |
| २ जनरल इलेक्शन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ फिर्याद खर्च | -- | -- | -- | -- | -- | -- | १९२-९-६ | २८७-०-० | २०१-१०-० | ५३८९-८-६ | १४०१-१५ |
| ४ जमीन सारा | -- | १००-०-० | -- | -- | १९-९-९ | ५६-०-० | ९९-९-९ | ३४-०-० | ४४४२-९-३ | ५६-११-० | १८४६-४१ |
| अ ४ जमीन खरेदी | -- | ९-१४-३ | -- | -- | -- | -- | -- | -- | ३६७२-०-० | ७३२-९-६ | १२१-६३ |
| ५ शिलकी सामान | -- | २३-६-० | -- | -- | -- | -- | ३०-९-० | ६९-:-० | ४८-१२-३ | ७३-१०-३ | ३७-६५ |
| ६ पुस्तके व वर्तमानपत्रे | -- | ४-१३-६ | -- | -- | -- | -- | ३५४-७-६ | -- | १६५-०-० | २७०५-१०-६ | १३५७-८० |
| ७ अन् फोरसीन ( किरकोळ ) | -- | ५१-३-९ | -- | -- | -- | -- | -- | -- | २५३-१५-० | १८२५-०-० | -- |
| ८ खानेसुमारी म्युनिसिपल बाय लॉज | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ४२६-१-० | ५३३-८० |
| ९ प्रवास खर्च | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २०-०-० | -- | ३०-०-० | ३०-०० |
| १० रेडिओ रिपेअर वगैरे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ११ ऑडिट ( फी ) | -- | -- | -- | -- | -- | -- | ४८५-४-० | -- | -- | -- | -- |
| १२ प्रांतिक समारंभ भूमीपूजन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १२९-२-० | -- | ५३०-०० |
| १३ स्वातंत्र्यदिन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १२-०-० | ३५-४५ |
| १४ तालुका व जिल्हा क्रीडामहोत्सव | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १५ जागा खरेदी | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २२०-२५ |
| १६ युनिव्हर्सिटी लेक्चर्स बःहिशालकेंद्र | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ११३-०-० | -- |
| १७ ओपन एअर थिएटर मदत | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १८ महागाई भत्ता रिफंड | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १९ वेडे, महारोगी चार्ज | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ८१९-१२-० | २७४-५० |
| २० मोटार इन्शुरन्स | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २९६-३-० | ९३-८५ |
| २१ नोकर ड्रेसेस् | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २००१-१२-० | ४२७२-०५ |
| २२ शेतकी प्रदर्शन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २३ दारूबंदी योजनेच्या यशस्वींकरता बक्षीस | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २४ पानसावरी तोडणे ( निवडुंग ) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २५ अनामत | -- | २२-२-६ | -- | -- | -- | -- | ५०-६-९ | ९-०-० | -- | -- | -- |

## बारामती म्यु. कडील खर्च – खर्चांची सदरे

| खर्चांची सदरे | बजेट अंदाज १८६५–६६ | १८७५–७६ | १८८५–८६ | १८९५–९६ | १९०५–०६ | १९१६–१७ | १९२५–२६ | १९३५–३६ | १९४५–४६ | १९५५–५६ | १९६४–६५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. साधारण खर्च** | | | | | | | | | | | |
| १ दी लाईफ इन्शुरन्स व्याज खर्च | — | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ ॲडव्हान्स | — | -- | -- | -- | -- | २६०–०–० | १३२०–०–० | १००–०–० | ७०–०–० | ५१२१४–१२–० | ७७६३२४–९० |
| ३ डिपॉझिट | — | -- | -- | -- | -- | -- | -- | ५४३–०–० | ३८९४–६–० | ५३९८–५–६ | ४५७८–८७ |
| ४ फिक्सड् डिपॉझिट | — | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २१७६४८१–६७ |
| ५ नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट | — | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ इन्व्हेस्टमेंट | — | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ७ ठेव ( दुकानात ) | ३५०-०-० ३४७ ०-० | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **कर्ज खाते** | | | | | | | | | | | |
| १ व्याज खर्च | -- | -- | -- | -- | -- | -- | ५०००–०–० | ३११३–०–० | १०८६–१३–० | -- | ३३८–६६–४५ |
| २ मुद्दल खर्च | -- | -- | -- | -- | -- | -- | | | | -- | ३११७७–५० |
| मागील सर्व पानांतील एकूण खर्चाची बेरीज | ५३४-३-९ २८५४-८-८ | ३३५७–१४–८ | ५७६३–१–८ | ७७६१–१४–७ | २६५३०–३–२ | २६२४८–०–० | ६९१२८–३–८ | ७८१७८–०–० | १०७९३७–०–० | ४१३९४६–४–३ | ३५००३९०–२४ |
| साल अखेर शिल्लक | -- १७३-१२-२ | -- | -- | — | ११०४८–१०–५ | १६८५३–०–० | — | ९५४३–०–० | १३०२८४–०–० | ४४६५७–१३–६ | २२८७५७–३१ |
| एकूण एकंदर खर्च | — ३०२८-४-१० | — | — | — | ३७५७८–१३–७ | ४३१०१–०–० | — | ८७७२१–०–० | २३८२२१–०–० | ४५८६०४–१–९ | ३७२९१४७–५५ |

ST.15

# बारामती नगरपालिकेच्या नोकरवर्गाचा खातेवार खर्चाचा तक्ता इ. स. १९५०–५१ ते १९६५–६६.

| अ. नं. | खात्याचे नांव | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ | १९५४–५५ | १९५५–५६ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय | ८९८२ | ९४०६ | ९५४५ | ९६८१ | १०६८१ | ९७०२ |
| २ | गुमास्ता कायदा | २६२२ | २६९९ | २०५३ | २७२४ | २७६४ | २८१९ |
| ३ | घरपट्टी | २८०५ | २९०८ | २९५५ | २१४७ | २९४१ | २९५२ |
| ४ | जकात | १२८३६ | १६०९२ | १६५४२ | १६९२७ | १७२८२ | १६६६६ |
| ५ | टोल | २२४४ | ४२२२ | ४२४१ | ४४५६ | ४६९२ | ४७४४ |
| ६ | गाडीपट्टी | ६६८ | ८४६ | ८६८ | ८८६ | ९३७ | ९४८ |
| ७ | जागा भाडे | १६०५ | १७३७ | १७४६ | १७४० | १७४७ | १७१५ |
| ८ | सॅनिटरी देखरेख | ६४४४ | ७०२४ | ६५३६ | ६४१२ | ७५८२ | ६८८६ |
| ९ | ,, ड्रेनेज | ८१७४ | ८१६० | ८९०५ | ९६६४ | ९८५१ | ५७८४ |
| १० | ,, कंपोस्ट | २७७७ | ४४६६ | ५४८५ | ५२७० | ५८०२ | ५५२१ |
| ११ | ,, झाडुवाले | १४२२६ | १६९२७ | १७५८६ | २१८५१ | २२८८० | २२६५१ |
| १२ | ,, भंगी | ९१२० | ११०५० | ११६५० | ११८९८ | १२५०८ | १२२७३ |
| १३ | ,, कचरा मोटर | ६८९८ | ७८१२ | ९०८२ | ८६५५ | ५०१२ | ९१९८ |
| १४ | ,, मैला मोटर | ३८५८ | ४९४६ | ६३११ | ६७९६ | ७५८७ | ७२८० |
| १५ | सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल | १२६०२ | १६६८४ | १६४४३ | १५१२१ | १५८७५ | १८२१२ |
| १६ | साथीचे रोग | २०८ | ५०९ | ८७९ | ७८० | ७९६ | ७९६ |
| १७ | मटनमार्केट | १५०३ | १६७८ | १७६१ | १७५१ | १७९५ | १७१२ |
| १८ | कोंडवाडा | ६२९ | ८२७ | ८५२ | ८४० | ८७२ | ८४१ |
| १९ | धर्मशाळा | ६७६ | ८४२ | ७९९ | ८२० | ८६६ | ६७ |
| २० | बाग | ११०४ | १८६१ | २०४० | २०६२ | २१४८ | २१२२ |
| २१ | गुरे दवाखाना | ३६४६ | ३८९१ | २७५७ | ३५२० | २५२८ | ७७१७ |
| २२ | जन्ममृत्यू | ७६८ | ९०० | ९०० | ९४२ | ३९४ | ८७१ |
| २३ | बांधकाम | १७३८ | २०१४ | १७०० | १६८० | १६५२ | १८६४ |
| २४ | गटार धुणे | १७३७ | २०११ | २११८ | २७९३ | २८६२ | २१०४ |
| २५ | शिशु संगोपन | २२८४ | २३२१ | २४६५ | २६२५ | २४५२ | २१३७ |
| २६ | डोळ्यांचा दवाखाना | ८१६ | २८४ | २१२४ | ७८० | ७९७ | ७६४ |
| | | | २२३१ | २३६६ | २०२६ | २१६० | २००० |
| २७ | पाणी शिंपडणे | — | — | १८२० | १८८५ | २०७७ | २११५ |
| २८ | ग्रंथालय व वाचनालय | — | १५०९ | -- | ६३५ | ७४६ | ७८० |
| २९ | पाणीपुरवठा | — | — | -- | -- | -- | -- |
| | | ११२४८९ | १२२६८८ | १४१२८५ | १४६४०९ | १५४१३८ | १५७४९८ |

| अ. नं. | खात्याचे नांव | १९५६–५७ | १९५७–५८ | १९५८–५९ | १९५९–६० | १९६०–६१ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय | ९८३२ | १०७७५ | १०२४८ | १०२८२ | १०२४८ |
| २ | गुमास्ता कायदा | २५४६ | २२७६ | २१५३ | २१९६ | २२४१ |
| ३ | घरपट्टी | ३३८० | २५८५ | २२२९ | २८७० | १४२७ |
| ४ | जकात | २०६९४ | २१८७१ | २५०१६ | २७५४४ | २९५५२ |
| ५ | टोल | ५४४४ | ५७५१ | २५९१ | ७२४८ | ७७८७ |
| ६ | गाडीपट्टी | १०८९ | ११५० | १४४५ | २४०६ | २५७६ |
| ७ | जागा भाडे | १८२२ | १७५५ | १८३१ | १८२१ | १९९० |
| ८ | सॅनिटरी देखरेख | ६८२६ | ४९९६ | ४८११ | १७७१ | ६६७६ |
| ९ | ,, ड्रेनेज | ९६९२ | १०६४७ | १०६८१ | १०६८२ | १२१५४ |
| १० | ,, कंपोस्ट | ५६५१ | ५६६५ | ६०२५ | ५७१५ | ५७६५ |
| ११ | ,, झाडुवाले | २५२०८ | २६५९९ | २६९७३ | २५५५ | २७७४८ |
| १२ | ,, भंगी | १२११५ | १२७९१ | १२५५४ | १२२२२ | १२५०७ |
| १३ | ,, कचरा मोटर | ८१४४ | ७८९१ | ७८१६ | ८०६३ | ८१२४ |
| १४ | ,, मैला मोटर | ७४५१ | ७७६० | ७६७९ | ७२३७ | ६८२० |
| १५ | सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल | १७१८५ | १६७५९ | १७११७ | १६७२६ | १८८४० |
| १६ | साथीचे रोग | ८०४ | ८०८ | १०६० | ८०५ | ८९८ |
| १७ | मटनमार्केट | १७९८ | १५१९ | १[illegible]९४ | १८३९ | २००२ |
| १८ | कोंडवाडा | ८३७ | ८८८ | १२१५ | १६१० | १७६० |
| १९ | धर्मशाळा | -- | -- | -- | -- | -- |
| २० | बाग | २१६६ | १२०१ | [illegible]५५ | २२२० | २८६९ |
| २१ | गुरे दवाखाना | २५९० | २५१८ | [illegible]५६ | २५९० | २९०८ |
| २२ | जन्ममृत्यू | ८८९ | ९१० | [illegible]१२ | ९९६ | ९२६ |
| २३ | बांधकाम | २१०३ | १९२० | २[illegible]७० | २८२६ | २९४ |
| २४ | गटार धुणे | २१२९ | २२७१ | २२१६ | २३४४ | २४५५ |
| २५ | शिशु संगोपन | २२४० | २५६२ | २[illegible]८० | २८४६ | २०१६ |
| २६ | डोळ्यांचा दवाखाना | ७६३ | ७८० | [illegible]१६ | ११२१ | २३५६ |
| | | २१४१ | २१४२ | २०६५ | २१६० | १८५० |
| २७ | पाणी शिंपडणे | २११२ | २०६३ | २१६० | १८९० | २२२७ |
| २८ | ग्रंथालय व वाचनालय | ८२९ | ८०७ | [illegible]०२ | ९९६ | ८५४ |
| २९ | पाणीपुरवठा | १०६२ | १२२८ | २२२२ | २४२१ | २६२४ |
| | | १५८७११ | १६४२११ | १७०३४८ | १७२७८० | १८५६५७ |

| अ. नं. | खात्याचे नांव | १९६१–६२ | १९६२–६३ | १९६३–६४ | १९६४–६५ | १९६५–६६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय | १०२७७ | १०४४९ | १०६४४ | १०३४८ | १४०९८ |
| २ | गुमास्ता कायदा | २४८० | २४८० | ३६४५ | ३३८३ | ५०९३ |
| ३ | घरपट्टी | १७४५ | २१६९ | ३५७६ | ३९२८ | ८३१६ |
| ४ | जकात | २६१८० | २९५०४ | ४३६४३ | ५३००३ | ६६६२७ |
| ५ | टोल | ९५२० | १०२८८ | ११४८४ | १३९४५ | १७५८० |
| ६ | गाडीपट्टी | ३०१४ | २१७८ | ३४८४ | ४०७२ | ४८०३ |
| ७ | जागा भाडे | २०८८ | २१८४ | २३५० | २५५८ | ३००४ |
| ८ | सॅनिटरी देखरेख | ६१८८ | ६१५४ | ६५४७ | ७७५४ | ९१३२ |
| ९ | ,, ड्रेनेज | ११५५३ | १२६१० | १४१६६ | १७३७१ | १८५६० |
| १० | ,, कंपोस्ट | ३८५५ | २६६२ | ३६६० | ४४६२ | ६२९९ |
| ११ | ,, झाडुवाले | २५५१६ | २७११८ | २९६८८ | ३४८८१ | ४१८५१ |
| १२ | ,, भंगी | १२७४६ | १२४६१ | १४२८१ | १८३७४ | २२७५४ |
| १३ | ,, कचरा मोटर | ५८९१ | ८०६२ | ८४०७ | ९३८८ | १०३१८ |
| १४ | ,, मैला मोटर | ८६९२ | ९४२८ | १००८९ | १०९३० | १०४९१ |
| १५ | सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल | ११९०६ | १८१२६ | १८३०७ | २११७२ | २०५४३ |
| १६ | साथीचे रोग | २०२४ | २०३० | २००८ | २४३६ | २४१२ |
| १७ | मटनमार्केट | २०५७ | २२१९ | २३८४ | २५६८ | २९३८ |
| १८ | कोंडवाडा | १८८२ | १८८७ | २००७ | २२७१ | १४६४ |
| १९ | धर्मशाळा | -- | -- | -- | -- | -- |
| २० | बाग | २४०४ | २४९७ | ३५९५ | ३९८१ | ४४७८ |
| २१ | गुरे दवाखाना | ४१२५ | ४१४० | ४६०२ | ४८६६ | ६८२[illegible] |
| २२ | जन्ममृत्यू | १०२६ | ६०१ | ११३२ | १२९६ | १५६[illegible] |
| २३ | बांधकाम | ३१५१ | २२२१ | २३१२ | २४८५ | ५२[illegible] |
| २४ | गटार धुणे | २६५९ | २६५१ | २६३३ | २५१९ | ४२[illegible] |
| २५ | शिशु संगोपन | २०८६ | ३०३६ | ३[illegible]८३ | ३५९२ | ३८[illegible] |
| २६ | डोळ्यांचा दवाखाना | २०२१ | २७५८ | २९[illegible]० | ३२३२ | ४१[illegible] |
| | | २२८७ | १४२४ | १४३० | १६८० | १८[illegible] |
| २७ | पाणी शिंपडणे | १५८२ | | | | |
| २८ | ग्रंथालय व वाचनालय | ९५९ | १०६४ | १०८३ | १०५८ | १६[illegible] |
| २९ | पाणीपुरवठा | २१६८ | २७७१ | ३२६९ | ३३६८ | ३५[illegible] |
| | | १९४८६१ | २०१२२२ | २१६७२९ | २४६९२९ | ३११[illegible] |